प्रदेश साकल्याचा

दिनानाथ मनोहर

प्रकरण पहिले

प्रेरणा आत आल्याची चाहूल लागून अजिताने समोरच्या पत्रावरील आपली नजर वर केली. भिंतीवरील घड्याळात पाच वीस झाले होते. खुर्ची मागे सरकवून उठत अजिता म्हणाली, 'प्रेरणा, मला आज ह्याच भागात सात वाजता एक अपॉईंटमेंट आहे. तुम्ही निघा सर्व."

बोलता बोलता अजिताने सहजतेने प्रेरणाच्या खांद्यावर हात टाकला, दोघी खोलीच्या बाहेर आल्या. पायऱ्या उतरून त्या खालच्या मजल्यावर आल्या, नरेश, नायर, लतिका तिघेही पोर्चमध्ये तिची प्रतिक्षा करत उभे होते. अजिता दाराशीच थांबली, मागे वळून

पाहात म्हणाली, "सत्या कुठयं? नायरजी, मी थांबतेय साडेसहापर्यंत. आपल्या सीएकडून एक क्वेरी आलीय, पण त्याबद्दल उद्या बोलू आपण. नरेश, ह्या लोकांना स्टॉपपर्यंत पोचवून दे आणि गाडी ठेवून तूही जा. मला परत विचारायला येऊ नकोस वर. राघव येईलच काही वेळात."

"दीदी, तुला कुठे सा◌ोडायचं असेल तर मी थांबते थोडावेळ." प्रेरणा म्हणाली.

"नको गं बाई. तुला वेळेवर सोडलं नाही तर तो विजय मला शिव्या देईल. मी स्टाफला गोड गोड बोलून एक्स्प्लॉईट करते असं म्हणतोच नाही तरी तो."

"ओ...! डझ् ही से सो, दीदी? मी त्याला झापते चांगलं आज. तुझी इन्व्हेस्टीगेटीव्ह पत्रकारीता तुझ्याजवळ राहू दे सांगते त्याला. "

''प्रेरणा... अगं गमतीनं म्हटलं मी. माझ्यावरून आणि आपल्या संस्थेवरून भांडू नका तुम्ही. म्हणजे भांडू नका असं नाही म्हणत मी. पण भांडायला इतर खुप विषय आहेत की तुम्हाला. काय नायरजी, बरोबर आहे ना माझं म्हणणं?"

नायरांचं वय फार तर चौपन्न पंचावन्न होतं. पण त्याचं वागणं एखाद्या वृध्दसारखं होतं, त्यांनी केवळ स्मित केलं आणि ते जीपकडे वळले. व्ही.आर.डी.सी. मध्ये कामाला लागून त्यांना आज सहा वर्षे झाली होती, तरीही ह्या तरुण पोरांपोरींना मोकळेपणी हसताना, खिदळताना पाहिलं की, त्यांना काहीतरी चुकत असल्यासारखं वाटत असे. सुरुवातीच्या काळात त्यांनी अजिताला सल्लाही दिला होता, 'मॅडम, मला उपदेश करायचा नाहीये, पण आपल्या हाताखालील माणसांशी इतकं खेळीमेळीनं नाही वागू. जरा जरब पाहिजे नाहीतर गैरफायदा घेतात लोक, कामचूकारपणा करतात.'

अजिताने त्यांचा सल्ला ऐकून त्यांचे आभार मानले होते. पण आपल्या वागणूकीमध्ये मात्र काही बदल केला नव्हता. कालांतराने नायरांच्या लक्षात आले होते, स्टाफमेंबर्समध्ये अजिताबद्दल आपलेपणा होता, आदरही होता, आणि आदराच्या भावनेत भीतीच्या भावनेचा भागही होता. अजिताचा समजूतदारपणा त्यांनी पाहिला होता आणि वेळप्रसंगी ती किती कठोर होऊ शकते हे ही त्यांनी पाहिले होते. तिचा कामाचा सपाटा वाखणण्यासारखा होता. परंतु काही वेळा ही बाई जरा विचित्र वागते. मध्येच दोन दोन दिवस नाहिशी होते आणि अशावेळी तिच्याशी संपर्क साधता यावा, यासाठी फोन नंबर वा पत्ताही देऊन जात नाही. अशावेळी आपली सर्व कामे उरकून, आवश्यक त्या सूचना देऊन ती जाते हे खरं, पण तरीही आपण कुठे सापडू शकू ह्याबद्दल ती काही माहिती ठेवत नाही हे नायरनां पटत नव्हते. नायरांचा स्वभाव पापभीरू आणि व्यंकटेशावर त्यांची अपार श्रृध्द. ह्या निरिश्वरवादी स्त्री बॉसशी आपलं कसं पटेल अशी

त्यांना शंकाच होती. पण मग त्यांच्या लक्षात आलं होतं, कुणाच्या धार्मिक भावनांचा ती अनादर करत नाही, परंतु ऑफिसमध्ये एकाही देवाची तसबीर नको असंही तिनं स्पष्ट सांगितले होते. समाजातील उच्च पदावरील नेत्यांबद्दल, समाजातील मान्यवरांबद्दल जो आदर असायला पाहिजे तो अजिता दाखवत नाही. स्वातंत्र्यकाळातील थोर सेनानींबद्दलही तिला आदर नाही हे पाहून नायरांना फारच खेद झाला होता. पण काही वेळा चर्चेतून त्यांना जाणवलं होतं, ह्या सेनानींबद्दल तिला त्यांच्यापेक्षा कितीतरी जास्त माहिती होती. पण एकूणच अजिताच्या विचित्र स्वभावाबद्दल नायरांचं विश्लेषण होते की, वयाची चाळीशी उलटूनही अजिताने लग्न केले नाही म्हणूनच तिच्या स्वभावात हा विचित्रपणा आला आहे.

आपल्या बोलण्यावर नायर केवळ स्मित करून गाडीकडे वळलेले पाहून, अजिताही मागे वळत प्रेरणाकडे पाहात आवाज गंभीर करीत म्हणाली,

'प्रेरणा, दिवस मोठे वाईट आहेत बाई. तरुण पोरींनी वेळच्या वेळी घरी पोचलेलं चांगले असतं, नाहीतर आईबापांना उगाच चिंता."

"ऐक प्रेरणा ऐक. दीदी काय सांगत्येय ते." लतिकाने हसत प्रेरणाला टोमणा मारला.

त्यांचा निरोप घेऊन भराभर पायऱ्या चढत अजिता वरच्या मजल्यावर पोचली आणि आपल्या खोलीत घुसली. टेबलावरील उघडया पत्रावर तिने परत एक धावती नजर टाकली, तळाला डाव्या कोपऱ्यात इमिजिएट ॲक्शन असा शेरा मारून तिने ते पत्र जवळच्या ट्रेमध्ये ठेवले आणि पत्रांच्या गठ्ठयातून दुसरे पत्र तिने पुढे घेतले.

सर्व टपाल वाचून संपवले तेव्हा पावणेसात वाजले होते. ती उठली, खिडकी बंद करताना तिची नजर खाली गेली. नरेशने जीप आणून ठेवली होती. सत्याने

तिची यामाहा फाटकाबाहेर काढून, फाटकाला कुलूप लावले होते. अंगण स्वच्छ झाडलेले दिसत होते आणि झाडांना नुकतेच पाणी घातल्याने, संध्याप्रकाश ात ती टवटवीत दिसत होती. तिने रस्त्याच्या पलीकडे पाहिले. सावित्रीबाईच्या झोपडीजवळील मैदानात पोरं व्हॉलीबॉल खेळत होती. दोघी तिघी बाया आपल्या पोरांना घेऊन मैदानाच्या कोपऱ्याला बसून खेळ पाहात, आपसात गप्पा मारत होत्या. आपलं ऑफिस इथे आल्यापासून ह्या झोपडपट्टीची कळा बदललीय. इथे जागा घेतली तेव्हा बिल्डरने तिला बजावलं होतं, 'मॅडम, ही वस्ती सेफ नाही. पश्चाताप होईल पहा तुम्हाला.' प्रथम काही महिने जरा त्रासही झाला होता. बिल्डींगकरता आणलेला मुरुम झोपडयात वापरला गेला होता. पण हळूहळू संबंध बदलत गेले होते. इथल्या लोकांशी ओळखीचे संबंध निर्माण केले होते ते जीप ड्रायव्हर नरेशने. मग लतिकाने तर पोरांशी दोस्ती करून व्हॉलीबॉल क्लबच सुरू केला होता. त्यातूनच उकिरडयाची सफाई होऊन हे खेळाचे मैदान तयार

झाले होते. छोटया फाटकातून बाहेर येता येता अजिताच्या मनात आलं, आपलं हे ऑफिस ह्या अस्ताव्यस्त पसरलेल्या शहरातील सेफेस्ट जागा आहे असं म्हणायला हरकत नाही. सर्व झोपडपट्टीच ऑफिसचं संरक्षण करायला हजर आहे.

मुख्य रस्त्यावर आल्यावर शहराकडे न वळता ती उलट दिशेला वळली. दोन एक किलोमिटर्स गेल्यावर तिने एका एस.टी.डी. टेलीफोन बुथपाशी आपली गाडी थांबवली. काऊंटरवरील फोनवरून तिने आपल्या ऑफिसचा नंबर फिरवला. रींग काही वेळ वाजत राहिली. तिला माहीत होतं फोन उचलायला ऑफिसमध्ये कुणी नाहीये, तरीही काही वेळ वाजणारी रिंग ऐकत राहिली. हँडसेट ठेवून ती बाहेर आली. परत यामाहावर आरुढ होण्याआधी ती रोडकडे पहात काही वेळ उभी राहिली, मग गाडी चालू करून तिने परत पुढचा प्रवास सुरू केला. सहाएक किलोमिटर्स गेल्यावर ती मुख्य रस्ता सोडून कोटाईपल्लीकडे जाणाऱ्या

रस्त्यावर वळली. सूर्य नुकताच क्षितिजामागे गेला होता. पश्चिमेला क्षितीजावर अजूनही ढगांच्या खालच्या कडा लाल सोनेरी दिसत होत्या. अजून अंधारायला सुरुवात झाली नव्हती. पण तरीही हा निर्मनुष्य झाला होता. रस्त्याला रहदारी तुरळकच होती. डाव्या हाताला असलेल्या चर्चला वळसा घालून रस्ता डावीकडे वळत गेला. चर्चच्या पुढेच रस्त्याला समांतर दफनभूमीची भिंत. दफनभूमीच्या कोपऱ्याला पोचल्यावर मुख्य रस्ता सोडून, भिंतीच्या बाजूने गेलेल्या लहानशा वाटेवर ती खाली उतरली. दफनभूमीच्या भिंतीच्या बाजूने दुसऱ्या कोपऱ्यावरील फाटकाशी जाऊन ती आत शिरली. फाटकाच्या आतल्या बाजूस जरा बाजूला तिने आपली टू व्हिलर उभी केली. गुलमोहरच्या झाडांच्या लाल फुलांचा सडा कबरींवर आणि भोवती पडला होता. संध्याकाळच्या ह्यावेळी झाडांची दाट सावली अधिकच गडद झाली होती. अजिता तेथेच थोडीशी रेंगाळली व बाहेर आली. चोहोबाजूला तिने शोधक नजरेने पाहिले. कोपऱ्यावर वळून दफनभूमीची भिंत आणि नदीच्या

मध्ये असलेल्या चिचोळया पट्टीत वाढलेल्या जंगलातून झाडाझुडपातून जाणाऱ्या वाटेने ती झपाटयाने चालू लागली. ही वाट रहदारीची नव्हती. दोन तीन ठिकाणी तर अजिताला खाली वाकून आडव्या आलेल्या फांद्या चुकवाव्या लागल्या. नदी येथून दिसत नव्हती. मात्र त्या दिशेने पक्ष्यांचा कलकलाट ऐकू येत होता. दफनभूमीच्या भिंतीला सोबत करत जाणारी पाऊलवाट पुढे जाऊन नदीकडे वळली. अजिता पाऊलवाटेने खाली उतरत नदीजवळ पोचली. नदीच्या जवळील लहानशा मंदिराजवळच्या पाराजवळ बसलेल्या एसेनने तिच्याकडे पाहून आपला मूठ वळलेला हात वर करून जिंदाबाद केला. तिनेही हात उंचावून उत्तर दिले आणि ती त्याच्याशेजारी येऊन बसली.

आरामात बसून ती काही क्षण नदीच्या पृष्ठभागाकडे पाहात राहिली मग तिने त्याच्याकडे वळून पाहिले. तो तिच्याकडेच पाहात होता. त्याच्या ओठावर किंचित स्मित होते, मात्र त्याचा चेहऱ्यावर

थकल्याच्या खाणाखूणा दिसत होत्या. त्याच्या पालथ्या हातावर आपला हात ठेवत किंचित जवळ सरकत तिने विचारले,

"काय म्हणताहेत आपले शस्त्रनिर्माते कॉम्रेड्स्?"

"ओ फाईन. दे आर हॅपी. इगोरने त्यांना काही नवीन खेळणी दिली आहेत.'' तो म्हणाला. अजिताला परत एकदा त्याच्या आवाजाचं वैशिष्टय जाणवलं. ह्याचा आवाज मृदू आहे, पण त्यात एक प्रकारची धार, एक जरबही आहे.

"हं, सुन्या, मला ह्या इगोरचं काय करायचं काही समजत नाही बाबा." अजिता जरा गंभीर होत म्हणाली.

"अजिता, तु त्यात उगाच डोकं घालू नकोस. तुझं त्याच्याविषयीचं काय मत आहे हे तू स्पष्ट शब्दात स्टेट कमिटीसमोर मांडले आहेस. स्टेट कमिटीने तुझा रिपोर्ट

सेंट्रल कमिटीकडे पाठवला आहे. आणि आता इगोर परतलाय बिहारला. ती मंडळी बघून घेतील त्याचं काय करायचं ते."

"ओ..? केंव्हा गेला तो? पण मला काही बोलला नाही. मला भेटला होता तो परवा. हॉटेल खैबरमध्ये."

"खैबरमध्ये! कधी अजिता?"

"तीनच दिवसांपूर्वी."

"म्हणजे निश्चित कोणत्या तारखेला? कोणत्या दिवशी?"

"आज 19 जून.'' अजिताला एसेनच्या आवाजातील बदल जाणवला होता, " 15 तारखेला संध्याकाळी तो हॉटेल खैबरमध्ये होता, आणि 16 ला सकाळीही."

"कसं शक्य आहे. ही लेफ्ट फॉर पाटणा ऑन ट्वेल्थ. आर यू शुअर?"

"अगदी तारीख, वेळेसकट सांगू शकते मी तुला. 'वनअर्थ'ने साऊथ झोनची मिटींग घेतली होती खैबरमध्ये. संध्याकाळी मिटींग संपल्यावर आम्ही बसलो होतो पोर्चमध्ये गप्पा मारत. तर समोर इगोर काऊंटरवर रिसेप्शनिस्टशी बोलून घाईघाईत आत जाताना पाठमोरा दिसला. मी म्हटलं, त्याला हॅलो म्हणावं. म्हणून उठले, काऊंटरवर जाऊन विचारले तर रिसेप्शनिस्ट म्हणाली, 'मॅडम, हा पोरगा कोल्ड ड्रींक्स घेऊन चाललाय पहा. जा त्याच्या बरोबर.'

मी त्या पोऱ्याबरोबर गेले, त्याने खोली दाखवली. मी बेल वाजवली तर इगोरनेच दार उघडलं. मला पाहून त्याला धक्काच बसला असावा, मला वाटलं जरा घाबरलाच तो. त्याच्या चेहऱ्यावरची नाराजी पाहून मी घाईघाईत त्याला म्हणाले, 'आमची मिटींग आहे इथं.

तुम्हाला पाहिलं म्हणून सहज हॅलो करायला आले.' त्यानंतर तो सावरला, म्हणाला, 'आज सकाळीच आलो मी इथं आणि उद्या सकाळी जातोय गयेला. तुमचा काय प्रोग्रॅम?'

'आमची मिटींग संपल्यातच जमा आहे. उद्या सकाळी समारोप होईल, बारानंतर सुट्टी.'

'मग आपल्याला भेटणं कठीणच आहे. ठीक आहे पुढच्या वेळी भेटुया.' असं म्हणत, चक्क दरवाजा बंद करून घेतला त्यानं. आत कोण आहे हे मला दिसू नये अशी त्याची धडपड होती हे माझ्या लक्षात आलं होतं, म्हणून मीही त्याच्या खांद्यावरून आत नजर टाकली होती. तेथे दोघंजण होते. त्यातील एकाला मी ओळखलंय सुन्या. तो हिंदू एकताचा पंडीत शर्मा होता."

"गुडनेस! डू यु रिअली सी हीम देअर?"

तिने काही वेळ काही उत्तर दिले नाही.

"म्हणजे काय? दुसऱ्या दिवशी पहाटे उठून गार्डनमध्ये फिरत होते, बहुधा इगोरनं मला पाहिलं असावं, तो स्वत: होऊनच सामोरा आला, मी हसतच त्याला विचारलं, हे पात्र कुठं भेटलं तुला? मी काय म्हणतेय हे त्याच्या लक्षात आलं नाही. बहुधा मी कुणाबद्दल बोलतेय हेही त्याच्या लक्षात आलं नसावं, मग मी त्याला म्हटलं, 'मी पंडित शर्माबद्दल विचारतेय.' त्यांने चक्क सुटकेचा निश्‍वास टाकला, म्हणाला, 'तुमच्या मंडळींनी माझ्यावर एक कामगिरी सोपवली होती.' एवढे बोलला आणि घाईघाईने सटकला तेथून."

एसेन काही वेळ विचार करीत राहिला, मग म्हणाला, "अजिता, देअर इज समथिंग फिशी हीअर. आता मी गेलो होतो ना, आपले शस्त्रतज्ज्ञ कॉम्रेड सांगत होते, तेथील स्टाँच हिंदुत्ववादी संघटना हल्ली फार ॲग्रेसिव्ह झाल्यात. जेथे ख्रिश्चन व हिंदू मिक्स

वस्ती आहे तेथून ख्रिश्चनांना बाहेर जाण्याकरता प्रेशर आणत आहेत. पण ती हिंदुत्ववाद्यांचे धोरणच दिसत्येय. हिंदूतेरांना हिंदूपासून वेगळे करायचे, त्यांचे एकमेकांशी संबंध येऊ द्यायचे नाहीत. त्यांच्याजवळील अस्त्रेही आता अधुनिक झाली आहेत. पोलीसांनी टाकलेल्या छाप्यात सापडलेली अस्त्रे ही भारतात तयार झालेली नाहीत. ती युरोपात कुठेतरी बनली असावीत असं जीएमचे मत आहे. पण ती त्यांच्यापर्यंत कशी पोचली हे गूढच आहे."

बराच वेळ कोणी काही बोलले नाही. मग एसेन म्हणाला, "ठीक आहे, मी ह्याबद्दल पीकेशी चर्चा करतो. काल पीकेशी माझं खुप सविस्तर बोलणे झाले सेन्ट्रल कमिटीच्या मिटींगच्या संदर्भात. ओरिसातील स्टेट कमिटीनेही सेंट्रल कमिटीतील स्टेट कमिट्यांचे प्रतिनिधीत्व वाढविण्यावर विचार व्हावा अशी मागणी केलीय. कॉम्रेड रंजनही पीकेला विचारत होता, नवे प्रतिनिधी कोण पाठवणार"

अजिता काहीच बोलली नाही. गेल्या काही वर्षांत पक्षाच्या नेतृत्वातील बिहारी कॉम्रेडसच्या प्रभावामुळे काही समस्या निर्माण होत आहेत असं जाणवत होतं. भारतीय संदर्भात वर्गलढयाला जातवर्चस्वाविरुध्द लढयाचा एक पदर असणं अटळ आहे हे सर्वांनाच मान्य होते. पण गेल्या काही वर्षांपासून तेथे ह्या लढयाला जातीयसंघर्षाचेच रूप आले आहे असं दिसत होतं. एसेन आणि रंजन ह्यांनी सामाईक लेख लिहून ह्या समस्येकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला होता. पण त्याचा फारसा उपयोग झालेला नव्हता.

पण मुळात पक्षांमध्ये परस्पर संवादच मर्यादित असल्याने स्थानिक पातळीवरील असे प्रश्न समस्येचे रूप घेतात असं अजिताचं म्हणणं होतं. सशस्त्र लोकक्रांतीचे तत्त्वज्ञान मानत असलेल्या आणि कायद्याने बंदी असलेल्या पक्षाला खुलेपणाने राजकीय कार्य करणे शक्यच नसते हे मान्य करूनही पक्षाच्या निर्णयप्रक्रियेत जास्तीतजास्त लोकशाही असली

पाहिजे असं उघडपणे मांडणारे जे काही सदस्य पक्षसंघटनेत होते, त्यात अजिता पुढे होती. तिचा भूतकाळ आणि गेल्या काही वर्षांत तिच्या व्हीआरडीसीचे दोन जिल्ह्यात पसरलेले कार्य ह्यामुळे ती जर सेंट्रल कमिटीत गेली तर हा विचारप्रवाह प्रबल होईल, आणि त्याकरता तिने सेंट्रल कमिटीत गेले पाहिजे असं स्टेट कमिटीतील बऱ्याच कॉम्रेडस्चे मत होते. कॉम्रेड रंजनचेही मत तसेच होते.

परंतु अजिताच्या मनात मात्र व्हीआरडीसीच्या वाढत्या कामामुळे आपल्याला ही जबाबदारी सांभाळणे शक्य होईल वा नाही ह्याबद्दल शंका होती. पण ह्या शंकेबरोबरच पक्षाच्या एकूण राजकारणाला जास्त वास्तववादी, व्यवहारी दिशा देण्याची संधी त्यातून मिळेल असंही तिला वाटत होते. निदान स्त्रियांच्या बदलत्या जाणिवा आणि क्रांतीकार्यात त्यांच्या सहभागाची गरज ह्याविषयी सीसीचा दृष्टिकोन आपण काही प्रमाणात तरी बदलू शकू असं

तिला विश्वास होता. सेंट्रल कमिटीमधील स्टेट कमिटयांच्या प्रतिनिधींची संख्या वाढवायला सेंट्रल कमिटीतील, विशेषत: बिहार, युपीमधील कॉम्रेड्स् सहजासहजी मान्यता देणार नाहीत, असंही तिला वाटत होतं. गेल्या तीन वर्षापासून पक्षाच्या ऍक्टीव्हिटीच्या, पक्षसदस्यांच्या संख्येच्या, आणि पक्षाच्या लोकसंघटनांच्या कार्याच्या दृष्टीने विचार केला तर सेंट्रल इंडिया झोन, नॉर्थ इस्ट झोनच्या तुलनेत खुपच पुढे आला होता. बिहार, बंगालच्या कॉम्रेडस्चा पक्षावर असलेला प्रभाव कमी होण्याचा धोका नेतृत्व घेणार नाही असं तिला वाटत होतं.

ह्याशिवाय तिला विरोध होण्याचं प्रमुख कारण ती संघटनान्तर्गत लोकशाहीचा पुरस्कार करते हे नसून ती स्त्री आहे आणि तिच्यावर स्त्रीवादाचा प्रभाव पडलेला आहे अशी पक्षामध्ये बऱ्याच जणांची समज झालेली आहे, हे आहे असं तिचं मत होतं. पक्षामध्ये पुरुषसत्ताक दृष्टिकोनाचा प्रभाव आहे हे एसेनला

मान्य होते, परंतु त्याच्या मताने अजिताला होणारा विरोध हा डेव्हलपमेंट वर्क आणि आर्म स्ट्रगल ह्यांच्यातील आंतर्विरोधातून निर्माण झाला होता. एसेनने ह्याविषयावरही अंतर्गत चर्चेकरता एक पेपरही लिहिला होता. लोकांमध्ये लोकशाही जाणिवा रुजवणं, वाढवणं आणि विकासात्मक कार्य ह्यांच्या संबंधात एसेनला काय म्हणायचे आहे ह्याबाबतीत तिला एसेनशी चर्चा करायची होती, त्यासाठीच त्यांनी आज भेटायचे ठरवले होते.

परंतु गेल्या दीड महिन्यात त्यांची भेट झाली नव्हती, हेही एक कारण होतंच आजची भेट ठरवण्याचे. पण गेल्या दोन तीन वर्षांपासून हे असंच व्हायला लागलं होतं. दोघेही आपापल्या कामात एवढे बुडून गेले होते की, त्यांच्या भेटीतील अंतर लांबतच चालले होते. दरवेळीच असे भेटले की आपल्याला एकदा आरामात भेटायला पाहिजे असं म्हणून दोघं एकमेकांचा निरोप घेत होते. पूर्वी एखादा आठवडा जरी भेटीविना गेला तर

अस्वस्थ व्हायचो आपण, आता तसं होत नाही. आपण म्हातारे झालोय का एसेन? त्याला विचारावंस वाटलं तिला. आपल्या चेहऱ्यावरचे हसू ह्या अंधारात एसेन पाहू शकत नाही हे बरंय. नाहीतर चर्चा वेगळयाच दिशेला गेली असत ी.

चर्चा संपवून एसेन जाण्याच्या तयारीने उठला तेव्हा भोवतालचा परिसर दाट अंधारात डुबला होता. समोरील नदीचे पाणी मात्र् अधून मधून चमचमत होते. निरोप घेताना त्यांनी एकमेकाला अलिंगन दिले, त्यात आपलेपणा होता, पण आवेग नव्हता.

हाताची मूठ वळवून लाल सलाम करून एसेन चालू लागला, तेव्हा तिने घडयाळाकडे नजर टाकली. चमकणारे काटे साडेआठ झाले असल्याचे दर्शवत होते. एसेनच्या पावलांचा आवाज अगदी अस्पष्ट येत होता, पण तरीही कमी कमी होत जाणाऱ्या आवाजांवरून एसेन उजवीकडे वळून ती आली त्याच्या विरोधी दिशेने

गेल्याचे तिच्या लक्षात आलं. तिला माहीत होतं की त्याने चर्चच्या जवळ कुठेतरी आपली मोटरसायकल उभी केली असणार. ती तशीच समोरच्या नदीच्या पात्राकडे पाहात बसून राहिली, शांत आणि स्तब्ध. आसमंत सर्व शांत होता. नदीच्या वरच्या अंगाने टिटीवीचा कलकलाट ऐकू आला परंतु काही वेळच आणि मग परत शांत झाले. मध्येच तिला एसेन ज्या दिशेने गेला होता, त्या दिशेने काहीतरी आपटल्याचा आवाज ऐकू आला. ती एकदम सावध झाली. ह्या दफनभूमीच्या आसपास कुणी येण्याची शक्यताच नाही. मग हा आवाज? झाडावरून एखादं सुकलेलं फळ पडलं असेल का? का एखादे सागाचे वाळलेले पान? कान टवकारून आजुबाजूच्या परिसरातल्या आवाजांची जातकुळी शोधण्याचा खेळ खेळत ती तशीच बसून राहिली.

पंधरा मिनिटे झाल्यावर ती उठली. हलक्या पावलांनी पण झपाझपा ती पाऊलवाटेने चालू लागली.

नदीच्या पात्रातून वर चढत दफनभूमीच्या भिंतीकडे जाणाऱ्या वाटेने ती वाटेच्या टोकाला आली. येथे पाऊलवाटेला दोन फाटे फुटलेले आहेत आणि उजवीकडे जाणारा फाटा चर्चकडे जातो हे तिला माहित होते. ती डावीकडे वळली आणि भिंतीला समांतर जाणाऱ्या वाटेने चालू लागली. काही अंतर गेली अन् ती एकदम थबकली. तिच्या समोरच बऱ्याच अंतरावर काहीतरी कशालातरी घासल्याचा स्पष्ट आवाज तिच्या कानी पडला. तिचा पाठीचा कणा एकदम ताठ झाला, स्तब्ध, निश्चल. कितीतरी क्षण ती तशीच उभी राहिली. पण सर्व आसमंत शांत होता. स्मशानभूमीच्या पलीकडून दूरवरून अस्पष्ट बोलण्याचे आवाज अधुनमधून ऐकू येत होते. परंतु भोवतालचा प्रदेश सर्व शांत होता. तरीही ती तशीच स्तब्ध उभी राहिली बराच वेळ. परत एकदा तो आवाज तिला ऐकू आला. पण आता तो आवाज जास्त दूरून आला होता. परत एकदा निस्तब्धता पसरली. एखादं जंगली जनावर पाणी प्यायला नदीकडे गेलं असावं का?

ती चालायला लागली. ती अत्यंत सावधतेने चालत होती. पाऊलवाटेच्या दोन्ही बाजूंना असणाऱ्या झाडांच्या सावल्या धुंडाळत, पावलांचा आवाज न करता पुढे सरकत होती. ती जंगलाच्या कडेला पोचली. झाडांच्या गर्दीतून बाहेर आली. वरच्या मोकळया आकाशातून परावर्तीत होणाऱ्या प्रकाशात तिला आता भोवतालचे जग बरेच स्पष्ट दिसत होते. झाडांच्या दाट अंधारातून बाहेर येण्यापूर्वी शेवटच्या झाडापाशी ती परत एकदा स्तब्ध उभी राहिली. तिची नजर भोवतालच्या झाडांझुडपांच्या, भिंतीच्या बुडाशी असलेल्या दाट अंधारात शोध घेत गेली. मग ती झाडाखालून बाहेर मोकळयावर आली आणि पुढे चालू लागली. इकडे तिकडे न बघता, स्वत:शी गुणगुणत सरळ फाटकाकडे चालत गेली आणि फाटकातून आत गेली. आजुबाजूला न बघता आपल्या गाडीपाशी गेल्यावर आपल्या खांद्यावरील पर्स काढून तिने चावीकरता पर्समध्ये हात घातला. तिची नजर मात्र हँडलला असलेल्या आरशावर होती. फाटकापाशी

भिंतीला आतल्या बाजूने खेटून उभ्या असलेल्या झाडापासून एक सावली वेगळी झाली. आपले दोन्ही हात तिने वर उचलले होते, दोन्ही हातात कपडयाचा पीळा ताणून धरलेला होता.

आरशावरून नजर काढून हालचाल न करता तिने केवळ बुब्बुळांची हालचाल करून डाव्या, उजव्या बाजूला पाहून घेतले. मग तिने पर्समधून चावी काढली. मुद्दामूनच तिने चावीचा आवाज केला. क्षणभर ती थबकली, मग ती खाली वाकली, चावी लावण्याकरता. जेव्हा तिला पाठीशीच, अगदी जवळ हालचाल जाणवली, वाकलेल्या स्थितीतच ती गरर्कन मागे वळली आणि तिच्या तोंडाभोवती कपडयाचा पीळा टाकायला झुकलेल्या त्या आकृतीच्या छातीत सर्व ताकदीनिशी तिने डोक्याने जोरदार ढूशी मारली. तिने केलेल्या अनपेक्षित हालचालीने आणि छातीत बसलेल्या धक्क्याने तो माणूस ओरडून मागे धडपडला, पाठीवर पडला. अजिताचाही पुढे तोल गेला, जमीनीवर

हात रोवून तिने स्वत:ला सावरले, पण उठता उठता हातातून खाली पडलेली पर्स पावलात अडकल्याने ती परत धडपडली.

घाईघाईत ती उभी राहिली, तेव्हा फाटकातून वेगाने पळ काढणाऱ्या माणसाची छायाकृती तिला दिसला. ती त्याच्या पाठीमागे दोन, तीन पावले धावली. तो माणूस डावीकडे वळून जंगलाच्या काठाने नदीच्या दिशेला पळत जाताना तिला दिसला. त्याच्या पाठलाग करून त्याला गाठावं असं क्षणभर तिला वाटलं, पण ती भिंतीला समांतर जाणारी पाऊलवाट सोडली, तर हा भाग तिला अनोळखीच होता. तिने विचार बदलला. स्वत:शीच हसली ती. प्रथम तिला वाटलं होतं, की पुढे वाकलेले असताना तो मागे आला की, एक बॅक की त्याच्या पोटात द्यावी, परंतु आपला कुडता आपल्याला की मारायला आड येईल असं वाटल्यामुळे तिने डोक्याचा उपयोग करायचा निर्णय घेतला होता. नदीच्या दिशेने अंधारात नाहीशा होणाऱ्या त्या

माणसाकडे पाहात ती परत हसली. गाडीकडे वळता वळता तिच्या मनात आलं, जरी आपल्यावर हल्ला करून आपली पर्स पळवण्यात हा भुरटा यशस्वी झाला असता तरी त्याला काय मिळाले असते, पन्नास साठ रूपये. आज त्याचं नशीब बेकारच होतं म्हणायला पाहिजे. बिचाऱ्याची बरगडी व्ॅक झाली नसली म्हणजे मिळवली, नाहीतर चांगलाच भुर्दंड पडेल बिचाऱ्याला! बहुधा आपण आलो तेव्हा येथेच जवळपास शेतात असणार तो, एकटीला जाताना पाहून त्यानं संधी साधली असावी. तिला खात्री होती तिचा पाठलाग करीत कुणी आलं नव्हती. टेलिफोन बुथपाशी थांबून तशी खात्री करून घेतली होती तिने. तिने हसत कीक मारली, गाडी सुरु केली. गाडी वळवून ती फाटकाकडे वळली आणि फाटकाबाहेर पडलेला पांढरा कागद तिला दिसला. ती तेथे आली तेव्हा तो कागद तेथे नव्हता. तिने गाडी थांबवली, खाली वाकून तिने तो कागद उचलला. कागदाची घडी तिने उलगडली आणि गाडीच्या लाईटमध्ये तिने कागदावर पाहिले. ही बाजू

कोरीच होती, तिने कागद उलटला, कागदाच्या डाव्या बाजूला वरच्या कोपऱ्यात धावत्या इंग्रजी लिपीत लिहिलेले होते,

Kalinga Air ways, Flight No. IC- 421 on 25 May.

त्या माणसाच्या आकृतीला पाहिल्यापासून तिच्या मनात अशीच समज होती की एकटया बाईला पाहून चोरी करण्याचा मोह पडलेला हा कुणीतरी भूरटा चोर आहे. परंतु आता तिच्या मनात शंका निर्माण झाली होती, हा भूरटा चोरच आहे का? नाही. एखाद्या भुरट्या चोराकडे आसाममधील विमान कंपनीच्या तिक◌ीटाचा नंबर असण्याची शक्यता नाही. तो भूरटा चोर नव्हता तर मग तो होता तरी कोण? आपण इथे येत असल्याची बातमी लागल्याने तो येऊन आपली वाट पाहात होता का? का आपला पाठलाग करत तो इथे आला? का एसेनच्या पाठीमागे आला होता? एसेन जाणार आणि

आपल्याला एकटं गाठता येणार हे त्याला माहीत होतं का? आणि जर तो भूरटा चोर नव्हता, त्याला आपल्या पर्समधील पैसे चोरायचे नव्हते तर मग... हा कागद दुसऱ्या कुणाचा असू शकेल का?

आपल्यावर हल्ला करण्याकरता, आपल्याला संपवण्याकरताच तो इथे आला होता का? आपण जीवावरच्या हल्ल्यातून वाचलो आहोत का?

स्वत:शीच हसून तिने आपल्या मनातील विचारांना झटकून टाकण्याचा प्र्यत्न केला. परंतु तिला जाणवलं आपल्या कपाळावर घामाचे थेंब आकारात आले आहेत.

तिने झपाटयाने यामाहा उजव्या बाजूला वळवली आणि दगडाधोंडयांमुळे मिळणाऱ्या धक्क्यांची पर्वा न करता गाडी रोडच्या दिशेने सोडली. मुख्य रोडवर आल्यावर तिने सुस्कारा सोडला. आपण इथं येणार हे कुणा तिऱ्हाईताला कळणं शक्यच नव्हते. फार तर मी सात

वाजता कुठेतरी जाणार आहे एवढे समजणे शक्य होतं, पण हे ठिकाण! ह्याचा अर्थ हा माणूस आपल्या मागावरच असावा, आपला पाठलाग करत असावा. आपल्याला ते समजू शकले नाही. किंवा एसेन आपल्याला भेटणार हे त्याला माहीत असावं. पण का? आपल्याला नष्ट करून कुणाचा लाभ होणार आहे? आपल्या जीवंत राहण्याने कुणाचे नुकसान होणार आहे? ती गोंधळली होती, अस्वस्थ झाली होती. हा शत्रू कोण? वर्तमानकालीन की भूतकालीन?

प्रकरण दुसरे

अजिताने निर्णय घेतला आणि भरवेगाने जाणारी यामाहा पहिल्या लेनमधून दुसऱ्या लेनमध्ये व लगेच तिसऱ्या लेनमध्ये आली, पाठीमागून येणाऱ्या गाडयांच्या कर्कश हॉर्न्सकडे, ब्रेक्सच्या

आवाजांकडे, ड्रायव्हर्सनी दिलेल्या शिव्याशापाकडे तिने बिलकूल लक्ष दिले नाही. आपल्या गाडीची गती झपाट्याने कमी करत अचानक ती उजव्या बाजूच्या गल्लीत वळली. मुख्य रस्ता तिच्या ओळखीचा रस्ता होता. रोजच ती ह्या रोडने ऑफिसला जात होती. पण हा भाग तिला अनोळखी होता, ह्या लेनचे अस्तित्व तिच्या पूर्वी कधी लक्षातही आले नव्हते. समोरच तिला 'रेस्तारांॅ रिव्हर व्ह्यू' चा झगमगता बोर्ड दिसला. बाहेर दोन मारूती उभ्या आहेत, गार्डनमधील बहुतेक टेबले रिकामीच आहेत, हे तिच्या लक्षात आलं आणि तिनं आपली गाडी फाटकापाशी नेऊन उभी केली. आपल्या डोक्यावरील शिरस्त्राण तिने खस्सकन् ओढून बाजूला केले आणि फाटकातून आत येऊन तिने उजव्या बाजूला फाटकाजवळच असलेल्या परंतु झुडपाच्या आडोशाला असणाऱ्या टेबलाजवळच्या खुर्चीत बैठक मारली. हातातील रुमालाने तिने चेहऱ्यावरील घाम पुसला, तेव्हा तिच्या लक्षात आलं, तिचा चेहरा घामाने डबडबला आहे, पाण्याचा ग्लास

घेतांना तिच्या हे ही लक्षात आलं की, तिच्या हातांना सुक्ष्म कंप आहे. पाण्याचा ग्लास तिने ओठाला लावला आणि थंडगार पाणी तिने घशात ओतले. पाण्याचा ग्लास खाली ठेवताना तिच्या लक्षात आलं, अजूनही छातीच्या पिंजऱ्यात तिचं हृदय वेगाने धडधडतंय, धावतंय. आपण सुरक्षित आहोत, आपल्याला काहीही झालेले नाही, आपल्याला एक्साईट व्हायचे काहीही कारण नाही. तो क्षण आता गेलाय. ती मागे सरकून खुर्चीच्या पाठीला पाठ टेकवून ताठ बसली आणि तिने आपल्या श्वासोश्वासावर लक्ष केंद्रित केले. आत घेतलेला श्वास छातीत पूर्ण खालपर्यंत पोचण्याआधीच परत बाहेर पडत होता. तिने श्वासाची गती कमी करण्याचा प्रयत्न केला नाही, किंवा मुद्दामून दीर्घ श्वास घेण्याचा वा श्वास रोखण्याचाही प्रयत्न केला नाही. इन्स्टिक्ट ऑफ सर्व्हाव्हल! एकच उत्तर. नाहीतर आज आपण का वाचलो हे आपल्यालाच सांगता येणार नाही.

सकाळच्या रम्य वेळी हायवे वर फारशी गर्दी नसताना, एका मस्त मूडमध्ये, सहजतेने, आपली यामाहा पळवत ती चालल◌ी होती. हायवेवर वाहनांची गर्दी नव्हती. दोन कार्स तिच्यामागे होत्या. पण त्या बऱ्याच मागे होत्या आणि ठराविक अंतर कायम राखून त्या तिच्यामागे धावत होत्या. मग तिच्या लक्षात आलं, त्या दोन्ही कार्सना ओव्हरटेक करून एक जीप वेगाने पुढे येतेय. काही वेळातच ती जीप जवळ येऊन पोचली. अजिताने गती कमी न करता तिला पुढे जाण्याकरता इशारा केला होता. परंतु पुढील कार्संना ओव्हरटेक करून पुढे आलेली जीप पुढे जाण्याऐवजी अजिताच्या मागेच काही अंतर ठेवून धावू लागली तेव्हा आरशामधून तिने मागच्या गाडीकडे नजर टाकली, आणि एका अनामिक भितीने तिच◌ा कब्जा घेतला. काहीही करून तातडीने ह्या गाडीपासून दूर झाले पाहिजे अशी तीव्र उर्मी तिच्या मनात आकारात आली.

आपल्या अंगांगामधून ही भितीची लाट का निर्माण

झाली? कालचा संध्याकाळचा प्रसंग आपण विसरूनही गेलो होतो, तरीही आपण का घाबरलो? ती जीप आपल्या अंगावर येऊन धडकणार आहे अशी भिती आपल्या मनात का उद्भवली? आपल्या मनातील त्या भितीला तसा काही वस्तूनिष्ठ आधार नव्हता, त्या जीपने पुढे जाण्याचा प्रयत्न करणे ह्यात गैर काहीच नव्हतं, ती भिती अकारण होती.

ती स्वत:शीच हसली, हे सर्व युक्तिवाद आपल्या मनाने त्यावेळी केले नाहीत, त्या अकारण भीतीवर ताबा मिळवण्याचा आपला प्रयत्न यशस्वी झाला नाही, त्या भीतीच्या प्रभावाखालीच आपण पुढे वागलो म्हणूनच आपण आता येथे टेबलापाशी अजूनही श्वासोच्छवास करत आहोत, आपली यामाहा अजूनही बाहेर सकाळच्या उन्हात चमचमत आहे. त्या भितीच्या आहारी आपण गेलो म्हणूनच आपण जिवंत आहोत आता. तिने ते शेवटचे काही क्षण परत आठवण्याचा प्रयत्न केला.

तिच्या पाठीमागे असलेल्या कार्सना ओव्हर टेक करून मागून पुढे येणाऱ्या जीपला पाहून, आपली लेन बदलावी अशी तीव्र भावना एकाएकी तिच्या मनात निर्माण झाली होती, तिच्या मनात आलं होतं की गती वाढवून ती मागची जीप जवळ पोचण्याआधीच आपण दुसऱ्या लेनमध्ये जावे. त्या जीपला पाहून आपल्याला असे का वाटावे हा प्रश्न मनात येऊन तिने मागे वळून आरशातून ड्रायव्हरच्या चेहऱ्याकडे पाहण्याचा प्रयत्न केला. त्याचा चेहरा तिने कधी पाहिला नव्हता, पण क्षणभर... अगदी क्षणभर त्याच्या नजरेशी तिची नजर भीडली होती. आणि तो अनोळखी चेहरा पाहून तिला कालच्या घटनेची तीव्रतेने आठवण आली होती. मागील जीपपासून पुढे जाण्यासाठी तिने गती झाढ़वली होती, पण त्या जीपनेही आपली गती वाढवली होती. अजिताने आपली गती अधिक वाढवली होती. तिच्या मोटरसायकलमधील आणि त्या जीपमधील अंतर झपाट्याने कमी होत गेले होते. जीप जवळ आल्यावर तिने जीपच्या ड्रायव्हरला पुढे सरकण्याचा इशारा दिला

होता मात्र आपली गती कमी केली नव्हती. जीप तिच्या जवळ येऊन पोचली, आता जीप तिच्या बरोबर धावत होती, तिच्या मोटरसायकलपासून चार पाच फूट मागे. तिच्या मोटरसायकल आणि जीपमधले अंतर कमी होत होते. तिच्या बाजूला बाजूला सरकत तिला डिव्हाईडच्या बाजूला ढकलत होती. जीपच्या ड्रायव्हरच्या मनात काय आहे हे तिला जाणवले, तिने आपली गती वाढवली, तिच्या समोर धावणाऱ्या गाडयांमधील अंतर कमी होऊ लागले. गती वाढवून तिने जीपच्या समोरून पलीकडच्या लेनमध्ये जायचा प्रयत्न केला असता तर अनायसेच ती जीपच्या समोर आली असती. तिच्या लक्षात आलं जीपचा ड्रायव्हर तेच साधू इच्छित असावा. तिला घाबरवून तिने अशी काहीतरी चूक करावी अशीच त्याची अपेक्षा असावी. तिने पुढे पाहिले रस्ता जरा डाव्या बाजूला वळत होता, जीप तिच्या अगदी पाठीमागेच येऊन पोचली होती, तिने अधिक गती वाढवली, पण ह्यातून कशी सुटणार होती ती. एकाएकी तिने गाडीचा गेयर बदलला, ब्रेक दाबला,

गाडीची गती एकाएकी कमी केली, आपलं सर्व अंग तिने डाव्या बाजूला झुकवले, तिच्या अगदी जवळून, तिच्या अंगाला घासूनच जीप पुढे गेली आणि ती मागे पडली, जीपच्या ड्रायव्हरने गती कमी केली, परंतु जीप पुढे गेली होती, काही फूटच. ती दुसऱ्या लेनमध्ये आली, जीप ड्रायव्हरही दुसऱ्या लेनकडे सरकला. तिच्या समोर येऊन तिला आडवे होण्याचा प्रयत्न करत होता, मग ती एकाएकी उजव्या बाजूला वळली होत◌ी, मागच्या गाडयांची पर्वा न करता. तिचं भाग्य मागची कार पुरेसी दूर होती. जर... जर त्या क्षणाला मी आपल्या गाडीची गती एकाएकी कमी केली नसती तर जीपने मला रोडच्या मधल्या डिव्हाईडर भिंतीवर ढकलले असते, त्या भिंतीच्या आणि जीपच्या मागच्या बाजूच्या चिमटीत मी चेपले ग◌ेले असते, जीपच्या धक्क्याने मी डिव्हाईड वॉलवर आदळले असते आणि ...काही क्षणांच्या फरकामुळे आपण वाचलो.

तिने परत एकदा पाण्याचा घोट घेतला. तो ड्रायव्हर

पाहून आपल्याला खरंच कालची आठवण का झाली होती? कालच्या माणसामध्ये आणि ह्या ड्रायव्हरमध्ये काही साम्य होते का? ती जीप पाहिल्याबरोबर आपल्या मनात भीती का निर्माण झाली? ही जीप आपण ह्यापूर्वी कुठे पाहिली होती का? त्या जीप ड्रायव्हरचा आपल्याला डिव्हाईडच्या भिंतीमध्ये चिणायचा उद्देश होता ह्यात काहीही शंका नाही. आपल्या मागे धावत असलेल्या कार्सच्या ड्रायव्हर्सच्याही ते लक्‌्षात आलं होतं. त्यांच्या चेहऱ्यावरूच ते स्पष्ट होत होते. म्हणूनच गती कमी करून आपण एकाएकी लेन बदलली तरी मागच्या कार ड्रायव्हरने आपल्याला गूडलकचा सिग्नल दिला होता. काल झालेला हल्ला आणि ताबडतोब आजचा हा प्रयत्न!

पण आपण एवढे का बिथरलो आहोत? मलायीच्या जंगलात हात‌ात मशीनगन्स असलेल्या सी.आर.पी.च्या टोळीला पाठीशी घेऊन आपण बिनिधास्त एसेन, रवी आणि इतर कॉम्रेड्स् बरोबर

भटकत होतो. कुठल्याही क्षणी त्यांनी केलेल्या अदांधुंद गोळीबारात शरीराची चाळणी होण्याची शक्यता असून त्यांच्या नजरेखाली बँकेत दिवसाढवळया घुसून कॅश पळवली आपण चौघांनी फक्त. आणि आज आपण कुणीतरी आपल्याला मारायचा प्र्यत्न केला तर एवढे हादरलो आहोत? ह्या वीस वर्षांच्या काळात आपण एवढे बदललो आहोत का? नाही! आपण अजूनही मृत्यूला घाबरत नाही. पण जीवाची बाजी लावून लढणं वेगळं. तेथे शत्रूशी सिधा सामना असतो. इथे हा शत्रू छुपा आहे, धोकेबाज आहे, आपल्याला बेसावध गाठून वार करण्याची तो संधी शोधत आहे. समोरून येणाऱ्या वेटरकडे पाहात तिने मनाशी निर्णय घेतला, मृत्यूसंबंधी आपलं तात्विक चिंतन आपण परत कधीतरी निवांत करूया. मात्र् आपल्या मनातील ही भीती काय चीज आहे, तिचा उदभव कसा झाला आहे, तिचा आपल्या सक्षमतेवर काय परिणाम होण्याची शक्यता आहे, ह्याचा मात्र् आपल्याला विचार करावाच लागेल. कमरेच्या पट्टयाच्या पाऊचमधून तिने मोबाईल

बाहेर काढला आणि आपल्या संस्थेचा नंबर फिरवला.

"व्हि.आर.डि.सी. प्लीज." प्रेरणाचा आवाज आला.

"हाय् प्रेरणा. अजिता हियर. हे बघ. मी ऑफिसला यायला निघाले होते, काही कारणांमुळे मध्येच अडकलेय जरा. अर्धा तासात मी पोचते सेंटरला. नायरजीना सांग. दुपारी लंचनंतर मी कडेगावला जाणार होते. पण आता जाऊ शकणार नाही. कडेगावला फोन करून मी संध्याकाळी येतेय सांग."

"ओके अजिता. एनी थिंग रॉंग? युवर व्हॉईस सीम्स टू बी डिफरन्ट. काही झालंय का? तु आहेस कुठं, मी नरेशला पाठवू का?"

अजिताने ताबडतोब उत्तर दिले नाही. तिच्या लक्षात

आलं अजूनही तिच्या शरीरात सुक्ष्म कंप आहे. तिच्या आवाजातील थरथर प्रेरणाला जाणवली असणार. तिने स्वत:वर ताबा मिळवण्याचा प्र्यत्न केला, मग शक्यतोवर शांत स्वरात म्हणाली,

''नथिंग रॉंग. डिफरन्ट? यस्. यु आर क्वाईट परसेप्टीव्ह. गुड! एक छोटासा अपघात होणार होता. पण काळजी करू नकोस, आम्ही दोघंही सुखरूप आहोत. मी आणि आपली यामाहा. बट हाऊ इज विजय ?"

"ओ! ही इज फाईन. थँक्यू. आम्ही काल रात्री तु रेकमंड केलेल्या जागी गेलो होतो अजिता. वुई रिअली एन्जॉईड द स्पॉट. ऍन्ड नारायण रिअली इज अ जेम. अ सुपर्ब कुक. ऍन्ड अजिता, ही रिअली अडोअर्स यू. ही वॉज जस्ट बबलींग ओव्हर युवर लास्ट व्हिजीट देअर. ऍन्ड अजिता, दॅट हील फॉरेस्ट. . इटस् रिअली..लव्ह..ली..."

''प्रेरणा! डोन्ट गेट एक्साएटेड.'' अजिता क्षणभर थांबली. तिने दीर्घ श्वास घेतला. मग काहीसं हसत म्हणाली," ॲन्ड यु चर्पिंग बर्ड, डोन्ट वेस्ट युवर एनर्जी इन् अननेसेसरी चॅटरींग. यु नीड इट फॉर वर्क ॲन्ड फॉर विजय टू. इजंट इट?"

"यस् अजिता.. यस्. यस्. ओके बाय् देन."

"बाय् प्रेरणा. ॲन्ड डोन्ट फरगेट टू टेल नायरजी."

अजिताने मोबाईल बाजूला ठेवला. ती आता रिलॅक्स झाली होती. मघापासून तिचे बोलणे पूर्ण होण्याची वाट पाहात थांबलेल्या पोराकडे ती वळली,

"काय रे नाव तुझं?"

तो पोरगा जरा घोटाळला, मग चाचरत म्हणाला, "कृष्णराज..राजू"

"व्वा, छान नाव आहे. सॉरी हं, तुला वाट पाहात उभं राहावं लागलं."

पोरगा गोंधळला, शरमला. पण तो खुष झाला.

समोरच्या खाद्य पदार्थांचा समाचार घेतल्यावर कॉफीचे घोट घेत अजिता विचार करत होती. आता झालेल्या घटनेचा उद्देश स्पष्ट होता, आपल्याला जाणून बुजून, लक्ष ठेवून मारण्याचा कुणीतरी प्रयत्न करत आहे? पण का? आणि कोण? आपली संस्था ब्लॉकमध्ये दारूबंदी लागू करण्याचा प्रयत्न करत्येय आणि त्यामुळे काही लोकांचे हितसंबंध दुखावले जाणार आहेत हे स्पष्ट आहे. पण आपल्याला मारून ही प्रक्रिया थांबणार आहे असं वाटण्याइतके प्रीतमसिंग कॉन्ट्रॅक्टर किंवा रसूलदादा खुळे नाहीत. हे प्रयत्न केवळ आपण करत नाहीयोत. ब्लॉक पातळीवरील ह्या समितीत सर्वोदयी, समाजवादी ह्यांचाही पुढाकार आहे, सत्ताधारी पक्षासकट इतर पक्षांचे आमदारही त्यात सहभागी

झालेले आहेत. माझा रोल तर ह्यात मर्यादित आहे. खरं तर रसूलदादाला दारूबंदी झाली तर बेकायदेशीर दारू विकण्यात जास्तच नफा मिळेल हे समजत असणार. मग आपल्याला मारण्याचा प्रयत्न कोण करतोय? नकळत मी शेपटीवर पाय दिलाय असा कुणी नाग तर सूड घेत नसेल? ह्याचा आपल्या भूतकाळाशी तर काही संबंध नसेल ना? आजचा हा प्रयत्न म्हणजे आपल्याला भलतंच कुणी समजून झालेला नसेल ना? पण आपल्याकडे काहीही कॉंक्रीट माहिती नसताना हवेतच तलवार फिरवण्यात काही अर्थ नाही. आपल्याला त्या जीपचा नंबरही माहीत नाही. आपण त्या जीपच्या ड्रायव्हरच्या चेहऱ्याचे वर्णन करू शकू का? तिच्या लक्षात आलं तिला केवळ त्याची घट्ट मिटलेली जिव्हणी आठवत आहे.

एक गोष्ट निश्चित आहे, आपण अधिक सावधगिरी बाळगली पाहिजे. तिने घड्याळात पाहिले. आपला हा अर्धा तास फुकट गेला आहे. ह्या महिन्याच्या अखेरपर्यंत

तीस गावांत महिलांच्या बैठका घेऊन ग्रामसभांकरता योग्य वातावरण तयार करायचे आपण ठरवले आहे. दिल्लीला होणाऱ्या 'स्त्री आणि पर्यावरण' ह्या सेमिनारकरता टिपण पाठवायचे कबूल केले आहे. त्या पाठोपाठ 'लोकव्यवस्थापन आणि वने' ह्या सेमिनारला रिसोअर्स परसन म्हणून जायचे आहे. आज प्रेरणाला रिझर्वेशन्स झाली वा नाही हे बघायची आठवण करून दिली पाहिजे. व्हरांडयापाशी दुरूनच तिच्याकडे पाहात असलेल्या राजूला तिने हातांनी खूण करून बील आणायला सांगितले.

प्रकरण तिसरे

अजिताने नेटस्केप ब्राऊजर बंद केला, इंटरनेट कनेक्शन ब्रेक केले, कॉम्प्युटर बंद करण्याची कमांड देऊन काही क्षण ती खुर्चीवर तशीच बसून राहिली.

तिने घडयाळाकडे पाहिले, दीड वाजून गेला होता. प्रेरणाबरोबर काम करीत बसल्यामुळे तिला ऑफिसमधून यायला दहा वाजले होते. खिडकीतून दिसणारा आकाशाचा पट्टा चांदण्यांनी गच्च भरलेला होता. मध्यरात्रीचा गारवा जाणवायला लागला होता. ओटयावरचे दूध फ्रीजमध्ये ठेवावे आणि झोपायला जावे असा विचार करीत ती खुर्चीवरून उठली आणि ती किचनच्या दाराशी पोचलीही नव्हती तर टेलिफोनची घंटी खणाणली.

तिने फोन उचलला, नकळत तिचे परत एकदा घडयाळाकडे लक्ष गेले, एक चाळीस. "हॅलो, अजिता हिअर."

"मॅड़म...! "

राघवच्या आवाजातील वेगळेपणा तिला जाणवला, काही क्षण तिने प्रतिक्षा केली, मग तिनेच विचारले,

"यस् राघव, व्हाटस् मॅटर?"

"मॅडम, व्हेरी बॅड न्यूज़. मॅडम,'' राघव परत अडखळला.

सम कॉम्रेड किल्ड इन् पोलीस ऍक्शन? एक शंका तिच्या मनात चमकून गेली. पण क्षणैकच. नाही, अशी बातमी राघव देऊ शकत नाही. तिने दीर्घ श्वास घेतला, मग हळूच म्हणाली, "यस् राघवन्?"

"मॅडम, विजयचा ऍक्सिडेन्ट झालाय, पोलीसांचा ऑफिसला फोन आलाय..."

'' ओ..नो!'' ती काही क्षण काहीच बोलली नाही, "ठीकाय. मी निघते ताबडतोब. कुठल्या हॉस्पीटलला आहे?"

"हॉस्पीटलला नाही मॅडम. पोलीस फॉऊंड हीम

डेड्."

"व्हाट! नो...नो. इट कान्ट बी राघव. शक्यच नाही."

"मॅडम, डि.वाय.एस.पी. भास्करन् हॅव आस्कड्‌ यू टू कॉन्टॅक्ट हीम."

"ओके! ओके. . बट् राघव...व्हाट अबाऊट प्रेरणा.. डझ् शी नो?"

"शी..शी...पोलीसांनी तिलाच प्रथम कॉन्टॅक्ट केले आणि दुर्दैवाने तिनेच फोन ऍन्टेड् केला."

"ओ. . . ओ! ठीकाय. राघवन्. मी भास्करनशी बोलत े. तू ऑफिसमध्येच थांब. मी परत फोन करते."

तिने फोन खाली ठेवला आणि ती जवळच्या खुर्चीत

बसली. तिची नजर बाहेर गेली. चांदण्या तशाच चमचमत होत्या. कित्येक क्षण ती एकटक नजरेने आकाशात पाहात राहिली. ऑफिसच्या फाटकापाशी, हेल्मेटचा पट्टा लावत त्यांचा निरोप घेणाऱ्या विजयचा हसरा चेहरा तिच्या नजरेसमोर तरळला.

'नो...नो..नो..नो....' नकळत तिच्या ओठांतून एक चित्कार बाहेर पडला. काही क्षण आपल्या दोन्ही पंजामध्ये मस्तक गच्च आवळून ती बसून राहिली, तिची कोपरे टेबलावर घट्ट रोवली गेली होती.

काही वेळानंतर तिने हळूच आपले हात बाजूला केले, तिची नजर परत एकदा काही क्षणांकरता आकाशात थिजून राहिली. मग एकाएकी तिचा कणा ताठ झाला, आपल्या दोन्ही हातांच्या पंजांनी तिनं आपला चेहरा खसखसा पुसला. ती खुर्चीवरून उठली. तिने हॅन्डसेट उचलला वॅ्रडलवरून. मग ती भराभर नंबर बटणे दाबत गेली.

"हॅलो!" जाडाभरडा पुरुषी आवाज आला.

"हां, हॅलो...मी अजिता बोलत्येय. साहेब आहेत?"

''एक मिनिट मॅडम.''आवाजात सौम्यता आली होती.

मग काही वेळानंतर फोनवर आवाज आला, "आय ऍम रिअली सॉरी कॉम्रेड अजिता. आय् ऍम रिअली सॉरी."

अजिता काहीच बोलली नाही. परंतु डि.वाय.एस.पी. भास्करन् पुढे बोलत होते. '' इटस् व्हेरी अन्फार्च्यूनेट. मृताच्या खिशात सापडलेल्या डायरीतील पत्त्यावरून आम्ही त्याच्या घरी कळवण्याची व्यवस्था केली आहे. "

अजिता काहीच बोलली नाही.

"आय रिअली फील सॉरी. सच अ नाईस मॅन. आय वॉज ॲक्वेंटेड विथ दॅट यंग मॅन. बट नो वन रिपोर्टेड द ॲक्सीडेंट. ॲन्ड व्हेन पोलीस फाउंड आऊट, इट वॉज क्वाईट लेट.' ' डि.वाय.एस.पी. भास्करन काहीवेळ थांबले मग जरा कोरडया आवाजात म्हणाले, "बॉडी पोस्ट मार्टेमकरता पाठवावी लागेल. पण त्याअगोदर तुम्ही येऊन आयडेन्टी-फिकेशन केले तर बरं होईल. अपघातातील मोटर सायकल ही व्हि.आर.डी.सी.च्या नावाने रजिस्टर्ड आहे. शिवाय मयत मिस्टर विजय हे जरी टाईम्सचे पत्रकार असले तरी ते आपल्या संस्थेच्या कामानिमित्तच..."

"यस्. आय नो व्हाट यू मीन. ही वॉज माय फ्रेंड मिस्टर भास्करन्. आय ॲम कमिंग देअर."

"आपण तेथेच थांबा, मी गाडी पाठवतो."

"नाही..नाही. मी येते तिकडे. मी कुठे भेटू

आपल्याला?"

"माझ्या ऑफिसला या आपण. मी आहे इथेच."

अजिताने फोन खाली ठेवला. कपडयाच्या कपाटासमोर जाऊन क्षणभर ती विचार करत उभी राहिली. मग तिने झटकन् अंगावरील गाऊन काढून टाकला आणि समोरच दिसणारा पंजाबी ड्रेस तिने हॅन्गरवरून खेचूनच काढला, स्वेटर खाद्यावर टाकला. घाईघाईत आपली हॅन्डबॅग घेण्याकरता टेबलाकडे वळता वळता तिच्या मनात आलं, 'तसं म्हटलं तर आता घाई करण्यात काहीच अर्थ नाहीये. विजय गेलाय आणि मी येथे सुखरूप आहे.'

डि.वाय.एस.पी. कार्यालयासमोर तिची रिक्षा थांबली, ती खाली उतरत नाही तोपर्यंत कुणीतरी पोलीस कॉन्स्टेबल तिच्याजवळ येऊन पोचला, "मॅडम. साहेबांनी आपल्याला जीपकडेच बोलावले आहे."

कॉन्स्टेबलच्या पाठोपाठ ती जीपजवळ पोचली. डि.वाय.एस.पी. भास्करन् स्वत:च ड्रायव्हिंग सीटवर बसले होते. पाठीमागे तिघे पोलीस बसले होते. रिकाम्या फ्रंट सीटवर बसता बसता, तिने विचारले, "अपघाताची बातमी केव्हा समजली?"

"आमच्या गस्तीच्या लोकांनी मोटर सायकल, रोडच्या साईडच्या झुडपामध्ये अडकलेली पाहिली. तुमचा मित्र मात्र वीसएक फूट खाली झाडांच्या बुध्याशी होता, त्याला वर काढायला बराच त्रास पडला. ताबडतोब त्याला हॉस्पिटलला आणलं. पण काही उपयोग नव्हता. ही वॉज ऑलरेडी डेड." डि.वाय.एस.पी. भास्करन्नी माहिती दिली आणि ते गप्प झाले. समोरच्या चौकात उजव्या बाजूला वळण घेऊन गाडी परत सरळ धावू लागली, तेव्हा ते तिच्याकडे वळले आणि सहज स्वरात त्यांनी विचारले,

"अपघात किती वाजता झाला असावा अजिताजी?"

त्या सहज आवाजात विचारलेल्या प्र्श्नाने अजिता एकच क्षणाकरता गोंधळली, तिने ताबडतोब उत्तर दिले नाही, पण जेंव्हा ती बोलली तेंव्हा तिचा आवाज अगदी शांत व गंभीर होता, "ऑफीसमधून तो सव्वासहाच्या सुमारास बाहेर पडला. अपघात कडेगावला जाताना झाला की परत येताना?" तिने प्र्श्न केला.

"मोटर सायकलच्या पोझीशनवरून अपघात गावाकडे जाताना झाला असावा."

"विजय मधे कुठे न थांबता गावाकडे गेला असेल तर अपघात सात ते साडेसातच्या मधल्या काळात झाला असावा."

जीप हॉस्पीटलच्या मुख्य दरवाजातून आत घुसली, आणि हॉस्पीटलच्या मागच्या बाजूस, हॉस्पीटलपासून जरा दूर असलेल्या एका बसक्या इमारतीशी जाऊन थांबली.

खोलीचे दार उघडून पोलीस बाजूला झाला. डि.वाय.एस.पी. भास्करनच्या पाठोपाठ अजिता आत शिरली. अंगावर जाड लोकरीचा स्वेटर, आत उबदार कपडे असूनही त्या खोलीत शिरल्याबरोबर एक चमत्कारीक उबट गारठा जाणवला अजिताला आणि तिच्या अंगावर शहारा उठला. त्या लहानशा खोलीत दोन तीनच टेबले होती, भास्करन कोपऱ्यात ठेवलेल्या एका टेबलाकडे वळले, टेबलापाशी येऊन ते थबकले. मागून येणाऱ्या अजिताकडे वळत ते बाजूला सरकले आणि अजिताची नजर टेबलावर उताणा पडलेल्या विजयकडे गेली.

"बाहेर एवढ ा गोंधळ उडवून दिलाय, आणि हा येथे शांत झोपलाय," तिच्या मनात विचार चमकून गेला. ती पुढे सरकली, तिची नजर त्याच्या सर्वांगावरून फिरली. कुठेही जखम दिसत नव्हती, डोके, हातपाय सर्व व्यवस्थित जागच्या जागी होते. तिने त्याच्या चेहऱ्याकडे पाहिले. चेहऱ्यावर, कपाळावर, ग ालावर

ओरबाडल्यासारख्या जखमा दिसत होत्या. पण त्या खोल नव्हत्या. चेहऱ्यावर सुकलेल्या, गोठलेल्या रक्तामुळे चेहरा काहीसा विद्रूप दिसत होता. तिचे डोळे त्याच्या चेहऱ्यावर स्थिर झाले. 'काय भाव आहेत ह्या चेहऱ्यावर. यातना, निराशा की अस्पष्ट स्मित? निर्जिव चेहऱ्यावरील गोठलेल्या भावनांचा काही अर्थ लावणं शक्य आहे का?'

विजय अत्यंत काळजीपूर्वक गाडी चालवायचा. निर्मनुष्य रिकाम्या चौकात उत्तररात्रीही तो नियमाप्रमाणे सिग्नल्स देऊनच तो गाडी पुढे नेत असे. 'मग घाटातून जाताना गाडी वेगाने चालवणे, किंवा ओव्हरटेक करणे असे काही करणे हे इम्पॉसिबल. पण मग हा अपघात की घातपात? ' तिच्या मनात प्रश्न चमकून गेला. पण ताबडतोब ती सावध झाली. आता फक्त माहिती मिळवण्याची वेळ आहे. काय झालं असावं, कसं झालं असावं, ह्याविषयी कल्पना करण्याची ही वेळ नाही. शिवाय तिला माहीत होतं, डि.वाय.एस.पी.

भास्करन तिच्या चेहऱ्याचे निरीक्षण करत आहेत. ती जरा जवळ सरकली, परत एकदा तिची नजर विजयच्या शरीरावरून सरकत गेली, आणि पोट व कमरेच्या भागाशी अडखळली. मग तिने आपली नजर भास्करनच्या चेहऱ्याकडे वळवली. त्यांच्या चेहऱ्यावरील प्रश्नचिन्ह पाहून तिने होकारार्थी मान हलवली.

"पोस्ट मार्टेम झाल्यावरच मृत्यूचे खरं कारण समजेल. परंतु मेंदूच्या मागच्या भागाला आणि कण्याला जोरदार मार लागल्याचे दिसत आहे. रात्र असल्यामुळे जागेचा पंचनामाही करता आलेला नाही. पण माझ्या अंदाजाप्रमाणे मोटरसायकल झुडपामध्ये दडलेल्या दगडाला आदळून मयत माणूस फेकला गेल्याने झाडाच्या बुंध्यावर आदळून त्याच्या पाठीच्या कण्याला जबरा मार लागला असावा. चला, चलूया."

भास्करन दरवाजाच्या दिशेने निघाले. पण त्यांच्या

पाठोपाठ जाण्यासाठी निघण्यापूर्वी अजिता परत एकदा विजयच्या प्रेताजवळ गेली. तिची नजर त्याच्या चेहऱ्यावरून खाली कमरेकडे सरकली, एकाएकी ती ताठ झाली. मग एक पाऊल पुढे घेऊन तिने निरखून पाहिले. स्ट्रेंज... हे असं होणं शक्यच नाही. प्रत्येक गोष्ट अत्यंत सावधपणे काळजीपूर्वक करणाऱ्या विजयचा अपघात! आणि हा असा निष्काळजीपणा. अपघात अखेर अनपेक्षितच असतात. पण वाईड चीटरची बटणे वरखाली लावणे...

''काही गडबड?'' डि.वाय.एस.पी. भास्करननी विचारले.

"नाही..नाही. काही नाही.'' असं म्हणत अजिता घाईघाईने दाराकडे वळली. तरीपण दाराशी पोचण्याआधी तिची नजर परत एकदा विजयने घातलेल्या वाईड चीटरकडे वळली होती.

"आपण प्रथम आपल्या ऑफिसकडे जाऊया. तेथेच बोलूया." भास्करन जीपकडे वळता वळता म्हणाले. वाटेत ते काही बोलले नाहीत, अजिताही आपल्याच विचारात बुडाली होती. विजय असा अनपेक्षित गेला होता, किती जणांच्या भविष्यकाळाची दिशा त्यामुळे बदलणार आहे? प्रेरणा ह्या धक्क्यातून कशी सावरेल? विजयच्या घरची आर्थिक स्थिती काय होईल? ते कुटुंब ह्या धक्क्यातून कसं सावरेल? पण ह्या प्रश्नांची उत्तरे कुणी देऊ शकणार आहे का? आता मुख्य प्रश्न आहे तो म्हणजे हा अपघात होता की घातपात? पण त्याचं उत्तर मिळूनही काय फरक पडणार आहे? ह्या घातपातामागे कोण हा प्रश्न शिल्लक राहणारच.

ऑफिसमध्ये पोचल्याबरोबर भास्करननी आपला थर्मास उघडून दोन ग्लासेसमध्ये कॉफी ओतून घेतली. डि.वाय.एस.पी. भास्करनचा एकूण पोलीस डिपार्टमेंटमध्ये दरारा होता, आदरही होता. पण त्यांच्या जवळ असलेल्या, त्यांच्या कार्यक्षेत्रातील, त्यांच्यापेक्षा

वरिष्ठांतील आणि त्यांचा हाताखालील कनिष्ठांतील बहुसंख्यांकांना त्यांचे अस्तित्व अडचणीत वाटणारे होते. आपल्या अधिकारक्षेत्रातील पोलीस स्टेशनमध्ये आल्यावर, चहाची तल्लफ आल्यास कॉन्स्टेबलला बोलावून त्याच्या समोर पैसे ठेवून चहा मागवणारा हा पोलीस अधिकारी डिपार्टमेंटमध्ये अपवादच. आणि गैरसोयीचा अपवाद. डि.वाय.एस.पी. भास्करननी राजकीय पुढाऱ्यांना दिलेल्या सडेतोड उत्तरांच्या, आणि गुंतागुंतीची प्रकरणे यशस्वीरित्या सोडविण्यात आवश्यक असलेल्या त्यांच्या सक्षमतेच्या व चिकाटीच्या अनेक आख्याायिका पोलीस डिपार्टमेंटमध्ये सांगितल्या जात होत्या. अजिताने दुसरा घोट घेतल्यावर ते पुढे झुकले आणि म्हणाले, "आता बोला अजिताजी. योग्य वेळ आली की तुमचा ऑफिशियल जबाब घेतला जाईलच. पण माझ्या मनात काही प्रश्न निर्माण झाले आहेत."

अजिताने दीर्घ श्वास घेतला, आणखी एक कॉफीचा

घुटका तिने आपल्या घशाला जाळीत खाली ढकलून दिला. मग पुढे झुकून टेबलावर आपले दोन्ही हाताचे पंजे पालथे ठेवत ती म्हणाली,

''हा अपघात कसा झाला प्रश्नाचं उत्तर काहीही असले तरी जे विजयला ओळखतात, ते ह्या दोन्ही गोष्टी विजयच्या बाबतीत होणे शक्यच नाही असे ठामपणे म्हणतील."

"तुम्हीही?"

''होय. मीही. त्याचा स्वभाव अत्यंत सावध आहे. काहीजण अशा स्वभावाला भितराही म्हणतील. एका ठराविक वेगानेच तो गाडी चालवायचा. त्याला अपघात होणं अशक्यच. घातपात होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. पण त्याचं कारण मला सांगता येणार नाही. विजयला मी निदान पाचसहा वर्षांपासून पत्रकार म्हणून ओळखते. प्रेरणा आमच्या संस्थेत काम

करत असल्याने त्याच्याशी ह्या एकदोन वर्षात जास्त जवळचा संबंध आला. पण त्याच्या पत्रकारिकतेबद्दल मला फारसं माहीत नाही. त्या क्षेत्रात त्याला शत्रू आहेत वा नाही हे मला माहीत नाही. तो कडेगावला जाणार आहे हे कुणालाच माहीत नव्हते. त्यालाही नाही, मलाही नाही. तुम्हाला माहीत असेल, मीच कडेगावला निघाले होते. ऐनवेळी मी जाण्याचे कॅन्सल करून त्याला माझ्या जागी पाठवले. एका अर्थाने मीच त्याला मृत्यूकडे पाठवले."

" निश्चितपणे काय घडले असावे, ह्याचा अंदाज उद्या दिवसाउजेडी परिस्थिती पाहिल्यावरच कळेल. तेव्हा त्याबद्दल तुम्ही आतच स्वत:ला अपराधी समजायचे काही कारण नाही. वाहन अपघात म्हणजे नेहमीच वाहनचालकाचाच दोष असतो असे नाही. म्हणजे अपघात झालेल्या वाहनचालकाचाच दोष असतो असे नाही." भास्करन काही वेळ विचार करीत राहिले, मग त्यांनी विचारले, " दोन गोष्टी विजयच्या बाबतीत

अशक्य आहेत असं तुम्ही म्हणालात. त्यातील एक, त्यानं रश ड्रायव्हींग केल्यामुळे त्याच्या अपघात झाला असणे शक्य नाही, ही एक गोष्ट. दुसरी?"

"मला वाटतं तुमच्याही ते लक्षात आले आहे, विजयच्या वाईड चिटरचे, जर्कीनचे एक बटण चुकीच्या काज्यात लावलेले आहे. खालचे बटण वरच्या काज्यात. विजय निघाला तेव्हा, त्याने बटणे व्यवस्थित लावलेली होती, हे मी ठामपणे तुम्हाला सांगू शकते. तो निघाला, तेव्हा मी त्याला विचारले होते की, 'विजय, परत यायला उशीर झाला तर थंडीने गारठशील, आत स्वेटर आहे की नाही?' तेव्हा त्यानं सांगितले होते, 'ह्या वाईड चीटरला पुढच्या बाजूला डबल लेअर आहे. आतल्या बाजूला चेन आहे. वरच्या कापडाला बटणं.' त्यावेळी माझं लक्ष त्याच्या बटणांकडे गेले होते. हे बोलणे झाले तेव्हा प्रेरणाही तेथे होती, नायरही होते. रस्त्यात त्याला वाईड चीटर काढण्याचे काही कारण होतं असं मला वाटत नाही. आणि काही कारणांमुळे काढून परत

घातला असता तरी त्याची बटणं वरखाली लावण्याचे काहीच कारण नव्हते."

"अव्यवस्थितपणाला किंवा गबाळेपणाला काही कारण लागत नाही." भास्करन म्हणाले,

"पण विजय अव्यवस्थित वा गबाळा नव्हता. शिवाय त्याने आतली चेन व्यवस्थित लावलेली आहे, मात्र बाहेरची बटणं...."

"तुमचं म्हणणं मी मान्य करतो. पण मरणाच्या दारी असताना चुक होणं शक्य आहे."

"म्हणजे तुम्हाला असं म्हणायचंय की, वाईड चीटरची बटणं लावली तेव्हा तो मरणाच्या दारी होता?"

"माझी खात्री नाही. त्यानं अपघात झाल्यानंतर बटणं लावली वा आधी मी खात्रीने सा ंगू शकत नाही.

पण त्याच्या रक्ताने भरलेल्या बोटांचे ठसे बटणाजवळ दिसत आहेत. ते तसे का यावेत ह्याचे दुसरे काही उत्तर माझ्याकडे नाही."

बराच वेळ कुणी काही बोललं नाही.

मग अजिता म्हणाली, "तसं जर असेल तर, त्याचा अर्थ असा होतो की, अपघात झाल्यानंतर विजय काही काळतरी जीवंत होता आणि ह्या काळात ओरडून मदत मागण्याऐवजी, किंवा स्वत: वर येण्याची धडपड करण्याऐवजी तो आपल्या वाईड चीटरची सुटलेली बटणं लावण्याचा प्रयत्न करत होता. किंवा व्यवस्थित लागलेली बटणं सोडून परत चुकीच्या पध्दतीने लावत होता. जखमी झाल्यानंतर त्याने आपल्या जर्किनची बटणे लावण्याकरता आपल्या आयुष्यातील अखेरचा उर्जा खर्च केली. इटस् क्रेझी. रिअली क्रेझी."

"मला वाटतं, अजिताजी." भास्करन म्हणाले,"तुम्ही

साध्या गोष्टी गुंतागुंतीच्या करत आहात. विजयला लवकर परत येण्याची इच्छा होती हे तर स्पष्टच आहे. प्रेरणाचा निरोप घेताना त्यानं घाईघाईत बटणं वरखाली लावली असतील, आणि जखमी झाल्यावर आपल्या चेहऱ्यावरील रक्त त्याच्या हाताला लागून चीटरला लागलं असेल. तो काही महत्त्वाचा मुद्दा आहे असं मला वाटत नाही. त्याबद्दल व्यवस्थित माहिती स्पॉटवर गेल्यावर समजेलच. पण मला सांगा, कडेगावला तुम्ही कशासाठी जाणार होता, आणि तेथे जाण्याचा कार्यक्रम तुम्ही एकाएकी का बदलला?"

अजिता काही क्षण भास्करनकडे पाहात राहिली, भास्करन हा प्रश्न आपल्याला कधीतरी विचारणार हे तिला अपेक्षितच होतं. पण ह्या प्रश्नाचं उत्तर तिलाही माहीत नव्हतं. तिच्या मनात आलं, खरंच शेवटच्या क्षणी आपल्याऐवजी विजयला पाठवावे असं का आपल्या मनात आलं? डि.वाय.एस.पी.ना आपल्यावर ह्या दोन दिवसात दोन खूनी हल्ले झाले हे कळले तर

ते ह्या घटनेचा काय अर्थ लावतील? तिने तो क्षण परत जगण्याचा प्र्यत्न केला.

ऑफिसमधले दिवसाचे सगळे काम संपवून ती पुर्ण तयारीनिशी बाहेर आली होती. बाहेर प्रे्रणा आणि विजय बोलत उभे होते. पण त्यांच्याकडे पाहाताच तिला त्यांच्या चेहऱ्यावरील हावभाव पाहून त्यांचा काहीतरी वादविवाद झाला असावा असं जाणवलं होतं. मग तिने हसतच विजयकडे पाहून विच◌ारले होते, "कारे, काही भांडण चाललं होतं का?"

"पहा ना अजिताजी, हिने मला बरोबर वेळ दिली होती. मी हजार भानगडी करून वेळेवर आलो. अन् ही म्हणते अर्जंट काम आहे, आजचे तर सोडा, उद्याचंही सर्व कॅन्सल कर म्हणत्येय."

"कशाचे काम आहे प्रे्रणा?"

"ऑडिटरने क्वेरी काढलीय ना! गेल्या वर्षाचा अकाऊंटही पाहावा लागेल. तीन-चार तास काय, कदाचित जास्तीच वेळ लागेल. म्हणून मी ह्याला म्हणाले, आपण परवाच भेटू एकदम."

"कोण आहे तुझ्याबरोबर आणखी?"

"तीच अडचण आहे अजितादीदी. कुणीच रिकामं नाहीये. लतिकाची मिटींग आहे. नायरजी यायला तयार आह◌ेत, पण.."

"आय ऍम सॉरी, विजय. शी इज् राईट. इटस् अर्जंट." मग त्याच्या चेहऱ्यावरील निराशेचे भाव पाहात अजिता म्हणाली होती, "एक मार्ग आहे. तू माझं काम केलेस, तर मी प्रेरणाला मदत करेन. आज नाही पण मग उद्याचा दिवस तुम्हाला मिळू शकेल. आज दोन तीन तास बसलो आणि तिने उद्या सकाळी काही वेळ दिला तर अकरा वाजेपर्यन्त ती मोकळी होईल."

"डन!" ' विजय आनंदाने म्हणाला होता, "बोला, काय काम आहे?"

"तसं तुला आवडेल असंच काम आहे, कडेगावला जायचं, मिटींगला हजर राह्यचं.बचत गटाच्या मिटीगमध्ये जे कामकाज चालेल त्याचे मिनिटस् लिहायचे. बस्स. मात्र् आणखी काही कार्यक्र्म तुला करता येणार नाही. आमची दारूबंदीची मोहीम चालू झालीय. जेवणाची सोय खास असेल हे मात्र् निश्चित. बघ. मिटींग आटोपून मध्यरात्र्पर्यंत परत येऊ शकशील." अजिता म्हणाली होती.

आणि मग काही वेळातच तो आपली स्कूटी तेथेच ठेवून संस्थेच्या यामाहावर बसून बाय् बाय् करीत गेला होता.

अजिताने तो प्र्संग सविस्तर सांगितल्यावर डि.वाय.एस.पी. काही क्षण गप्प बसले मग हलक्या व

सहज आवाजात ते म्हणाले, "कॉम्रेड अजिता, विजय व्ही.आर.डी.सी.चा कर्माचारी नव्हता हे स्पष्टच आहे. पण तो तुमच्या पक्षाचा सदस्य होता क ा?"

अजिताने त्यांच्याकडे पाहिले तेव्हा तिचा चेहऱ्यावर एक विमनस्क हास्य झळकून गेले, मान हलवत आणि त्यांच्याकडे एक बोट रोखीत ती म्हणाली, "मिस्टर भास्करन. तुम्ही माझा दोन तीन वेळा कॉम्रेड म्हणून निर्देश केला. मी त्याला हरकत घेतली नाही. मी कॉम्रेड आहे. मी तो विचार मानते. एकवेळ मी एका पक्षाची ऍक्टीव्ह कार्यकर्तीही होते. पण ती गोष्ट आता इतिहासाचा भाग झाली आहे. त्यामुळे माझा कुठला पक्ष नाही. विजय एखाद्या पक्षाचा सदस्य होता वा नाही मला माहीत नाही."

डि.वाय.एस.पी. भास्करन किंचित हसले, मग खांदे उडवून म्हणाले, "एनी व े, इट डझन्ट मॅटर. विजयचे राजकीय संबंध काय होते ही माहिती काढता येईल,

काढावीच लागेल."

जीप जेव्हा घाटाच्या मध्यावर पोचली, सकाळचे आठ वाजत आले होते. तिला सकाळी घरी जायला संधीच मिळाली नव्हती. डि.वाय.एस.पी.च्या कार्यालयात तिचा जबाब घेता घेता सकाळ झाली होती. आधीच्या वळणावरूनच तिला रस्त्याच्या कडेला उभी असलेली पोलीसची जीप दिसली. प्रेसची गाडीही जवळच उभी असलेली दिसत होती. हे साहजिकही होतं. विजय आंध्रा टाईम्सचा रिपोर्टर होता. रिपोर्टर्स डी.वाय.एस.पी.ची वाट पाहात होते. पत्रकारांतील काही जण तिला ओळखत होते. परंतु ओळखीचे स्मित करून ते भास्करनकडे वळले होते. विजय आपल्याच कामाकरता कडेगावला निघाला होता, हे कळल्यावर रिपोर्टर्स आपल्या मागे लागतील असा विचार मनात येऊन तिने एक दीर्घ उसासा सोडला.

जीप थांबल्याबरोबर पोलीस इस्पेक्टर अय्यर धावत

पुढे आला. अजिता जीपमधून उतरून जरा बाजूला जाऊन उभी राहिली. डि.वाय.एस.पी. भास्करन् इन्स्पेक्टर अय्यर बरोबर अपघाताच्या स्थळी निघाले, तेव्हा अजिताही त्यांच्याबरोबर चालू लागली. पुढे आलेल्या पत्रकारांना भास्करननी दूरच थांबवले, " मी आताच येतोय इथं. प्रथम मला काय झालंय ते समजून घेऊ द्या. मी बोलतो तुमच्याशी."

रोडच्या कडेला मोटर सायकल उभी करून ठेवली होती. अजिताने दुरूनच निरीक्षण केले, एका बाजूने, पेट्रोल टॅकवर जोरदार तडाखा बसून त्याचा पृष्टभाग आत गेल्याचे दिसत होते. आणि त्याचप्रमाणे त्याच्या उलट बाजूलाही मागच्या चाकाच्या जवळ जोरदार मार बसलेला दिसत होता.

इन्स्पेक्टर अय्यर भास्करन् साहेबांना माहिती सांगत होता. "साहेब, रायडरचा कंट्रोल गेल्याने गाडी झुडपात गेली असं दिसत नाही. बहुतेक कुठल्यातरी

फोर व्हिलरने यामाहाला उजव्या बाजूने जोरदार धडक दिल्याने गाडी झुडपातल्या तोडलेल्या झाडाच्या बुंध्यावर दुसऱ्या बाजूने आदळली, आणि ह्या दोन्ही धक्क्यांमुळे रायडर खाली फेकला गेला. आता फोर व्हिलरने मुद्दामून धडक देण्यात आली की, अपघाताने धडक बसली हे सांगणे कठीण आहे."

गाडी ह्या झाडाच्या बुंध्यावर आपटून ह्या फांदयांमध्ये तिरप्या पोजीशनमध्ये अडकली आहे असं दिसत होतं. डि.वाय.एस.पी. भास्करन रस्त्यावर उमटलेल्या चाकाच्या खुणांकडे पाहात होते, बहुधा शेवटच्या क्षणाला आपल्याला पुढे निघायला जागा नाही आणि गाडी आपल्याला धडक द्यायचा प्रयत्न करीत असल्याचे लक्षात आल्याने विजयने एकदम ब्रेक दाबून गाडीची धडक चुकवण्याचा प्रयत्न केला असावा. रोडवर उमटलेल्या टायरच्या खुणांवरून तसं भासत होते. हायवेवर तिला अशाच प्रकारे डिव्हाडींग वॉलमध्ये चेंदण्याचा प्रयत्न झाला होता. येथेही तीच गाडी

वापरली गेली होती का? विजय ऑफिसमधून निघाला तेव्हा संध्याकाळ झाली होती. इथे पोचला तेव्हा अंधारलेले असणार. भास्करननी काठावर जाऊन खाली डोकवून पाहिले, मग अजिताला जवळ बोलावून बारा पंधरा फूट खाली असलेल्या झाडाच्या बुंध्याकडे तिचे लक्ष वेधले. इन्स्पेक्टर पुढे होत म्हणाला, "त्या झाडावर मृत असामी खोडाला टेकून बसली असताना मरण आलं असावं असे दिसत्येय. मृत इसम खाली फेकला गेला तरीही त्यानं वर येण्याचा, रांगत वर येण्याचा प्र्यत्न केला असे दिसत्येय, पण त्या प्र्यत्नात तो पुन्हा घसरला असावा. तेथे जमीनीवर तशा खूणा दिसत आहेत सर."

"ठीक आहे. वेगवेगळया ऍंगल्सनी फोटो घेऊन ठेवा. प्रेत कुठे होते? वर चढण्याचा प्र्यत्न कुठे झाला, ह्याच्या प्र्तिमा स्पष्ट येतील असा प्र्यत्न करा. ही घटना संध्याकाळी सात साडेसातला झाली असावी. त्यादृष्टीने एखादी संशयास्पद गाडी दिसली का ह्याचा

शोध घ्या. चहाच्या टपऱ्यांवर कोणी काही बोलत होतं का बघा. यामाहाचीही तपासणी करा. ब्रेक फेल झाला नाही ना? तपास घ्या. व्यवस्थित पंचनामा करा, मगच गाडी हलवा. खालच्या झाडापर्यंत जाता येईल का? "

"रोडने जरा वर जाऊन पाऊलवाटेने फिरून खाली जावं लागेल सर."

"हरकत नाही. मला रस्ता दाखवा. नाही. तुम्ही यायची गरज नाही. आणि तुम्ही येथलं काम आटपल्यावर मला कॉन्टॅक्ट करा. जरा ही पत्रकार मंडळी काय म्हणतात ह्याचाही शोध घ्या. कुणीतरी कॉन्स्टेबल द्या माझ्याबरोबर."

कॉन्स्टेबलच्या मागे निघाल्यावर भास्करननी अजिताला बरोबर येण्यासाठी इशारा केला होता. ते दोघे त्या झाडापाशी पोचल्याबरोबर अजिताच्या लक्षात आलं, झाडाच्या खोडावर खडूने खूण केलेली होती.

तेथे पोचल्याबरोबर भास्करननी झाडाच्या खोडाच्या आसपास जमिनीवर कशाचा तरी शोध घ्यायला सुरुवात केली. कॉन्स्टेबलही गुडघ्यावर बसून हातांनी गवत बाजूला करून काही दिसतं का ते शोधू लागला. त्यांना फार वेळ शोध घ्यावा लागला नाही. झाडाच्या बुंध्यापासून काही अंतरावरच, जरा खाली कॉन्स्टेबलला एक पेन सापडला. पेन उघडा होता, त्याचे टोपण मात्र पेनबरोबर नव्हतं.

भास्करनी तो पेन नीट रूमालात गुंडाळून घेतला आणि कॉन्स्टेबल जवळ देऊन ते म्हणाले, "हे इन्स्पेक्टर अय्यरच्या ताब्यात द्या. भोवतालच्या भागाची नीट तपासणी करा. पेनचं टोपण सापडतं का पहा."

परत वर येता येता अजिताने विचारले, "सर, तुम्हाला पेन सापडायला हवा हे अपेक्षितच होतं का?"

"तसं म्हणायला हरकत नाही. मिस अजिता, समजा

तुम्ही अशा रीतीने जखमी आहात, कुठल्याही क्षणाला तुमची शुध्द जाईल अशी शक्यता आहे. तुम्हाला कोणतीतरी महत्त्वाची माहिती तुमच्या सहकाऱ्याला सांगायची आहे. सुशिक्षित माणूस काय करेल?"

"खिशाला पेन असेल तर तो मेसेज लिहून ठेवण्याचा प्रयत्न करेल."

"बरोबर. हा मेसेज लिहिण्यासाठी ती व्यक्ती कागद शोधण्याचा प्रयत्न करेल. जर कागद नाही असं लक्षात आलं तर काय करेल?"

अजिताने क्षणभर विचार केला, मग भास्करनकडे वळत ती म्हणाली, "आपल्या डाव्या तळहाताच्या कातडीवर वा मांडीवर लिहिता येईल."

"एकदम बरोबर. विजयच्या तळहातावर शाईच्या काही रेघेट्या मला दिसल्या होत्या. पण त्या प्रयत्नात

असतानाच विजयच्या हातून पेन निसटला असावा, किंवा कुडीतून त्याचा जीव!"

"म्हणजे तुमचा अंदाज बरोबर निघाला. पेन सापडला.'' मग क्षणभर थांबून तिने विचारले, "सर, विजयच्या हातांवर केवळ अर्थशून्य रेघोटयाच होत्या की काही अर्थ निघू शकेल असे शब्दही होते?"

"केवळ अर्थहीन रेघोटयाच होत्या. पण अजिताजी, त्या रेघोटयांतून काही शब्द तयार होत नसले तरी त्या रेघोटया काहीतरी सांगतातच. विजय तुम्हाला काहीतरी माहिती द्यायचा प्रयत्न करत होता. ती माहिती त्याला धडक देऊन जाणाऱ्या वहानाबद्दल असणार किंवा तुम्ही त्याला ज्या कामगिरीवर पाठवले होते त्याविषयी असणार."

"जातानाच ही घटना घडलीय मिस्टर भास्करन्. मी सांगितलेल्या ठिकाणी तो पोचूच शकला नाही."

"पण त्याला तुम्हाला काहीतरी महत्त्वाचे सांगायचे होते हे निश्चित. आणि ती माहिती एक दोन शब्दांतच सांगणं शक्य होतं हेही स्पष्ट आहे. नाहीतर तळहातावर त्याला किती लिहिता येणार होते? ही माहिती कशाबद्दल असावी ह्याचा काहीतरी अंद◌ाज तुम्हाला असेल कॉम्रेड अजिता."

काहीवेळ अजिता काहीच बोलली नाही, मग म्हणाली, "सर, तुम्हाला वेळ असेल तर आपण आता केडगावला जाऊन येऊ या. झालेल्या घटनेबद्दल तेथील लोकांना माहितीही देता येईल. मी काल आले नाही, काही निरोप नाही, त्यामुळे त्यांना चिंता लागलेली असेल."

"ठीक आहे, जाऊन येऊ आपण" भास्करन म्हणाले. डि.वाय.एस.पी.ना केडगावला घेऊन जाण्यातील तिचा हेतू स्पष्ट होता. आपण कशाकरता तेथे जाणार होतो म्हणजेच विजय कशाकरता जाणार होता हे

लोकांकडूनच त्यांना कळावं अशी तिची इच्छा होती. पण अजिता विचारात पडली होती. विजय मरण्यापूर्वी काहीतरी सांगण्याचा प्रयत्न करत होता? पण काय आणि कुणाला? प्रेरणाला की मला? त्याला धक्का देऊन जाणाऱ्या गाडीचा नंबर तर त्याने पाहिला नसेल?

रात्री अजिता आपल्या खोलीवर पोचली तेव्हा मध्यरात्र उलटून गेली होती. केडगावला जाऊन परतायला दुपार झाली होती. भास्करननी तिला ऑफिसपर्यंत पोचवले होते. तेथेही मरणाची छाया पडलेली दिसत होती. तिने स्टाफमधील सर्वांना खोलीत बोलावून घेतले होते आणि जे जे काही घडलं होतं त्याची माहिती त्यांना दिली होती, सकाळी ऑफिसवर येत असताना हायवे झालेली झालेली घटनाही तिने त्यांना सांगितली होती. पोलीस आता स्टाफला भेटणार,जास्तीतजास्त माहिती काढण्याचा प्रयत्न करणार हे निश्चितच होते. त्यामुळे स्टाफला

विश्वासात घेऊन वेळीच माहिती देणे अत्यंत आवाश्यक होते.

विजयचे वडील व भाऊ गावात आले होते, त्यांना गाठून विजयचे प्रेत ताब्यात घेण्याकरता त्यांना मदतीची गरज असल्यास नायरजी व लतिका ह्यांनी मदत करावी असेही ठरले. स्वत: अजिता डि.वाय.एस.पी. भास्करनशी बोलून विजयची डेड बॉडी मिळण्यात काही अडचणी येऊ नयेत हे बघणार होती.

ऑफिसातून अजिता प्रेरणाच्या घरी गेली होती. डॉक्टरांनी प्रेरणाला सिडेटीव्ह देऊन झोपवले होते. प्रेरणाच्या आईवडलांजवळ काही वेळ बसून ती घराकडे निघाली तेव्हा ती इतकी थकलेली होती की, नरेशला वाटेत गाडी थांबवून दुधाची पिशवी व अंडी घ्यायला, आणि घरी पोचल्यावर उठवायला सांगून ती जीपच्या सीटवरच झोपली होती. घरी पोचताच कॉम्प्युटर उघडून एम. एस. वर्डमध्ये तिने पी.के. करता

एक शॉर्ट मेसेज तयार केला आणि इंटरनेट कनेक्शन जोडून इमेल पाठवून दिला. स्थानिक वर्तमानपत्रांत विजय अपघातात गेल्याची बातमी आली होती. त्यात डी.आर.व्हि.सीचा उल्लेख आला होता.

रात्री झोपण्यापूर्वी तिने ऑफिसला फोन केला. राघवन् फोनवर आला. विजयची बॉडी त्याच्या आईवडलाच्या ताब्यात देण्यात आल्याचे, आणि शव गावाकडे न नेता, येथेच विद्युतदाहिनीमध्ये नेण्याचा निर्णय त्यांनी घेतल्याचे आणि नातेवाईकांशिवाय कोणी ह्या कार्यक्रमाला येऊ नये अशी त्यांची इच्छा असल्याचेही राघवनने सांगितले. नायर त्यांच्याबरोबरच राहून त्यांना मदत करत असल्याचेही त्याने सांगितले. सकाळी ऑफिसमध्ये जाताना विजयच्या आईवडलांना भेटायला जायचे ठरवून अजिता बेडकडे वळली आणि काही क्षणातच तिला गाढ झोप लागली.

प्रकरण चौथे

दुपारची दोन वाजण्याची वेळ. शहरातील अतिसधन लोकांची निवासस्थाने असलेल्या बंजारा हिल्स ह्या वस्तीचा चढ चढून टॅक्सी थांबली आणि काहीवेळ काहीच हालचाल झाली नाही. रस्ते निर्मनुष्य होते, वातावरण नि:शब्द होते. टॅक्सीचा दरवाजा उघडून पस्तीशी-चाळीशीची एक स्त्री बाहेर आली. आपले दोन्ही पंजे कमरेवर रोवून तिने आपल्या शरीराला आळोखे पिळोखे दिले. जीनमध्ये अव्यवस्थित खोचलेला टॉप तिने खेचून बाहेर काढला, आपल्या हॅन्डबॅगमधील सिल्कचा रंगीत रुमाल तिने एका सहज बेफिरीने आपल्या गळयाभोवती बांधला. डाव्या हातातील हँडबॅगला एक झोका देऊन तिने खांद्यावरून पाठीवर टाकली. तिच्या अंगावरील कपडे भारी किमतीचे होते, पण सहज निष्काळजी पध्दतीने ते परिधान केले होते.

टॅक्सी वळली, उतारावरून घसरत दूर गेली हे लक्षात आल्यावर ती जागची हलली. तिची चाल होती रेंगाळणारी पण डौलदार होती. तिच्या ढिलावलेल्या शरीराकडे व सुस्तावलेल्या चेहऱ्याकडे पाहून ह्या वस्तीतील कुणीतरी खुशालचेंडू गृहिणी एखाद्या थ्री स्‌टार हॉटेलमध्ये बियरबरोबर सामिष भोजन घेऊन घराकडे परतत असावी असे कुणीही म्हटले असते. पण खरी परिस्थिती तशी बिलकूल नव्हती. ती पुर्णपणे सावध होती. तिच्या नजरेने तो निर्मनुष्य रस्ता, त्या रस्त्यावरील अलिशान बंगले, त्या बंगल्यांच्या खिडक्या, ह्या सर्वांना आपल्या नजरेत सामावून घेतले होते. तिचे तिक्ष्ण कान आजुबाजूला होणाऱ्या प्रत्येक आवाजाची दखल घेत होते. रमत गमत ती त्या लेनच्या दुसऱ्या टोकाकडे निघाली. रस्त्याच्या टोकाला एका प्रचंड आकाराच्या फाटकापाशी लहानशा पीलबॉक्समध्ये बसलेला वॉचमन तिला त्या दिशेने येताना पाहून बाहेर आला, आणि दरवाजावर हात ठेवून तिच्याकडे पाहू लागला. ती जवळ आली, तिची संथ

आळसावलेली नजर झाडांवरून, कंपाऊंडवरून फिरत त्याच्यावर आली आणि पुढे सरकली तेव्हा तो गोंधळला, तो परत मागे पीलबॉक्सकडे वळणारच होता, आणि ती त्याच्याकडे वळली आणि तिने विचारले

" राकेशब ाबू कोईमतूरसे वापस आ गये क्या? "

गार्डने तिला सॅल्युट केला आणि म्हणाला, " साब, आपकी राह देख रहे है."

अजिता आत घुसली. पातळ विटा अंथरलेला रस्ता झाडांच्या गर्दीतून रस्त्यापासून बऱ्याच आत असलेल्या बंगल्याकडे जात होता. बागेला पाणी देताना विटांचा रस्ताही पाण्याने भिजवण्यात आला होता. त्यामुळे एक सघन शितलता जाणवत होती, शरीराला. अजिताची नजर भोवतालच्या हिरव्या रानात फिरत गेली आणि ती नकळत अडखळली. बागेत कुठेतरी आंबा पाडाला आला होता. ओल्या मातीच्या वासासोबतच आंब्याचा

गंध तिच्या मस्तकात पोचला आणि क्षणभर तिच्या नजरेसमोर एक प्रतिमा झळकून गेली. आंब्याच्या दाट सावलीत खोडाला टेकून उभ्या असलेल्या दोन मुली एकच हिरवीगार कैरी पाळीपाळीने लचके तोडून खात होत्या. अजिताची नजर त्या हिरव्या रंगाच्या अनेक छटांतून शोध घेत गेली, आणि कैऱ्यांनी लगडलेले झाड तिला दिसले. तिला जाणवले, तिच्या तोंडाला पाणी सुटले आहे. तिने पायांची गती वाढवली, मात्र बंगल्याकडे जाणाऱ्या विटांच्या रस्त्याने बंगल्याकडे न जाता मध्येच हिरवळीत उतरलेल्या पायवाटेने ती चालू लागली. ती पायवाट बंगल्याला वळसा घालून मागच्या बाजूला जाऊन बंगल्यापासून बऱ्याच अंतरावर असलेल्या आऊट हाऊसकडे वळली होती.

अजिताची नजर भोवती भिरभिरत होती. भोवताली होणाऱ्या प्रत्येक आवाजाची दखल तिचा मेंदू घेत होता. पायवाट मुख्य बंगल्यापासून दूर कंपाऊंडला लागून असलेल्या लहानशा पण टूमदार आऊट हाऊसकडे

गेली होती. ती व्हरांडयात पोचली. व्हरांड्यातील एका खुर्चीवर तिने आपल्या हातातील हँडबॅग टाकली, पायातील सॅन्डल्स काढले. काही क्षण अगदी थकून गेल्यासारखी ती खुर्चीच्या पाठीवर मान टेकून शांत पडून राहिली. घराच्या अंतर्भागातून कुणीतरी बोलत असल्याची गुणगूण ऐकू येत होती. विजयकुमारचा मृत्यू झाल्यानंतर एल.आय.बी. किंवा सी.आय.डी.चा ससेमिरा आपल्यामागे काही दिवस तरी असणार असं गृहीत धरून ती पहाटेच घरातून बाहेर पडली होती, आणि उलट सुलट मार्गांनी येथे पोचली होती.

काही वेळानं ती उठली, बॅग खांद्यावर टाकून दरवाज्यात आत असलेल्या उजवीकडील जिन्याने ती वर आली. छोटासा पॅसेज पार करून ती घराच्या मागच्या बाजूच्या भिंतीला लगटून ह्या टोकापासून त्या टोकापर्यंत जाणाऱ्या गॅलरीच्या टोकाशी उभी राहिली. तिची नजर मागच्या बाजूला दिसणाऱ्या कंपाऊंडच्या भिंतीवरून फिरत गेली मग ती गॅलरीच्या दुसऱ्या

टोकाला असलेल्या दाराकडे निघाली.

रिजनल कमिटीच्या मिटींगकरता आलेले सभासद टेबलाभोवती बसले होते, त्यांना जिंदाबाद करून ती रिकाम्या खुर्चीवर स्थानापन्न झाली. जमलेल्या सहकाऱ्यांकडे तिने नजर फिरवली. अकरा सभासदांपैकी नऊजण हजर होते. पीकेने तिच्या अभिवादनाला प्रतिसाद दिला, पण तो कुठल्या तरी विचारात असल्याचे दिसत होते. ए. एन. उर्फ ॲन उर्फ अनिता नेहमीप्रमाणे ताजीतवानी व तरतरीत दिसत होती. गटाचे आयडॉलॉग डॉ. शर्मा अजून तरी आलेले नव्हते. ऑर्डिनन्स सेक्शनचा केवळ एमजी हजर होता. पण ती त्यांची नेहमीचीच पध्दत होती. एमजी व टीजी दोघांपैकी कुणीतरी एकजणच बहुतेक वेळा मिटींगला येत असे. पाच फिल्ड लिडर्सपैकी तीन जण हजर होते. त्यांचे कपडे जरी शहरी वळणाचे आणि फॅशनेबल होते, तरी त्यांच्या चेहऱ्यावर उन्हातान्हाच्या, रानावनाच्या खाणाखुणा जाणवत होत्या.

नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे मागील मिटींगमध्ये जे निर्णय ठरले होते, जी माहिती काढायची होती वा जी ॲक्शन घ्यायच ी होती, त्याबद्दल एकेका सभासदांनी रिपोटाअग झोच्ले. पावसाळा ऐन जोरात होता. राज्यात बहुतेक ठिकाणी पाऊस कोसळत होता. हे तीन महिने ग्रामीण व आदिवासी भागातील सर्व जनता आपापल्या कामात गुंतलेली, बसेसची वाहतूक विस्कळीत, कच्चे रस्ते पाण्याखाली गेलेले. त्यामुळे हा सिझन म्हणजे ॲक्टिव्हीटीज्च्या दृष्टीने थंडच. त्यामुळे आढावा घेण्याचे काम उरकायला फारसा वेळ लागला नाही.

त्यानंतर पीकेने ॲनाला सेंटर कमिटीच्या वार्षिक मिटींगचा रिपोर्ट रिजनल कमिटीला द्यावा अशी सूचना केली. ॲना तयारीतच होती. एक लहानशी डायरी समोर घेऊन तिने बोलायला सुरुवात केली. ''तीन दिवसीय ह्या नॅशनल कॉन्फरन्समध्ये गेल्या वर्षात ज्या नवीन स्टेटस्मध्ये काम सुरु करण्यात आले त्यांचे प्रतिनिधी आले होते. शिवाय परदेशातूनही बंगलादेश,

जर्मनी, युके, लंका आणि ऑस्ट्रेलियातूनही समविचारी संघटनांचे प्रतिनिधीही कार्यक्रमाला आले होते. अवर बिल्व्हड लीडर सत्येन गुप्त ह्यांनी तीन दिवसांच्या कॉन्फरन्सचे उद्घाटन केले आणि तिन्ही दिवस ते तेथे हजर होते. त्यांनी वेळोवेळी कॉन्फरन्सच्या कार्यक्रमात हस्तक्षेप करून चर्चेला योग्य वळण देऊन केंद्रीय समिती व राज्य समित्यांना युध्दषनती आणि डावपेच ह्या संदर्भात महत्त्वाचे मार्गदर्शन केले. अधिवेशनात वेगवेगळया राज्यसमित्यांनी आपल्या क्षेत्रात झालेल्या कार्याची माहिती दिली. कॉम्रेड पीके यांनी आपल्या सेंट्रल इंडिया झोनच्या कार्याविषयी माहिती दिली. अखेरे ह्या सत्राचा समारोप करताना अवर बिल्व्हड् लीडर कॉमरेड सत्येन गुप्त ह्यांनी आपल्या रिजनचा मुद्दामून आदर्श म्हणून उल्लेख केला. आंतरराष्ट्रीय स्थितीबाबत.."

अजिताने आपल्या समोरील पॅडवर लिहायला सुरुवात केली. तिने काही शब्द कागदावर लिहिले

आणि त्यानंतर ती आपल्याच विचारात मग्न झाली. गेल्या चार महिन्यांपासून अजिताला रिजनल कमिटीच्या मिटींगमध्ये पक्ष सदस्य झालेल्या स्त्री पुरुषांकरता एक कोड ऑफ कंडक्ट असले पाहिजे आणि त्यात पुरुष सभासदांनी स्त्रियांना सन्मानाने,समानतेने वागवावे म्हणून काही नियम केले पाहिजे असे मांडायचे होते. हे नियम काय असावेत, व ते अमलात आणले जावेत म्हणून काय करावे ह्यावर विचार करण्यासाटी एक समिती नेमावी. ह्या समितीत स्त्रियांची संख्या अर्ध्यापेक्षा जास्त असावी, अशीही सूचना मांडण्याचे तिच्या मनात होते. ह्याविषयी एक डिटेल्ड प्रोग्रॅमही तिने तयार केला होता. त्या संदर्भात तिने आधीच ऍनाशी, एसेनशी बोलणेही केले होते. परंतु आज तिला मुख्यत: आपल्यावर झालेल्या खूनी हल्ल्यांबद्दल आणि त्यात विजयचा मृत्यूबद्दल माहिती द्यायची होती, त्यावर सविस्तर चर्चा व्हावी अशीही तिची इच्छा होती. त्यामुळे आज परत एकदा तिने स्त्रीपुरुष संबंधाविषयीचा विषय पुढच्या

मिटींगमध्ये काढायचे ठरवले. विजय पक्षसदस्य नव्हता तरी तो डाव्या विचारांचा होता. एस.जी. ग्रुपविषयी त्याला सहानुभूतीही होती. पण महत्त्वाची गोष्ट ही होती की, तिच्याकरता तयार करण्यात आलेल्या सापळयात विजय सापडला होता, हकनाक मारला गेला होता. . विजयचा मृत्यू गंभीरपणे घेणे गरजेचे आहे असे तिला वाटत होते. आपले म्हणणे प्रभावीपणे कसे मांडता येईल ह्या संदर्भात ती विचार करत होती.

'''ह्यानंतर अवर बिलव्हड् लिडर कॉम्रेड सत्येन गुप्त ह्यांचे आभार मानणारा ठराव सर्वांनी एकमताने टाळयांच्या व घोषणांच्या गजरात पारीत केला. रिजनल कमिटीच्या दृष्टीने महत्त्वाचे जे मुद्दे मिटींगमध्ये उपस्थित केले गेले त्याबद्दल एक वेगळा रिपोर्ट तयार करण्यात येईल, आणि त्यावर सदस्यांमध्ये विस्तृत व खोल रूपात चर्चा होणे गरजेचे असल्याने तसा कार्यक्रम आखला जाईल. मात्र येथे आपण अवर बिलव्हेड लिडर कॉम्रेड सत्येन गुप्त ह्यांनी आपल्या

रिजनने केलेल्या प्रगतीबद्दल रिजनल कमिटीचे कौतूक करताना जो इशारा देऊन ठेवला आहे त्याकडे खास लक्ष देणे आवश्यक आहे. मी हा उतारा कोट करते, 'सेंट्रल इडिया झोन कमिटीने गेल्या दोन वर्षांत विविध आघाडयावर जी लक्षणिय कामगिरी केली आहे, त्याबद्दल समितीला क्र्ांतिकारी अभिवादन करणे योग्यच ठरेल. आपल्या देशासारख्या अर्धसामंती, अर्धभांडवली देशात सामान्य नागरीकांमध्ये सन्मानाने जगण्याची जिद्द जागवणे, विकसित करणे ह्याला विशेष महत्त्व आहे. विशेषत: ज्या समाजात अनेक दलित, पददलित विभागांना शतकानूशतके माणूस म्हणून लाभलेले नैसर्गिक अधिकारही नाकारले गेले आहेत, अशा समाजात ह्या समाजगटांचा स्वाभिमान, अस्मिता जागी करणे, वाढवणे हे क्र्ांतीला पोषकच कार्य आहे. परंतु हे लक्षात घेणे गरजेचे आहे की, बर्ुझ्वा डेमॉक्र्सीमध्ये अशा प्रकारे अधिकारांच्या जाणिवा विकसित करण्याच्या संघर्षाला दुय्यम महत्त्व आहे. कारण दलित, पददलितांच्या अस्मिता बर्ुझ्वा

लोकशाहीच्या चौकटीत विकसित केल्यास त्यात विकृती निर्माण होण्याची शक्यता आहे. म्हणूनच अर्धसामंती, अर्धभांडवली व्यवस्थेविरूध्द निर्णायक सशस्त्र लोकसंघर्ष हाच प्रथम महत्त्व असलेला प्रथम टप्प्याचा क्रांतिक ारक मार्ग आपण मान्य केला आहे हे कुणीही विसरू नये."

अजिताने दीर्घ सुस्कारा सोडला. कॉम्रेड एस.जी.ने दिलेला इशारा सेंट्रल इंडिया झोनच्या कार्याचा उल्लेख करताना केला असल्याने त्यात गर्भीत अर्थ काय लपला आहे, आणि हा इशारा कुणाला उद्देशून दिला आहे हे कुणी समजून सांगण्याची गरज नव्हती. ऍना आणि एसेनशी अधिवेशनाला जाण्यापूर्वी जी चर्चा झाली होती, त्यात ऍना म्हणालीही होती की, सेंट्रल कमिटीमध्ये पक्षसदस्य संख्याबलानूसार रिजनल कमिटयांना प्रतिनिधीत्व मिळावे म्हणून प्रयत्न करणे हा एकच मार्ग आपल्यापुढे आहे. त्याकरता अजितान े सेंट्रल कमिटीमध्ये जाणे गरजेचे आहे. तिचे इथले कार्य

सातत्याने वाढत आहे हे लक्षात घेऊनही ती जबाबदारी टाळणे योग्य ठरणार नाही.'

ती आठवण येऊन अजिता स्वत:शीच हसली. राजकीय विषय निघाला की इतर वेळी अगदी सहज सुंदर बोलणाऱ्या अनिताचा सूरच बदलत असे, आणि तिची भाषा राजकीय ठराव मांडत असल्यासारखी होत असे हे अजिताला माहीत होते.

पक्षाचे हे केंद्रिय समितीचे अधिवेशन यशस्वी झाल्याबद्दल रिजनल कमिटीत पक्षाच्या केंद्रिय नेतृत्वाचे क्रांतिकारी अभिनंदन करणारा एक ठराव पीकेने वाचून दाखवला, तो सर्वांनी मंजूर केला आणि मग अजिताच्या प्रश्नावर चर्चा सुरू झाली. अजिताने थोडक्यात आपल्यावर झालेल्या खूनी हल्ल्याची आणि विजयच्या मृत्यूची हकिकत सांगितली. त्यानंतर गेल्या पाच दिवसांत आपण सतत सावध राहिलो आहोत, पण आपला कुणी पाठलाग करीत नाही, वा आपल्या कुणी

मागावर नाही अशी आपली खात्री झाली आहे असेही अजिताने सांगितले. ह्या खुनी हल्ल्यामागे कोण असावे, त्याचे कारण काय असावे, आता हे हल्ले का थांबले असावेत, असे अनेक प्रश्न चर्चेमध्ये उपस्थित झाले.

"विजयचा मृत्यू झाल्याने अजिता सुरक्षित झालीय असं म्हणावं लागेल. पोलीस आपला शोध घेतील म्हणून खूनी भूमीगत झाल ा असेल किंवा आता अजिताच्या आगोमागेच पोलीस राहाणार असाही धोका त्याला वाटत असेल. थोडक्यात मला वाटतं, आता अजिताला धोका नाही. पण ह्याचा अर्थ मुळात हा प्रयत्न का कुणी केला ह्याचा शोध घेतलाच पाहिजे." एमजीने मांडले होते. त्याच्या युक्तीवादात एक तर्कदुष्टपणा होता, पण त्यात सत्याचा अंशही होता. विजय गेल्यापासून आपल्या कुणीही मागावर नाही, हे तिला मान्य करणे भाग होते.

मग अजिताच्या कार्यपध्दतीच्या संदर्भातही बरेच प्रश्न उपस्थित केले गेले. व्ही.आर.डी.सी.ने दारूबंदीसारख्या आंदोलनात सर्वोदयी लोकांबरोबर सहभागी होणे योग्य आहे का असाही प्रश्न उपस्थित केला गेला. अजितासारख्या जहाल राजकीय कार्याची पार्श्वभूमी असलेल्या कॉम्रेडने ह्या अशा कामात शक्ती व वेळ वाया घालवू नये असं फिल्ड वर्कर्सकडून परत एकदा मांडलं गेले. डि.वाय.एस.पी. भास्करन् अत्यंत आतल्या गाठीचा माणूस आहे, आणि त्याच्यापासून सावध राहाणे गरजेचे आहे असंही आग्रहपूर्वक सांगितले गेले. मुळात हे विकासाचे काम सतत वाढत चालले आहे ही बाबच कितपत योग्य आहे ह्यावरही मते व्यक्त केली गेली. आपल्यावर झालेले खूनी हल्ले आणि विजयचा मृत्यू ह्या मुळ मुद्यावरच चर्चा व्हावी म्हणून अजिताला सतत प्रयत्न करावे लागले. अखेर हे हल्ले व्हि.आर.डी.सी.च्या कामाशी संबंधित नसावे असे गृहीत धरून ह्या हल्ल्यांमागे कोण असावे ह्याचा शोध घेण्यासाठी कॉम्रेड एसेनने कॉम्रेड अजिताला साह्य

करावे असा निर्णय घेण्यात आला. शिवाय हे प्रकरण निवळेपर्यंत कॉम्रेड अजिताने पार्टी मेंबर्सना भेटण्याचे वा संपर्क करण्याचे टाळावे, गरज भासल्यास खास काळजी घ्यावी अशीही सूचना केली गेली. ह्या संदर्भात एक अहवाल सेंटर कमिटीला पाठवावा असेही ठरले आणि इतर काही मुद्दयांचा विचार करून मिटींग समाप्त झाल्याची घोषणा पीकेने केली.

खालच्या व्हरांडयात एसेनशी भेटीची वेळ निश्चित करत असतानाच अजिताला एकदम ह्या मिटींगमध्ये इगोरवर काहीच चर्चा झाली नाही हे आठवलं. पीकेने सेंट्रल कमिटीच्या संबंधित कॉम्रेडशी तरी ह्यावर चर्चा केली वा नाही हेही सांगितले नव्हते असेही तिच्या लक्षात आले.

नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे ते एक एक जण काही मिनिटांच्या अंतराने तेथून बाहेर पडत होते. जाताना क्रांतिकारी जिंदाबाद करून निरोप घेत होते. जीएम

जाता जाता काही क्षण अजिताजवळ आला, म्हणाला, "मला वाटलं होतं, सीसीकडून इगोरबद्दल काही माहिती येईल, त्यावर चर्चा होईल. आय ऍम बीट वरीड्. पंडित शर्मा हा अत्यंत खतरनाक माणूस आहे. इगोरने ह्या नागापासून दूरच राह्यला हवे असा त्याला सल्ला देणे गरजेचे आहे. अजिताने इगोरला खैबरमध्ये पाहिल्याचे एसेनने इतरांना सांगितले होते, हाच त्याचा अर्थ होता.

बहुतेक सर्व निघून गेल्यावर एसेनही गेला. अजिता निघण्याच्या तयारीतच होती तोच अनिता खाली आली. अजिताचा निरोप घेताना सहजतेने अनिताने अजिताच्या पाठीवर हात टाकून जवळ घेतले, आणि म्हणाली, " अजिता, प्लीज टेक केअर ऑफ युवरसेल्फ. वुई नीड यू."

अजिता रस्त्यावर आली, नेहमीप्रमाणे बसस्टॅन्डवर जाऊन उभी राहिली. अशा प्रसंगी परतताना तिची एक

खास पध्दत होती. जर त्यादिवसाची तारीख विषम असेल तर ती उजव्या हाताला वळून आंबेडकर पुतळयाजवळ बस पकडत असे. सम तारखेला हुतात्मा स्मारकाजवळील स्टॅन्डपासून. बसस्टॉपवर पोचल्यावर स्टॉपवर उभ्या असलेल्या एखाद्या व्यक्तीची ती निवड करत असे आणि ती व्यक्ती ज्या बसमध्ये चढत असे तिच्यात तीही चढत असे आणि लास्ट स्टॉपपर्यंत जात असे. त्यानंतर ती आपल्या निवासाकडे कधी टॅक्सीने तर कधी बसने, कधी रिक्शाने तर क्वचित चालतही पोचत असे. माणूस रोजच्या व्यवहारात ठराविक गोष्टी ठराविक पध्दतीनेच करत असतो. आणि तिच्या हालचाली जर प्रेडिक्टेबल असतील तर तिच्यावर नजर ठेवणं हे सोपं होतं. त्यामुळे घरी जाताना अनपेक्षित मार्गाने जायचे असा तिचा प्रघात होता. पण आज मात्र ती सरळ रिक्शा करून तिच्या निवासस्थानाजवळील चौकात येऊन उतरली. माणसाला नवीन सवयी सहज लागतात, प्रयत्न न करता, अजाणतेपणी. बसस्टॉपवर पोचल्यावर विशिष्ट जागी उभे राहणे, हॉटेलमध्ये

रिकामे असेल तर विशिष्ट टेबलाशी बसणे, साध्या साध्या गोष्टी पण माणूस नकळत सवयीप्रमाणे करतो. मात्र सवय लागू नये म्हणून जाणिवपूर्वक प्रयत्न करावे लागतात. ह्या सवयी केवळ शारीरिक पातळीवरली नसतात. मनाला देखील विशिष्ट पध्दतीने विचार करण्याची सवय असते. टेकडीवर पाऊस पडला की विशिष्ट मार्गांनी पाणी खाली येते तसाच हा प्रकार. सवय म्हणजे स्वातंत्र्याला घातलेले कुंपणच.

घराकडे वळण्याआधी जवळच्या कोपऱ्यावरील इराण्याच्या हॉटेलमध्ये ती घुसली. तिला हे इराण्याचे हॉटेल फारच आवडत असे. येथे फॅमिली रुम्स तर नव्हत्या, पण आतला हॉल हा फॅमिलीज् आणि स्त्रियांकरता रिझर्व्ह होता. ती कोपऱ्यातील टेबलावर पोचली. चहाचा पहिला घशाला जाळणारा घोट घेतला आणि नकळत तिची नजर समोरच्या आरशाकडे गेली. येथे भिंतींवर, खांबांवर जेथे जागा मिळेल तेथे आरसे लावले होते. समोरच्या आरशात तिच्या चेहऱ्याचे डाव्या

बाजूचे प्रतिबिंब दिसत होते. खांबावरील त्या आरशाचा ॲंगल असा होता की, समोर बसलेल्या व्यक्तीचा चेहरा प्रतिबिंबात डाव्या बाजूने दिसत असे. समोरच्या आरशात दिसणारा चेहरा तिचाच चेहरा आहे हे प्रथम काही दिवस तिच्या लक्षातच आलं नव्हतं. तिने भोवताली नजर फिरवून इतर खांबांवरील आरशात बघितले होते, आणि वेगवेगळया आरशात आपली वेगवेगळी प्रतिबिंबे पाहात राहिली होती. त्यानंतर अनेकवेळा ती एकटीच ह्या टेबलावर येऊन बसली होती. आपल्या चेहऱ्याच्या अनेक अनोळखी प्रतिमा पाहाताना हरवून जायची ती. एसेनजवळ ती सहज ह्याबद्दल बोलली होती आणि एसेन खास ही जागा बघायला एकदा तिच्याबरोबर आला होता. आरशांतील प्रतिबिंबांकडे पाहात राहिला होता. '

"ह्या आपल्याच अस्तित्वाच्या विविध प्रतिमा पाह्यल्या की मला आठवतं, कुणीतरी लिहिलं आहे, प्रत्येक व्यक्तीचं व्यक्तित्वे हे अनेकांगी असते. मल्टा

डायमेन्शनल पर्सनॅलिटी!"ी अजिता त्याला म्हणाली होती.

" एखाद्या अनेक पैलू पाडलेल्या हिऱ्याप्रमाणे. होय ना? पण हिऱ्यांचे सर्व पैलू एकम्ेच्कांचे तेज वाढवतात, डोळयाला दिपवणारे. पण आपल्याला मात्र हे पैलू ्अनोळखीच नाही, अज्ञातही असातात. काहीवेळा आपल्याच व्यक्तित्वाचा अगदी अनोळखी पैलू समोर येतो आपल्या. चांगला की वाईट? ह्या प्र्श्नाचे उत्तर महत्त्वाचे नाही. अनोळखी असणं हे महत्त्वाचे. पण खरंच आपलं व्यक्तित्व अनेक पैलू असलेल्या हिऱ्याप्र्माणे असतं का? मला वाटतं अजिता, आपल्या ह्या बाह्य मानवी विश्वाप्र्माणेच आपलंही अस्तित्व आहे. विविध पैलू असलेलं नाही तर विविध तुकडे तुकडे झालेले. फ्र्ॅगमेंटेड्."

अजिताने त्यावेळी एसेनचे म्हणणं मनाला भिडूच दिलं नव्हतं. ह्या अनुभवातील थ्रील तिला हरवायचे नव्हते.

पण तरीही विविध पैलू की विविध भग्न तुकडे? ह्या प्रश्नाला ती टाळू शकली नव्हती. मग केव्हांतरी हे आकर्षण कमी झाले होते, तिचे तेथे येणे कमी झाले होते.

प्रकरण पाचवे

अजिताला सकाळी उठायला जरा उशीरच झाला. आदल्या दिवशी इराण्याच्या हॉटेलमधून चहा घेऊन ती बाहेर पडली होती, पण तिला ताबडतोब घरी जावेसे वाटले नव्हते. संध्याकाळचे सात वाजत आले होते. कुणा मैत्रिणीकडे जाणेही शक्य नव्हते. मग ती वुमेन्स

क्लबमध्ये गेली होती आणि स्विमींग टँक जवळच्या बाकावर समोर पाण्यात डुंबणाऱ्या मुलींकडे पाहात बसून राहिली. रात्री ती घरी पोचली आणि नायरांचा फोन आला होता. तिची तब्येत कशी आहे हे बघण्यासाठी त्यांनी फोन केला होता. विजयच्या मृत्यूमुळे झालेल्या एकूण मानसिक ताणामुळे आणि शारिरीक अस्वस्थतेमुळे आपण ऑफिसला येणार नसल्याचे, व सर्व दिवस एका मैत्रिणीकडे जाऊन तिच्या मुलाबाळांत राहणार असल्याचे तिने नायरांना सांगितले होते. नायरांनी तिचा दिवस कसा गेला ह्याची चौकशी करण्यासाठी आणि तिच्या तब्येतीची चौकशी करण्यासाठी फोन केल्याचे सांगून दुसऱ्या दिवशी नरेश तिला घ्यायला जीप घेऊन घरी येईल, तेव्हाच तिने ऑफिसला निघावे, आणि पुढील काही दिवस तरी तिने जीपशिवाय कुठेही हिंडू नये असे बजावले होते. संस्थेच्या अकाऊटंटचे काम करणारा ह्या रुक्ष स्वभावाच्या माणसाचा आपलेपणा तिला काहीसा अनपेक्षित होती. थँक्स म्हणून तिनं फोन खाली

ठेवला.

व्हि.आर.डी.सी.मधल्या कुणालाच तिचा भूतकाळ खऱ्या अर्थाने माहीत नव्हता. ती मार्क्सवादी विचारांना मानते, डाव्या राजकीय पक्षांबद्दल तिला सहानुभूती आहे हे सर्व स्टाफला माहीत होते. परंतु ती एखाद्या राजकीय पक्षाची आणि सशस्त्र क्रांतीवर विश्वास ठेवणाऱ्या पक्षाची सभासद असेल अशी त्यांना शंकाही नव्हती. ऑफिसमधील कर्मचाऱ्यांचे तिच्यावरील प्रेम, भक्ती पाहून तिला कधीकधी आपण ह्या मंडळींना फसवतो आहे, त्यांच्याशी प्रतारणा करत आहोत अशी अपराधित्वाची भावना त्रास देत असे.

ऑफिसमध्ये जाताना नरेश खास जागरूकतेने ड्रायव्हिंग करत असल्याचे अजिताला जाणवले. तसं म्हटलं तर ह्याबाबतीत नरेश नेहमीच सावध असे. रस्त्याने येताना-जाताना कुणाची गाडी येते जाते ह्याकडे त्याचे नेहमीच लक्ष असे. जवळपास कुणी

ओळखीचा दिसला आणि अजिताचे तिकडे लक्ष नसले तर तो तिचे लक्ष तिकडे वेधत असे. व्हि.आर.डी.सी.ने जेव्हा जीप घेतली तेव्हा तिचा ड्रायव्हर पक्षसभासद नसण्याबद्दल रिजनल कमिटीमध्ये घमासान चर्चा झाली होती. ह्यावर व्हि.आर.डी.सी.ची गाडी केवळ संस्थेच्या उघड कामालाच वापरली जाईल, पार्टी ह्या गाडीचा उपयोग करू शकणार नाही असं तिनं स्पष्ट भूमिका घेतली होती. तेव्हा अनेकांनी त्यावर नाराजीही व्यक्त केली होती. अखेर अत्यंत आणीबाणीच्या प्रसंगी ही गाडी पक्षाला ताब्यात घेण्याचा तात्विक अधिकार आहे हे तिने मान्य केल्यावर गाडीवरील चर्चा थांबली होती.

अजिताला आपली यामाहाच खरी प्रिय होती. त्यामुळे जीपचा उपयोग केवळ संस्थेच्या कामाकरताच केला जात असे.

व्ही.आर.डी.सी.च्या त्या लहानशा दोन मजल्यांच्या

टुमदार इमारतीच्या पायऱ्या चढून एका लहानशा दारातून आत गेल्याबरोबर समोर दिसे ते रिसेप्शनिस्टचे टेबल. बाजूला भ्ठातीशी असलेल्या खर्ुच्या आणि दोन्ही बाजूच्या भिंतींवर रंगवलेली सुरेख आकर्षक चित्रे. मागच्या बाजूला मोकळी चाकळी जागा होती, काही खर्ुच्या, काही झाडे. कुणाला गप्पा मारायच्या, पाहुण्यांना संस्थेविषयी माहिती द्यायची तरच ह्या जागेचा उपयोग व्हायचा. रिसेप्शनिस्टच्या बाजूने वर जाणारा जीना. पहिल्या मजल्यावर लायब्ररी. वरच्या मजल्यावर कॉम्प्युटर रूम. आणखी आठ दहा पायऱ्या चढल्या की अजिताचे टेबल. एक अकाऊंटटची रूम सोडली तर सर्व ऑफिसचं वातावरण ऑफिसला न शोभणारे.

कार्यालयात शिरताना अजिताला जाणवले, आज वातावरणात एक गंभीरता आहे, स्टाफ मोकळेपणी बोलत नाहीये, धावपळ कमी आहे. प्रेरणाची गैरहजेरी तर क्षणाक्षणाला जाणवत होती. पण ते साहजिकच

होतं.

प्रेरणाला घेऊन तिची आई काही दिवस तिच्या बहिणीकडे बंगलोरला जाणार होती. प्रेरणाच्या बहिणीने परस्परच ऑफिसला फोन करून तीन आठवडयाची रजा मागितली होती. इतर प्रसंगी एक दिवसाचीही रजा देताना कुरकुरणाऱ्या अजिताने सरळ अनुमती दिली होती. चार वर्षांपूर्वी प्रेरणा जेव्हा व्हिआरडीसीला जॉईन झाली तेव्हा ती एम.एस.डब्लू करून नुकतीच कॉलेजमधून फ्रेश आली होती. भरपूर आत्मविश्वास आणि लोकांवरही भरपूर विश्वास आणि काम करण्याचा उत्साह. प्रेरणाला गाणी म्हणण्याची लहानपणापासूनच आवड होती. आवाजही चांगला, शिवाय स्वभावानं बडबडी. त्यामुळे काही दिवसातच अजिताने स्त्रियांचे ट्रेनिंग करण्याची जबाबदारी तिच्यावर सोपवली. परंतु केवळ आपले स्वत:चेच काम करणे एवढेच तिने केले नाही. काही महिन्यातच तिने एकूणच ऑफिसच्या कामाची माहिती करून घेतली

होती. त्यामुळे प्रेरणाची गैरहजेरी सर्वच कर्मचाऱ्यांना जाणवणे अटळ होते.

अजिता बसली आणि लतिका आत आली. आदल्या दिवशी अजिता तेथे नसताना, डि.वाय.एस.पी. भास्करन् ऑफिसला आले होते. प्रत्येक स्टाफ मेंबरशी ते वेगवेगळे बोलले होते. मुख्यत: विजयबद्दल प्रश्न विचारले होते पण त्याचबरोबर त्यांनी अजिता आणि व्हिआरडीसीच्या कार्यासंदर्भातहीी चौकशी केली होती. लतिका आणि अजिताची बोलणी चालू असतानाच फोन खणाणला. प्रेरणाच्या आई फोनवर होती,

"आम्ही परवा जाण्याचं रिझर्वेशन केले आहे. पण प्रेरणाची स्थिती पाहिली की तिला बंगलोरला घेऊन जाण्याचा निर्णय बरोबर वा चूक अशी मलाच शंका यायला लागते पोरी." तिची आई म्हणाली.

प्रेरणा इथेच राहिली, कामात राहिली तर ती आपल्या

दु:खातून लवकर बाहेर पडेल असं अजिताला वाटतं होतं. पण इथे तिला वरचेवर विजयची आठवण येण्याचीही शक्यता होती. प्रेरणाच्या आईला काही निश्चित सल्ला देणे कठीण होतं. मग प्रेरणाची आईच पुढे म्हणाली, "तिथे गेले की, आम्ही आमच्या दैनंदिन कामात रमणार. हिच्या आता कुणी मैत्रिणीपण नाहीत तेथे. एकटेपणा खायला उठेल तिला. तुर्तास आम्ही काही ठरवलं नाही. पण असं करा ना, तुम्ही यांना तिला भेटायला. मला वाटतं तिला बरं वाटेल."

संध्याकाळी अजिता, लतिका, नरेश बरोबर प्रेरणाकडे गेली. प्रेरणाला पाहून अजिताला धक्काच बसला. चार दिवसात तिचा सर्व चेहरामोहराच बदलून गेला होता. काही वेळ ऑफिसच्या कामाविषयी बोलणी झाली पण मग बोलणे विजयकडे वळले, विजयच्या आठवणी निघाल्या. लतिका विजयने ऑफिससमोरील झोपडपट्टीच्या पोरांचा क्लब तयार करायला कशी मदत केली होती त्याची हकिकत सांगू लागली आणि

प्रेरणाला तेथे थांबणे शक्यच झाले नाही. ती उठून बाहेर गॅलरीत गेली. अजिताही तिच्या पाठोपाठ मागे गेली. अजिताने तिला डि.वाय.एस.पी. काय म्हणत होते ते थोडक्यात सांगितले. आणि त्या संदर्भात विजयने वाईंडचीटरची बटणे वरखाली लावली होती असे सांगताच, प्रेरणा म्हणाली, "दीदी, तुला माहीत आहे, हे अशक्य आहे. त्याचा व्यवस्थितपणा तुला माहीत आहे. शिवाय ऑफिसमधून जाताना बटणे व्यवस्थित लावलेली होती. तू आणि मी आपण दोघींनीही त्याला पाहिले होते. ह्यात बिलकूल संशय नाही."

मग विजयने पेन काढून स्वत:च्या हातावर संदेश देण्याची कशी धडपड केली होती हे सांगून अजिताने प्रेरणाला विचारले, "बटणे वरखाली लावून विजय काहीतरी संदेश देऊ इच्छित होत◌ा असं वाटतंय मला. तूमच्या गप्पामध्ये कधी बटण विषय आला होता का? काही खास उल्लेख झाला होता का? "

" बटण.. नाही. ह्या शब्दाला काही खास अर्थ असेल असं नाही वाटत मला. तसा खास उल्लेख झाला होता असे आठवत नाही. पण दीदी , त्याला शब्दांशी खेळायला फार आवडायचं. नवीन शब्‍द सापडला ना कुठं वाचताना, स्वत:च्या जिभेवर तो शब्द घोळत असे. त्याचे समानार्थी शब्द, त्याचे विरोधार्थी शब्द. तो म्हणायचा अनेक इंग्रजी शब्द लॅटीन शब्दावरून तयार झालेले असतात. हा लॅटीन शब्द तुम्हाला माहीत असला की त्या शब्दावरून तयार झालेले अनेक शब्द तुमच्या ओळखीचे होतात. नवीन शब्दाला तो अशा प्रकारे उच्चारत असे, जणू त्या शब्दाला तो चोहोबाजूने तपासून पाहात असे. एखादा हिरा निरखावा तसा. एखादा नवीन शब्द समजला ना, कॉम्प्युटर उघडून त्यावर त्याचा अर्थ बघण्याची, वा समानार्थी, विरोधार्थी शब्द शोधण्याची नुसती घाई होत असे त्याला. मी त्याला चिडवत असे अजिता..." बोलता बोलता प्रेरणाचा घसा दाटून आल्याने ती मध्येच थांबली.

तिच्या डोळयात पाणी डबडबून आले, आता तिला हुंदका येणार आणि ती ओक्साबोक्सी रडायला लागणार असं वाटलं अजिताला. ती घाईघाईत प्रेरणाला म्हणाली, "म्हणजे तो नक्की थिसॉरसचा उपयोग करत असणार! तुझ्या कॉम्प्युटरवर थिसॉरस असेल ना, चल आपण बघूया थिसॉरसवर बटण हा शब्द देऊन."

"चल, बघूया.'' स्वत:ला सावरत प्रेरणा म्हणाली, " गेल्या पाच दिवसात त्याला कुणी चालूसुध्द केलेले नाही.' ' त्या दोघी कॉम्प्युटरपाशी गेल्या, खुर्ची कॉम्प्युटर-टेबलजवळ घेऊन प्रेरणाने कॉम्प्युटर चालू केलेला पाहून प्रेरणाची आई चकित होऊन पाहातच राहिली. तिची आणि अजिताची दृष्टादृष्ट झाली तेंव्हा तिने किंचित मान हलवून आपलं समाधान व्यक्त केले. प्रेरणाने एम. एस. वर्ड प्रोसेसर उघडला, बटण हा शब्द लिहून त्यावर कर्सर आणून तिने टूल्स मेनू उघडून थिसॉरसवर क्लिक केले. थिसॉरसची डायलॉग बॉक्स उघडली, उजव्या बाजूला समानार्थी शब्दांची यादी

आली. दोघीही नजर त्यावर गेली आणि अजिता स्तंभीत होऊन कॉम्प्युटर स्क्रीनकडे पाहातच राहिली.

Identification

Marker

Emblem

I.D.

Badge

अजिता I.D. ह्या शब्दाकडे अशा रितीने पाहात होती, की तिची विचारशक्ती जणू थांबून गेली होती, तिचा मेंदू सून्न झाला होता. प्रेरणाने तिला ह्या गुंगीतून जागे केले. प्रेरणा तिच्या हाताला स्पर्श करीत म्हणाली, "अजितादीदी, काय झालं?"

"मला कळत नाही, पण..पण आय.डी. आय.डी.... ह◌ी इनिशियल्स आहेत प्रेरणा इगोरची. इगोर डॉब. जर्मना फंडींग एजन्सीचा प्रतिनिधी. तू ओळखतेस त्याला. पण. . पण त्याचा इथे काय संबंध?'' अजिता काही वेळ विचारांच्या तंद्रीत गप राहिली, मग स्वत:शीच पुटपुटल्यासारखी म्हणाली, "आय.डी...इगोर डॉब."

"अजिता, हे खरं आहे की क◌ेवळ योगायोग? आय.डी. म्हणजे इगोर डॉब असंच विजयला सांगायचे होते का?"

हाताला झालेला स्पर्श आणि प्रेरणाच्या आवाजातील तीव्रता लक्षात येऊन अजिता सावरली, ती तिच्याकडे वळत म्हणाली, "हा केवळ योगायोग आहे की, विजयने जाणीवपूर्वक दिलेला संदेश आहे हे आता आपल्याला तपासावे लागेल. पहिला प्र्श्न आहे, विजय इगोरला ओळखत होता का? ओळखत असेल तर कसा? ह्या

अफघातामागे इगोर आहे असं त्याला सुचवायचे आहे का? पण तसे असेल तरी ते विजयच्या कसे लक्षात आले? प्रेरणा, विजय तुझ्याशी कधी ह्या विषयावर बोलला होता का?'' मग तिला आपण उत्तेजित झाल्याचे जाणवले. ती गप्प झाली.

प्रेरणा खुर्ची बाजूला सारून उभी राहिली, अजिताकडे वळत म्हणाली, "अजितादीदी, नक्कीच हा संदेश आहे, दीदी. विजय इगोरला ओळखत होता का? त्यांची प्रत्यक्ष भेट झाली का नाही मला माहीत नाही. पण इगोर आपल्या ऑफिसवर आला होता, कडेगावला गेला होता हे त्याला माहीत होतं. त्याला नक्कीच अशी काहीतरी माहिती असणार की ज्यामुळे त्याला ह्या हल्ल्यांमागे इगोर असल्याचा संशय आला असणार. अजितादीदी, विजय निष्काळजीपणे आपल्या शर्टाची, आपल्या जर्कीनची बटणं उलटी पालटी लावणं शक्यच नव्हतं. विजय त्याच्या शेवटच्या..."

"प्रेरणा, त्यादिवशी मला डिव्हाईडवर दाबून चिरडायचा प्रयत्न झाल्याचे तू त्याला बोलली होतीस का?"

"मला...मला नीट आठवत नाही दीदी. पण मला वाटतं तू खाली आलीस ना, तेव्हा आम्ही त्याच विषयावर बोलत होतो. पण"

"ठीक आहे प्रेरणा. ठीक आहे. आपल्याला एकदम निष्कर्षावर येता यायचे नाही. पण त्यादृष्टीने माहिती मिळवली पाहिजे."

प्रेरणा काही काळ अजिताचा हात आपल्या दोन्ही हातात पकडून स्वत:च्याच विचारात गुंगून राहिली, मग आईकडे वळत म्हणाली, "आई, आपण बंगलोरला जायचे काही दिवस पोस्टपोन करूया. विजयचे आईवडील अजूनही इथेच असतील, आजच मी त्यांना गाठते, विजयच्या खोलीवरचे कागदपत्र तपासूया

आपण अजितादीदी, त्याच्या मित्रांना भेटूया. कुठेना कुठे, आपल्याला माहिती मिळेल."

अजिता काही वेळ प्रेरणाकडे चकित होऊन पाहात राहिली, मग तिचा हात दाबत म्हणाली, "थॅंक्स, प्रेरणा, थॅंक्स. मी आता एसेनला भेटतेय. सकाळ ी मी तुला फोन करते. मग आपण काय आणि कसं करायचं ते ठरवू. आणि हे बघ, प्रेरणा, स्वत:ची जरा काळजी घे. ह्या पाच दिवसात तू स्वत:ची काय हालत करून घेतली आहेस. मी येते. फोन करते."

अजिता घाईघाईने तेथून बाहेर पडली कारण ती स्वत:च उत्तेजित झाली होती. तिने घड्याळाकडे नजर टाकली. घरी जाऊन कपडे बदलून हॉटेलवर पोचायचे म्हणजे धावाधाव करावी लागणार होती. पण ह्या अशा घामेजल्या शरीराने, आणि अशा कपडयात एसेनला भेटणे तिला योग्य वाटत नव्हते. प्रेरणाकडे काय घडले हे एसेनला सांगायला ती अगदी उत्सुक झाली होती.

ती गार्डन होटेलला पोचली, आणि गार्डनमध्ये अगदी कोपऱ्यात झुडपामागे लपलेल्या टेबलाशी पोचली. एसेनने उठून तिचे स्वागत केले, आणि तिच्याकडे बघताच त्याने तिला विचारले, "काय झालंय अजिता, तूझ्यात काहीतरी बदल झालाय, तुझा मूड बदललाय?"

त्याच्या प्र्श्नाने ती खुष झालीी. एसेनच्या ह्याच वैशिष्ट्यामुळे तो तिला आवडायचा. ह्याची संवेदनशीलता नेहमीच कार्यशील असते. समोरच्या व्यक्तीच्या मूडबद्दल नेहमी सजग असतो हा. समोरील व्यक्तीमध्ये झालेले बारके सारके बदलही ह्याच्या ताबडतोब लक्षात येतात. व्यक्तिगत पातळीवर संवाद साधण्याचे खास कसब ह्याच्या अंगी आहे ही पक्षातील सर्वांनीच मान्य केलेली बाब. समोरच्या माणसाच्या अन्तर्मनात सहज प्र्वेश करतो, समोरच्या माणसाला बोलका करतो. पीके आणि एसेन दोघेही रिजनल कमिटीमध्ये सिनिअर, अनुभवी. पण पीके आपल्या व्यक्तिमत्त्वाने समोरच्या व्यक्तीला भारावून

टाकतो, जणू हिप्नॉटाईज करतो, तर एसेनचे व्यक्तिमत्त्व जाणवतच नाही. एसेन एखाद्या व्यक्तीबरोबर असेल तर असे वाटते की, एसेनच त्या व्यक्तीच्या, व्यक्तिमत्त्वाच्या प्रभावाने भारावून गेला आहे. पण अजिताला माहीत होते, अनुभवाने तिला हे कळले होते की, एसेनला त्या विशिष्ट व्यक्तीकडून काय साधायचे आहे ह्याची स्पष्ट जाणीव सतत असते, मात्र त्याला घाई नसते, वाट पाहण्याची त्याची तयारी असते. मित्र, सखा, सल्लागार म्हणून एसेन एक आदर्श व्यक्ती आहे हा अजिताला आलेला विश्वास अनेक वर्षांच्या सहवासातून आकारात आलेला होता.

अजिताने प्रेरणाकडे घडलेली हकिकत सांगून विजयने दिलेल्या संदेशाचा अर्थ आपल्याला प्रेरणाकडे कसा सापडला हे सांगितल्यावर एसेन म्हणाला,

'अजिता. विजयने प्रथम डाव्या हातावर लिहिण्याचा

प्रयत्न केला, मग बटण आणि काजं वरखाली करून काहीतरी सांगायचा प्रयत्न केला असेल हे मी मान्य करतो. पण बटणाचा आणखीही एखादा सरळसाधा अर्‍थ असू शकेल. बटण म्हणजे आयडी? अशक्य नाही पण असंभव वाटतं मला. पण ह्याचा अर्थ इगोरविषयी संशयाला जागा नाही असं बिलकूल नाही. इगोरबद्दल आपल्याला खोलात चौकशी करावीच लागणार आहे. इगोरबद्दल तुला आलेला संशय, त्याच्याविषयीचे तुझे मत ह्या संदर्भात सीसीने मौन पाळले आहे. कदाचित त्याचे कारण हे ही असेल की, ह्या ग्रुपचा आणि आपला संबंध बराच जूना आहे. आपल्याला त्यांच्याकडून मिळणारी मदतही लढयाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे हे प्रकरण जरा नाजूक आहे हे तुला मान्य असेलच. मधल्या काळात मी चौकशी केलीय, अजिता. तो बिह‍ारमध्ये जाऊन परत आला नव्हता. आपण बिहारमध्ये जात आहोत असे सांगून आपला निरोप घेतल्यावरही तो शहरात होता. त्यामुळे तु त्याला तेथे पाहिलंस आणि तेही पंडित

शर्माबरोबर. त्यामुळे तो काहीसा बिथरणे अपेक्षित आहे. पण त्याकरता तो तुझ्यावर खूनी हल्ले करेल?

तुझ्यावर जे प्राणघातक हल्ले झाले त्यात इगोरचा संबंध असू शकतो, ती शक्यता मी नाकारत नाही. पण मला वाटतं, आपण दुसऱ्या टोकावरून सुरुवात करूया. तुझ्यावर खूनी हल्ले झाले आहेत, ह्यात काही संशय नाही. ज्यानं हे खूनी हल्ले केले वा करायला लावले त्या माणसाला तुझ्यापासून गंभीर धोका आहे असा त्याचा दृढ समज झाला आहे. तुला गप्प करण्याची गरज गेल्या काही दिवसातच खुन्याला वाटू लागली आहे. अजिता, तुझ्यावर झालेल्या हल्ल्याचा ह्या चार पाच दिवसांत झालेल्या एखाद्या घटनेशी तुला संबंध जोडता येतो का?

आपण ज्या दिवशी भेटलो त्याच दिवशी तुझ्यावर पहिला हल्ला झाला. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी ऑफिसकडे येताना परत एकदा हल्ला झाला. ह्याचा

एक अर्थ असा निघतो अजिता की, ह्या माणसाची तुझ्यावर बऱ्याच दिवसापासून नजर असावी. तुझे येण्याजाण्याचे रस्ते, आपल्या भेटीची ठिकाणं ह्यांची माहिती त्यानं अगोदरच मिळवली असावी. कारण तुझा कुणी पाठलाग केला नव्हता, आपल्या दोघांशिवाय आपण भेटणार आहोत ह्याची कुणाला माहिती नव्हती, मारेकऱ्याने तुला त्या रस्त्याकडे जाताना पाह्यल्याबरोबर त्याने तू कुठे जाणार हे ओळखले असावे."

"तुझ्यावर हल्ला झाला त्याच्या आदल्या दिवशी तु अत्यंत अनपेक्षितपणे इगोरला खैबरमध्ये भेटली होतीस. तो येथे असल्याची माहिती आपल्याला कळावी अशी त्याला बिलकूल इच्छा नव्हती. तु त्याला पंडित शर्माबरोबर पाहिलेस परंतु त्याला शर्माला भेटण्याचा तो पटेलसा खुलासा करु शकत होता. तुझ्यावर होणाऱ्या हल्ल्यांमागे इगोर असेल तर अजिता, तुला अशी काही गोष्ट कळलेली असणार की, ज्या गोष्टीचं महत्त्व तुला

अजून समजलेलं नाही, पण ती गोष्ट तुला माहीत झाली आहे अशी त्याची खात्री झाली आहे."

बोलता बोलता एसेन मध्येच थांबला. आपल्या हातात व्हिस्कीचा ग्लास आहे ह्याची त्याला जणू एकाएकी आठवण झाली असावी. त्याने ग्लास तोंडाला लावला. बराच वेळ तो शांत राहिला, मग तिच्याकडे वळत तो म्हणाला, "अजिता, तो तुझ्याशी काय बोलला ते नीट आठव, तु काय बोललीस ते आठव. मला वाटतं खैबरमध्ये असं काहीतरी घडले की त्यामुळे इगोरला तुला नष्ट करण्याची गरज वाटली असली पाहिजे."

बोलता बोलता तो थांबला, ग्लास ओठांना लावून तो लहान लहान घुटके घेत राहिला, मग त्याचे डोळे एकाएकी चकाकले,

"आय थिंक अजिता, आय गॉट इट. तू सांगितलेस,

की त्याच्या खोलीच्या दरवाजातून तू दोन माणसांना बघितलेस. एकाला तू ओळखलेस. पण अजिता दुसरी व्यक्ती कोण होती?"

"सुन्या, मी तुला सांगितलेय, मी त्या व्यक्तीला कधीही पाहिलेले नाही. मी तिला ओळखत नाही."

"अगदी बरोबर. पण इगोरला जर असं वाटत असेल की, तु त्याला ओळखतेस, किंवा कालांतराने तुला त्याची ओळख पटेल, आणि त्या व्यक्तीबरोबर त्याला पाहाणं हे त्याच्या दृष्टीने अत्यंत धोक्याचे असेल तर! अजिता, तो माणूस कोण होता?"

एसेनने बोलता बोलता तिचा हात हातात घेतला होता, तो उत्तेजित झाला होता.

"आठवायचा प्रयत्न कर अजिता, तो माणूस कोण होता? तू त्याला ओळखलेले नाहीस. पण हा माणुस

कोण होता हे तुला कळण्याची शक्यता आहे असं इगोरला वाटत असेल तर.. माणसाबरोबर त्याचे संबंध असल्याचे आपल्याला कळू नये असं त्याला वाटत असेल तर.. मला वाटतं अजिता, इगोरने त्या माणसाची आणि पंडित शर्माची भेट मुद्दामून येथे आयोजित केली असावी. पण मग तुझ्यावर झालेल्या खूनी हल्ल्यामागे तो माणूसही असण्याची शक्यता आहे. मला वाटतं..."

अजिता तो क्षण आठवण्याचा प्रयत्न करत होती. इगोर दारातच उभा होता, दाराच्या चौकटीवर दोन्ही हात ठेवून. जणू काही अजिताने आत घुसण्याचा प्रयत्न करण्याची शक्यता होती, आणि तिला आडवण्याकरता तो तयार होता. तिने जरा एका बाजूला झुकून आत पाहिले होते, तिची नजर शर्मावर काही क्षण रेंगाळली होती, मग त्या दुसऱ्या व्यक्तीकडे सरकली होती, पण तिची नजर आपल्याकडे येणार हे लक्षात येऊन तो माणूस बाजूला सरकला होता, तिच्या नजरेच्या टप्प्याबाहेर, दाराच्या आड. पण त्याचा चेहरा तिला

दिसला होता. अजिताला त्याचा चेहरा आठवत नव्हता. पण त्याच्या बसण्यामध्ये असा काहीतरी डौल होता, त्याच्या चेहऱ्यावर असे काही निब्बरपणाचे भाव. . ती चमकली..होय, त्याच्या शरीरात डौल होता, चेहरा रापलेला, निब्बर ..एखाद्या मिलिटरी अधिकाऱ्यासारखा. . पण नाही. त्या क्षणाच्या दृष्टिक्षेपात आपल्याला एवढे दिसणे शक्यच नव्हते. आपल्या मनाचा खेळच असावा ह ा.

अजिता काही क्षण एसेनकडे पाहात राहिली, मग म्हणाली, " सुन्या, मी त्या माणसाचा चेहरा पाहिलाय. तो चेहरा माझ्या ओळखीचा नाही. तो चेहरा मी कुठे पाहिलेला नाही. पण मला असं वाटतंय की तो एखादा मिलीटरीतला अधिकारी असावा. पण मला खात्र्री नाही. पण तो चेहरा मी कुठेही प ाहिला तरी मी ताबडतोब ओळखेन की हाच तो माणूस."

"बरोबर. तुला आज ना उद्या त्या माणसाची ओळख

पटेल अशी भीती त्यांना वाटत असावी, मला वाटतं अजिता. म्हणूनच त्याला तुला कायमचे गप्प करण्याची गरज वाटली असावी. हा माणूस तू कुठेतरी परत पाहशिल, किंवा त्याचा फोटो पाहशील किंवा.. "

एसेन बराच वेळ गप्प राहिला, पुढ्यातील ग्लास रिकामा करून त्यानं दुसरा ग्लास भरला. मग म्हणाला, "पण अजिता, हा सगळा आपला अंदाज आहे. कदाचित इगोरचा ह्यात काही संबंधही नसेल, पण हे काम एका माणसाचे नाही, अजिता. इगोर त्यांच्यापैकी एक असण्याची शक्यता आहे."

"सुन्या, तो माणूस जर कुणी महत्त्वाचा असेल तर आज ना उद्या मला त्याचा फोटो दिसेल, मी त्याला ओळखेन. पण... दुसरा मार्ग आहे, विजयला इगोरचा का संशय आला, त्याचे आणि इगोरचे काय संबंध होते, ह्याची माहिती काढली तर..."

"होय, तो एक मार्ग आहेच. त्या मार्गाने तू काम तर सुरू केले आहेसच. विजयच्या पत्रकार मित्रांकडून काही समजतं का ते पाहता येईल. शिवाय खैबरमध्ये इगोर तेथे असताना विजय तेथे गेला होता का? ह्याचाही शोध घेता येईल. शक्यता कमी आहे पण प्रयत्न तर करून पहा..'' एसेन म्हणाला. "पण हे लक्षात घे अजिता, आपल्याला ही माहिती काढताना फारच काळजी घ्यावी लागेल, जर का आपण इगोरचा संबंध विजयशी जोडतोय हे भास्करनना कळलं, आणि त्यांनी चौकशी सुरू केली तर आपली पंचाईतच होईल. इगोरबद्दल पोलिसांना बिलकूल संशय येऊन चालणार नाही अजिता. पोलीस विजयच्या अपघाताची केस अशी क्लोज करणार नाहीत. भास्करनचे समाधान झालेले नसेल तर ते चौकशी करतच राहाणार. ह्यामध्ये इगोर गुंतला असेल ना, तर पोलीसांच्या आधी आपल्यालाच कृती करावी लागेल."

ते दोघे बाहेर आले तेव्हा मध्यरात्र होऊन गेली होती.

निरोप घेताना एसेन जरा भावनावशच झाला होता, तिचा हात हातात घेऊन तो म्हणाला होता, "आणि अजिता, इगोर जरी येथून गेला असला तरी धोका संपलाय असं मला वाटत नाही. बेफिकीर होऊ नकोस. काळजी घे. मलाईचे जंगल आणि हे काँक्रीटचे जंगल.. हे जंगल जास्त धोकादायक आहे अजिता. एकीकडे पक्ष आणि दुसरीकडे तुझी संस्था ही सर्कस करतानाच तुझ्यावर ताण येत आहे आणि त्यातून ही भानगड. टेक केअर..टेक केअर ऑफ युवरसेल्फ. . तुला माहीत आहे, अजिता, ह्या आपल्या विश्वात कोणाच्या खांद्यावर विश्वासाने डोक टेकणं तर सोड, एक संतापाचा हुंकार, एक दु:खाचा उसासा सोडणंही कठीण असतं. तुझी मैत्री फार मोलाची आहे माझ्यासाठी अजिता."

अजिताला जाणवलं आपल्या डोळयांच्या कोपऱ्यात पाणी जमा होतंय, त्याचा हात प्रेमाने थोपटत त्याच्यापासून दूर होत ती म्हणाली, "सुन्या, दारू चांगली असली की तू सेंटिमेंटल होतोस. आणि..."

तिचा गळा दाटून आला होता, आपलं वाक्य मध्येच सोडून ती मागे वळली.

प्रकरण सहावे

तिने घडयाळाकडे पाहिलं, अडीच वाजले होते. पण अजूनही तिला झोपावेसे वाटत नव्हते. गेले तास दीड तास नेटस्केप ब्राऊजर चालू करून सर्च इंजीन्सना इव्होल्यूशन हा शब्द पुरवून बराच वेळ ती त्या विषयावरील वेगवेगळी आर्टिकल्स, वेगवेगळया वेबसाईटस् पाहात बसली होती. तिने कॉम्प्युटर बंद केला आणि ती अंथरूणावर पडली, पहाटेचे गार वारे हलू लागले होते. तिने कुस बदलली, खिडकीकडे पाठ फिरवली आणि डोळे मिटले. दरवाजाचा उघडण्याचा कर्रकर आवाज आला, तिने दचकून उठून बसली. मग तिच्या लक्षात आलं, तो बाथरूमच्या दरवाजाचा आवाज

होता. कित्येक दिवसापासून त्या दार◌ाच्या बिजागऱ्यांमध्ये तेल घालायला पाहिजे असं ती म्हणत होत. वाऱ्याची एकाएकी झुळूक आल्याने दरवाजा हलला होता. ती हळूच उठली, अंधारातच ती आतल्या बाजूस गेली आणि तिने बाथरूमचे दार घट्ट लावून कडी सरकवली. ती परत अंथरूणावर आली. मी घाबरलेय का?

इगोर इथे आला आणि सर्वच वातावरण बदलायला सुरुवात झाली होती. अगदी प्रथम भेटीतच त्याच्याबद्दल तिचं मत वाईट झालं होतं. बिहारमध्ये पक्षाच्या हालचालींवर गेल्या काही दिवसांपासून खूपच मर्यादा आल्या होत्या. सवर्ण सधन शेतकऱ्यांनी आपली सेना उभी केली होती. एका बाजूला ही सेना, दुसऱ्या बाजूला आर्म्ड पोलीस. शस्त्रास्त्रांचा साठा सुरक्षित जागी ठेवणे त्रासदायक होत होते. साऊथ झोनमध्ये शस्त्रास्त्रे जास्त सुरक्षित राहू शकतील म्हणून पहाणी करायला इगोर आला होता. तिला तो दिवस चांगला

आठवत होता.

त्या रविवारी खरं तर तिने युनिव्हर्सिटीमध्ये होणाऱ्या आदिवास◌ीवरील सेमिनारसाठी जायचे निश्चित केले होते. आदिवासी जीवनाबद्दल तिच्या मनात लहानपणापासूनच एक कुतूहल होते आणि इतकी वर्षे आदिवासी क्षेत्र्ात, राजकीय, संघटनात्मक कार्य केल्यानंतरही, शेकडो आदिवासी स्त्र्ी पुरुषाशी दोस्तीचे संबंध येऊनही तिचा आदिवासी संस्कृती, आदिवासी गीते, आदिवासी नृत्ये ह्यातील रस कमी झाला नव्हता. परंतू शनिवारी 'पीक अप्' टपालात ऍनाचा निरोप मिळाला होता, इगोर भेटीस येत असल्याचा.

दर शनिवार आणि बुधवारचा अजिताचा हा कार्यक्र्म निश्चित ठरलेला होता. पक्षातील भूमीगत राहून कार्य करणाऱ्या काही खास कॉम्र्ेडसना परस्परांशी संपर्क साधण्यासाठी ही व्यवस्था करण्यात आली होती. तसे

म्हटले तर आता इंटरनेटच्या माध्यमातून इमेल पाठवणे शक्य झाल्यापासून प्रत्यक्ष लिखित पत्र लिहिण्याच्या पध्दतीचा उपयोग करण्याचे टाळले जात होते. त्यामुळे हल्ली ह्या सोयीचा उपयोग मुख्यत: पीकेकडूनच आणि क्वचितच केला जात असे. तरीपण अजिता आणि पीकेमधील संवादाचा हा एक मार्ग होता.

शहराच्या परिघावरील क्षेत्रात चाणाक्य नगर ही प्रचंड मोठी हाऊसिंग सोसायटी. खास सधन कुटुंबांसाठी बांधलेली. मोठे विशाल क्षेत्र, स्विमिंग टँक, गार्डन, मुलांसाठी मिनी एस्सेल अशा सोयींन ी युक्त. चार मजली, बत्तीस बिल्डींग असलेल्या त्या सोसायटीचे अनेक सभासद हे कुठेतरी दुसऱ्या शहरात राहाणारे आणि क्वचित येथे काम निघाल्यास येऊन राहाणारे. त्यामुळे अनेक फ्लॅटस् कुलूप लावून ठेवलेले. ह्या भाडेकरूंच्या टपालाच्या पेटयाही जिन्याच्या तोंडाशी लावलेल्या. कधीतरी वर्षातून ही मंडळी येणार परंतु त्यांच्या नावाची टपालपेटी लावलेली. अशाच एका

टपालपेटीचा उपयोग पीक अप् टपालासाठी केला जात होता.

नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे अजिता सोसायटीत शिरली. 16 नंबरच्या बिल्डींगच्या जिन्यापाशी जाऊन तिने सरळ कर्नल गोन्सालविज् नावाची टपालपेटी उघडली. आतील पत्रे हॅन्डबॅगमध्ये टाकली. पीकेने तिला पत्रात लिहिले होते की जर्मनीतील भ्रातृसंघटनेचा एक कॉम्रेड भारतात भेटीस येत आहे आणि शनिवारीच एरोड्रॅमवर त्याला घ्यायला जावे लागणार आहे. युनिव्हर्सिटीत जाण्याचा बेत रद्द करून अजिता इगोरला आणायला गेली होती.

संध्याकाळी ती इगोरला भेटायला हॉटेलवर गेली होती. पुढील काही दिवसात इगोरने कुणाकुणाला भेटावे, कुठल्या क्षेत्रात जाणे आवश्यक आहे, कुठे जाणे शक्य आहे, ह्यावर चर्चा करुन त्याचा कार्यक्रम निश्चित करण्याकरता ती त्याला भेटायला आली होती. बाहेर

जीप दिसली नाही पण त्याबद्दल तिला काही आश्चर्य वाटले नव्हते. संध्याकाळी आपण कदाचित काही खरेदी करण्याकरता बाहेर जाऊ असे इगोर म्हणाला होता. तेव्हा तिने त्याला, नरेश आणि जीप त्याच्या सेवेत हजर आहेत, असं गमतीने सांगितले होते. काही वेळ लॉबीत तो येण्याची वाट पाहून अजित◌ा अखेर काऊंटरवर 'आपण तळघरात असलेल्या बारमध्ये त्याची वाट पाहात आहोत' असा निरोप ठेवण्याकरता गेली तेव्हा तो सकाळीच बाहेर पडल्याचे तिला समजले होते. तिला माहीत होतं, ह्या बारमध्ये गर्दी होते ती रात्री नऊनंतर आणि म्हणूनच तिने जरा कोपऱ्यात, सहज लोकांच्या नजरेत य◌ेणार नाही असं टेबल ताब्यात घेऊन बियरची बाटली मागवून नॅशनल वुमेन कॉन्फरन्सच्या नुकत्याच झालेल्या अधिवेशनाचा अहवाल वाचायला घेतला. वाचता वाचता ती काही विशिष्ट ठिकाणी मार्करने खुणा करत होती, काही ठिकाणी समासामध्ये टीकाटिप्पणीही नोंदवत होती. नॅशनल वुमेन कॉन्फरन◌्सच्या सेक्रेटरीला तिने

कॉन्फरन्सच्च्या रिपोर्टवर फीडबॅक द्यायचे कबूल केले होते.

तिने रिपोर्ट वाचून संपवला आणि तिच्या लक्षात आले, तिच्या भोवतालच्या टेबलांपैकी दोन तीनच टेबले आता रिकामी होती. तिने घडयाळाकडे पाहिले. तिला तेथे येऊन दीड तास होऊन गेला होता. तिने जवळच्या खिडकीच्या काचेतून हॉटेलच्या प्रवेशद्वाराच्या बाजूला असणाऱ्या पाकाअग स्पेसकडे बघितले, अजूनही जीप आली नव्हती. तिने घडयाळात पाहिले आणि मनाशी ठरवले की, आणखी पंधरा मिनिटे वाट पाहायची, इगोर जर तेवढयात आला नाही तर चालायला लागायचे. तिने खुणेनेच आणखी एक बियरची बाटली मागवली आणि आपल्या मनात उसळया घेणाऱ्या संतापाच्या लाटेकडे दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न करत ती तेथे बसून राहिली. पंधरा मिनिटे होऊन गेली. इगोरचा पत्ता नव्हता. पहाटेपासून ड्यूटीवर असलेल्या नरेशला लवकर सुट्टी देणे गरजेचे

होते. वाट पाहून पाहून ती वैतागली होती. गाडीला काही झालं तर नाही ना? नाही, काहीही झालं असतं तरी नरेशने ऑफिसला फोन केला असता. आपल्याला ताबडतोब कळवण्यात आलं असतं. इगोरला पोलिसांनी काही त्रास दिला नसेल ना? तिच्या मनात शंका येत होत्या.

निघून जाण्याकरता ती उठलीही परंतु सीसीने पाठवलेल्या ह्या पाहुण्याची सरबराई करणे तिचेच काम होते. इथे शहरात तिच्याशिवाय इतर कुणी कॉम्रेड हे काम करू शकत नव्हता. इगोर परदेशी पाहुणा होता. सावर्डयाला जाण्याचे रद्द करून ती ह्या कुणा जर्मन पाहुण्याची वाट पाहात येथे बसली होती. हे असं हल्ली अनेक वेळा होऊ लागले होते. पीके कडून काही तरी काम सांगितले जायचे आणि तिला आपला ठरलेला कार्यक्रम रद्द करावा लागायचा. कित्येकदा तर तिच्यावर सोपवण्यात आलेले काम इतके दुय्यम स्वरुपाचे असे की, तिचे आपले काम त्यासाठी रद्द

करावे लागते, तिचा कार्यक्रम तिला बदलावा लागतो ह्याची जाणीवच पीकेला वा ऍनाला नसावी असे तिला वाटत असे.

बंदुका खांद्यावर घेऊन लपून छपून जंगलात राहाणे, पोलीसांपासून स्वत:चा बचाव करणे हेच खरं क्र्यातिकारक कार्य आहे, बाकी सर्व फालतू, अशी आत्मकेंद्रित मध्यमवर्गीय समज ह्यात डोकावते असे तिला वाटत असे. लेनिनीस्ट पक्षसंघटनेच्या संकल्पनेत कार्यकर्ता आणि कष्टकरी वर्ग, राजकीय पक्ष संघटना आणि लोकसंघटना ह्यांच्या नात्यात अनुस्युत असलेला वर्चस्ववाद ह्या दृष्टिकोनाच्या मुळाशी आहे असंही तीचं मत व्हायला लागलं होतं. स्त्री पुरुष संबंधाच्या मुळाशी हीच वर्चस्ववादी मनोवृत्ती असते, आणि त्यामुळे स्त्रियांच्या परस्पर संबंधातही ही वृत्ती कार्यरत असते. तिला माहीत होतं ही केवळ तिची समस्या नव्हती.

पक्षातील प्रत्यक्ष लढाऊ सैनिक आणि इतर कार्यकर्ते, सिम्पथाईझर्स ह्यांच्या जीवनशैलीत अंतर होते हे निश्चितच खरे होते. क्रांतिकारी सैनिकांचे जीवन जगणारे कॉम्रेड्स् धोक्याचे जीवन जगत होते, ह्या सैनिकांना व्यक्तीगत असे जीवनच नव्हते ह्याचीही तिला जाणीव होती. पण त्याचबरोबर सर्वसामान्य माणसासारखं जगत पक्षाशी बांधिलकी ठेवून काम करणाऱ्यांना काय अडचणी असतात ह्याकडे सहानुभूतीपुर्वक पाहिले जात नाही असं तिला वाटायचं. शहरात आपला व्यवसाय सांभाळून पक्षकार्य करणाऱ्यांना मध्यमवर्गीय म्हणून हिणवणे ही तर सर्वच डाव्यांची जूनी पध्दत होती. अंगावर वर्दी चढवली, खांद्यावर बंदूक लटकवली की मध्यवर्गीय प्रवृत्ती नष्ट होते असं समजणं म्हणजे अडाणीपणाच आहे असं तिला वाटायचे.

अखेर इगोर आला तेव्हा ती एवढी कंटाळलेली आणि वैतागलेली होती, की, त्याला आपल्याकडे

येताना पाहून उठून हसून त्याचे स्वागत करण्याचाही उत्साह तिला नव्हता. इगोरने उशीर झाल्याबद्दल तिची भरघोस माफी मागितली. परंतु तो इतका वेळ कुठे गेला होता, आणि एवढा उशीर का झाला ह्याचे काहीही कारण त्यान िंदिले नव्हते. ह्याशिवाय आपण खूप थकलो असल्याने पुढील कार्यक्रम ठरवण्यासाठी आपण उद्या सकाळी भेटूया अशी विनंती करून त्याने त्या विषयावर काही बोलण्याचेच नाकारले होते. त्याच्या विनंतीला तिने मान्यता दिल्यावर आपली आता काही जेवण घेण्याची इच्छा नसल्याचे सांगून तो तिला निरोप देण्याच्या तयारीत उभा झाला होता.

इगोरला हॉटेलच्या रुममध्ये पोचवून ती लिफ्टने खाली आली. इगोरने आपल्याला अपमानित केले आहे असं तिला वाटत होते. आपल्या जागी कुणी गोऱ्या कातडीची स्त्री असती तर तो असा वागला असता का? असा विचार तिच्या मनात आला तेव्हा त्या विचाराला बाजूला झटकून टाकीत, इगोरऐवजी कुणी लंका किंवा

ब्रह्यदेशवासी नॉनव्हाईट व्यक्ती असती तर तिच्यासाठी आपण असे प्रतिक्षा करत बसलो असतो का? हा प्रश्न उपस्थित करून तिने स्वत:ला अनुत्तरीत केले होते.

ती बाहेर आली, तिला पोर्चमध्ये बघताच नरेश समोर आला. त्याच्यि चेहऱ्यावरील थकवा स्पष्ट जाणवत होता. पहाटे पाच वाजताच तो अजिताच्या घरी जीप घेऊन हजर झाला होता, आणि तेव्हापासून सर्व दिवस त्याला किंचितही उसंत मिळाली नव्हती. विमानतळावरून इगोरला हॉटेलमध्ये सोडून, नरेश अजिताला ऑफिसला सोडायला गेला होता आणि परत इगोरच्या सेवेत हजर झाला होता. नरेशने तिला सांगितलं होतं, परदेशी लोकांकरता असलेल्या टर्फ क्लबजवळील एका हॉटेलमध्ये इगोर घुसला होता, तो चार तासांनी बाहेर आला होता. नरेशचा चेहरा पाहिल्याबरोबर इगोरबरोबर त्याने दिवस कसा काढला असेल ह्याची कल्पना करूनच तिला त्याची दया आली. आपण रिक्शाने घरी जाऊ, त्याने ताबडतोब घरी

जाऊन आराम करावा आणि सकाळी गाडी घेऊन ऑफिसवर यावे असे सांगून तिने त्याला सुट्टी दिली होती.

नरेश आनंदाने उडया मारतच हॉटेलच्या पायऱ्या उतरला होता आणि गाडी घेऊन नाहीसा झाला होता. अजिता काही वेळ तशीच पायऱ्यांवर उभी राहिली. तिला इगोरचा राग आला होता. आपल्याला काही काम असेल ह्याचाही विचारही न करता हे काम तिच्यावर सोपवणाऱ्या पीकेचाही तिला राग आला होता. गुप्ततेच्या दृष्टीने फोनवर सहज कॉन्टॅक्ट करणे शक्यतोवर टाळणे गरजेचे असते हे तिला माहीत होते. तरीही आपल्याला केवळ वेळ आहे का ह्याची चौकशी पीकेला करता आली असती असं तिला वाटलं. इगोरची वाट पाहात असताना, तिने रिपोर्टवर काम केले होते हे खरे. पण आज संध्याकाळी न भेटता आपण उद्याच भेटू असे त्याने अगोदरच सांगितले असते तर!

हा इगोर आहे तरी कोण? काय साम्य आहे त्याच्या आणि आमच्या जगण्यात. एक सम ान दृष्टिकोन. एक विचारसरणी. केडगावच्या कॉमरेड व्यंकण्णा आणि कॉम्रेड इगोर ह्यांच्या जीवनात काय सारखेपणा आहे. त्यांचं वर्तमानकालातील जीवन, त्यांचा भूतकाळ काय साम्य आहे त्यात? व्यंकप्पाचे सोडून देऊ, पण इंग्रजी भाषेवर प्रभुतव असणाऱ्या, सहा सात भारतीय भाषा लिहू बोलू शकणाऱ्या, विचारवंत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कॉम्रेड एसेन आणि कॉम्रेड इगोर मध्ये तरी काय साम्य आहे? आज मी सावरडयाच्या बायांना कबूल केले होते, संध्याकाळी पोचते म्हणून. त्याऐवजी मी इथं थांबले ह्या इगोरला एन्टरटेन करायला. होय, एन्टरटेनच, नाहीतर काय? का वाट पाहात थांबले मी त्याच्यासाठी. ठरलेली वेळ पाळली नाही म्हणून सरळ घरी का नाही गेले?

आय ॲम फ्रॉड. ...फ्रॉड. . एकाएकी तिला वाटलं, आपल्या पोटात ढवळतंय, प्रचंड हालचाल सुरू झालीय,

भूपृष्टाचं कवच फोडून बाहेर पडू पाहातोय उसळया मारणारा तप्त लाव्हा. छे, वाटेत येईल त्याला जाळून भस्म करण्याची शक्ती असलेला लाव्हा इथे कुठून येणार? ह्यातून बाहेर पडणार घाण, तुंबलेलं, सडलेलं काळ, पिवळं पाणी, घाणेरडा वास आसमंतात पसरवणारं. तिला वाटलं, ह्या शरीराचा, मनाचा, ह्या भोवतालच्या माणसांचा, मानवी जगाचा आपल्याला नॉशा आलाय. किळस... नुसत्या आठवणीनंच अंगावर शहारा येतोय नखशिखांत. असहाय्यपणे तिने भोवती बघितले, आपल्या अंगातील सर्व शक्ती नष्ट झालीय. सगळं त्राण नाहीसं झालंय. गर्भगळीत झालोय आपण. पुढच्याच क्षणाला सर्व कोलॅप्स होईल. एक सडका,, कुजका ओंगळ ओघळ वाहात जाईल, आपल्या मांडयांवरून ओघळत, पोटऱ्यांवरून. ह्या पायऱ्यांवरून खाली उतरत...नकळत तिन आधारासाठी भोवताली चाचपडलं, पोकळीलाच पकडण्याचा प्रयत्न केला तिनं निष्फळ. मग लटपटत्या पायांनी ती मागे फिरली. उतरलेल्या पाच सहा पायऱ्या चढून ती पॅसेजमधील

सोफ्याकडे गेली आणि ती सोफ्यावर बसली. हू सेड आय ऍम फ्रॉड. यू आर फ्रॉड. युवर सोसायटी इज फ्रॉड, युवर रिलीजन इज फ्रॉड, युवर नेशन, युवर सिव्हिलायझेशन, युवर वर्ल्ड, युवर हिस्ट्री, युवर फ्युचर. एव्हरीथींग लिव्हिंग ऍन्ड एव्हरीथींग डेड इज फ्रॉड. आय डोन्ट वॉन्ट इट. ऍन्ड डोन्ट नीड इट...

तिने मागे डोके टेकून डोळे मिटले.

बराच काळ ती तशीच बसून होती. मग आपण कुठे बसलो आहोत, आता किती वाजले आहेत हे तिच्या लक्षात आले. ती उठली, जवळच असलेल्या लेडीज् रूममध्ये शिरून तिने आपल्या चेहऱ्यावर भरपूर पाणी मारले, खसखसा चेहरा पुसून तिने आरशात पाहिले. ती आता बरीच सावरली होती. बाहेर आल्यावर ती झपाट्याने रस्त्यावर आली. ऍटो पकडून ती घराकडे निघाली. रिक्शा चौकात आली, आणि उजवीकडे वळली, आणि मागून येऊन एक कार तिच्या जवळून

टर्न मारून झपाट्याने पुढे गेली. कारमध्ये मागच्या बाजूस दोघेजण बसले होते आणि त्यातील एक जण इगोर होता.

त्या रात्री तिला इ-मेल मिळाल ा, दुसऱ्या दिवशी रात्री हॉटेल रजतवर तिला बर्थडे पार्टीसाठी आमंत्रण देण्यात आले होते. त्याचा अर्थ स्पष्ट होता, उद्या दुपारपर्यंतच तिला इगोरला गाठावे लागणार होते, त्याच्याशी बोलावे लागणार, आणि संध्याकाळच्या रिजनल कमिटीच्या मिटींगमध्ये त्याच्याशी झालेल्या चर्चेचे रिपोटाअग करावे लागणार होते. त्याचा अर्थ असा होता की उद्याही तिला सावरडयाच्या बायांना भेटायला जाता येणार नव्हते. पार्टीच्या दृष्टीने ती करत असलेले काय दुय्यम आणि पुरक स्वरूपाचे होते. लोकांचा सहभाग वाढवण्याकरता, पक्षाचे कार्य करण्याकरता उभी केलेली व्हि.आर.डी.सी. ही एक फ्रंट होती.

पण लोकांसाठी केडगावचे व्हिआरडीसीचे काम त्यांच्या रोजच्या जीवनाशी नाते सांगणारे होते. क्रांतिकारी लढयात वर्गशत्रूसोबत सशस्त्र लढा देणे आणि लोकांचा सहभाग, लोकांचा आत्मविश्वास वाढवणाऱ्या ह्या लोकसंघटनाचे कार्य करणे, दोन्हीना सारखेच महत्त्व आहे असे अजिताचे मत होते. सशस्त्र लोकसंघर्षावर भर देणाऱ्या पार्टीच्या राज्यसमितीतील एक सदस्य आणि व्हि.आर.डी.सी. सारख्या लोकसंघटनेची संचालिका ह्या दोन्ही भूमिका एकाच वेळी निभावणे तिला दिवसेंदिवस जड जाऊ लागले होते. फिजिकली आणि मेंटली टू. दोन वर्षांपूर्वी व्हि.आर.डी.सी. ची स्त्रियांची जी स्वतंत्र आघाडी तिने सुरू केली होती, त्यामागील भूमिकेविषयी व कार्यक्रमाविषयीही पक्षाच्या नेतृत्वामध्ये असलेली साशंकता वाढत होती. अजिताला माहीत होते, इगोरचा निरोप घेऊन निघाल्यावर हॉटेलच्या पायऱ्यावर तिला जो नैराश्याचा झटका आला होता तो ह्या ताणाचा परिणाम होता. एकाच वेळी पक्षाची व

व्हि.आर.डी.सी.ची जबाबदारी सांभाळण्याची ही सर्कस करण्याचा ताण तिला हल्ली जाचक होऊ लागला होता.

इगोरशी झालेल्या चर्चेत इगोरने हे स्पष्ट केले होते की, त्याला पार्टीच्या इतर ॲक्टीव्हिटीज्मध्ये फारसा रस नाही, त्याला मुख्य रस आहे तो पार्टीच्या शस्त्रास्त्रे पैदा करणाऱ्या वा निर्माण करणाऱ्या यंत्रणेत. सैनिक तयार करता येतात, आव्हाने करून, देशभक्तीपर गाणी लावून किंवा पैशाची लालूच दाखवून. परंतु लढणाऱ्याच्या हातात शस्त्रे कोणती आहेत ह्यावर सत्तासंघर्षात विजय कुणाचा हे ठरते असे त्याने ठामपणे मांडले होते. लोकांच्या जाणीवा विकसित केल्या पाहिजेत, लोकांच्या जीवनाशी संबंधित माहिती मिळवण्याचा त्यांना हक्क पाहिजे, लोकांना अशा प्रकारच्या निर्णयात सहभाग असला पाहिजे, इत्यादी बाबींमध्ये त्याला फारसा रस नव्हता. क्रांतिकारी संघर्षासाठी सशस्त्र लढा देण्याची गरज आहे, ही

शस्त्रास्त्रे अधुनिक असली पाहिजे, नवीन तंत्रज्ञानाचा आपण जास्तीतजास्त उपयोग केला पाहिजे, शक्य असेल तर मिसाईल लॉन्चर्सही आपण वापरली पाहिजेत असं त्याच म्हणणं होतं. त्याच्याशी थोडावेळ चर्चा केल्यावर अजिताच्या लक्षात आलं होतं की ह्या माणसाची राजकीय समज फारशी नसावी, काही स्लोगन्स, काही फार्म्युले हाच त्याचा राजकीय विचारांचा पाया आहे. पण इगोरशी झालेल्या चर्चेतून एकच समाधान तिला मिळाले होते की, इगोरला तातडीने तिच्या क्षेत्रात नेऊन त्याला एन्टरटेन करण्याची गरज नव्हती. पुढचे काही दिवस तरी तिला आपल्या कामात लक्ष देता येणार होते

मिटींगमध्ये इगोरचा विषय घेतला गेला होता. अजिताने इगोरशी झालेल्या चर्चेची माहिती दिली होती. पहिल्या दिवशी त्याने थकल्याचे निमित्त करून आपल्याला कसे फुटवले आणि त्यानंतर तो काही लोकांबरोबर जाताना आपल्याला कसा दिसला,

नरेशला घेऊन तो युरोपियन, अमेरिकन सधन टुरिस्टांकरता तयार झालेल्या क्लबमध्ये तो कसा गेला होता, हीही माहिती तिने मिटींगमध्ये दिली होती. आणि आपले त्याच्याविषयी झालेले मत स्पष्टपणे मांडले होते. पण हे मत मांडताना त्याचा स्त्रियांविषयी दृष्टिकोन कसा पुरुषकेंद्री आहे हा मुद्दा मांडायचे मात्र तिने टाळले होते. एखादी व्यक्ती राजकीय दृष्टया किती प्रगत आहे हे ठरवताना स्त्रीपुरुष संबंधाविषयीची त्या व्यक्तीची मते व व्यवहार हा एक महत्त्वाचा क्रायटेरिया आहे असे तिचे मत होते. पण हे पार्टीतील इतर सहकाऱ्यांना हा मुद्दा फारसा महत्त्वाचा वाटत नाही हे तिला माहीत होते. चर्चेमध्ये तशी आग्रही भूमिका मांडण्याने संवादाला अडथळाच होतो असं लक्षात आल्यामुळे ती ह्या विषयात बोलण्याचे टाळले होते.

इगोरविषयी आपले मत तिने स्पष्टपणे मांडले होते. पण इगोरला पक्षाच्या सेंट्रल कमिटीने पाठवले होते. पक्षाच्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील संबंधात जर्मनीतील

हा पॉलीटिकल ग्रुप महत्त्वाचा होता. इगोर त्या ग्रुपचा प्रतिनिधी होता. आधुनिक शस्त्रास्त्रांचा तो तज्ज्ञ होता. त्यामुळे जीएमने त्याला कसे व केव्हा भेटावे, पक्षाच्या गुप्तपणे चाललेल्या शस्त्रनिर्मिती केंद्राला त्याने कधी व कशी भेट द्यावी ह्याबद्दल चर्चा करण्यात आली. इगोरसारख्या गोऱ्या कातडीच्या माणसांना ग्रामीण भागात पोलिसांचे नजरेपासून वाचवून घेऊन जायचे म्हणजे नेहमीच अडचणीचे होई. अशी व्यक्ती फंडींग एजन्सीशी वा वृत्तसंस्थेशी संबंधित असेल तर तिला ग्रामीण भागात नेणे सोपे जात असे. पण तशी काही ओळख नसेल तर अशा व्यक्तीला ग्रामीण भागात नेणे अवघडच असे. इगोरच्या बाबतीत ती अडचण नव्हती. जर्मनीतील एका फॉरीन फंडींग एजन्सीचा प्रतिनिधी अशीही इगोरची ओळख होती. त्यामुळे भारतात कुठेही हिंडणं त्याच्याकरता फारसं कठीण नव्हते. इगोरने कडेगावलाही भेट देणे योग्य ठरेल असे सर्वांचेच मत ठरल्याने जीएम बरोबरची भेट पार पडल्यानंतर त्याने कडेगावला जावे असाही निर्णय झाला.

इगोर जवळ जवळ आठवडयाकरता जीएमकडे गेला होता आणि अजिता आपल्याकडे कामाकडे वळली होती. गावोगावी स्त्रियांची शिबिरे घेण्याची मोहीम सुरू झाली होती. ग्रामीण क्षेत्रात कार्य करायचे म्हणजे निसर्गचक्राशी नाते जोडावेच लागते. कृषीव्यवस्थेशी बांधल्या गेलेल्या ह्या जीवनातील कौटुंबिक सोहळे असोत वा सार्वजनिक सण असोत, त्याचे निसर्गाशी नाते जोडले गेले होते. त्यामुळे संघटनेचे कोणते कार्‍यक्रम कोणत्या मोसमात घ्यायचे हेही ह्या निसर्गचक्रावरच ठरवावे लागत असे. ज्या दिवसात शेतीत काम नसल्यासारखेच, घरात सुगीच्या धान्याची उब, त्या दिवसात घरातील लग्नासारखे कार्यक्रम सोडले तर स्त्रिया मोकळया असतात, म्हणून शिबीरांसारखे कार्यक्रम त्याच दिवसात घेणे योग्य. पाऊस सुरू झाला शेतात पेरण्या, लावण्या सुरू झाल्या कार्यक्रमांना सुट्टी. ग्रामपंचायतींच्या कारभारात स्त्रियांचा सहभाग वाढावा म्हणून आयोजित केलेल्या शिबीर साखळीचा शेवट स्त्रियांची जंगी परिषद घेऊन

होणार होता. त्यासाठी अजिताने वेगवेगळया पक्षातील आणि पक्‍्षाबाहेरीलही संघटनात कार्य करणाऱ्या स्त्री कार्यकर्त्यांना आमंत्रित केले होते. ह्यात जागतिक पातळीवर पारितोषिक आणि सन्मान प्राप्त झालेल्या रेणूका मिश्रांनी सहभागी होण्याचे मान्य केले होते. ह्या सर्व गडबडीत अजिता इगोरला विसरूनच गेली होती.

ह्या हल्ल्यांमागे इगोरच असेल का? का आपण जिला ओळखत नाही अशी ती व्यक्ती ह्यामागे आहे? ती व्यक्ती कोण हे आपल्याला समजले पाहिजे. . म्हणजे सगळेच प्रश्न सुटतील. अशा व्हिआयपी व्यक्तींचे एकत्र कुठे पाहायला मिळतील? विजयला इगोरबद्दल काय माहिती होती? त्याच्या पत्रकार दोस्तांकडून काही म‍ाहिती मिळेल का? आपल्याला असं काय माहिती आहे की, ज्यामुळे आपल्या जीवावर ही मंडळी उठली आहेत?

सकाळी अजिताला जाग आली तेव्हा तिला हे लक्षातच

येईना की, इगोरबद्दल आपण जागृतावस्थेत विचार करत होतो की, निद्रावस्थेत स्वप्ने पाहात होतो. एकमात्र झालं होतं, झोप पुरेसा वेळ न मिळूनही तीचं मन ताजंतवानं झालं होतं. नव्या दिवसाला सामोरं जायला ती तयार होती.

प्रकरण सातवे

अजिता नुकतीच ऑफिसमध्ये पोहचली होती, आलेल्या पत्रांवरून नजर टाकीत असतानाच फोन खणाणला होता,

'हलो, अजिता हिअर'

'अजिता, मी प्रेरणा. मी काल विजयच्या आईवडलांना भेटले. विजयचे कागदपत्र पाहायला आईने तर काहीच हरकत घेतली नाही, पण वडलांची मात्र तयारी नव्हती. भास्करनकडून एक माणूस येऊन हे कागदपत्र पाहून गेलॉय. आता तुम्हाला आणखी काय नवीन कळणार, असं ते म्हणत होते. अखेर मी तुझे नाव सांगितल्यावर ते तयार झाले. आता आपण कधी जायचे सांग.'

अजिता काही वेळ विचार करत राहिली. मग म्हणाली, 'प्रेरणा, आज जमणे तर कठीण आहे, पण उद्या मात्र मी जमवते, आपण सकाळीच दहा, साडे दहाला तेथे जाऊ. चालेल ना? '

प्रेरणाचा होकार आल्यावर अजिता म्हणाली, 'आणखी एक कल्पना माझ्या डोक्यात आाली आहे प्रेरणा. सकाळीच रामतनयचा फोन मला आला होता. रामतनय. तुला मााहीत आहे ना? न्युज् वीक चा स्तंभलेखक. तो विजयचा चांगला मित्र होता.

त्याच्याशी बोलताना मला कल्पना सुचली, मी त्याला म्हटलं, विजयला श्रध्दांजली अर्पण करायला पत्रकारांतर्फेच् एखादा कार्यक्रम ठेवता येईल का? तसं करता आलं तर आपल्याला एकाच वेळी अनेक पत्रकारांशी बोलता येईल, चौकशी करता येईल. तुला काय वाटतं?'

'कल्पना छान आहे अजिता. पण त्या सर्व अनोळखी लोकांसमोर... मला नाही गं जमायचं.'

"अगं ठीक आहे. तु यायलाच हवे असे नाही. मला वाटतं, केवळ प्रेक्षकात येऊन बसलीस तरी पत्रकारांना सहानूभुती वाटेल तुझ्याबद्दल. जरा मोकळेपणी बोलतील कदाचित. पण जाऊ दे. तू म्हटशील हे इमोशनल एक्सप्लॉयटेशन आहे."

'' नाही, अजिता, तसं काही माझ्या मनात नाही आलं. मला वाटतं ह्यातून नक्कीच लाभ होईल. मी

बघते. आपण उद्या भेटणार आहोत."

"आणि प्रेरणा, एक लक्षात ठेव, कदाचित डि.वाय.एस.पी. भास्करन तुझ्याकडे येतील. वाईड चिटरच्या बटणाचे गूढ आपल्या उलगडलंय, त्याबद्दल चक्कार शब्द बोलून नकोस.' 'प्रेरणाने होकर भरण्याआधीच अजिताने फोन डिसकनेक्ट केला.

समोरच्या पत्रांच्या चळतीकडे वळता वळता अजिताचा हात थबकला.

प्रेरणाशी बोलता बोलता अजिताच्या मनात पत्रकारांची एक कंडोलन्स मिटींग आयोजित करण्याची कल्पना आली होती. प्रेरणाची प्रतिक्रिया अजमावण्यासाठी अजिताने रामतनयचे नाव घेतले होते. आता मात्र त्याच्याशी संपर्क साधायला हवा. अजिताने टेलिफोन पुढ्यात घेतला आणि रामतनयचा नंबर फिरवायला सुरुवात केली.

प्रेरणाला घरी सोडून अजिता आपल्या ऑफिसकडे यायला निघाली. विजयच्या बॅगेमधील कागद तपासून पाहता पाहता सहजच दोन अडीच तास निघून गेले होते, परंतु विजयने इगोरच्या काही माहिती मिळवली होती, वा त्याला काही माहिती मिळाली होती असे दर्शवणारे त्यांना काहीही सापडले नव्हते. विजयच्या आई म्हणाली होती की, 'कदाचित एखादा दिवस तुम्ही अगोदर आला असता तर तुम्ही काय शोधताय ते तुम्हाला मिळालंही असतं. पोलीसांच्या माणसाने पाहिल्यावर टेबलाच्या खणातल्या चिठ्ठया चपाटया.. कुणाचे पत्ते, कुणाच्या चिठ्ठया, किरकोळ बिले. काय करायचं तो कचर ा ठेवून. ह्यांनी सर्व काढून जाळून टाकलं, काय साधलं त्यातून त्यांनाच माहीत?'

प्रेरणा तर काही न सापडल्यामुळे अगदीच निराश झाली होती. अजिताने कागदपत्र पाहताना काही कागद बाजूला ठेवले होते. त्यातील एक लेख संरक्षण खात्याकडून परदेशी शस्त्रास्त्र बनवणाऱ्या

कंपन्य ा ंकडून केल्या जाणाऱ्या खरेदीविषयी होता. दुसऱ्या एका लेखाच्या मजकूरावरून घाईघाईत नजर फिरवताना पंडित शर्मांचा उल्लेख झालेला तिला दिसला होता म्हणून अजिताने तो लेख बाजूला ठेवला होता. अजिताने लेख आपल्या पर्समध्ये खुपसले होते.

प्र्रेरणा अगदीच निराश झाली होती. विजयच ी कागदपत्र्े पाहताना तिच्या जुन्या स्मृती परत ताज्या झाल्या असणे साहजिकच होतं. तिचा मूड बदलण्याच्या उद्देशाने अजिता तिला म्हणाली, 'प्र्रेरणा, आपण उद्या हॉटेल खैबरला जाऊया. इगोर काही दिवस तेथे होता. विजय त्याला भेटायला तेथे गेला होता का ह्याची आपण चौकशी करूया. तुला आठवतं असेल, खैबर हॉटेलला वनअर्थने घेतलेल्या सेमिनारला आपण गेलो होतो, इगोर तेथे होता त्यावेळी. सकाळी जाऊया आपण. शिवाय संध्याकाळी आपल्याला प्र्रेस क्लबमध्येही जायचंय."

प्रेरणाने तिला भेटायचे कबूल तर केले पण तिचा उत्साह कमी झाला आहे हे स्पष्ट दिसत होते, परंतु तिला कशात ना कशात गुंतवून ठेवणे गरजेचे होते. खरं तर तिने कामावर यावे असं सुचवावे असंही अजिताच्या मनात आलं होतं, पण त्यातून गैरसमजच होण्याची शक्यता आहे असं लक्षात येऊन त्याऐवजी खैबरला जाताना अजिताने तिला बरोबर घ्यायचे ठरवले होते.

त्याचदिवशी अजिताला दोन दिवसांनी आर.सी.ची स्पेशल मिटींग ठेवली असल्याचा आणि सर्व सदस्यांनी मिटींगला हजर राहाणे आवश्यक असल्याचा निरोप मिळाला. विजय गेल्यापासून अजिता काहीना काही कारणांनी पुर्ण वेळ ऑफिसमध्ये जाऊ शकली नव्हती, आणि पुर्ण लक्षही देऊ शकली नव्हती. त्यामुळे व्हि.आर.डी.सी.चे ऑफिस उघडले जात होते एवढेच म्हणता येत होते. सर्व स्टाफ एका विचित्र मन:स्थितीत रोजचा आला दिवस पुढे ढकलत होता. अजिताला

कळत होते, असे चालणे योग्य नाही. परत एकदा नेहमीप्रमाणे काम सुरू होण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज होती आणि पक्षाची ही मिटींग मध्येच आली होती. विजयच्या मृत्यूच्या छायेतून स्टाफमेंबर्सना बाहेर काढून परत एकदा कामाला गती आणण्याचे काम करायला हवे होते. कामाचा बॅकलॉग संपवायला हवा होता. इगोरबरोबरच्या माणूस कोण होता ह्याचा शोध घ्यायला हवाच, पण रूटीन कामही व्हायला हवीत. पुढील तीन चार महिने आपण पूर्णपणे आपल्या संस्थेच्या कार्यातच लक्ष घालणार आहोत असं मिटींगमध्ये मांडायचंही तिने ठरवले होते. मिटींगच्या आदल्या दिवशी एसेनशी बोलून घ्यायला पाहिजे असे मनाशी ठरवून तिने त्याला निरोप पाठवला.

प्रेरणा आणि अजिता जेव्हा हॉटेल खैबरमध्ये पोचल्या, तेव्हा सकाळचे दहा वाजत होते. हायवेपासून थोडंसं आत असलेले हॉटेल. हॉटेलच्या तळमजल्याला रेस्तारॉं आणि बार होता. बाकी इमारतीत

राहण्याची सोय होती.

अजिता काऊंटरवर पोचली, तिला पाहून आतल्या ऑफिसमध्ये बसलेला मॅनेजर बाहेर आला. तसं पाहिलं तर खैबरचे रेटस बरेच हाय होते, पण तरीही अजिताने ह्यापूर्वी एन.जी.ओ.ंचे काही सेमिनार्स किंवा काही एक दोन मिटींगाही येथे घेतल्या होत्या. पावसाळयाच्या दिवसात जेव्हा सिझन ऑफ असेल तेव्हा ती असे कार्यक्रम घेत असे, त्यावेळी मॅनेजमेंट काही खास सवलतही देत असे. मॅनेजरला अजिता त्याच कामात आली असावी असे वाटले.

मॅनजरच्या अभिवादनाला उत्तर देत ती म्हणाली, "ऑगस्टमध्ये एक मिटींग घ्यायला विचार आहे. तीस एक स्त्रिया असतील. जरा तारखा बघा ना रिकाम्या केव्हा आहेत. शक्यतोवर त्यावेळी इतर कुणाचे कार्यक्रम नसले तर बरे!"

मॅनेजरने दोघींना आत बोलावले. ऑगस्ट, सप्टेंबर महिन्यात कुठले दिवस रिकामे आहेत हे पाहून घेतल्यावर, "दोन, तीन दिवसांत संबंधित संस्थांना कन्सल्ट करून मी फोन करते." असं सांगून अजिताने त्या विषयावर पडदा टाकला.

मग सहज आठवण झाल्यासारखे म्हणाली, "आणखी एक काम होतं. खरं तर तुम्हाला त्रास देणं योग्य नाही.. मागच्याच्या मागच्या आठवडयात आम्ही एक सेमिनार घेतला होता इथे. त्या सेमिनारमध्ये कोण कोण आले होते, ह्याची यादी आमच्याकडे आहे परंतु काही जणी लवकर गेल्या होत्या, काही उशिरा आल्या होत्या. ती माहिती जरा आम्हाला पाहिजे होती."

मॅनजेरने ताबडतोब त्यांना रिसेप्शनीस्टकडे नेले आणि तिला आवश्यक माहिती द्यावयास सांमितली.

प्रेरणा रजिस्टरवरून माहिती लिहून घेत असताना

अजिताने रिसेप्शनीस्टशी गप्पा सुरू केल्य होत्या. प्रेरणानी माहिती घेईपर्यंत अजिताला कळले होते, की इगोरबरोबर असलेल्या इसमाचे नाव रजिस्टरमध्ये नोंद करण्याची वेळच आली नव्हती. हा इसम संध्याकाळी अकराच्या सुमारास इथे आला होता आणि पहाटे येथूनच परत विमानतळावर गेला होता. काही तासाकरता भेटायला आलेल्या पाहुण्यांचे रेकॉर्ड ठेवण्याची पध्दत नव्हती. मात्र् पहाटे एरोड्रमवर जाण्यासाठी खैबरकडून टॅक्सी सर्वीस पुरवण्यात आल्याने हा इसम येथून दिल्लीला गेला होता असं दिसत होतं. इगोर मात्र् तेथे दोन दिवस राहिला होता. परंतु इगोरला आणखी कुणी त्या काळात भेटायला आले नव्हते. विजय आणि इगोर ह्यांचा काही संबंध होता वा नाही, हा प्र्श्न अनुत्तरणीयच राहिला होता.

पत्र्कार भवनामधील शोकसभेला अजिताने विजयच्या संदर्‍भातील काही आठवणी साध्या शब्दात सांगून विजय सर्वांशी अत्यंत मित्र्त्वाने,

आपलेपणाने कसा वागत असे ह्याची उदाहरणे देऊन अशा ह्या अजातशत्रू पत्रकाराचा शेवट अशा रितीने व्हावा ह्याबद्दल खेद व्यक्त केला. विजयच्या मृत्यूचे गूढ एका अर्थाने अजून उलगडलेले नाही असं सा ंगून तिने विजय शेवटच्च्या काही दिवसात एखाद्या विशिष्ट प्रकरणाचा पाठपूरावा करत असल्याची काही माहिती आपल्याकडे असेल तर ती संबंधित चौकशी अधिकाऱ्याला पुरवल्यास हे गुढ उलगडण्यास मदतच होईल असा आशावादही व्यक्त केला होता. ह्या सभेला एल.आय.बी.चा माणूस आला आहे ह्याची दखल अर्थातच अजिताने घेतली होती. सभा संपल्यावर विजयच्या पत्रकार सहकाऱ्यांबरोबर गप्पा मारताना विजय ह्या अखेरच्च्या काही दिवसात शस्त्रास्त्रांच्या व्यापाराबद्दल आणि हा व्यापार करणाऱ्या दलालांचा राजकारणी लोकांशी असलेल्या संबंधांबाबत माहिती मिळवत असल्याचे एका मित्राने सांगितले होते. परंतु ह्याबाबत तो प्रत्यक्ष संबंधित लोकांना भेटला होता की केवळ लायब्ररीमध्ये ह्या विषयावर वाचन करत

होता, ह्याबाबतीत मात्र तो मित्र काही सांगू शकत नव्हता.

त्यादिवशी संध्याकाळी घरी पोचल्याबरोबर अजिताने आपल्या पर्समध्ये टाकलेला विजयचा लेख वाचायला घेतला. लेख कच्च्या मसूद्याच्या स्वरुपात होता, अजिताने एसेनशी माहिती देण्याकरता एका कागदावर लेखातील महत्त्वाचे मुद्दे टिपून घेतले. वाढत्या हिंसेच्या घटनांच्या संदर्भात काही वेगळी माहिती आणि निरिक्षणे ह्या लेखात होती. परंतु कुणा व्यक्तीला त्रासदायक ठरेल अशी काही माहिती त्यात नव्हती. तरीही ही माहिती एसेनला पोचवली पाहिजे असं तिने ठरवले. दुसऱ्या दिवशी सकाळी तिने दोन दिवसांत तिला जे काही नवीन कळले होते त्याची माहिती एसेनला पोचवली.

1) देशातील वाढती हिंसा, प्रतिस्पर्धी राजकीय संघटनेवर किंवा दुसऱ्या जातीच्या वस्तीवर सामुहिक

हल्ले, पोलीसांशी किंवा एस.आर.पी.वर होणारे सशस्त्र हल्ले ही समस्या दिवसेंदिवस गंभीर स्वरूप धारण करत आहे. आणि ह्याचे कारण अशा घटनांची संख्या वाढतेय हेच नाही, तर अशा घटनांमध्ये हिंसेचा वापर करणाऱ्या संघटना, गट हे अत्यंत अधुनिक शस्त्रास्त्रांचा वापर करत असताना आढळून येत आहेत. प्रादेशिक सुरक्षा सेनेकडेही जी शस्त्रे नाहीत अशी शस्त्रे अशा अतिरेकी गटांकडे दिसत आहेत. ही शस्त्रास्त्रे बहुधा परदेशात तयार झालेली असतात आणि आपल्या देशात छुप्या मार्गाने आणली जातात.

2) दोन तीन दशकांपूर्वीपर्यंत हाती शस्त्र घेऊन बंडखोरी करण्याची, क्रांती करण्याची भाषा केवळ डावे अतिरेकीच करत असत. परंतु गेल्या काही वर्षांत ही स्थिती बदलत गेली आहे. प्रादेशिक अस्मिता फुलवणारे, सांस्कृतिक पातळीवर वेगळेपणाचा दावा करून स्वतंत्र राज्याची मागणी करणारे, आणि धार्मिक मुलतत्त्ववादी संघटना, गटही शस्त्रबळाचा उपयोग करत असताना

दिसत आहेत. अशा गटांकडेही अत्याधुनिक शस्त्रे पोचली आहेत असे पुरावे सापडले आहेत.

3) किंबहुना गेल्या काही वर्षांत असे दिसते की, डाव्या अतिरेकी संघटनांची, गटांची अशांतता पसरवण्याची शक्ती वेगवेगळया कारणांनी कमी होत गेली आहे. ह्या विचारप्रवाहाच्या संघटनांना असलेला सामाजिक पाठिंबाही कमी होत चालला आहे. मात्र जहाल उजव्या गटांची त्रासदायक होण्याची शक्ती मात्र वाढत आहे. त्यांच्याविषयी सर्वसामान्य जनतेत मिळणारा पाठिंबाही वाढत आहे. धर्मद्वेषाच्या आधारावर हिंसक कारवाया करणारे गट वाढत आहेत.

4) देशात अशांतता माजवण्याचा उद्देश असलेल्या शक्तींनी गेल्या दोन वर्षात डाव्या अतिरेकी संघटनांना शस्त्रे देण्याऐवजी उजव्या मुलतत्त्ववादी हिंसक गटांना अधुनिक शस्त्रांचा पुरवठा करण्याची निती व्यवहारात आणली आहे.

5) ह्या व्यवहारामध्ये शस्त्रविक्रीच्या व्यवहारात दलाली करणारी भारतीय कंपनीही गुंतली असावी असे दिसते. ह्या दलाली करणाऱ्या कंपनीचे हितसंबंध भारताने शस्त्रास्त्र निर्मीतित स्वयंपूर्ण व्हावे ह्यात गुंतलेले नसून, भारताने परदेशी कंपन्यांवर अवलंबून राहावे ह्यातच गुंतले आहेत.

विजयच्या ह्या लेखात कुणा व्यक्तींची नावे घेतली गेली नव्हती हे जरी खरे असेल तरी, शस्त्रांस्त्र व्यवहाराच्या संदर्भात माहिती मिळवताना त्याला इगोरविषयी काही माहिती मिळाली होती का? इगोरचे पक्षाशी संबंध आहेत हे विजयला माहीत झालं होतं का? विजय चूकीने आपल्याऐवजी मारला गेला असं आपण समजतोय, ते खरं आहे का? का शस्त्रास्त्त व्यवहारातील काही गुप्त स्फोटक माहिती त्याला मिळाली होती? पण मग आपल्यावर झालेले हल्ले?

प्रश्नांची गुंतागुंत वाढत चाललीय का आपण दुबळे

झालोय?

प्रकरण आठवे

मिटींग सुरू करतानाच पीकेने जाहीर केले, "ह्यावेळी ही मिटींग अत्यंत अल्पकाळाच्या सूचना देऊन घेण्यात आली आहे. त्यामुळे प्रत्यक्ष फिल्डमध्ये असलेले, दूरचे कॉम्रेडस् ह्या मिटींगला येऊ शकलेले नाहीत. पण सीसीने पाठवलेल्या संदेशानुसार आणि पुढील तयारी करण्याच्या दृष्टीने हालचाली सुरू करता याव्यात, ह्यासाठी ही मिटींग घाईघाईत घेण्याशिवाय काहीही पर्याय नव्हता. तेव्हा इतर गोष्टींचा विचार आपण ह्या मिटींगमध्ये न करता केवळ ताबडतोबीने ज्यावर कारवाई करावी लागणार आहे अशा गोष्टी

आपण आता उरकणार आहोत.

नुकतीच सीसीची मिंटींग झाली, त्यावेळी कॉम्रेड सत्येन गुप्तनी माझ्याबरोबर काही बाबतीत पर्सनल चर्चा केली होती. त्या चर्चेचा संबंध कॉम्रेड अजिताने इगोरच्या संदर्भात जी माहिती व मते व्यक्त केली होती त्यांच्याशी होता. आजच्या ह्या संदेशामध्ये देखील कॉम्रेड एस.जीं. नी काही अधिक माहिती पुरवली आहे. प्रथम कॉम्रेड एस.जी.नीं कॉम्रेड अजिताने दाखवलेल्या सावधानतेबद्दल आणि आपली मते स्पष्टपणे आणि तातडीने कळवल्याबद्दल अभिनंदन केले आहे. त्यांनी पुढे काय म्हटले आहे हे मी वाचूनच दाखवतो, 'क्रांतीकारी सैन्याला आधुनिक शस्त्रअस्त्रांचे साह्य करणाऱ्या समविचारी गटाचे अस्तित्व धोक्यात आले आहे. ह्या धोक्याचे मुळ येथे आपल्या भारतातच आहे आणि ती विषारी मूळी येथेच आणि ताबडतोबीने उपटून टाकणे गरजेचे आहे. ह्या गरजेतून, आणि एकूण राजकीय परिस्थितीचे निरिक्षण करून सीसीने एक

महत्त्वाचा निर्णय घेतला आहे आणि तो प्रत्यक्षात आणण्याची जबाबदारीही साऊथ झोनवर टाकली आहे. सीसीने असा निर्णय घेतला आहे की, केंद्र शासनात अत्यंत महत्त्वाच्या पदावर असलेल्या व्यक्तीला देशाच्या आणि जनतेच्या हिताच्या दृष्टीने निष्क्रिय करणे आवश्यक आहे. ही व्यक्ती कोण हे योग्य वेळी आपल्याला कळेलच. परंतु त्यासाठी जे तंत्र वापरण्याचा निर्णय घेण्यात आला आहे ते तंत्र आपल्या लढ्यात आत ापर्यंत कधीच वापरले गेलेले नाही. हे तंत्र आहे ह्युमन बॉंबचे! लढ्याचे हे नवीन हत्यार पूर्ण जबाबदारीने, सक्षमतेने वापरणे गरजेचे आहे.

पीकेने हातातील कागद बाजूला ठेवला, क्षणभरच तो थबकला, आणि त्याच सूरात तो पुढे बोलू लागला, " सर्वोच्च त्यागाला आपण तयार असल्य ाचे सिध्द करण्याची ही एक संधीच आपल्याला मिळालेली आहे. गटाच्या, संघटनेच्या, देशाच्या, पिडीत - दलित जनतेच्या भविष्याच्या दृष्टिने अत्यंत महत्त्वाची ही

कामगिरी पार पडेपर्यंत गुप्तता राखण्याची नितांत गरज आहे. ह्या कामगिरीचे महत्त्व, गुप्तता राखण्याची आवश्यकता हे लक्षात घेऊन ही कामगिरी रिजनल कमिटीच्या सदस्यांवरच सोपवण्याचा निर्णय सीसीने केला आहे. कोणत्याही प्रकारचा त्याग करण्याची तयारी आपण, येथील प्रत्येकाने ह्यापूर्वीच्या अनेक कामगिऱ्यामध्ये सिध्द केली आहे. परंतु तरीही ही विशिष्ट जबाबदारी घेण्यास कुणाची काही हरकत असल्यास अगोदरच स्पष्ट विचारावे अशीही सूचना सीसीने केली आहे. मला विश्वास आहे, आपणा सर्वांचीच हा अत्युच्च त्याग करण्याची तयारी आहे"

पीके थांबला, बोलत असताना त्याची शोधक - भेदक नजर सर्वांवरून फिरत होतीच. आता परत एकदा त्याने सर्वांच्या चेहऱ्यांवरून आपली प्ृश्नांकित नजर संथपणे फिरवली. सामुहिक कृतीवर भर देणाऱ्या एसजीला असा वैयक्तिक बलिदानाचा मार्ग स्विकारण्याची गरज का वाटली

असावी असा प्रश्न अजिताच्या मनात उगवला होता. पीकेची नजर आपल्या चेहऱ्यावर काही क्षण जास्त काळ रेंगाळली की काय अशी शंकाही अजिताच्या मनात येऊन गेली. पीकेने हा प्रश्न अशा रीतीने उपस्थित करणे अयोग्य आहे असंही वाटलं अजिताला. रिजनल कमिटीच्या प्रत्येक सभासदाने ह्यापूर्वी अनेक वेगवेगळया मोहिमांमध्ये सहभागी होऊन आपली कमिटमेंट सिध्द केलेली आहे. त्यामुळे त्याचा हा प्रश्न म्हणजे एक प्रकारची रिच्युअलच म्हणावी लागेल. आपल्या मनातील विचारांना बाजूला सारून अजिताने पीकेकडे लक्ष वळवले. पीकेने परत बोलायला सुरुवात केली होती,

"ही मोहिम यशस्वी करण्यासाठी कोणकोणत्या साधनांची गरज लागेल? ह्यातील कोणती साधने आपल्याकडे आहेत, किती आपल्याला तयार करता येतील, किती आपल्याल ा दुसरीकडून प्राप्त करावी लागतील ह्याची सर्व माहिती पुढील पाच दिवसात

एमजी व टीजी काढतील, व तो रिपोर्ट 'के पॉईट'च्या मिटींगमध्ये सादर करतील. एएन त्यांना ह्यासाठी साह्य करेल. ऑपरेशनची पुर्ण तयारी आपल्याला पुढच्या तीन आठवडयात करायची आहे. ह्या संदर्भात बाकी महत्त्वाची माहिती आपल्याला योग्य वेळी सीसीकडून कळवण्यात येईल. शनीवारी होणाऱ्या 'के पॉईट' मिटींगला अजिताने हजर राहावे. ह्याशिवाय पुढचा आठवडा आरसीच्या कुणाही सदस्याने आऊट ऑफ सर्क्युलेशन जाऊ नये. आपली गरज लागल्यास आपल्याशी सहज संपर्क साधता येईल अशी काळजी घ्यावी. कुणाला ह्यावर काही खास महत्त्वाचा मुद्दा मांडायचा नसेल तर मिटींग संपल्याचे मी घोषित करतो."

आपल्याला पुढील काही महिने संस्थेच्या कामात जास्तीतजास्त लक्ष घालायचे आहे असं तिला मिटींगमध्ये मांडणे शक्यच झाले नव्हते. पण अजिता त्याबद्दल विचार करत नव्हती. तिच्ि्या मनात अनेक

प्रश्न उभे राहिले होते. इतर कॉम्रेडसच्या मनातही हे प्रश्न असणार हे निश्चित होते. परंतु पीकेने त्यावर चर्चा टाळली होती. वैयक्तिक पातळीवर केल्या जाणाऱ्या हिंसेला तिच्या ग्रुपने प्रथमपासूनच विरोध केला होता. सशस्त्र लढयाचा मार्ग पत्करणाऱ्याला हिंसा मान्यच असते. परंतु ही हिंसा वर्गीय लढयाचा भाग असेल तेव्हाच योग्य ठरते. समुदायाची सामुहिक कृती हिसेंचा मार्ग पत्करू शकते. वर्गाच्या नावाने व्यक्तीने हिंसा करणे ह्यला पक्षाचा तात्विक पातळीवर विरोध आहे. हा निर्णय पक्षाच्या हिसेविषयीच्या मुळ भूमिकेलाच छेद देतोय. आणि ही हिंसा कशाकरता तर परदेशातील एका ग्रुपच्या अस्तित्वाकरता. त्यातून पक्षसंघटनेवर सरळ हल्ला ओढवून घ्यायचा. मुळ तात्विक भूमिकेलाच नकार देणारा हा निर्णय घ्यायची कारणे तरी काय? त्यावर चर्चा का नाही?

अजिता मनात विचार करत होती. के पॉईट मिटींगला मला का बोलवलं हे स्पष्ट आहे, कुठल्याही

ऑपरेशनचे प्लॅनींग करायचे तर मी प्रत्येक शक्यतेचा, बारीक बारीक गोष्टींचा विचार करते, विशिष्ट ऑपरेशनमध्ये कोणी भाग घ्यावा हे ठरवताना प्रत्येक व्यक्तीच्या गुणावगुणाचा अत्यंत निष्ठूर तटस्थतेने विचार करते. पीकेच्या बोलण्यावरून रिजनल कमिटीतील सभासदांपैकीच कुणावर तरी ही जबाबदारी टाकली जाणार हे निश्चित दिसतंय.

आपल्या युनीटमधीलच कुणा व्यक्तीची निवड ह्युमन बॉम्ब म्हणून करायची असेल तर मी कुणाची निवड करेन? तिच्या मनात प्रश्न आला परंतु ताबडतोब तिने स्वत:ला सांगितले, नाही, असा प्रश्न विचारणं चुकीचा आहे. प्रश्न असा विचारायला हवा की, ह्यूमन बॉंब म्हणून व्यक्तीची निवड निश्चित करताना मी कोणत्या मार्गदर्शन तत्त्वांचा विचार करेन? ह्या तत्त्वांमध्ये अग्रक्रम कशाला देईन? ह्या प्रश्नांची उत्तरे निश्चित केल्यावर त्याच्या आधारे युनीटमध्ये ही जबाबदारी ज्यावर टाकता येईल अशा व्यक्तीची नाव

निश्चित करता येईल. त्यावर पहिला चॉईस. . दुसरा चॉईस अशी निवड मी करेन. के पॉइंट मिटींगला जाण्याआधी मला ह्या मुद्यांचा विचार करून ठेवायला हवा.

पण ह्याचा अर्थ नेतृत्वाचा हा निर्णय तात्विक भूमिकेच्च्या विरोधात आहे असं मत असूनही मी तो निर्णय मान्य केलाय असाच होतो ना? ह्या निर्णयावर अमान्यता दर्शवणारे मतही मी व्यक्त करणार नाही का? पक्षनेतृत्वाच्या निर्णयावर वारंवार प्र्श्न उपस्थित करण्याची पाळी माझ्या वर का यावी? मला जे दिसते ते इतरांना का दिसू नये?

येणाऱ्या मिटींगमध्ये कुठले विषय येण्याची शक्यता आहे त्याचा अंदाज घेऊन त्याविषयी अगोदरच विचार करून ठेवायचा ही तिची नेहमीचीच पध्दत होती. कुठल्याही ऑपरेशनच्या वेळी ती पहिला प्र्श्न विचारत असे, ह्या ऑपरेशनमधून आपण काय साधणार आहोत?

ऑपरेशनमध्ये आपण काय कमावणार आहोत, काय गमावणार आहोत?

कोणत्या तरी अत्यंत महत्त्वाच्या व्यक्तीचा बळी घ्यायचा निर्णय घेण्यात येणार आहे, आणि ती जबाबदारी आमच्या रिजनवर टाकण्यात आली आहे ह्याचा अर्थ ही व्यक्ती ह्या क्षेत्रातच येणार असणार! तीन आठवडयांच्या आत सज्ज व्हायचा आदेश देण्यात आला आहे. अशा महत्त्वाच्या ऑपरेशनचा विचार फार अगोदर करण्यात ही बातमी बाहेर फुटण्याचा धोका वाढतो हे तर सरळ आहे. म्हणजे तीन आठवडयानंतर ताबडतोबच मुख्य कृती केली जाणार. काही महिन्यापूर्वी वन अर्थच्या आशा सिंगने तिला सांगितले होते की, डिफेन्स आणि एनजीओज् ह्यांचे एक सेमिनार लवकरच ऑर्गनाईझ करण्याचा नि‍र्णय घेतला गेला आहे. ह्या सेमिनारनंतर मिलीटरी ज्या एरियात मोठया प्रमाणात आहे, आणि जेथे मिलिटरी पर्सनल्स व स्थानिक जनता ह्यात दुरावा आहे तो दूर करण्याकरता

काही प्रयोग मिलीटरी अन एनजीओज् मिळून काही कार्यक्रम घेता येतील का ह्यावर विचार होणार आहे. ह्यातील पहिला सेमिनार कोडाईकल्लीला ऑगस्टच्या तिसऱ्या आठवडयात होणार आहे. ह्या पहिल्या सेमिनारला डिफेन्स शाखांचे चीफज्, डिफेन्स मिनिस्टर हजर राहाणार आहेतच पण पंतप्रधानही हजर राहाणार आहेत. ह्याच कॉन्फरन्समध्ये ह्यूमन बॉम्बचा उपयोग केला जाणार असावा असा अंदाज करायला हरकत नाही. पंतप्रधान की संरक्षण मंत्री?

पंतप्रधानाचा बळी घेतला जाईल अशी शक्यता नाही. आघाडी सरकारच्या ह्या पंतप्रधानांच्या पाठीशी त्यांच्या पक्षातील आमदार-खासदारांचे पुरेसे पाठबळ नाही. आंतरराष्ट्रीय पातळीवर सोडाच, देशाच्या पातळीवरही लोकांमध्ये पंतप्रधानांची खास प्रतिमा नाही. उद्योगपती, मिडीया बॉसेस, संरक्षण खात्यातील उच्च अधिकारीवर्गात आणि विरोधी पक्षनेत्यांमध्ये पंतप्रधानांचा खास प्रभाव नाही. त्यामुळे हे पंतप्रधान

मोठ्या प्रमाणात मंत्रीमंडळातील सहकाऱ्यांतील ताणतणाव कमी करण्याचे, सामोपचाराचेच राजकारण करत आहेत. कुठल्याही राजकीय विषयाबाबत त्यांनी ठाम भूमिका घेतलेली नाही, घेत नाहीत. त्यामुळे राजकीय, परिवर्तनवादी चळवळींच्या विकासाला हे पंतप्रधान असणे लाभदायकच आहे असं मत सीसीनें काही दिवसापूर्वीच व्यक्त केले होते. त्यामुळे पंतप्रधानाना नष्ट करण्याचा निर्णय सीसी घेईल अशी शक्यता नाही. कदाचित डिफेन्स मिनिस्टरचा घात करण्याचे सीसीने ठरवले असेल.

पंतप्रधान आणि सुरक्षामंत्री येणार असल्याने, आंतरराष्ट्रीय पातळीवरील कॉन्फरन्स असल्याने सेक्युरिटी कडकच असायला पाहिजे. म्हणजे हा ह्युमन बॉम्ब सहजपणे स्टेजपर्यंत जाऊ शकेल अशी व्यक्ती पाहिजे. तिची सेक्युरिटीकडून कडक तपासणी झाली तरी बॉम्बचा पत्ता लागणार नाही ही काळजी घ्यावी लागेल. म्हणजे ही व्यक्ती शक्यतोवर स्त्री असायला

हवी. तिच्यात एक खास चार्म हवा, चेहऱ्यावर लोभस हास्य हवे आणि डोक्यात थंडपणा. अनिता अशी व्यक्ती आहे. होय. अनिताच योग्य निवड होऊ शकते. तिचा मेंदू म्हणजे वन ट्रॅक मशीन आहे. ती फिल्ड ॲक्टीव्हीस्ट नाही. ती गेल्यामुळे कामावर ताबडतोबीने काही परिणाम होणार नाही. ह्याचा अर्थ ती डिस्पोजेबल आहे का? नाही. असं म्हणणं योग्य नाही. पण ह्यूमन बॉम्बची निवड करताना ती व्यक्ती गेल्यानं गटाचे फारसे नुकसान होणार नाही ह्याचाही विचार करायला हवा. ही व्यक्ती अशी हवी की जिला अशा कार्यक्रमात सहजपणे वावरायची सवंय हवी.

परंतु मूळात ह्यूमन बाँबचा उपयोग करण्याचा निर्णय का घेण्यात आला असावा? अशी काय परिस्थिती निर्माण झाली असावी की ह्या मार्गाचा अवलंब करण्याचा निर्णय घ्यावा लागावा? लोकसमुदायांच्या सामुहिक कृतीवर जोर देणाऱ्या एस.जी.च्या मांडणीत हे खरं तर बसत नाही. आणि ...

काऊंटरवर पैसे ठेवून ती बाहेर पडली. तिला अनुभवाने माहीत झालं होतं, नेहमी सावध राहाणारे मनही काहीवेळा कल्पनाशक्तीच्या वारूवर आरूढ होऊन वाहत जाते. सातत्याने सावध राहाणे, संशयी राहाणे, ही मनाची नैसर्गिक अवस्था नसावी. ती बाहेर आली. अनिता डिस्पोजेबल आहे असा विचारच माझ्या मनात कसा आला? क्रांतीकारी संघटनेचा कुणी ॲक्टीव्हीस्ट डिस्पोजेबल असू शकतो का? असा विचार माझ्या मनात येऊच कसा शकतो? आपल्या एका सहकार्‍याच्या, एका मैत्रिणीच्या मृत्यूबद्दल आपण इतका सहज विचार करू तरी कसे शकतो? एकाएकी तिच्या मनात स्वत:विषयी घृणेची तीव्र भावना जागृत झाली. ऐ मेरे वतनके लोगो, ऐकून आपण अस्वस्थ होत नाही का? वो सुबह कभी तो आयेगी ह्या गाण्याची केवळ धून लागली तरी आपले डोळे भरून य ेत होते, ते दिवस काळाच्या उदरात नाहीसे झालेत का? लोकांचे दु:ख, यातना पाहून आपण अस्वस्थ व्हायचो, आपलं मन पिळवटून निघायचे. केवळ सहानुभूतीची भावना

कितीही तीव्र असेल तरी ती कृतीला प्रेरक ठरेलच असे नसते. गरज असते समवेदनेच्या भावनेची. ह्या समवेदनेच्या भावनेमुळेच मी चळवळीत आले ना?

ती अजिता कुठाय? एकाएकी तिला वाटलं जोराजोरात हाका मारत धावत सुटावं, अजिता...अजिता... धावत सुटावं, सागर किनाऱ्याला पोचावं, आणि सागर आणि आकाश जेथे भिडते त्या क्षितीजापर्यंत ऐकू जाईल असा आक्रोश करावा...अजिता. अजिता... तू कुठं हरवलीयस गं?

दुपारचे दोन वाजून गेले होते तरी बसला बरीच गर्दी होती. बसमध्ये बसल्यावर तिनं बसच्या प्रवाशांवर नजर फिरवली. सगळे अनोळखी चेहरे. ती अगदी पुढे जाऊन ड्रायव्हरच्या पाठीमागच्या सीटवर जाऊन खिडकीजवळ बसली. बस गावातून बाहेर पडली आणि काही मिनिटातच वळणे घेत वर चढणाऱ्या घाटाच्या रस्त्याने वर सरकू लागली. के पॉईंटच्या मिटींगला

जायला तिला नेहमीच आवडत असे. ह्या उंच डोंगरावर असलेल्या देवीच्या दर्शनाला येणारे बहुसंख्य अडाणी, शेतकरी, मजूर वर्गातले असतं. प्रत्येकाला मातेकडून काहीतरी मागायचे असे, किंवा मागितलेले लाभले म्हणून केलेला नवस फेडायचा असे. देवीच्या दर्शनाला उच्च सधन वर्गातले लोक येतच नसत असा नव्हता. पण अशांची संख्या फारच कमी असे, आणि जे येत असत ते आपल्या स्वत:च्या कार्सनी येत असत, किंवा टॅक्सीने येत असत आणि थेट मंदिरापाशी उतरून दर्शन घेऊन तातडीने खाली उतरून घाटाच्या तोंडाल◌ाच असलेल्या झगमगीत ढाब्यात श्रमपरिहाराकरता जात असत.

बस थांबल्यावर इतर यात्रेकरूंच्या गर्दीबरोबर ती मंदिराकडे चालू लागली. मंदिराशी पोचल्यावर ती मंदिराला प्रदक्षिणा घालणाऱ्यांबरोबर मंदिराच्या मागे गेली, आणि पाठीमागच्या बाजूच्या पाऊलवाटेने जंगलात घुसली. वाट तिच्या पायांच्या ओळखीची होती.

जंगलातून वळणे घेत ती पायवाट अगदी पठाराच्या कडेशी जंगलातून बाहेर पडत होती. जंगल संपून येथे डोंगर जेथे खालील खोल दरीत कोसळत होता तेथपर्यंत काठावर बांधलेल्या तटाच्या भिंतीपर्यंत केवळ गवतच वाढलेले होते. भिंतीच्या काठाने ती चालत राहिली. बुरूजावर जाणाऱ्या चढावावर जरासं वर चढल्यावर तिला एसेन दिसला. वाऱ्याने तिची ओढणी आणि केस उडत होते. पण दोन्ही सावरण्याचा प्रयत्न न करता ती त्याच्याकडे पाहात चालत राहिली. एसेनच्या मागील गडद निळया रंगाचं निरभ्र आकाश. त्याच्याकडे पाहून उत्साहाने तिनं आपले दोन्ही हात उंचावून जोरजोरात हलवले. परंतु त्याने काहीही प्रतिसाद दिला नाही. खरं तर तो तिच्या दिशेनेच बघत होता. का कुठल्या विचारांच्या तंद्रीत असल्याने कुठेच बघत नाहीये तो? परंतु एसेनचा हा स्वभाव नाही. सावधानता त्याच्या पेशीपेशीत भिनलीयं. तिच्या पावलाची गती आपोआपच वाढली.

ती जवळ पोचली तेव्हा तिच्या लक्षात आलं की तो तिच्याकडे पाहात आहे, आणि त्याच्या चेहऱ्यावर काही वेगळेच भाव आहेत..आश्चर्याने, दु:खाचे... मग तिच्या लक्षात आलं ती शिट्टीवर कुठल्या तरी शब्द हरवलेल्या गाण्याची सुरेल धून वाजवत आहे. ती हंसली आणि शेवटच्च्या चार पाच पायऱ्या उडया मारतच तिनं पार केल्या आणि ती किचिंत अडखळली. बुरजाच्या भितींला पाठ टेकवून पीके, एमजी, टीजी आणि नायर बसले होते. अनिता पुढे झाली, आपला हात पुढे करून तिने तिचा हात हातात घेतला, "नेहमीप्र्माणे एकदम वेळेवर. बसने येऊनही तू हे कसे साधतेस कुणास ठाऊक?" ती स्मित करीत म्हणाली. अजिताला वाटलं अनिताचा हात तिच्या हातात काही क्षण जास्तच रेंगाळला आहे. ती प्र्ा. नायरच्या शेजारी भिंतीशी बसली.

' ' प्रिलीमिनरीज् मध्ये वेळ न घालवता आपण ताबडतोब विषयाला सुरुवात करूया. आज आपण येथे का जमलो आहोत हे सर्वांना म ाहीत आहेच. एक

स्पष्ट करायला पाहिजे की, ही केंद्र सरकारात असलेली महत्त्वाची व्यक्ती कोण हे अजून सीसीने कळवलेले नाही. परंतु कोडाईकल्ली येथे होणाऱ्या कार्यक्रमात येणाऱ्या व्यक्तीमध्ये ही व्यक्ती असणार आहे. ह्या कार्यक्रमात अनेक व्ही.आय.पी. येणार असल्याने ही व्‌्यक्ती कोण असेल ह्याचा अंदाज करण्यात आपण वेळ आणि शक्ती घालवू नये. एमजीने ह्या ऑपरेशनकरता काय काय साधने लागतील ह्याची प्राथमिक माहिती मिळवली आहे. प्रा. नायरांनी ह्या कार्यक्रमाचे म्हणजे कोडाई कॅनाल येथे होणाऱ्या कार्यक्रमाचे स्वरुप कसे असेल ह्याची माहिती मिळवली आहे. आपण चर्चेला सुरुवात करूया का एएन? "

अनिताने मान हलवली, आपल्या पर्समधून आपली छोटी डायरी तिने बाहेर काढली. पीके आणि अनिता एकत्र राहातात हे सर्वांना माहीत आहे. परंतु मिटींगमध्ये पीके नेहमी तिला एएन् म्हणतो, चुकूनही ॲन नाही किंवा अनिताही नाही. जणू येथे आपले नाते

वेगळे आहे हे त्याला सांगायचे असते, इतरांना आणि अनितालाही. आपल्या मनात अनेक वेळा आलेला हा विचार अजिताने बाजूला सारला आणि आपला हात किंचिंत उंचावून तिनं पीकेकडे पाहून इशारा केला. आपल्या पर्समधून एक कागद उलगडून पीकेकडे करत ती म्हणाली, "ही जबाबद◌ारी कुणा व्यक्तीवर टाकायची हा निर्णय सीसीने घेतला असेल, तर काही प्र्श्नच उरत नाही. पण ही व्यक्ती निश्चित करण्याची जबाबदारी रिजनल कमिटीवर असेल तर ह्या महत्त्वाच्या कामासाठी व्यक्ती निवडताना कोणत्या मुद्यांचा विचार करावा ह्यावर मी एक टिप्पण काढले आहे. त्याचा उपयोग करायचा वा नाही हे चेअरमनने ठरवावे. शिवाय सी.सी.ने हा निर्णय कोणत्या स्थितीत घेतला आहे हे मला माहीत नाही परंतु हा निर्णय आपल्याच तात्विक भूमिकेला अपवाद करणारा आहे असं माझं मत मी व्यक्त करून ठेवते."

पीकेच्या चेहऱ्यावर एक अस्वस्थतेची सावली

सरकत गेली. प◌ीकेने तिच्या हातातील कागद घेतला, क्षणभर तो विचारात पडला. मग कागदावरील मजकूरावर त्यानं नजर टाकली, काही क्षण तो मजकूराकडे पाहात राहिला, मग घसा साफ करीत तो सौम्य आवाजात म्हणाला, "सीसीने ह्या संदर्भात निर्णय घेतला आहे. पण तरीही अजिताने उपस्थित केलेले मुद्दे म◌ी वाचून दाखवणार आहे कारण प्रत्यक्ष प्लॅनिंग करण्यासाठीदेखील ते आपल्याला उपयोगी पडू शकतील असं मला वाटतं.

एक - कार्यक्रमाचे स्वरुप लक्षात घेता ज्या व्यक्तीला अशा सेमिनार्समध्ये वावरण्याची सवंय आहे, उच्चभ्रू लोकांत जी सहजतेने वावरू शकते अशी व्यक्ती असणे गरजेचे आहे.

दोन - इंग्लीश व हिंदी भाषा सहज बोलता येणे गरजेचे आहे.

तीन - थंड डोक्याने आल्या परिस्थितीला तोंड देऊ शकेल अशी ही व्यक्ती आपल्या बोलण्याने, आपल्या वागण्याने लोकांना सहज भूरळ घालू शकेल अशी हवी.

चार - जिचे फोटो वर्तमानपत्रात फारसे आलेले नाहीत, किंवा पोलीसांना जी फारशी ओळखीची नाही अशी व्यक्ती असणे आवश्यक आहे.

पाच - अशी व्यक्ती शक्यतोवर फिल्डवरील ऍक्टीव्हिस्ट नसावी, अगदी स्पष्टच सांगायचे तर तिच्या नसण्यामुळे चळवळीच्या कामावर कमितकमी परिणाम होईल अशी ही व्यक्ती असावी.

सहा - ज्या व्यक्तीला आमंत्रण मिळवणे अवघड जाणार नाही अशीच व्यक्ती निवडावी. कॉन्फरन्सच्या सुरुवातीपासून ह्या व्यक्तीने स्पॉटवर हजर राहाणे आवश्यक आहे. तिसऱ्या दिवशी प्रत्यक्ष व्हि. आय. पी. हजर होतील तेव्हा सिक्युरिटी कडक होईल, मात्र

पहिले दोन दिवस सिक्युरिटी फारशी टाईट नसेल तोपर्यंत ह्या व्यक्तीने तेथील लोकांत सामावून जाणं गरजेचे आहे.

पीकेने वाचन संपवताच प्रा. नायर उत्साहाने म्हणाले, "ब्रेव्हो कॉ. अजिता. तुमचा शेवटचा मुद्दा अत्यंत महत्त्वाचा आहे. ही जबाबदारी ज्याला देण्यात आली आहे त्यानं प्रथमपासूनच कार्यक्रमात हजर राहून आपल्याला योग्य संधी कुठे व केव्हा मिळेल ह्याचा अंदाज घेणे अत्यंत आवश्यक आहे. मला तर असं वाटतं...' ' बोलता बोलता प्रा. नायर मध्येच थांबले. अजिताच्या लक्षात आलं, पीकेने नजरेनंच त्यांना खुणावलं होतं आणि प्रा. नायराच्या आपण मध्येच बोलायला सुरु केल्याचे लक्षात आले होते.

पीकेने बोलायला सुरुवात केली, "कॉम्रेडस..'' तो किंचित थबकला, त्याची नजर काही क्षण अजिताच्या नजरेला भिडली आणि त्यानंतर ती क्षितीजाकडे वळून

स्थिर झाली. "नेहमीप्रमाणेच अजिताने मांडलेले मुद्दे अत्यंत महत्त्वाचे आहेत. सीसीने हे बहुतेक मुद्दे विचारात घेतले आहेत."

पीकेच्ी नजर अजिताच्या नजरेला भिडली आणि परत क्षितीजाकडे धावली... आणि अजिताच्या पोटात एकदम पोकळी निर्माण झाल्यासारखे तिला वाटलं, पीके पुढे काय बोलणार हे आपल्याला समजले आहे. तिची नजर आकाशाकडे वळली, निळया आकाशात खोल खोल घुसण्याचा प्रयत्न तिची नजर करत होती..

' 'ह्या सर्व मुद्यांचा विचार करून आणि ह्या ऑपरेशनचे अनन्यसाधारण महत्त्व लक्षात घेऊन ही जबाबदारी लढयात ज्याने आपली बुध्दीमत्ता, धाडस, बांधिलकी सिध्द केली आहे अशा कार्यकर्त्यावरच टाकणे अत्यंत आवश्यक होते. ऑपरेशन यशस्वी झालं तर शासन आपल्यावर तुटून पडणार आहे. त्याची तयारी आपल्याला करावी लागणार आहेच. पण

ऑपरेशन अयशस्वी झालं तरीदेखील शासन आपल्या पाठीमागे हात धुवून लागणारच. किंबहुना अयशस्वी झालं तर त्याचे परिणाम अधिकच भयानक होतील. हे सर्व लक्षात घेऊन सीसीने आपल्यातील अत्यंत योग्य व्यक्तीची, अषजताची निवड ह्या कामाकरता केली आहे."

व्हाट? ओ. . नो! नायरांचा आवाज तिच्या कानी पडला. जी.एम. ने दीर्घ सुस्कारा सोडला. एसेन निश्चल.

इगोर! अजिताच्या मनात हा शब्द उमटला, तिच्या मेंदूत तो शब्द परत परत प्रतिध्वनित होत राहिला, घूमत राहिला. पण क्षणेकच. अजिता सावध झाली आणि तिने एक फटका देऊन त्या शब्दाला बाहेर फेकले.

अजिताने आपली आकाशात हरवलेली नजर

काढण्याचा प्रयत्न केला नाही. तिला माहीत होतं, त्या सर्वांची नजर तिच्या चेहऱ्यावर लागलेली आहे, तिला माहीत होतं, आपल्या चेहऱ्यावरचे भाव वाचण्याचा प्रत्येकजण प्रयत्न करीत आहेत. तिच्या मनात विचार आला, इतकी सहजस्पष्ट असलेली, सूर्यप्रकाशासारखी स्वच्छ असलेली गोष्ट आपल्या कशी लक्षात आली नाही. आपण मांडलेल्या क्रायटेरियाचा विचार केला तर ह्या सर्वात मीच योग्य व्यक्ती आहे, ह्या साध्या लॉजिकल कन्क्लुजनला आपण का पोचू शकलो नाही. आपली कठोर तर्कनिष्ठ बुध्दी ह्या सत्याला सामोरी का जाऊ शकली नाही. अजिताच्या ओठावर किंचित हसू उमटलं, मग तिने आपल्या दोन्ही हातांनी आपला चेहरा खसाखसा पुसला, मग हात खाली घेत पीके कडे वळत ती म्हणाली, "थॅंक्स, सीसीने, आरसीने माझ्यावर दाखवलेल्या ह्या विश्वासाबद्दल मला खरोखरच आनंद झाला आहे.'' क्षणभर तिनं कुणी काही बोलतं का ह्याची वाट पाहिली आणि मग काहीशा घाईघाईने ती म्हणाली, "व्ही.आर.सी.डी.ची प्रतिनिधी

म्हणून मला ह्या सेमिनारला आमंत्रण आलेले आहेच. पण माझ्यावर टाकलेल्या जबाबदारीचा परिणाम व्ही.आर.डी.सी.वर किती होऊ शकेल, तो कमीतकमी व्हावा म्हणून यासाठी काय करता येईल ह्याचा मात्र विचार झाला पाहिजे. कदाचित मला रजेवर जाता येईल.. पण....." बोलता बोलता अजिता एकदम मध्येच थांबली.

एक चमत्कारीक शांतता तेथे पसरली.

आसमंतातील शांतता त्यामुळे जास्तच टोचू लागलीय असं वाटलं एसेनला, 'अजितावर तीन खूनी हल्ले झाले, त्यातून ती वाचली. हा चौथा हल्ला का?" त्याच्या मनात हा प्र्श्न क्षणैक चमकून गेला.

' ' शासनाच्या दमनाशी पक्षसंघटनेला सामना करावा लागणारच आहे. ते कसं साधायचं ह्याचा विचार करावा लागणार आहे. अजिता सी.आय.डी. आणि

सी.बी.आय.ला पक्षाची सदस्य आहे हे माहीत असलं तरी तिची जनमानसातील आणि मिडीयातील प्रतिमा व्हि.आर.डी.सी.ची संचालिका, आणि विकासकार्यातील एक कार्यकर्ती अशीच आहे. त्यामुळे व्हि.आर.डी.सी.ला त्रास होईल हे खरं आहे, परंतु स्टाफपैकी कुणालाच अजिताचे पार्टीशी असलेले संबंध माहिती नसल्याने पोलीसांना तिच्याबद्दल त्यांच्याकडून काही नवीन कळणार नाही. आता ह्या घातपाताची जबाबदारी पक्षाने घ्यायची वा नाही ह्याबद्दल निर्णय झालेला नाही. परंतु तसं केल्याने पक्षाला त्रासदायकच होईल आणि त्यातून काहीही साधणार नाही."

पीके थांबला, त्याच्या म्हणण्याचा अर्थ स्पष्ट होता, पक्षसंघटनेवर दमनाचा वरवंटा फिरू नये म्हणून व्हि.आर.डी.सी.चा बळी दिला जाणार होता. कॅडर्सचा बचाव व्हावा म्हणून इंडिजिनस लिडरशीपचा बळी दिला जाणार होता.

"पण व्हि.आर.डी.सी.ला कमितकमी त्रास होण्यासाठी काही मार्ग सापडतो का ह्याचा जरूर विचार केला पाहिजे. " पीके पुढे बोलत राहिला, "मला वाटतं, प्रा. नायर, तुम्ही ह्या कॉन्फरन्स संदर्भात सविस्तर माहिती आम्हाला प्रथम द्यावी, त्यानंतर एमजीने साधनसामुग्रीबाबत माहिती द्यावी. पुढील काही दिवस कॉम्रेड अजिताने काय करायचं ह्या संदर्भातही आपल्याला विचार करावा लागेल. तिला विशेष ट्रेनिंग देण्याची गरज असल्यास त्याच्या तारखाही आपल्याला ठरवाव्या लागतील."

काही क्षण शांततेत गेले. अजिताची नजर परत क्षितीजावर लागली होती. आपलं सर्व शरीर हलकं होऊन तरंगत असल्याचा विचित्र भास तिला होत होता. आजुबाजूची चर्चा तिला ऐकू येत होती. आपले हे सहकारी केवळ काही अंतरावर बसले आहेत हे तिला माहीत होतं, पण त्याचबरोबर त्यांच्या बोलण्याचा आवाज दुरून, खूप दुरून येत आहे असंही तिला वाटत

होतं. आपल्या मनाच्या ह्या अवस्थेकडे ती लक्ष लावून पाहात होता. एमजीचं बोलणं झाल्यावर प्राध्यापकांनी काही शंका उपस्थित केल्या होत्या. बॉम्बची सक्षमता समजून घेण्यासाठी काही फुलप्रुफ मेथड आहे का? ह्या त्यांच्या प्र्श्नाने तिचे लक्ष वेधून घेतले. तिने चर्चेकडे लक्ष देण्याचा प्र्यत्न केला. ती चर्चा तिला ऐकू येत होती, त्याचा मतितार्थ तिच्या लक्षात येत होता, पण तरीही तिला वाटत होतं, ह्या चर्चेशी आपला काही संबंध नाही.

अनिताने काही क्षण अजिताच्या चेहऱ्याकडे पाहिले, तिच्या चेहऱ्यावर तिच नेहमीची शांती होती, ती सर्व बोलणं लक्षपूर्वक ऐकत असल्याचे भाव तिच्या चेहऱ्यावर होते. तिची नजर मात्र् क्षितीजात हरवली होती. अनिताने बोलायला सुरुवात केली, "माझी एक सुचना आहे, नव्हे दोन सूचना आहेत. एक - अजिता ह्या मोहिमेत यशस्वी व्हावी म्हणून इतरांना जी तयारी करायची आहे आणि ज्या तयारीशी तिचा प्र्त्यक्ष काही

संबंध नाही त्याविषयीच्या चर्चेत तिनं हजर राहण्याची गरज नाही असा निर्णय आपण घ्यावा. दोन - आजपासून काही दिवस तिला पुर्ण मोकळे द्यावेत. त्या दिवसात तिला काय करायचे त्याचा निर्णय तिनेच घ्यावा."

काहीक्षण कुणीच काही बोलले नाही. ऍनच्या सूचनेचा अर्थ स्पष्ट होता, अजितावर टाकण्यात आलेली जबाबदारी शंभर टक्के पार पाडली जावी ह्यासाठी काय काय केले पाहिजे ह्याची चर्चा तिच्यासमोर करणं अवघडच होतं. दुसऱ्या सूचनेचा अर्थ होता की, अजिताने महाप्र्याणापूर्वी ज्यांना भेटायचे आहे, त्यांना भेटून यावे. महाप्र्याण की निर्वाण? अजिताच्या ओठावर किंचित हसू उमटले. अजिता आपली नजर क्षितीजावरून त्यांच्याकडे वळवत म्हणाली, "ह्या दोन्ही सूचनांचे मी स्वागत करते काही सुधारणा सुचवून. माझ्याशी प्रत्यक्ष संबंधित नसलेले परंतु ह्या मोहिमेशी संबंधित असलेले

असे जे निर्णय तुम्ही घ्याल त्यातील महत्त्वाचे मुद्दे संक्षेपात मला तुमच्या सोयीच्या वेळी सांगावेत."

"ही सूचना अगदी योग्य आहे. एएनची दुसरी सूचनाही योग्य आहे. त्यात सुधारणा एवढीच करावी की, ह्या काळात तिच्याशी इमर्जन्सी मध्ये कुठे संपर्क साधता येईल ही माहिती अजितानं एएनला देवून ठेवावी." पीके म्हणाला.

'' ओके!'' अजिता म्हणाली, क्षणभर ती घोटाळली, मग उभी राहात ती हंसत म्हणाली, " अनिताची पहिली सूचना तुम्हा सर्वांना मान्य असेल तर त्या सूचनेची अंमलबजावणी मी ताबडतोब सुरू करावी असं मला वाटतं. मला वाटतं, आय शॅल मुव्ह नाऊ. शुड आय?"

आपण तयार केलेल्या क्रायटेरियाचा विचार केला तर आपण रिजनल कमिटीमधील सर्वात योग्य व्यक्ती आहोत. पण ह्याचा अर्थ काय होतो?

मुद्दा पाच - अशी व्यक्ती शक्यतोवर फिल्डवरील ऍक्टीव्हिस्ट नसावी, अगदी स्पष्टच सांगायचे तर तिच्या नसण्यामुळे चळवळीच्या कामावर कमितकमी परिणाम होईल अशी ही व्यक्ती असावी.

आपण.. आपण डिस्पेन्सिबल आहोत का? तिच्या छातीत एक वेदनेची कळ चमकून गेली असं तिला वाटलं.

प्रकरण नववे

फ्लॅटचं कुलूप उघडून ती आत आली, दरवाजा बंद करून दरवाजाशीच उभी राहिली आणि समोर दिसणाऱ्या दृश्याकडे पाहात राहिली. काही काळाचाच

अवकाश आहे. एका क्षणाला मी ह्या माझ्या खोलीतून बाहेर पडेन आणि परत कधीच ह्या किल्लीचा उपयोग करणार नाही. त्या कामगिरीवर निघताना ही फ्लॅटची चावी रिनाकडे पोचवून द्यायला विसरून चालणार नाही, तिच्या मनात विचार आला आणि ती स्वत:शीच हसली. समोरचं काचेचे टिपॉय, मागील सोफा, खुर्च्या, पलीकडच्या भिंतीकडील टेबल. कॉम्प्युटर, की बोर्डवर अर्धवट उघडं असलेलं तिचं पुस्तक, पेन, ह्या वस्तूंकडे ती पाहात राहिली. माझी पुस्तकं, माझा पेन, माझी खोली. ह्या निर्जीव वस्तू! किती सहजपणे आपण भोवतालच्या ह्या जगावर आपलेपणा लादतो. आपला अधिकार सांगायला लागतो. पण ही केवळ मालकीहक्काची भावना आहे का? ह्या आपलेपणात स्वामीत्वाची भावना किती आणि ममत्वाची भावना किती? स्वामित्वाची भावना असणं योग्य नाही हे ठीकच आहे. पण माझ्या मनातील ही भावना ममत्वाची आहे. स्वामित्वाची भावना संपून ममत्वाची भावना सुरू होते की ममत्वाच्या भावनेतून स्वामित्वाची भावना

आकारात येते? निर्जीव वस्तूंबद्दल स्वामित्वाची भावना निर्माण होणे हे नैसर्गिकच म्हटले पाहिजे. पण दुसऱ्या सजीवांबद्दल, दुसऱ्या व्‍्यक्तीबद्दल स्वामित्वाची भावना असणं? पण स्वामित्व आणि ममत्व ह्या भावनांमधील सीमारेषा स्पष्ट असते का? असू शकते का? आपण लढ्यात उतरलो ह्याचं कारण सामान्य माणसांबद्दल वाटणारी ममत्वाची भावनाच कारणीभूत नव्हती का? आणि त्यांचे भलं कशात आहे ह्याविषयी आपण निर्णय घेऊ लागलो त्यामागे कोणती भावना होती, ममत्वाची की स्वामित्वाची? त्या ममत्वाच्या भावनेचा ह्या स्वामित्वाच्या भावनेशी काही संबंध आहे का?

हे विचार माझ्या डोक्यात का यावेत? ह्यापूर्वी अत्यंत धोक्याच्या ऑपरेशनवर निघताना, दार बंद करतानाही असे विचार माझ्या मनात कधी आले नव्हते. आपण जिवंत परत येऊ अशी खात्री देता येत नव्हती, अशा वेळीही खोलीचा निरोप घेऊन मी गेले नव्हते. निदान

तीन प्रसंग तरी असे होते की, आम्ही मृत्यूचा धोका पत्करला होता. परत जिवंत येऊ ह्याचा भरोसा नव्हता. आणि तरीही त्यावेळी मी अशी अस्वस्थ झाले नव्हते. ह्यावेळी अजून कशात काहीच नसताना मी अशी अस्वस्थ का? आय ॲम अ सर्व्हायव्हर! खरं तर प्रत्येक कार्यकर्ता, नेता, प्रत्येक सेनानी सर्व्हायव्हरच असतो. शूर सेनानी टिकून राहातो. तो लढाया जिंकतो, कारण त्याच्याकरता अनेकावधी आपले प्राण देतात, तो मात्र मरत नाही. त्याच्याभोवतालची सामान्य माणसं मरतात, तो मरत नाही, टिकून राहातो आणि असामान्य होत जातो. आतापर्यंत मी अत्यंत धोकेदायक अशा मोहीमांमध्ये भाग घेतला, पण प्रत्येक वेळी मनाला कुठेतरी विश्वास असायचा, मी जगणार, मी उरणार... परंतु ही लढाई आगळीच आहे. येथे उरण्याचा प्रश्नच येत नाही. आय् वोन्ट सर्व्हाईव्ह.'

आरसीची मिटींग झाली की, बहुधा ती तातडीने फिल्डवर रवाना होत असे. तिच्या युनिटवर टाकलेली

कामगिरी इतरांना सांगण्याची, त्यांच्याशी चर्चा करण्याची तिला घाई होत असे. आर.सी. च्या निर्णयांच्या आपल्या कामाच्या संदर्भात अर्थ काय? पक्षाची भूमिका विकास क्षेत्रातील आपल्या कार्यकर्त्यांपर्यंत कोणत्या स्वरूपात पोचवता येईल ह्याबद्दल तिला विचार करावा लागे. पक्षाच्या घोषणांचा आपल्या लोकांच्या, स्त्रियांच्या दृष्टीने अर्थ काय ह्याचा विचार तिला करावा लागत असे. दुसऱ्याच दिवशी ती ऑफिसमध्ये सर्वांची मिट◌ी◌ंग घेत असे. सर्व स्टाफला ह्या तिच्या उत्साहात ती सामील करून घेत असे. नवीन कार्यक्रम राबवण्यात आर्थिक, व्यावहारीक काय अडचणी येतील ह्याचा ती अंदाज घेत असे. त्यांच्या सूचना ऐकून घेत असे. मग दुसऱ्या दिवशी केडगावला रवाना होत असे. व्हि.आर.डी.सी.चे काम प्रथम अजिताने केडगावी सुरू केले होते, त्याचे एक कारण होते, केडगाव हायवेवर होते आणि दुसरे कारणही खरं तर त्यातूनच आलं होतं. हायवेवरील टपरीमध्ये ती चहा प्यायला थांबली होती, आणि तिची तेथे मुरलीबाईची

ओळख झाली होती. तिच्यासारखी समज असलेली सहकारी मिळाली म्हणूनच कामाची चांगली सुरुवात झाली होती. काम वाढत गेलं होतं. केडगाव आता त्या भागातील व्हि.आर.डी.सी.च्या तीस गांवातील मुख्य कार्यालय असलेले आणि प्रत्येक बाबतीत पुढाकार घेणारे गाव ठरले होते. गेल्या चार पाच वर्षे जाणिवपूर्वक प्रयत्न करून स्थानिक पातळीवरील जबाबदारी सांभाळू शकेल अशी कार्यकर्त्यांची फळी तिने उभी केली होती. मात्र व्हि.आर.डी.सी.च्या कार्यात पुढाकार घेणाऱ्या स्त्री पुरुषांना तिने पक्षसंघटनेत घेतले नव्हते. एखादा जहाल पोरगा आढळला तर एसेनशी त्याची ओळख करून देणे एवढेच तिचे काम होते, जर हा पोरगा मुक्तीसैन्यात दाखल झालाच तर त्याच्या कुटुंबाला विकासकार्यातून लाभ कसा पोचेल, आर्थिक दृष्टया त्या कुटुंबाला सुरक्षितता कशी देता येईल एवढीच जबाबदारी ती घेत असे. व्हि.आर.डी.सी. ही क्रांतीकारक संघटना नाही अशी स्पष्ट भूमिका तिने घेतली होती. व्हि.आर.डी.सी.च्या सभांमध्ये पक्षाची

क्रांतीकारी भूमिका मांडली जात नाही, म्हणून तिच्यावर टीकाही होत असे. पण लोकसंघटनेचे कार्यकर्ते म्हणजे राजकीय संघटनेचे कार्यकर्ते नाहीत ह्या भूमिकेला ती घट्ट चिकटून राहिली होती.

पण म्हणूनच आपण डिस्पेन्सिबल झालो आहोत का? तसं पाहिलं तर आपली फिल्डवरील भूमिका नेत्यापेक्षाही मार्गदर्शक सहकारी अशीच आहे का?

तिने अंगातील कपडे काढून टाकले, गाऊन चढवला. घडयाळाकडे पाहिले. अजून बारा वाजले नव्हते. बारा मिनिटं कमीच होती. बारा वाजून गेल्यावरच इंटरनेट सुरू करायचे तिने ठरवले. तरीही ती कॉम्प्युटर समोरील खुर्चीवर बसली.

माझी मानसिकता बदलली आहे का? मी दुबळी होत चालली आहे का? नाही, हे खरं नाही, पक्षाने आदेश दिला तर आजही तीन चार साथीदारांसह गुन्नूरच्या

पोलीस स्टेशनवर हल्ला चढवून आपल्या साथीदारांना सोडवून आणण्याची कामगिरी पार पाडायला मी बिलकूल कचरणार नाही. सगळया गोष्टी लक्षात घेऊन, माहिती मिळवून आपली कमितकमी हानी होईल आणि तरीही मोहिम विजयी होईल ह्याची मी काळजी घेईन. माझ्या मनात किचिंतही चलबिचल होणार नाही.

मला वाटतं, आपल्या स्वत:च्या मृत्यूबद्दल विचार करताना माणूस नेहमीच आशावादी असतो. परिस्थिती पुर्णपणे प्रतिकूल असतानाही, इतर सर्व मरतील पण आपण मात्र् काहीतरी चमत्कार घडून जिवंत राहू अशी माणसाची श्रृध्द असते. बेसलेस फेथ. कुठल्याही क्षणी मरण्याची शक्यता असूनही आपण चिरंजिव आहोत असं धरूनच माणूस जगत असतो. तर्कदुष्टपणे केलेले परिस्थितीचे विश्लेषण जगण्याची शक्यता नाही असं ठामपणे दर्शवत असले तरी आपण ज िवंत राहाणार असंच गृहितक व्यक्तीच्या मनात असतं. आतापर्यंतच्या

लढयांत आणि ह्या लढयात हाच फरक नाहीये का? आतापर्यंत केलेल्या मोहीमांमध्ये यशस्वी होणं ह्याचा अर्थ होता, आपलं इप्सित पुरं करणं आणि आपण सहिसलामत परत येणे. ह्या मोहीमेत यश मिळवणे ह्याचा अर्थ आहे, आपलं इप्सित साध्य करणे आणि आपला शेवट होणे. यश आणि आपला मृत्यू ह्यांच्यात अंतर नाही, दोन्ही एकच आहेत. यश म्हणजेच आत्मधात. आत्मघात...आत्मघात! खरं तर आपलं इप्सित साध्य झालं की नाही हेही आपल्याला समजणार नाही अखेरच्या क्षणाला. महाराज गडावर पोचल्याचा संकेत देणारे तोफांचे आवाज ऐकून पावनखिंडीत बाजी पडला. . ह्या मिस बाजीला मरताना हे समाधानही मिळणार नाही. ती स्वत:शीच हसली.

आत्मबलिदान आणि आत्महत्त्या ह्यात काय नाते आहे हे वस्तूनिष्ठपणे तपासले पाहिजे? दोन्हीचा अर्थ आत्मघातच, परंतु हेतू वेगळे, उद्देश निराळे.

हा प्रश्न माझ्या मनात कसा आला? का आला? राजकीय उद्दिष्टपूर्तीसाठी हत्त्येवर विश्वास ठेवणाऱ्याला आत्महत्त्येशी वावडं असण्याचं खरं तर काही कारण नसायला पाहिजे. हा अयोग्य, अनाठायी प्रश्न आपण विचारात का घ्यावा?

तिने पुढे झुकून कॉम्प्युटर स्वीच ऑन केला. ती करत असलेल्या कार्यावर तिची निष्ठा होती, आणि ही निष्ठा आंधळी नव्हती. मनानं आणि हृदयानं ती ह्या कार्यात आली होती. त्याकरता काय किंमत द्यावी लागेल ह्याचा डोळसपणे विचार करून तिनं हा मार्ग पत्करला होता. लहानपणापासून ती बोलघेवडी होती. लोकांशी गप्पा मारण्यात तिला खराच मजा यायचा. मित्रमैत्रिणी जोडणे हा तिचा छंद होता. नव्हे ती तिची गरजच होती. एकांताला ती घाबरायची असा त्याचा अर्थ नाही. पण एकटेपणा तिला फारसा पसंत नव्हता. आपल्याभोवती कुणीतरी असावं, आपण सतत चारचौघात असावं ही तिची गरज होती. म्हणूनच

एसजीच्या ग्रुपला जॉईन झाल्यावर तिला आपल्या स्वभावात बदल करावा लागला होता. जाणिवपूर्वक बदल करावा लागला होता. पहिली काही वर्षे लोकांपासून स्वत:ला दूर ठेवणे, सहज झालेल्या ओळखीत आपल्याविषयी खरी माहिती न देणे, कुणी मैत्रीचा हात पुढे केला तर आपला हात मागे घेणे, या सर्वांच्या तिला फार यातना व्हायच्च्या त्यावेळी. आपलं अस्सल रूप दाखवायचं नाही आणि तेही भोळयाभाबडया तुमच्यावर भरोसा ठेवणाऱ्या लोकांना. स्वत:बद्दल कमितकमी माहिती द्यायची, अनोळखी माणसाकडे संशयाने पाह्यचे, ह्या नवीन सवंयी अंगवळणी पाडणे तिला फार कठीण गेले होते. बसमधून जाताना, ट्रेनमधून प्रवास करत असताना, लोकांपासून दूर राहणं हे तिला मनस्वी तापदायक व्हायचं. आपण एकटे पडत चाललोय, एकांडे होत चाललोय असं वाटायचं. पण फिल्डमध्ये, गावातील लोकांत काम सुरू केले तरीही ही भावना दूर झाली नव्हती. एका अर्थाने ग्रामीण शेतकरी, शेतमजूर

ह्यांच्या राहाणीमानाचा अंगिकार केला तरी, त्यांच्यातील होणे, त्यांच्यातील म्हणून त्यांच्याकडून अंगिकार केला जाणे हे होत नव्हते. लोक आणि नेता हे नाते दुरावा निर्माण करणारे. त्यामुळे संवादाची गरज नेहमी वाटतच राह्यची, अतृप्तता टोचत राह्यची. व्हि.आर.डी.सी. ची स्थापना करून त्या कार्यात संपुर्ण लक्ष घातल्यानंतर ह्या यातना बऱ्याच प्रमाणात कमी झाल्या होत्या. पण तरीही कुणाही समान पातळीवरील, मनमोकळया संबंधांना फुलू देण्याला मर्यादा घालाव्या लागत होत्या.

ह्याच काळात केव्हांतरी मग एक वेळेस तिच्या लक्षात आलं होतं, इंटरनेटवर तिची संवाद करण्याची गरज पूर्ी होऊ शकतेय. एखाद्या व्यक्तीशी संवाद करण्याची पूर्वअट असते त्या व्यक्तीशी ओळख असणे. ओळखीबरोबर येते व्यवहारातली रितीरिवाज पाळण्याची गरज. परस्पर संबंध टिकवण्यासाठी व्यवहारात पाळावी लागणारे उपचार, काही पथ्ये.

समोर आल्यावर हसून स्वागत करण्याची, इच्छा नसतानाही बोलण्याची, ऐकण्याची, आपल्या ज्या विषयात रस नाही त्यातही रस दाखवण्याची गरज कायमच राहाते. समोरच्या व्यक्तीला भावेल, आपल्याला परवडेल एवढेच खुल्ले व्हायचे, तेवढीच बाजू दाखवायची. पण इथे ही काहीच गरज नाही. इंटरनेटवर तिची पाचसहा व्यक्तींशी चांगलीच दोस्ती जमली होती. दोस्तीचा पायाच परस्परावर विश्वास. पण ह्याला दोस्ती म्हणता येणंही कठीण होतं. आपल्याला मानवाच्या उत्क्रांतीबद्दल बोलायला आवडतं, असं जाहीर केल्यावर तिचा ल्यूसी आणि जॉनशी संवाद जूळला होता. मग कालांतराने आणखीही काहीजण ह्या संवादात सामील झाले होते. पण त्यांनीी एकमेकाची वैयक्तिक माहिती विचारण्याचा वा सांगण्याचा कधी प्रयत्न केला नव्हता. कुणी नवाडयाने नेटवर येऊन तसा प्रयत्न केलाच तर त्यांनी त्या व्यक्तीला समजूतदारपणे संवाद थांबवायला सांगितले होते. हे खरं होतं की, जागतिक पातळीवरील

राजकारणावर चर्चा करताना नेहमी येणाऱ्यांच्या भाषाशैलीवरून, दिलेल्या माहितीवरून, त्यांनी उल्लेखलेल्या घटनांवरून, राजकीय नेत्यांच्या उल्लेखावरून ते कुठल्या देशांचे असावेत ह्याचा अंदाज करता येणे शक्य होते. कुणा दोघांमध्ये जास्त दृढ़ संबंध निर्माण होणे शक्य होते. पण ह्या ओळखीचा आधार होता, त्या दोघांनी आपली म्हणून जी माहिति सांगितली होती त्या माहितीचाच. पण ती माहिति खरी आहे, हे तपासायचा काही मार्ग नव्हता. ल्यूसी ही स्त्री आहे हे तिनं मान्य केलं होतं, तिने आपले नाव ल्यूसी सांगितले होते म्हणून. त्या व्यक्तीने सत्य म्हणून सांगितलेल्या माहितीचा ती व्यक्ती कशी असेल ह्याचा थोडाफार अंदाज येण्याकरता उपयोग होतोही. पण मुख्यत: परस्परसंबंध कशाच्या आधारावर तर संवादाच्या, परस्परसंबंध कशाकरीता तर संवादाकरता. असे हे संवादाचे नाते होते. तिला वाटायचं हा संवाद खऱ्या अर्थानं आमच्या मनांचा संवाद आहे, मानसिक आणि बौध्दिक पातळीवरील संवाद. आपला दुबळेपणा,

आपली वैगुण्ये प्रकट केली तरी त्याचा गैरफायदा उठवण्याची शक्यता नाही, मिळेल ती सहानुभूती आणि शक्य असल्यास सल्ला. ह्या संबंधात एकमेकावर कोणत्याही प्रकारची बंधने नाहीत. संवाद करण्याची इच्छा हा एकमेव पाया आहे ह्या संबंधांचा. रोज हजेरी लावायलाच हवी असं बंधन नाही, चर्चेत येणाऱ्या प्रत्येक विषयावर आपलं मत व्यक्त करायलाच हवं असंही नाही. चर्चा संपेपर्यंत हजर असण्याचीही सक्ती नाही. अजिता मात्र ज्या दिवशी घरी असेल त्या रात्री काही काळतरी ह्या गप्पामध्ये सामील होत असे. परस्पर विश्वासाने आपल्या मनातील विचार, भावना, आपली मते व्यक्त करण्याची, खुला संवाद करण्याची तिची गरज इंटरनेटवर पुरी होत होती.

अजिता चॅट नेटशी कनेक्ट झाली तेव्हा मारिया आणि ल्यूसी, स्त्रियांना मासिक पाळी येणं बंद होताना कशा प्रकारच्या बदलांना सामोरे जावे लागते, शारीरिक आणि मानसिक पातळीवर अशा काळात काय काय

बदल होतात ह्यावर बोलत होत्या. अजिताने सर्वांना ग्रीट करून आपण त्यांची चर्चा वाचत असल्याची जाणीव करून दिली. काही वेळ ती त्यांचा संवाद ऐकत राहिली. आपल्या ग्रामीण क्षेत्रातील स्त्रियांच्या अनुभवावरही तिने काही मते ऐकवली. खर ं म्हणजे ती जॉन नेटवर येण्याची वाट पाहात होती. आत्महत्त्या आणि आत्मबलिदान ह्यात खरंच काय अंतर असतं ह्या विषयावर बोलायला, विचार करायला जॉनला आवडेल हे तिला माहीत होतं. परंतु काही वेळ जॉनची प्रतिक्षा केल्यावर तिने गुडबाय करून ल्यूसी आणि मारियाचा निरोप घेतला.

तिनं लाईट बंद केला. उशीवर डोकं टेकवलं. आपल्याला काही दिवस आपल्या मनाप्रमाणे काहीही करण्याची मूभा आहे. काही दिवस रजा मंजूर झालीय. पण मुख्य प्रश्न आहे, व्हि.आर.डी.सी.ची व्यवस्था कशी लावायची? आपल्या सहकाऱ्यांना, नायरजींना, लतिकाला, प्रेरणाला काय सांगायच े, त्यांना कसे

सावध करायचे. त्यांना संपूर्ण अज्ञानात ठेवणे हीच त्यांच्या सुरक्षिततेची हमी असं धोरण आतापर्यंत तिने राबवले होते. पण हे खरे होते का? खरे आहे का? आपली खरी आयडेन्टीटी उघड झाल्यावर त्यांना त्रास होणे अटळ आहे. लवकरात लवकर काहीतर सज्जड कारण सांगून दीर्घ मुदतीसाठी रजेवर जाणे, कोडाईकल्लीच्या कॉन्फरन्स ऍटेन्ड करूनच ड्यूटीवर हजर होईन असे कबूल करणे, व्हि.आर.डी.सी. संपुर्ण संपर्क तोडणे एवढेच करता येईल. आपल्या आजीला भेटण्याचे कारण सांगून.

ऍन आपल्याशी संपर्क साधेल, मिटींगमध्ये पुढे जे काय ठरले असेल त्यात आपल्याशी संबंधित जे असेल त्याची माहिती ती आपल्याला देईल. पुढच्या सूचना देईल. अंगावर बॉब दडवून सहजतेने चालता फिरता येते वा नाही, सहजतेने वागता येते की बघण्यासाठी कदाचित काही काळ बॉब अंगावर ठेवण्याचाही निर्णय घेतला जाईल आणि ते योग्यच होईल. बॉम्बची ट्रायल

घेता येणार नाही, मी लक्ष गाठण्याकरता काय आणि कशा पध्दतीने झोच्ले पाहिजे ह्याची रंगीत तालीम देता येणार नाही. पण समजा सर्व तयारी करून मी व्हि.आय.पी.ला मिठी मारण्यासाठी धावत निघाले, आणि बॉम्बमुळे मला पळताच आले नाही तर! आणि बाँबचा स्फोटच झाला नाही तर! पण एमजी अशा प्रकारचा आपला फजितवडा करणार नाही. निदान परदेशी बनावटीच्या ह्या बाँबची ही तरी गॅरंटी देता येईल. हा विचार मनात येऊन अजिताला हसू आले.

ह्या महायात्रेला जाण्यापूर्वी आपण कुणाकुणाला भेटायचं? कुणाकुणाचा निरोप घ्यायचा? पण निरोप घ्यायचा म्हणजे काय? आपण काय उघड सांगू शकणार आहोत की मी निघाले महानिर्वाणाला म्हणून. पूर्वी काशीयात्रेला जाताना आता जाणारा परतणार नाही असं गृहीत धरून निरोप दिले, घेतले जात असत. आता तसं स्थानही राहिलं नाही खात्रीचे असुरक्षित. इतक्या वर्षांच्या काळानंतर अचानक पूजाला भेटायला गेलो

तर काय वाटेल तिला? का सुलभाताईकडे जावं? तिच्या पिलांसोबत एक दिवस घालवावा? तिनं मनाशी ठरवले, निदान एखादा दिवस तरी पुजाबरोबर घालवायचा, जाऊन जाऊन कुठे गेली असेल, शोधून काढू कुठेही असेल तेथून. आजीला नक्की माहीत असेल तिचा पत्ता. मग एकदम तिच्या नजरेसमोर आपल्या गावाकडील जुन्या वाडयाच्या दरवाजाशी निरोप द्यायला आलेल्या आजीची मुर्ती उभी राहिली. तिनं निर्णय घेतला, आजीला भेटायला जायचं. तिला सांगायचं, आज्ये, मी पुढे जाते, आणि बुकींग करून ठेवते तुझ्या नावाचं.

अंथरूणावर अंग टाकल्यावर तिने कूस बदलली, समोर खिडकी उघडी होती, आकाश दिसत होतं, पण आज एकही चांदणी दिसत नव्हती. ढगांच्या थरावरून शहरातल्या दिव्यांचा परावर्तीत प्रकाश कळकट, पिवळट वाटत होता. एसेनचा फोन नाही आला अजून. तिच्या लक्षात आलं, ती त्याच्या फोनची वाट पाहात

होती. पीकेने तिच्या नावाची अनाउन्समेंट केल्यावर त्याची आणि तिची नजर नकळत एकमेकांना भिडली होती. त्यालाही ही अनाउन्समेंट अनपेक्षित होती का? एसेनची आठवण झाल्याबरोबर दुपारपासून मनात उमटू पाहाणारा तो प्र्श्न उसळून वर आला. . वेगानं आणि जोरानं. पण तिनं घट्ट डोळे मिटले, श्वासोच्छवासावर लक्ष केंद्रीत केले, त्या प्र्श्नाकडे मी दुर्लक्ष करणार आहे, दाबून टाकणार आहे मी त्या प्र्श्नाला. अशी शंका माझ्या मनात येते तरी कशी? मन एवढे कोते आहे का माझे? तिला माहीत होतं हा प्र्श्न एकटा नाही, तो घेऊन येणारं आहे सोबत असंख्य प्र्श्नांचा घोंघावता गांधीलमाश्यांचा थवा.

ती धावत होती, सर्व बळ एकवटून, जास्तीत जास्त लांब टांगा टाकीत, क्षणाचाही वेळ न घालवता, ती धावत होती. दूर समोर डोंगराच्या कुशीत उभ्या कातळात खोदलेले एक भगदाड तिला दिसत होते, ती गुहा असावी किंवा एखादं शेकडो वर्षांपूर्वी खोदलेले

अर्धवट राहिलेले लेणे असावे. ती त्याच्याकडे धावत होती. भोवती उजाड माळरान, डोक्यावर रणरणतं ऊन, पायांशी तिच्याच वेगानं तिचा पाठलाग करणारी सावली.. जोराजोरात चालणारा श्वासोच्छवास. . वेगाने हालणारा छातीचा भाता..ती आता त्या भगदाड़ाशी पोचलीच होती, त्या भगदाडातून ती आत शिरणार होती. . त्या अंधारात..त्या कुबट परंतु शितल काळोखात..बाहेरच्या ह्या रोमारोमाला टोचणाऱ्या प्रकाशशलाके पासून दूर...गर्भागारात..

तोल जाऊन ती पुढे कोसळली, आपले दोन्ही हात तिने पुढे पसरले, क्षणभर तिचं मन एका अचाट भितीनं थरथरलं, जिला तळ नाही अशा खोल खोल विवरामध्ये ती कोसळणार होती का? अंतहीन विवर.. कृष्णविवर.. पण तिचे हात जोराने काळया कातळावर आपटले, तिचे गुडघे जमिनीवर आदळले, आणि मग तिचे शरीरही. काही क्षण ती सुन्न होऊन तशीच पडून राहिली. मग हळूच तिने डोळे उघडले, दोन्ही हात टेकवून ती

गुडघ्यावर आली आणि तिची नजर भोवताली फिरली आणि ती धडपडत उभी झाली. भोवतालच्या अंधूक अंधारात स्पष्ट दिसत नव्हते. पण तिला वाटलं, तिच्याभोवती अनेक जण जमा झालेत, त्यांचे डोळे अंधारात लकाकताहेत आपल्याला निरखताना. तिने डोळे मिटले, परत उघडले. हळूहळू तिची नजर सरावली. भोवतालच्या सर्वच भिंतीवर अनेक मूर्ती कोरलेल्या होत्या. तिच्या उजव्या हातालाच एक नर्तक मृदूंगाच्या तालावर नाचत होता. त्याच्या ओठावर अस्फूट हास्य आणि चेहऱ्यावर स्वप्नील भाव. अर्धोन्मिलीत डोळे. ती हळूच त्या मूर्तीकडे सरकली. ती जवळ पोचली, तिच्या लक्षात आलं खुपच भव्य मूर्ती होती ती. आणि जमीनीपासून उंचही. तिचे मस्तक त्या मूर्तीच्या कमरेपर्यंत पोचले होते. आपल्या उजवे पाऊल त्या नर्तकाने चवडयावर अलगद टेकवले होते, त्यामुळे त्याचा गुडघा किंचित पुढे आला होता. आपला उजवा हात तिने पुढे केला, गुडघ्याला अलगद स्पर्श केला तिने. त्या मुलायम, शितल स्पर्शाने तिच्या शरीरावर

एक अलगद शहारा उमटला, अलगद तिने आपला हात वर सरकवला, मांडीचा घोटीव गुळगुळीत स्पर्श.. तिची नजर त्या नर्तकाच्च्या शरीरावरून वर सरकत गेली. त्याच्च्या पोटाचे स्नायू.. भरदार छाती, स्तनाग्रे.. खांदे.. आणि एकदम किंचाळी फोडून ती बाजूला झाली.. तिच्च्या नजरेसमोर त्या मूर्तीचा चेहरा बदलत गेला होता, त्या चेहऱ्यातून अलगद एक चेहरा उमटत होता... इगोरचा चेहरा...

झटक्यात ती वळली आणि ती धावत सुटली...

ती दुसऱ्या भिंतीजवळ पोचली. ही भिंत जरा चांगली प्रकाशलेली होती. भिंतीवरील मूर्ती स्पष्ट, ठाशीव दिसत होत्या. कुणा राजाची मिरवणूक चालली होती. पाठीमागे विविध वेषभूषा केलेले स्त्री पुरुष. स्त्रियांनी परिधान केलेली वस्त्रे वेगवेगळी, त्यांनी केलेल्या केशभूषाही विविध प्रकारच्च्या. आश्वस्थ होऊन तिने त्या स्त्रियांच्या चेहऱ्यावर नजर रोखली. काय चाललं

असेल त्या स्त्रियांच्या मनात. हजारो वर्षांपूर्वी ह्या नटून थटून मिरवत जाणाऱ्या स्त्रिया आपसात क ाय बोलत असतील. तिने एका स्त्रीच्या चेहऱ्याकडे नजर लावली. किचिंत चेहरा मागे वळवून ती दुसऱ्या स्त्रीला काहीतरी सांगत होती, तिच्या बोटाची एक अंगूली निर्देश करत होती, समोर घोडयावर बसलेल्या राजपुरूषावर. 'काय म्हणत असेल ती? म्हणत असेल किती रुबाबदार दिसतो ना हा? किती राजबिंडा!' तिची नजर झटकन् त्या स्त्रियांच्या चेहऱ्यावरून घोडयावर स्वार झालेल्या राजपुरुषावर गेली. आणि तो राजबिंडा पुरुष इगोरच होता. तोंडातून किंचाळी बाहेर पडू नये म्हणून पालथा पंजा तोंडावर दाबून ती मागे सरकत गेली, आणि वळून आतल्या गुहेत पळत गेली, आणि मग पळतच राहिली..चोहोबाजूंच्या भिंतीवरून इगोरचे असंख्य चेहरे तिच्याकडे रोखून पाहात हेते.

तिला जाग आली, खिडकीतून चंद्रप्रकाशाचा पट्टा तिच्या टेबलावर पडला होता, त्या प्रकाशात

टेबलावरील पुस्तकातील पेन चमकत होता. अजिताने कूस बदलली..इगोर...इगोर! तो अखेर जिंकला होता. पण का तो तिच्या जीवावर उठला होता...का..?

प्रकरण दहावे

सकाळी फोनच्या घणघणाटाने तिला जाग आली. नेहमीच्या शांत सूरात एसेनने तिला विचारले, "अजिता. तू आजच कुठं बाहेर निघत नाहीयेस ना? तसं नसेल तर आपल्याला दुपारीच कुठंतरी भेटता येईल."

"नाही, मी अजून काहीच ठरवलेलं नाही. तुम्ही मला रजा कधी देताय ते कळलं म्हणजे कार्यक्रम ठरवते मी. व्हि.आर.डी.सी.मध्ये मात्र जाऊन येणार आहे एखाद्या तासाकरता. माझ्या कलीग्जना थापेबाजी

करण्याकरता.'' ती किंचित थबकली, मग आवाजात खोटा गंभीरपणा आणत ती म्हणाली, "क्या है भई, वक्त बहोत थ◌ोडा है, बहुत सारी बाते करनी हैं"

तिला वाटलं होतं, तो हसून तिला काहीतरी प्रतिसाद देईल. पण एसेन गप्पच राहिला, केवळ त्याने सोडलेला दीर्घ निःश्वास मात्र तिला स्पष्ट ऐकू आला. मग तीच सरळ साध्या स्वरात म्हणाली, "मग काय करायचं सांग?"

"असं करूया. मी संध्याकाळ◌ी उशिरा तुझ्याकडे येतो. जेवायला काहीतरी घेऊन येतो. तेव्हा बोलूया सविस्तर."

बरेच क्षण शांततेत गेले आणि मग तिच्या लक्षात आलं तिनं त्याच्या प्रस्तावावर काही प्रतिक्रिया दिलेली नाही. ती घाईघाईने म्हणाली, "गुड आयडिया. जेवण बाहेरूनच आणणार असशील तर मोमिनपुऱ्यातून

आपली बिर्याणी घेऊन येना. खुप दिवसात जाण्याची संधीच नाही आलेली."

"ए. . मी तेच ठरवलं होतं, तूला सरप्राईझ देणार होतो. पण तू ही अशी.."

"आय ऍम सॉरी सुन्या. बरं मी आता आणखी काही फर्माईश करत नाही. तुच ठरव आणि दे सरप्राईझ."

होकार भरून त्याने फोन बंद केला.

दुपारी ती बरीच उशिरा परत आली. गेल्या तीनचार महिन्यांपासून तिनं बुध्दनं सांगितलेल्या धम्माचा अभ्यास सुरू केला होता. त्यासाठी शीलाच्या संशोधन संस्थेच्या लायबरीतून बरीच पुस्तके तिनं आणून ठेवली होती. सर्वच पुस्तके एकदम परत घेऊन आलेली पाहून शीला चकितच झाली. पण तिने प्र्श्न उपस्थित करण्या आधीच अजिताने जाहीर केले,

"एखाद्या महिन्यासाठी गावाकडे जातेय. डेव्हलपमेंटवरील एका पुस्तकाचं रुपांतर करतेय. तिथून आलं की मधल्या काळात राहिलेल्या कामांमध्ये गुंतेन. म्हटलं नाहीतरी दोन महिने पुस्तकं अशीच पडून राहाणार, तेव्हा जमाच करून टाकू."

शीलाने मग नेहमीचीच कॉमेंट केली होती, "तुझं बरयं अजिता. कामच असं की भरपूर भटकायला मिळतं, पुरेसा पैसा मिळतोय, लग्नंच केलं नसल्यानं संसार, मुलंबाळांचं झंझटही नाही. शिवाय तुझी दोस्तमंडळीही आहेत..' ' पलिकडेच बसलेल्या पुरुष सहकाऱ्याकडे चोरटा दृष्टिक्षेप टाकत तिनं आपलं वाक्य अर्धवटच सोडलं होतं. मग दुपारचं जेवण शीलाबरोबरच घेऊन अजिता परतली होती.

ती खोलीत आली आणि परत तिच्या डोक्यात विचारचक्र सुरू झालं, जणू ह्या विषयाबाबत विचार करायलाही हीच एक सुरक्षित जागा होती. शीलाकडून

अजिता ऑफिसला गेली होती, नायरजींना तिनं आपण वीस एक दिवसांच्या सुट्टीवर जात असल्याचे सांगितले होते, तेव्हा ते समाधानाने म्हणाले होते, 'मी सुचवणारच होतो तुम्हाला. आता काही दिवस कामं कमी आहेत, तुम्ही गेल्या तीन एक वर्षांत सुट्टी अशी घेतलेलीच नाही. जरा भटकून या.' ती सुट्टीवर जाणार ही बातमी ताबडतोब सर्व स्टाफमध्ये पसरली होती आणि दुपारी प्रेरणाचाही फोन आला होता, ती म्हणाली होती, 'मॅडम, मला वाटतं, मी गावाकडे जाण्यापेक्षा इथे राहून कामात राहिले तरच बरं राहील. तुम्ही सुट्टीवर जाणार असाल तर खुशाल जा, मी तीन दिवसांत परत जॉईन होते.' मग तीही भेटायला ऑफिसवरच आली होती. संध्याकाळी सर्व स्टाफ टॅरेसवर जमा झाला होता. प्रेरणा चांगलीच सावरली होती, निदान आता ह्या प्रसंगी इतरांचा मूड जायला नको ह्या उद्देशाने ती तसं भासवत तरी होती. वीस दिवस सुट्टीवर घालवून अजिता परस्पर कॉन्फरन्सला जाणार होती. त्यानंतर कॅलेन्डर पाहून ठेवले होते. तिने सुचवले होते, नवरात्राच्या

दिवसात सुटी न घेता दसऱ्याला जोडूनच दोन दिवस सर्वांनी सुट्टी घेतली तर बरे पडेल, कारण त्यानंतर दिपावलीच्या आधी आपल्याला बरीच कामे उरकावी लागणार आहेत. अर्थातच ह्या सुचनेचे सर्वानीच टाळया वाजवून स्वागत केले होते. अजिताने असंही सुचवले होते की, जरी प्रृत्येकजण आपापले काम जबाबदारीने सांभाळेल अशी तिची खात्र्ी आहे तरीही सोयीसाठी आपला चार्ज ती प्र्रेणाला न देता नायरांना देणार आहे. ही सूचनाही सर्वांनी मान्य केली. प्र्रेणाच्या मन:स्थितीचा विचार करूनच अजिताने हा निर्णय घेतला असावा असं सर्वांना वाटले. आणि ते खरेही होते, परंतु अंशत:, नायरजी रिटायर्ड होऊन येथे आले होते. पस्तीस वर्षे रिझर्व बँकेत त्यांनी प्र्रामाणिकपणे सर्वीस केली होती. पोलीसांची वक्र् नजर व्हि.आर.डी.सी. वर वळली की हा त्यांचा भूतकाळ व्हि.आर.डी.सी. च्या स्टाफला काही प्र्रमाणात संरक्षण देण्याची शक्यता आहे, हा ही एक अंतस्थ हेतृ अजिताच्या मनात होता.

आवश्यक ती कामे हातावेगळी केल्यावर घरी आल्याबरोबर तिच्या मेंदूमध्ये परत एकदा प्र्श्नांचे मोहोळ उठले होते.

ही व्ही.व्ही.आय.पी. व्यक्ती कोण असावी? जिला मी अनिहीलेट करणार आहे? ऍनिहिलेट.. शब्द कित्येकदा घटनेचे मूळ रूप लपवण्याचे कार्य करतात. हल्लीचा शब्द काय आहे..यस्. उस सालेको ठिकाने लगाऊंगा मैं.. ओके, आपण असं म्हणू. ज्या व्यक्तीचा मी खून करणार आहे ती व्यक्ती कोण असावी? व्यक्ती कोणीही असली तरी काय फरक पडतो. दॅट परसन मस्ट बी अ रिअल एनिमी ऑफ द पिपल...डेंचरस टू अवर पॉलिटिक्स. अवर एनिमी. ह्या व्यवस्थेतील मोक्याच्या जागेवर बसलेली व्यक्ती. जी व्यक्ती गेल्यामुळे सर्वत्र् हाहा:कार माजेल, गोंधळ उडेल. देशातील उच्च पदावरील व्यक्ती म्हणजे पंतप्रधान. मग नवा पंतप्रधान कोण ह्यावर सत्ताधारी पक्षात लठ्ठालठ्ठी होईल, आतापर्यंत जी धोरणे घेतली जात होती, त्यात काही

बदल होतील. पण हे सर्व कदाचित मागून होईल, ताबडतोबीने काय होईल? अफवांचे पेव फुटेल. मी कोण हे शोधले जाईल. कोणत्या जातीची, कोणत्या प्रदेशाची, कोणत्या धर्माची, कोणत्या पक्षाची, कोणत्या विचारप्रवाहाची. पण कित्येकांना हा शोध घ्यायचीही गरज वाटणार नाही. पंतप्रधानांना ठार मारले म्हणजे ह्यात पाकिस्तानचाच हात असला पाहिजे. . . खुनी अतिरेकी मुस्लीमच असणार..की तामील टायगर...की कश्मीर अतिरेकी..की खलीस्थानी. . आणि मग दंगल उसळेल. . ठिकठिकाणी. . वेगवेगळया कारणांसाठी... कुठे धार्मिक दंगे, कुठे जातीय... प्रस्थापित राजकीय पक्ष, प्रादेशिक गट आणि व्यावसायिक गुन्हेगारांच्या टोळया त्या परिस्थितीचा त्यांची ताकद वाढवण्यासाठी उपयोग करतील.

त्यात ही मंडळी वाकबगार असतात. कुठलेही नैतिक, तात्त्वि प्र्श्न त्यांना पडत नाही. बहुतेक ठिकाणी ह्या दंगली समाजातील गुंडप्रवृत्तीचे लोक

सुरू करतील. पोलीसांची दंडुकेशाही सुरू होईल.. कुणातरी सिनियर नेत्याच्या हातात तात्पुरता कारभार दिला जाईल. जुनेच धोरण राबवले जाईल अशी घोषणा होईल. . हा नेता हुतात्मा होईल. . लोकांच्या प्रक्षोभित झालेल्या भावनांचा उपयोग करून नवीन नेता पुढे येईल. नवीन पंतप्रधान येईल. . . पण त्यामुळे सर्वसाधारण धोरणात काय फरक पडेल? देशाचे साम्राज्यवादी देशाशी असलेल्या संबंधात काय फरक पडेल? देशाच्या डोक्यावर असलेला कर्जांचा डोंगर त्यामुळे कोसळेल का? काही प्यादी मागे पुढे होतील.. काही प्राधान्यता बदलतील.. पण अखेर ह्या व्यक्तीचा खात्मा केल्याने कितीसा फरक पडेल?

एकदा का माझी ओळख पटली की..व्हि.आर.डी.सी.च्या सर्व स्टाफला पोलीस ताब्यात घेतील. कडेगावला पोलीस पोचतील, अटका, मारहाण, छळ. . ह्या लोकांना काहीही माहीत नाही, पक्षाबद्दल माहीत नाही, ना माझ्याबद्दल, ना माझ्या

पूर्वायुष्याबद्दल. . माझ्या दुसऱ्या आयुष्याबद्दल. पोलीस विचारतील, मॅडमना तुम्ही ओळखता? हो गेली सात वर्षे सोबत काम केले आम्ही? साध्यासुध्या पण हुशार होत्या मॅडम. सर्वांशी किती प्रेमाने वागायचा.. कुणाला उणा शब्द बोलणार नाही, कधीच रागावल्याच तर काही वेळानं स्वत: यायच्या त्यांची कॅबीन सोडून. ती सगळी फसवी प्रतिमा. हिंसेवर विश्वास ठेवणाऱ्या अतिरेकी संघटनेची नेता होती ती. व्हि.डी.आर.सी. नंतर पक्षावर, संघटनेवर सर्व बाजूंनी जोरदार हल्ले सुरू होतील. पक्षसदस्य तयारीत असतील, पण सामान्य माणसांचं काय? आर्म्स ब्रिगेडमधील खेडयातील सैनिकांचे काय? जागोजागी कोंडीत पकडण्याचे प्रयत्न होतील. जे आमचे सहकारी तुरुंगात आहेत, त्यांना....

एक व्यक्ती खत्म करण्याकरता किती माणसांची किंमत द्यायची? आणि ही जीवावर उदार झालेली माणसं काय सहज मिळतात? अशा एकेका कार्यकर्त्याचं मुल्य

काय? ह्यातून काय साधलं जाणार आहे? मला भीती वाटते की, ह्या क्षेत्रात परत कित्येक वर्षे काम करणं कठीण होईल. हा निर्णय का घेतला गेला असावा? पण पक्ष नेतृत्वाबद्दल असा अविश्वास दाखवणं..

क्रांतीकारक लढयात जे कमावले आहे ते पणाला लावण्याची तयारी ठेवायलाच हवी, नाहीतर जे आहे ते सांभाळायचे, आणि आणखी मिळवण्याची आस ठेवायची ही तर मध्यमवर्गीय प्रवृत्ती...

नाही, सीसीने ह्या सर्व मुद्यांचा विचार नक्कीच केला असेल. एकाएकी निर्माण झालेल्या पोकळीमुळे होणाऱ्या गोंधळाचा लाभ उठवण्याची व्यापक योजना सीसीने केली असावी. पण खरं तर ह्या परिस्थितीचा जास्तीतजास्त लाभ कसा घ्यावा, ह्यावर खोलवर आणि सर्व थरांवर विचारमंथन करणे आवश्यक होते. असे विचारमंथन गेल्या काही महिन्यात झाले का? अशी सार्वत्रिक गोंधळाची स्थिती निर्माण झाली तर कसा

लाभ उठवता येईल, जनसंघर्ष कशा प्रकारे पुढे नेता येईल ह्या प्रश्नांवर चर्चा करणे सहजशक्य होते, तसे झाले आहे का? ह्या स्थितीचा लाभ उठवून एखाद्या क्षेत्रात उठाव करायचा अशी तर योजना नसेल ना? तशीच काहीतरी योजना असायला हवी. नाहीतर पोलीसांच्या बंदुकांचा रोख आपल्या दिशेने वळवण्यातून काय साधले जाईल? ह्या रोखलेल्या बंदुकांशी सामना करायला जनता उठणार आहे का?

पण माझ्या मनातील ह्या शंका, इगोरविषयी संशय..

मृत्यूच्या कल्पनेने माझं मन असं खेळ तर खेळत नाही ना?

पीकेकडून मला ह्या ऑपरेशनचा हेतू आणि त्यामागून आपण घेणार असलेल्या स्टेप्स याबाबत माहिती घ्यायला हवी. माझा त्यात सहभाग नसेल, पण दे ओ मी दॅट इन्फॉर्मेशन. आतापर्यंत ज्या मोहिमा

राबवल्या गेल्या त्या आकारात आणताना, त्या मोहिमांचा उद्देश, त्यातून होणारे लाभ आणि तोटे ह्यांचा नीट विचार केला गेला नाही का? गुप्ततेची गरज लक्षात घेऊन अशी चर्चा जास्तीतजास्त विस्तृत केली जावी असा दृष्टिकोन असावा हे तत्त्वत: मान्य करण्यात आलं नव्हतं का? ही मोहीम तर अधिक विस्तृत, दूरगामी आणि खोल परिणाम घडवून आणेल, त्या परिणामांचा सर्वांनीच विचार करणं आवश्यक नाही का? जर मोहीमेचा जास्तीतजास्त लाभ करून घ्यायचा, तर ही चर्चा लवकरात लवकर होणे गरजेचे आहे. तशी मागणी आपण पीकेकड े केली तर....! पण आपण तशी मागणी केली तर त्याचा काय अर्थ घेतला जाईल?

परंतु ह्या गोष्टींचा विचार केला नसेल हे शक्य नाही. ह्यावर सीसीमध्ये निश्चितच चर्चा झाली असेल. त्याशिवाय हा महत्त्वाचा निर्णय घेतला गेला नसणार हे निश्चित. पण जे घडणार आहे ते इथं घडणार आहे.

दडपशाहीचा जो बडगा उगारला जाईल, जे फटके मारले जातील ते येथील लोकांवर. मग लोकांमध्ये नाही तरी निदान रिजनल पातळीवर तरी अशी चर्चा व्हायलाच हवी.

ती झटकन् उभी झाली. खिडकीजवळ गेली...नाही, ह्यावर जास्त विचार करण्यात काही अर्थ नाही. नको त्या शंकाकुशंका मनात निर्मा‍ण होतील. त्याऐवजी एसेनशी, पीकेशी ह्यावर चर्चा करणे जास्त श्रेयस्कर होईल. मला कुठेतरी रिलॅक्स होण्याची गरज आहे. माझ्या मनातील हा गोंधळ एसेनशी बोलून कमी होण्याची शक्यता आहे. ती खिडकीपासून बाजूला झाली. तिला आठवलं, येताना मुद्दामून तिनं दुधाची पिशवी आणली होती. 'अजिता, आपण असं करूया. दुध तापवून ठेवूया, आणि चहाही घेऊया. मनाचा गोंधळ उडतो, उद्विग्नता येते तेंव्हा काहीतरी रूटीन काम करणं लाभदायक असतं.' स्वत:लाच सल्ला देत ती किचनकडे वळली.

" एसेन, तू आलास. फार चांगलं झालं. माझ्या मनात प्रचंड वावटळी उठताहेत विचारांच्या. शंका - कुशंकांच्या. त्यातील बऱ्याच राजकारणाशी, आपल्या चळवळीशी संबंधित आहेत. मला एकदा वाटलं होतं, मी पीकेशीच बोलायला हवं. पण पीकेशी मी बोलू शकते, चर्चा करू शकते. पण त्याच्या समोर मी स्वत:शी संवाद नाही करू शकत सुन्या. तसा संवाद तुझ्याबरोबर होऊ शकतो. तू बरोबर असताना मी मोकळेपणी बोलू शकते स्वत:शी आणि तुझ्याशीही. त्यातून पीकेशीच बोलले पाहिजेत असे काही मुद्दे आहेत. पण हे मुद्दे मी ह्या विशिष्ट परिस्थितीत उपस्थित केले तर त्याचा अर्थ कदाचित वेगळाच काढला जाईल. पण खरं सांगू.... पीके काय अर्थ काढेल ते सोड. पण मलाह ी वाटतं, ह्या मुदयांचा मी आता गंभीरतेने, तिव्रतेने विचार करते, ह्यामागे प्रेरकशक्ती माझी जगण्याची नैसर्गिक उर्मी हीच तर नसेल ना? माझ्याच जीवावर बेतली म्हणून हे सगळे विचार मला सुचायला लागले असं झालेलं नाही ना?"

अजिता थांबली, नजर वर उचलून तिनं समोर बसलेल्‍या एसेनकडे पाहिलं.

कॉफीचा कप दोन्ही हातांनी घट्ट पकडून तो बसला होता. त्याची नजर कॉफीच्या कपाच्या दिशेने होती.. अजिताची नजर त्याच्या चेहऱ्याकडे वळली. एरवी किंचित विस्मयचकित झाल्याची भावना व्यक्त करीत असणारे स्मित त्याच्या जिव्हणीवर रेंगाळत असायचं. तिला त्‍याचा चेहरा न्याहाळताना नेहमीच आश्चर्य वाटायचं. ह्यानं आपला चेहरा एवढा नितळ कसा राखलाय? ना डोळयाखाली काळी छटा, ना भुंवयांध्ये आठी, ना कपाळावर आडव्या रेषा, ना जिव्हणीच्या कडांना सुरुकुत्या. पण आता त्याचा चेहरा पाहून ती भयचकित होऊन त्याच्याकडे पाहात राहिली. जणू आतापर्यंत सोसलेल्या सर्व वेदना, शारीरिक, मानसिक हालअपेष्टांच्या खाणाखूणा त्याच्या चेहऱ्यावर एकाच वेळी उमटल्या होत्या. स्वच्छ नितळ पाण्याचा तळ ढवळून काढावा आणि तळाला असलेला गाळ

विस्कटून वर यावा तसं काहीसं.

तिला वाटलं, मी केवळ स्वत:चाच विचार करत्येय. मला माझीच काळजी. सुन्याला काय वाटत असेल ह्याबद्दल माझ्या मनात काहीच विचार कसा आला नाही. व्हि.आर.डी.सी. चं काम उभं झालं त्यात एसेनचा वाटा नाही का? मी प्रत्यक्ष कामात गर्क राहिले पण पक्षात वैचारिक पातळीवर इतरांशी संघर्ष करायचं काम एसेननीच केलं ना? मी सुटेन, माझ्यामागे सर्व खेळ उध्वस्त झालेलां पाह्यला मी नसेल. पण एसेन मागे राहील, सगळं हातातून कसं निसटतं आहे ह्याला साक्षीदार म्हणून. व्हि.आर.डी.सी. बंद पडली तर स्टाफमधील लोक इकडे तिकडे विखुरतील, खेड्यांतील स्त्रियांचे गट कदाचित चालू राहातील, खेड्याच्या पातळीवर स्त्री कार्यकर्त्या परत आपल्या पूर्वीच्या जीवनाकडे वळतील. हे ही तितकं सरळ सोपं नाही. पण निदान ह्या व्यक्ती सावरतील, टिकतील. पक्षातील कार्यकर्त्यांचं काय? एसेन आणि

इतर पक्ष कार्यकर्ते ह्यांची मानसिकता काय असेल ह्याचा विचारच केला नाही मी कधी? पण मग हे असं होणं गरजेचे आहे का? पक्षानं माझ्यावर सोपवलेली कामगिरी मी पार पाडेन. निश्चितच यशस्वी होईन मी. मी जिंकेन ..पण एसेन?

"मला वाटतं, मी प्रथम काही गोष्टी स्पष्ट करतो. ह्या ऑपरेशनची जबाबदारी तुझ्यावर टाकण्याचा निर्णय हा सर्वस्वी सीसीचा आहे. खरं तर केंद्रसरकारमधील एखाद्या मंत्र्याला ऍनिहिलेटच करायचं तर आपल्या राज्यात का हा ही प्रश्नच आहे. उलट ते दिल्लीच्या हद्दीत करणं जास्त सोयीस्कर झालं असतं. हे दिल्लीला होणाऱ्या एखाद्या कार्यक्रमात सहज साधता आलं असतं. आपल्या युनिटवर ही जबाबदारी का टाकण्यात आली ह्याचे लॉजीक खरोखरच मला समजत नाही. गेल्या वर्षापासून सीसीमध्ये आपल्या रिजनमधून निवडल्या जाणाऱ्या प्रतिनिधींची संख्या वाढवावी असे प्रयत्न आपल्या रिजनने चालवले आहेत. आमच्या

मनात तुला सीसीमध्ये पाठवायचे निश्चित होते. आमची अशी खात्री होती, अजिता, तू तेथे गेली असतीस तर आपला विचारप्रवाह मजबूत करण्याच्या कार्यात तू खूप पॉझिटिव्ह कॉन्ट्रीब्युशन करू शकली असतीस. जनसामान्यांच्या मनातील सुप्त स्वातंत्र्याच्या उर्मी, लोकशक्तीचा विकास आणि लोकशाही व्यवस्था ह्याचं नातं तुला जसं समजतं, आणि त्या दृष्टीने प्रत्यक्ष व्यवहारात काय केलं पाहिजे ह्याबाबत तुझ्या ज्या संकल्पना आहेत ना, त्यांच्या आधारावर तू संघटनेला, आपल्या धोरणांना नवे वळण देऊ शकशील असा विश्वास आहे आम्हाला. म्हणूनच पीकेने सीसीच्या प्रत्येक मिटींगमध्ये हा मुद्दा लावून धरला होता. आपला वाढलेला मास बेस लक्षात घेता ती मागणी योग्यही होती. पण सीसी हा निर्णय पुढे ढकलत राहिली. आणि ... " त्याचा घसा दाटल्याचा आभास झाला अजिताला. बराच वेळ तो न बोलता थांबला, दोन्ही हातात घट्ट पकडलेल्या ग्लासकडे नजर लावून. मग एकदम त्याने हालचाल केली, हातातील ग्लास त्याने तोंडाला

लावला, एक मोठा घोट त्याने घशाखाली ढकलला, आणि तो म्हणाला, "आता सीसीने निर्णय कळवलाय, आपल्या रिजनकडून दोन प्रतिनिधी नियुक्त करावेत म्हणून. पण..पण ह्याचा अर्थ काय मला समजत नाही अजिता."

त्याच्या चेहऱ्यावर उद्वेग, संशय, नैराश्य ह्या भावना तीव्र स्वरुपात दिसत होत्या. अजिताला त्याच्या चेहऱ्याकडे पाहवेना, तिने त्याच्या चेहऱ्यावरील आपली नजर खेचून बाजूला केली, खिडकीतून दिसणाऱ्या आकाशाच्या पट्ट्याकडे वळवली. खिडकीच्या काळया चौकटीतून एक चांदणी आत डोकावत होती. ती काहीच बोलली नाही. ती प्रतिक्षा करत राहिली, तो पुढे बोलण्याची.

"मला समजत नाहीये. म्हणजे जे तर्काच्या आधारावर सुसंगत वाटतं, ते घडलं नाही, म्हणजे शंका-कुशंका यावयास लागतात. गेल्या काही

दिवसांपासून मला खरोखरच वाटायला लागलंय, आपल्या रिजनमध्ये ज्या पध्दतीने दोन अंगांने काम वाढतयं, तशा प्रकारच्या कार्यपध्दतीत अडचणी असूनही जो पॉझिटीव्ह परिणाम घडतोय, तो सीसीतील काही सदस्यांना पचनी पडत नाहीये. गेल्या वर्षापासून तर मला वाटायला लागलं होतं आपल्या कामात अडचणी निर्माण करायचाच प्रयत्न चाललाय की काय? लोकसंघटनांकडून विकासकार्य चालवण्याबाबत तात्त्वि मतभेद असणं समजू शकतं अजिता. पण अशा प्रकारे तंगडया खेचणं..'' बोलता बोलता एसेन मध्येच थांबला.

"ह्या दोन गोष्टींचा काही संबंध नसण्याचीही शक्यता आहे सुन्या. सीसीमध्ये आपल्याकडून जाणाऱ्या प्रतिनिधींची संख्या वाढणं आणि मी सीसीत जाणं हा संबंध तुमच्या मनात होता. पण सीसीच्या दृष्टिने ह्या दोन गोष्टींचा संबंध असेलच असे नाही. ह्या कामगिर ीवर माझी निवड होणं ह्याचाही ह्या बाबीशी

संबंध असण्याची शक्यता नाही. दोन जागा वाढवण्याचा निर्णय ह्याच वेळी का झाला ह्याचं कारण वेगळंही असू शकतं, वेगळंच असावं. काय असावं सांगू? हे ऑपरेशन यशस्वी झालं की शासकीय दडपशाहीचा दंडूका फिरू लागणार हे अटळ. हा दंडूका आपल्या क्षेत्रात जास्त वुव्रतेने चालणार हेही नैसर्गिकच. आपण ह्या परिस्थितीला तोंड देण्यास तयार असणार हेही खरं आहे. त्यामुळे आपले कार्यकर्ते पोलीसांच्या तावडीत सापडू नये म्हणून काळजीही घेतील. पण पीकेला, तुला त्याकरता अंडरग्राऊंड जावं लागलं, आऊट ऑफ सर्क्युलेशन जावं लागलं. समजा काही कारणांनी तुम्ही अन-ऍव्हेलेबल असाल तर नाजूक प्रसंगी सीसी कुणाशी संपर्क साधणार? हा विचार करून कदाचित आताच दोन प्रतिनिधी वाढविण्याची काळजी घेतली असेल. असंही कारण असू शकेल की नाही?"

एसेन अजिताच्या चेहऱ्याकडे पाहात होता. त्याच्या चेहऱ्यावरील ते तीव्र भाव काहीसे निवळले, एक

अस्पष्ट अंधुक विस्मयाची भावछटा त्याच्या डोळयात उमटली.

"हे खरं आहे. तीही शक्यता आहे. कदाचित केवळ हीच शक्यता नसेल, पण ही ही शक्यता असणे शक्य आहे. पण तहीही मला वाटतं, सीसीमध्ये तुला माहीत आहे बिहार राज्याचा जास्त प्रभाव आहे. त्यांना आपल्या रिजनने पुढे यावेसे वाटत नाही. कित्येकदा काय होतं अजिता, कुणी मुद्दामून संकुचित दृष्टीकोनातून निर्णय घेत नाही. पण संकुचित दृष्टिकोन असला ना तर तुमच्या जाणिवेचे क्षितीज मर्यादित होते. तुमचे परसप्शेनच मर्यादित असते." तो काही क्षण घोटाळला, मग म्हणाला, "अजिता, तू अशी वेगवेगळया दृष्टिकोनातून पाहण्याची कला कुठून मिळवलीस गं?"

"वेगवेगळया दृष्टिकोनातून पाहण्याची कला! वा, सुन्या तू अगदी योग्य शब्द वापरलास. मी ह्या संदर्भात कधी विचार केला नव्हता. पण मला वाटतं ही कलाच

आहे. तू पेन्टींगच्या प्रदर्‍शनाला गेली असशील बऱ्याच वेळा. प्रदर्शन पहायला वेगवेगळया प्रकारचे लोक येतात. काहींना आपल्या घरात लावायला पेंटींग पाहिजे असते. काही नवश्रीमंतांना आपल्या दालनात नव्या उगवत्या चित्रकारांचे पेंटींग हवे असते. क्रिटीक्सना, पत्रकारांना त्यावर रिपोर्ताज तयार करायचा असतो, कित्येकजण फॅशन म्हणून येतात आणि क्वचित एखादा, खरा रसिक प्रत्येक पेंटींग अनुभवायाला येतो. असा माणुस चित्रासमोर उभा राहातो. निरखून पाहातो चित्राला. जणू चित्र आपल्या मेंदूत मुरू देतो. मग जरा मागे सरकतो, परत निरखतो, मग डावीकडे सरकतो, वेगवेगळया कोनातून, वेगवेगळया ऍंगल्समधून ते एकच चित्र अनुभवत असतो. ही पेंटींग अनुभवण्याची कला, व्यक्तीला सर्व जग बघताना, व्यक्तीशी ओळख करून घेताना, घटनेचा अर्थ लावताना, थोडक्यात बाहेरचे विश्व अनुभवताना, वापरता आली तर किती प्रचंड फरक पडेल नाही? " ती काही क्षण थांबली, तिची नजर

खिडकीबाहेरील चांदणीकडे लागली होती. तिच्या चेहऱ्यावर उत्साहाचे स्मित झळकत होते. तिच्या चेहऱ्याकडे पाहाता पाहाता एसेनला वाटलं, गेले तीन चार दिवस मनावर जमून राहिलेलं आपल्या मनावरील मळभ दूर होतंय.

"ही संकल्पना विकसित केली ना सुन्या, ही कला लोकांच्या अंगी वि्िकसित करण्याचं तंत्र जर आकारात आणलं ना, वा, व्वा, आपल्या कार्यकर्त्यांना घडवण्यासाठी हे तंत्र तर उपयोगी पडेलच, पण तेवढंच का? नवा माणूस निर्माण करण्यासाठीही हे तंत्र उपयोगात येईल. नाही तर एक तर करता येईलच. ह्या तंत्रावर एक चांगलं पुस्तक तयार केलं ना, आणि ते अमेरिकेतील एखाद्या पब्लिशर्सकडून छापलं ना, भरपूर पैसा मिळेल आपल्याला. डॉलर्समध्ये. पैसे मिळवण्यासाठी काय काय युक्त्या प्र्युक्त्या कराव्या लागतात आपल्याला. खरंच मला वाटतं एक प्रॉजेक्टच घ्यावा मी" ती बोलता बोलता एकदम थांबली.

तो क्षण चिरंतन नि:शब्दतेचे रूप घेऊन जणू त्या दोघांच्या अस्तित्वावर लटकत राहिला, त्या खोलीला आच्छादून राहिला. त्याला वाटलं, मी येथे असा बसलोय, ती बोलता बोलता थबकलीय, तिचा शेवटचा शब्द आमच्या दोघांमधील अंतराळात नुसता तरंगत नाहीये. हा क्षण असा थिजलाय जागीच. एकाएकी गोठून स्थिरावलाय. आम्ही, आमची शरीरं, आमचे श्वासोच्छवास, आमचे विचार एकाएकी गोठून लटकताहेत अधांतरी.

एकाएकी अजिता खुर्चीवरून उठली, सावकाश चालत ती खिडकीशी पोचली, ती बाहेर पाहात उभी राहिली. एसेनला तिची हालचाल जाणवली. त्याने आपल्या हाताची बोटं किंचित हलवली. त्याची नजर आता त्याच्या बोटांवर सरकली होती. जणू आपली बोटं हालू शकतात का हेच तो पाहात होता. मग तो एकाएकी खुर्चीवरून उठला,

"भेकड आहोत आपण. अजिता. भेकड आहोत. क्रांतिकारक म्हणवतो ना आपण स्वत:ला. नवा समाज घडवायला निघालोय, जेथे प्रत्येक व्यक्ती सन्मानाने जगेल, जिथे असुरक्षिततेची भावन ाच शिल्लक नसेल, जेथे दुसऱ्या माणसाची माणसाला भीती वाटणार नाही. प्रत्येक माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार असेल, आणि हे जग निर्माण करण्याचे स्वप्न पाहाणारे आपण शिस्तीच्या नावाखाली असत्यापुढे मान तुकवतोय. आपल्याला संशय आहे, तुला ही कामगिरी सोपवण्यामागे शुध्द राजकीय हेतू नाही, ह्यात ना आपल्या राज्यशाखेचे हित आहे ना आपल्या पक्षाचे हित. मुळात एखाद्या व्यक्तीची अशाप्रकारे हत्त्या करणे चूक आहे, अयोग्य आहे. तात्त्वि दृष्टया चूकीचे आहे हे, आणि व्यवहाराच्या पातळीवर ह्यामागे काय हेतू असेल त्याबद्दलही शंका घ्यायला प ुरेशी जागा आहे. नाही अजिता, तू काहीही म्हण, मला हा निर्णय आत्मघातकी वाटतो, हा निर्णय घेण्यात काहीतरी चूक होतेय असं मला वाटतेय, मला

वाटतं हा निर्णय राज्यसमितीने अमान्य करायला हवा, हा निर्णय योग्य आहे ह्याविषयी केंद्रीय समितीकडून जोपर्यंत पटवले जात नाही तोपर्‍यंत तो मान्य करू नये. पीकेजवळ मी ह्याविषयी शंका व्यक्त केली, ह्या अशा कृत्याच्या परिणामी सर्व संघटनेवर, जनतेवर शासनाकडून हल्ला होईल. खरं तर काहीही खास कारण नसताना हा हल्ला आपण आपल्यावर का ओढून घ्यावा, ह्या हल्ल्याला आपली तोंड द्यायची तयारी आहे का? "

तो कि‍िचिंत काळ काही बोलला नाही. '' नाही. अजिता, तू असं का मरावंस? का बळी द्यावास तू स्वत:चा? कुठल्या क्रायटेरियावर तुझी निवड झाली. ह्यापेक्षा दिल्लीत किंवा आसाममधील एखाद्या रिमोट जागी ही मोहीम पार पडली गेली तर! प्रचंड जनसमुदायांनं ही कारवाई केली असती तर! शासनाच‍्या प्रतिहल्ल्याला तोंड द्यायची गरजच पडली नसती. नाही... अजिता, मी तुला मरू देणार

नाही. का तूच का म्हणून? मी का नाही? ऍन का नाही? तुला सांगू अजिता, इट इज शेमफुल. पण पीकेने तुझं नाव घेतले आणि एकदम प्रथम प्रतिक्रिया माझ्या मनात आली, 'इगोर जिंकलाय'

ती उठली. आत गेली, चहाकरता पाणी गॅसवर ठेवलं, फ्रिजमधून दूध काढताना तिनं पाण्याची बाटलीही बाहेर काढली. बेसिनजवळ जाऊन बाटलीतले थंडगार पाणी तिनं आपल्या चेहऱ्यावर शिंपडलं. घोटभर पाणी घशात ओतलं. बाहेर येऊन तिने ती बाटली सुन्याच्या हातात दिली. काही न बोलताच ती परत आत गेली. चहा घेऊन ती बाहेर आली तेव्हा तिच्या चेहऱ्यावर परत नेहमीचेच नितळ भाव होते.

"हा फार विचित्र प्रकार घडतोय सुन्या. विचित्र आणि अपेक्षितही. खरं सांगते, ह्यूमन बॉंबची जबाबदारी आरसीच्या सदस्यांपैकीच एकावर पडणार असं निश्चित

झाल्यावर मी योग्य माणूस कोण म्हणून क्रायटेरीया तयार केला, आणि त्या क्रायटेरीयात कोण बसते ह्याचा शोध घेण्यासाठी प्रत्येकाच्या कुंडल्या तपासायला सुरुवात केली. आणि त्यात तुझी कुंडली सर्वात योग्य असं मत झालं माझ्या मनात. पण ह्यात सर्वात विचित्र गोष्ट अशी होती की, ह्या सर्व संभाव्य व्यक्तींच्या कुंडल्यांत माझी कुंडली मात्र मी टाकली नव्हती. ह्याचा अर्थ काय होता माहीत आहे सुन्या? आपल्या मनातील सेल्फ प्रिझर्वेशनची इन्स्टीक्ट, जगण्याची उर्मी प्रचंड प्रबळ असते. आपले विचार, आपला दृष्टिकोन, आपली तर्कशक्ती सगळया मानसिक प्रक्रियांमागे, अगदी रिफ्लेक्स ॲक्शन्समागेही ही भावना, ही इन्स्टीक्ट असते. हे सत्य मला उमगले आणि असं असेल तर स्थितीनिष्ठ विचार असं काही असू शकतं का? माझ्या मनात येणाऱ्या विचारांवरील भरोसाच वाटेनासा झालाय मला. नाहीतर बघना, गेल्या दोन दिवसात माझ्या मनात प्रचंड वादळ माजलेय. ह्यूमन बॉंब वापरणे हा योग्य डावपेच आहे का? हा प्रश्न माझ्याही मनात

अत्यंत तिव्रतेने सलू लागला. आणि त्यात काही आश्चर्य नाही. तो प्रश्न आपल्या सर्वांच्याच मनात असणार? कदाचित सीसीच्या पुढच्या मिटींगमध्ये त्यावर जोरदार चर्चा होईल. कारण स्पष्ट आहे, आपल्या राजकीय भूमिकेशी हे शस्त्र वापरणे विसंगत आहे. लोकांच्या लढ्यातील सहभागावर आपला आग्रह आहे. लोकांच्या सामाजिक, राजकीय, ऐतिहासिक जाणिवांचे उन्नयन आणि त्यातून त्यांचा लोकसंघर्षामध्ये वाढता सहभाग, त्यातून त्यांच्या क्रांतिकारक जाणिवांचे उन्नयन ही आपली क्रांतिकारक शक्ती वाढवण्याची वाट आहे.

ह्यात वैयक्तिक कृती नाकारली जात नाही, पण तिचे मर्यादित महत्त्व लक्षात घेतले जाते. व्यक्तीचे बलिदान त्याज्य, निरूपयोगी ठरत नाही, पण त्यातून काय साधले जाणार आहे ह्यावर हौतात्म्याची योग्यायोग्यता ठरते. परंतु हे प्रश्न अशा तीव्रतेने का उभे झाले माझ्या मनात? असं म्हणता येईल की, माझी जगण्याची उर्मी ह्या सर्वामागे प्रेरक शक्ती असेल. शक्य आहे. पण

प्रामाणिकपणे गेल्या तीन चार वर्षांच्या काळाकडे पाहिलं तर हे प्रश्न वेगवेगळया रुपाने, वेगवेगळया वेळी माझ्या मनात उगवत राहिले होते, सलत राहिले होते, हे ही एक सत्य आहे. माझ्या मनात विचारांचे नुसते थैमान माजलेय, पण त्याचबरोबर विविध रंगांच्या, आकारांच्या ह्या गर्दीत एक आकार आहे हे भासतंय मला. तो आकार शोधायचा जरा प्रयत्न केला तर सापडेलही मला. दिसेलही स्पष्ट. पण त्याचबरोबर मनात ही शंका सलतेच आहे, हा शोध घेण्याची गरज आताच तिव्रतेने का वाटतेय? ह्या आकाराचे अस्तित्व मला आताच का जाणवायला लागलेय? मृत्यूला अलिंगन देण्याची माझी तयारी नाही, प्रत्यक्ष मृत्यू साक्षात समोर आलाय आणि मनातील दुबळेपणा, भेकडपणाच वेगळे रूप घेऊन समोर येतोय असं तर नाही ना? माझी क्रांतीला पुरेशी कमिटमेंट का नाही?"

अस्वस्थपणे येरझाऱ्या घालत अजिता बोलत होती. खुर्चीत बसून एसेन तिच्याकडे पाहात होता, तिच्या

हालचाली निरखित होता. बोलता बोलता ती थांबली, खिडकीसमोर जाऊन उभा राहिली. तिचे हात खिडकीच्या लाकडी चौकटीवर होते, पण तिची बोटे अस्वस्थ हालचाल करीत होती. तिचा खालचा ओठ तिने वरच्या दातांखाली घट्ट दाबून धरला होता.

एसेन जागेवरून उठला, तिच्याजवळ पोचला, तिच्या शेजारी उभा राहिला. मग तो तिला सामोरा झाला. आपल्या दोन्ही पंजांनी त्याने तिचे डोके धरले, हळूच त्याने आपले ओठ तिच्या कपाळावर टेकले आणि तो तिच्या जवळ सरकला, तिचे डोके त्य◌ाने आपल्या डाव्या खांद्यावर झुकवले, तिच्या पाठीवर हात वेढून त्याने तिला कवेत घेतले.

"तूला जो आकार दिसतोय ना अजिता. तू त्याला नाकरून नाही चालणार. हे खरं आहे आता तू जे काही म्हणशिल ते तुझ्यावर जी जबाबदारी सोपवण्यात आली आहे त्याच्या संदर्भातच समजून घेतले जाईल. पण ते

साहजिकही आहे. होय ना? तुझ्याही मनातही शंका आहेच. पण माझा विश्वास आहे अजिता, तू ह्या जगण्याच्या उर्मीवर मात करू शकतेस. ह्या उर्मीतून तुला उर्जा लाभेल, तू त्या पलिकडे जाऊ शकतेस. तूला हा जो सत्याचा आकार जाणवतोय ना, त्याला नकार देऊ नकोस. त्याला समजून घे, उमजून घे. शब्दरूप द्यायचा प्र्यत्न कर तू. इतरांच्या डोळयावर हा जो चष्मा आहे ना, तो काही दिवसातच दूर होईल. तुच दूर करशील तो. आाणि तू जे काय लिहिशील ना, जे मांडशील ना, ते वेगळे निख्खळ सत्य म्हणून समजून घेतील ते." तो काही वेळ थांबला.

तिच्या चेहऱ्याची उब त्याला जाणवत होती, खांद्याला, गळयाला, त्याच्या छातीच्या वरच्या भागाला. त्याला आपल्या श्वासोश्वासाची वाढलेली गती जाणवली. त्यानं तिला अधिकच जवळ खेचलं, आता तो अगदी हळू आवाजात तिच्या कानाशी बोलत होता, आपल्या कुरवाळणाऱ्या आवाजाने तो तिला वेढण्याचा

प्रयत्न करत होती. . "होय अजिता, तू सीसीमध्ये न जाताही आपल्या गटाचं, लोकांचं भविष्य घडवू शकतेस, मला माहीत आहे अजिता. मला विश्वास आहे.'' त्याने आपलं डोकं मागे घेतलं, एका हातानं तिनं त्याचं डोकं खांद्यावरून दूर केलं, तिचा चेहरा समोर आल्यावर एखादा पाण्याने थबथबलेला पावसाळी ढग जसा डोंगराच्या शिखरावर उतरावा तसा त्याचा चेहरा तिच्या चेहऱ्याजवळ गेला, त्याचे ओठ तिच्या ओठाला भिडले, त्याने सर्वांगांने तिचे अस्तित्व व्यापून टाकले.

ती जागी झाली तेव्हा कॉटजवळच असलेल्या टेबलावर एसेनने ठेवलेली चिठ्ठी दिसली. ती उठली, खोलीत स्वच्छ प्रकाश पडला होता, खिडकीत उन्हाची किरणं उतरली होती. त्या प्रकाशात खोलीतील प्रत्येक वस्तू झगमग करत होती. ती किचनमध्ये गेली. गॅसवरील चहाच्या पातेल्याला तिने स्पर्श करून पाहिला. पातेलं चांगलंच गरम होतं. तिनं चहा कपात

ओतून घेतला. बेडरूममध्ये जाऊन तिनं चिठ्ठी उचलली.

' पुढचे सहा दिवस तुला मोकळे आहेत. ह्यातील एक दोन दिवस तू फिल्डवर जाशील, फिल्डवर तू ज्या काही ॲक्टिव्हिटीज् सुरू केल्या होत्यास त्या काही दिवस स्थगित कराव्या लागतील. पण त्यानंतर, ही गडबड जरा शांत झाल्यावर त्या ॲक्टिव्हिटीज् परत चालू करण्याचे सर्व प्रयत्न मी करेन. मुरलीशी, कृष्णाशी, रामय्याशी आणि गंगैय्याशी ह्याबाबत बोलून ठेव. मला वाटतं व्हि.आर.डी.सी. चा कारभार पुढे चालायला फारशी अडचण येणार नाही. तू जरी नसशील तरी व्हि.आर.डी.सी. चे सगळे प्रॅाजेक्टस चालूच राहातील. नाहीतरी ह्या प्रत्येक प्रॅाजेक्टची जबाबदारी तु स्टाफपैकी कुणावर तरी सोपवलेली आहेसच.

सहा दिवसांनी परत आल्यावर तुला एमजी बरोबर काही तास काढावे लागतील. तोपर्यंत ह्या मोहिमेच्या इतर गोष्टी आपल्याला कळतील. त्यानूसार पुढील

कार्यक्रम तुझ्यासोबत निश्चित होईल. ह्या मोहीमेचा परिणाम म्हणून काय होण्याची शक्यता आहे ते लक्षात घेऊन काय करायचं ह्याविषयी आमची चर्चा चालू झाली आहे. त्याविषयी तूला काय वाटतं ते लिहून देशीलच. पण तूला जो आकार जाणवतोय, ज्याचा अस्पष्ट आभास तुला होतोय, त्याचाही शोध घेऊन त्यावर लिही. नक्की लिहिशील. हे तुझं निशाण मी माझ्या हातात घेईन, माझ्या कुवतीनूसार. सीसीचा नवा सभासद म्हणून माझ्यावर काही जबाबदारी टाकण्यात आली आहे. त्यानंतर मी राज्यातील वेगवेगळया भागांत काही दिवस फिरत असेन. भेटूया. तू तुझ्या आजीला भेटून येईपर्यंत मी परत येत आहे. रिव्होल्यूशनरी विशेस्.'

अजिताने परत एकदा त्या चिठ्ठीवर नजर फिरवली. गॅस पेटवून तिनं ती चिठ्ठी त्यावर धरली. कागदाने पेट घेतला, आणि काही क्षणातच जळून त्याची राख झाली.

प्रकरण अकरावे

समोर लांबचलांब रस्ता पसरला होता. रस्त्याच्या दोन्ही बाजूने गढूळ पाणी खळाळत वाहात होते, रस्त्याला आडव्या जाणाऱ्या नाल्यांना जाऊन मिळत होते. रस्ते अजूनही ओले होते, जागोजागी साचलेल्या डबक्यांमध्ये आकाशाचे प्रतिबिंब दिसत होते. अजिताने मोटर सायकलची गती कमी केली. तिची नजर भोवतालच्या परिसरात फिरत होती. तिला वाटतं होतं, पावसाने भोवतालचं जग कसं धुवून स्वच्छ, चमकदार केलंय. समोरून गणाप्पा खांद्यावर मजबूत दंडया आडवा ठेवून त्यावर हात टाकून डुलत डूलत येत होता, कोपरांपासून त्याचे दोन्ही हात दंडयावरून पुढे येऊन खाली लटकत होते. हात न उचलताच गण्णाप्पानं तिला रामराम घातला. त्याच्या जिन्हणीवर ओघळलेल्या मिशांमधून त्याचे दात चकाकले आणि परत भुऱ्या

काळया केसांआड दडले गेले.

गावात शिरल्यावर नेहमीच्या सवंयीने येणाऱ्या सफाईने अजिताने डांबरी रस्त्यावरून मोटरसायकल खालच्या मातीच्या रस्त्यावर उतरवली आणि चिन्नूर विकास सोसायटीच्या कार्यालयासमोर उभी केली. मोटरसायकलचा आवाज ऐकून मुरली बाहेर आली आणि तिनं अजिताला जिंदाबाद केला. तिच्या खांद्यावर थाप मारत अजिता आत शिरली. लहानशा टेबलामागील खुर्चीवर बसत तिने हसून मुरलीकडे आणि पलिकडे बाकावर बसलेल्या दोघां तरूण पोरांकडे बघितले.

"अजिताताई, पाऊस कसा झाला गावाकडे?" मुरलीने विचारले."मुरली, अगं शहरात पाऊस होवो वा न होवो काही फरक पडत नाही. खरं म्हणजे पावसाची अडचणच होते शहरात. शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांच्या पाणलोट भागात पाऊस भरपूर

झाला, धरणं भरली म्हणजे झालं. पण तुमच्याकडे चांगला झालेला दिसतोय पाऊस." अजिता म्हणाली.

"गेले तीन हप्ते कोरडे गेले, डोळयाला पाणी आणलं होतं शेतकऱ्यांच्या. आता ठीक आहे. दोन दिवसांपासून सारखा पडत आहे, जमीनीची तहान भागलीय आता."

"बरं. ते ठीक आहे. आज काय काम आहे आपल्याला? महिला गटाची मिटींग होईल का नाही आज? हे बघ. दोन चार आठवडे मी आता इथं नाहीये. माझ्या गावाकडे जातेय. सगळा हिशोब आज बघून टाकू. कोणाला किती उचल लागेल त्याचा आकडा काढला तर आपल्याकडे तेवढी जमा आहे का ते समजेल. रजनी केंव्हा येणार आहे? " एका दमात अजिताने प्र्श्नांची सरबत्ती केली.

पण मुरलीच्या चेहऱ्यावरील शांती ढळली नाही. ती म्हणाली, "ताई, दोन दिवसांपासून रजनी आलेली

नाही. ह्या शहरी बाया. काही झालं की फोन करतात, येणार नाही म्हणून. ताई, आपल्या गावातील पोरी एवढी शिकल्यात, त्यांच्यापैकीच कुणाला का घेत नाही नोकरीवर? गावातीलच असली म्हणजे घराकडून हाकून आणता येतात?'' मुरली तक्रारीच्या सूरात म्हणाली.

'' खरं आहे मुरली.'' पण आपल्या महिला सदस्यांना कर्जे देण्यासाठी आपल्याला जे पैसे देतात ना, त्यांना हा हिशोब ठेवणाराच माणूस लागतो, कॉमर्सवाला. आपल्या गावात कुठं मिळणार अशा पोरी? तसं म्हटलं तर तसा एखादा पोरगा असेल तरी चालू शकेल. पण ते आता जाऊ दे. रचना आणि संघर्ष प्रगतीच्या बैलगाडीचे दोन बैल असं म्हणायला फार सोपं. पण एक बैल पळायला नुसता फुरफुरत असतो आणि दुसरा एक एक पाऊल टाकत चालणार. कसं गाडं हालायचं?'' हसत अजिता म्हणाली.

अजिताचं विधान मुरलीला किती समजलं कुणास ठाऊक, पण ती गडगडाट करून हसत म्हणाली, "हळू चालला तरी ठीक आहे. हा बैल तर सारखा बसायलाच पाहातो.' 'बाकावर बसलेली दोन तरुण पोरंही हसण्यात सहभागी झाली.

"बरं, आपल्या मजूर संघटनेचे सेक्रेटरी कुठयंत?" अजिताने त्या पोरांकडे पाहात विचारले.

"बेलहट्टीला आहेत कालपासून. गुंडाप्पाने काल दोन मजूरांना काठीने मारलं तर गावातल्या आपल्या लोकांनी गुंडाप्पाला धरून ठोकलं. गुंडाप्पा पोलीसांना आणायला तालूक्याला गेलाय. तुम्हाला तिकडं घेऊन यायला सांगितलंय."

अजिता खुर्चीवरून उठली, मुरलीकडे वळत म्हणाली, "बघते, काय झालंय ते. कुठलं तर गाव तुमचं? किती लांब आहे?"

त्या पोरांनी काही उत्तर देण्याआधीच मुरली म्हणाला, "ताई, तीन एक कोसाचं अंतर आहे अन् शेवटचा कोसतर चालतच जावे लागेल. काय रे, पाऊस चालू आहे का तुमच्याकडे?"

"रातभर पाऊस चालू होता. नाला भरून वाहातोय." एक पोरगा म्हणाला.

"मग तर दोन अडीच कोस चालत जावं लागेल ताई. रस्ता तर एकदम खराब आहे. ताई असं कर ना, ही मिटींग झाल्यावर जा तिकडे. रात्री तिकडेच म ुक्कामाला राहा." मुरली म्हणाला.

"नाही मुरली. तुला माहीत आहे. पहिला नंबर संघटनेचा. तू असं कर आपल्या यशवंताला मदतीला घे. मिटींग घेऊन टाक. ज्यांना ज्यांना गरज आहे खताची, सर्वांना मंजूर करून टाक. सर्व खत संपले तरी हरकत नाही. नवीन स्टॉक येईल दोन आठवडयात. मिटी ंग

जरा उशिरा सुरू करा. रामय्याशी बातचित करून मी तशीच परत येते. मला रामय्याशीही बोलायचं होतं. मला वाटलं होतं, रात्री तुम्हा सर्वांशींच बोलेन. पण आता तो रातचा काही येणार नाही. उद्या मला गंगापूरला जाऊन संध्याकाळपर्यंत परतायचंय.'' बोलत बोलत टेबलावरची बॅग उचलून अजिताने खांद्याला लावली. तिला मुरलीच्या चेहऱ्यावरची नाराजी दिसत होती, पण मुरली काही बोलली नाही.

पक्षातर्पेच् हे असं विकासाचं काम सुरू करावं म्हणून तिला आपल्या सहकाऱ्यांना पटवून द्यायला फार त्रास झाला होता आणि बराच काळही लागला होता. शेवटी प्रयोग करायचं मान्य झालं होतं, पण प्रयोग करायची जबाबदारी तिच्यावरच टाकण्यात आली होती. ही दोन परस्परविरोधी कामं करणं ही एक सर्कसच असणार हे अजिताला माहीत तर होतं, पण प्रत्यक्षात त्यामधील ताणतणाव व्यवहारात वेगवेगळया प्रकारांनी सातत्याने जाणवायला लागले होते. शेतकऱ्यांची, मजूरांची

आर्थिक स्थिती सुधारली नाही तर आपल्या सामर्थ्याची जाणिव होऊनही त्यांना स्वातंत्र्य उपभोगता येणार नाही असं त्याचं म्हणणं होतं. खेडयात एक दोन कुटुंब धनदांडगी. त्यांच्याकडे सर्व जमीन. मजूर काय शेतकऱ्यांनाही ह्यांची गरज पडायची रोजच्या जीवनात जगण्याकरता. रोजच्या जगण्यातच पारतंत्र्यात राहाण्याची ही गरज, त्यातून झुकण्याची झालेली सवय, रोजच्या जीवनात ही सवय अधिकाधिक घट्ट होत जाणार. संघर्षातून येणारी सामुहिक सामर्थ्याची जाणिव आणि वैयक्तिक पातळीवर सातत्याने येणारा दुबळेपणाचा हा अनुभव.

अजिताने आग्रहीपणे मांडले होते, ह्यांची आर्थिक स्थिती सुधारून त्याचं परावलंबित्व दूर करण्याला पर्याय नाही. आपण मोर्चा काढणार एक दिवस, शासकीय अधिकाऱ्यांच्या दुबळेपणाचा अनुभव देणार लोकांना. एखादी मोहीम राबवून तुरुंगातून सहकाऱ्यांना सोडवून आणणार. वर्गशत्रूवर सामुहिक

कृती करून लोकांना आपल्या संघटीत शक्तीचा प्रत्यय देणार, पण रोजच्या जीवनात जगण्याकरता त्यांना लाचारीच करावी लागणार, काही धनदांडग्यांसमोर झुकावे लागणार. ह्यातून काय सांधणार?

प्रत्यक्ष काम सुरू झाल्यावर मात्र तिच्या लक्षात आलं, ह्या अशा कामामुळे लोकसंघटनेच्या कार्यकर्त्यांचे शासनाशी, नोकरशाहीशी येणाऱ्या संबंधांचे रूप गुंतागुंतीचे होत चालले आहेत. शासनाबरोबर संबंध ठेवून, त्यांचे नियम पाळून शेतीविकासाचे, जलनियंत्रणाचे कार्य करायचे आणि गावातील धनदांडग्याविरूध्द लढताना शासनाशी संघर्षही करायचा. लोकांचे प्रतिनिधीत्त्व करणाऱ्या स्थानिक कार्‍यकर्त्यांना सत्ताधारी व्यक्तींनी सामावून घेण्याचे प्रयत्न केला तर त्यांना मोह पडणं साहजिकच होते. अशावेळी गावातील लोकांचा दबाव कार्यकर्त्यांवर असणं हाच मार्ग होता. त्याकरता सामान्य माणसाला आपल्या हक्काची जाणिव करून देणे अत्यंत गरजेचे

होते.

लोक गोंधळतील असं तिला वाटलं होतं. पण लोकांनी हे दुहेरी रूप मान्य केले होतं. संघर्ष महत्त्वाचा हे देखील त्यांना जाणवत असावं, असं अजिताला अनेक उदाहरणातून लक्षात आलं होतं. ह्याचा अर्थ ताणतणाव नव्हते असे नाही. हे ताणतणाव संस्थेसाठी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यात आणि संघर्षाचे काम करणाऱ्या संघटनेच्या कार्यकर्त्यांतही यायला लागले होते. मग तिच्या लक्षात आलं होतं, संघटनेच्या कामात लोकशाही बीजे रुजवणे हाच त्यावर उपाय आहे. संघटनेच्या कार्यकर्त्यांवर लोकमताचा दबाव आणणं हाच संघटना संघर्षरत ठेवण्याचा मार्ग होता. अजिताने रिजनल कमिटीला पटवले होते, इतरांची ह्या कामात मदतही मिळवली होती. त्यातून संघर्षाकडे झुकते माप देणारा एक व्यवहार आकार घेत गेला होता. अजिताला विश्वास होता, आपल्या अधिकारांची आणि जबाबदारीची जाणिव असणारी एक लढाऊ संस्कृती

ह्यातून आकारात येत होती.

पहाट होईपर्यंत गेल्या पाचसात वर्षांपासून बरोबर काम करणाऱ्या आपल्या सहकारी स्त्री पुरुषांबरोबर ती गप्पा मारत बसली होती. तिनं त्यांना सांगितलं होतं की, कदाचित बऱ्याच दीर्घ काळाकरता ती तेथे येऊ शकणार नव्हती. तिने त्यांना आश्वासन दिलं होतं की प्रेरणा तर वारंवार तेथे येऊन त्यांना साह्य करेलच, पण एसेनही आता जास्त येत जाईल. तिला निरोप द्यायला ते सर्व रस्त्यापर्यंत आले होते. मुरलीला ती परत येणार नाही असा अंदाज आला होता की काय कोण जाणे, पण तिनं अजिताला घट्ट मिठी मारून निरोप दिला होता. अजिता परत निघाली तेव्हा ही मंडळी आपल्याला परत भेटणार नाहीत ह्याचं दु:ख तर होतंच, पण आपण करीत असलेल्या कृत्यामुळे ह्यांच्या जीवनात जे संकट येणार आहे त्याबद्दल आपण त्यांना सावध करू शकत नाहीत, त्यांच्यापासून आपण हे लपवून ठेवत आहोत ही एक अपराधीत्वाची भावनाही

त्रस्त करत होती.

शहाराजवळ आल्यावर हायवेच्या दोन्ही बाजूला अधूनमधून असणारे ढाबे आणि बार पाहून तिला तिव्रतेनं असं वाटलं की कुणातरी मैत्रिणीला गाठावं, नाहीतर सरळ ऍनलाच फोन करावा. कुठल्या तरी बारमध्ये जावं, भरपूर रम प्यावी, ह्या पोटात पडलेल्या खड्डयाला, ह्या छातीत जाणवणाऱ्या पोकळीला काही काळ तरी विसरून जावं. पण तिनं तसं काही केलं नाही. त्या दिवशी संध्याकाळी आणि त्या रात्रीही बराच उशिरापर्यंत ती तिनेच सुरू केलेल्या ह्या प्रयोगाचे कठोर मूल्यमापन करणारे आर्टिकल लिहित होती.

क्रांतीकारक जाणीव वाढवण्याकरता वास्तवाचे बहुरंगी रूप समजून घेणे कसे आवश्यक आहे, तशी सवंय लागावी म्हणून खास नजर विकसित करणे कसे आवश्यक आहे हे तिने सांगितले होते. बहुरंगी, बहुआयामी वास्तवाचे रूप सर्वांगांने समजून घेतले

तरच त्या क्षणाला कुठले अंग महत्त्वाचे हे समजून घेणे शक्य होते असं मांडले होते तिने. त्यानंतर संभाव्य पोलीस दमनाच्या काळात गावांमध्ये काय करता येईल ह्या विषयी तिला जे वाटत होते तेही तिने सविस्तर लिहून काढले.

ती जेव्हा अंथरूणावर आडवी झाली तेव्हा ती अतिशय थकली होती, तरीपण तिला वाटत होतं आपल्याला झोप येणं शक्य नाही. कदाचित आता कधीच येणार नाही. आज किती तारीख. अजून किती दिवस शिल्लक आहेत? अकरा दिवस.. अकरा गुणिले चोवीस दोनशे चवसष्ठ. दोनशे चवसष्ठ तास. कदाचित आणखी काही तास ग्रेसही मिळतील. ती स्वत:शीच हसली. आपल्या मनाने काऊँट डाऊन करायला सुरूवात केली आहे का? तिने कूस बदलली. उद्या पीकेला फोनवर गाठून आपला कार्यक्रम सांगितला पाहिजे. दुपारी जर निघालो तर परवा दुपारी आपल्या काकूच्या हातचे चविष्ट मासे खायला आपण घरी पोचू

शकू. आता काउंट डाऊन सुरू केलाच आहे, तर राहिलेली कामं काय काय आहेत ह्याचीही एक लिस्ट तयार करायला हवी. मग जसजसे एक एक काम उरकत जाऊ तसतसे निळया शाईने लिहिलेल्या यादीतील एक एक मुद्यावर लाल शाईच्या पेनने खूण करीत जाऊ. ही कामांची यादी फार मोठी होईल का? तिनं मनातील कागदावर एक आकडा टाकला, पण त्यापुढे काही लिहायच्या आधीच तिला झोप लागली.

प्रकरण बारावे

शक्यतोवर आवाज न करता ती बर्थवरून खाली उतरली. अंगाची जुडी करून खुर्चीवर पेंगत बसलेल्या त्या म्हाताऱ्या माणसाच्या खांद्याला तिनं हलकेच स्पर्श केला, तरीपण तिच्या स्पर्शानं म्हाताऱ्याने दचकून डोळे उघडले, त्याचे शरीर एकदम ताठरले,

मान आत खेचली गेली, थरथरत्या आवाजात त्याने विचारले, "क्या है मेमसाब, क्या हुवा?'' त्या थरथरत्या आवाजातील भिती अजिताच्या मनात रुतत गेली. माझ्याबद्‌दल ह्या म्हाताऱ्याला भिती का वाटावी? पण नाही. ही भिती माझ्याबद्दल नाही. सगळयाच परक्या, अनोळखी माणसांबद्दल वाटणारी ही भिती असावी. पण तसंही नसावं, ही भिती माझ्यासारख्या माणसांचीच आहे. चांगले कपडे घालणाऱ्या, आधिकारवाणीने बोलणाऱ्या. सातत्याने भितीबरोबर जगणं कि‌ती कठीण असेल? पण तिनं आपल्या मनातील विचार बाजूला सारले, हलक्या आवाजात ती म्हणाली, "बाबा, माझी झोप झालीय, तुम्ही माझ्या जागेवर झोपा, मी इथं बसते.'' म्हातारा चकित होऊन काही क्षण तिच्याकडे पाहात राहिला, अन् मग तो घाईघाईत उभा राहिला, बर्थपाशी जाऊन तो तिचा बिस्तरा गुंडाळू लागला, पण अजिताने त्याला मध्येच अडवले, "नही, बाबा, आप सो जावो इस बिस्तरेपे. ए ब्लँकेटभी ओढ लो. ठंड बहोत है ना?'' तिचं बोलणं पुरं होण्याच्या आतच म्हातारा वर

चढला आणि ब्लँकेटमध्ये घुसला.

खांद्यावरची शाल अंगाभोवती घट्ट गुंडाळत अजिता खिडकीजवळ बसली. तिने काचेतून बाहेर पाहिले. इंजिनच्या दिशेला आकाशाने रंग बदलायला सुरूवात केली होती. अंधाराचा दाट काळा पडदा आता जरा झिरझिरीत झाला होता, त्यातून क्षितीजावरील डोंगराचे आकार, जवळ असलेल्या झाडांच्या एकमेकांत मिसळलेल्या छायाकृती, तर कुठे जलाशयाच्या पृष्ठभागावरील चमकता प्रकाश दृग्गोच्चर होऊ लागला होता. ह्या डोंगरांचे आकार आपल्या ओळखीचे वाटताहेत का? शक्य आहे, आपलं स्टेशन जवळ येत चालले आहे. आणखी फार तर एक दीड तास. तिने दीर्घ श्वास घेतला, सतत ओल्या असलेल्या मातीला वेगळाच वास असतो का? काहीसा कुबट, काहीसा कुजट पण त्याचबरोबर नवीन पालवीच्या गंधाची पुसट चाहूल देणारा. आपल्या बालपणाकडे परत चाललोय आपण. जर येथून परतलोच नाही आपल्या

तारूण्याकडे तर? निरागसतेकडून प्रौढत्वाकडे झालेली जाणिवेची यातनादायक आणि साहसी वाटचाल. ह्या वाटेने परत मागे जाता येणं शक्य आहे का? एकदम तिच्या मन◌ात विचार आला, आपल्या गावाकडून आपण ठरवलेल्या तारखेला परतलोच नाही तर? पीके काय करेल? अनिताला काय वाटेल? एसेन काय म्हणेल? ते काय आपला शोध घेतील? त्यांना कुठयं आपला पत्ता माहीत आहे? टूक..टूक माकड. ती हसली, आपला उलटा प्र्वास सुरू झालाय वाटतं? मग तिनं मनाच्या तळात दीर्घकाळ खोल निश्चल असलेल्या पण आता चाळवाचाळव करीत असलेल्या आठवणींकडे दुर्लक्ष करून तिने विचार करायला सुरुवात केली, सुन्याने केलेल्या सूचनेचा विचार करून आपण जे लिहिले ते पुरेसे आहे का?आपल्याला जे म्हणायचं आहे ते स्पष्ट झाले आहे का? काय लिहिणार आहोत आपण? ह्या रंगांच्या, आकारांच्या गोंधळात कुठला आकार जाणवतोय मला? कोणतं निशाण मी सुन्याच्या, अनिताच्या हातात देणार आहे मी? खरंच काही तसं

आहे का? का सुन्याला प्रभावित करण्यासाठी मी हे आभास उभे करत होते. त्यालाही फसवण्यासाठी, आणि मलाही. क्षणभर तिला वाटलं आपला चेहरा सुन्याच्या खांद्यावर आहे, त्याच्या गळयाची, खांद्याची उष्णता आपल्या गालाला जाणवत आहे, त्याच्या केसांचा स्पर्श आपल्या कानांना होत आहे, आणि त्याचे शब्द...कुरवाळणारे शब्द. . होय अजिता, तू सीसीमध्ये न जाताही आपल्या गटाचं, लोकांचं भविष्य घडवू शकतेस, मला माहीत आह े अजिता. मला विश्वास आहे.

तिचे स्टेशन जवळ आल्याच्या खाणाखुणा तिला दिसायला लागल्या तेंव्हा तिने आपल्या बर्थकडे पाहिलं. तो म्हातारा अजूनही अंगाभोवती पांघरूण गुरफटून गाढ झोपला होता. अजिता उठली, बर्थजवळ जाऊन ती क्षणभर त्याचा चेहरा निरखित उभी राहिली. मग तिनं हळ ूच हाक दिली, "बाबा, ओ बाबा" अजिताच्या पाठीमागे बर्थवर झोपलेला माणूस जागाच

होता. त्यानं कुशीवर वळून गाढ झोपलेल्या म्हाताऱ्याच्या चेहऱ्याकडे पाहिलं, मग त्याने अजिताकडे पाहात नाराजी दाखवत मान हलवली. ह्या म्हाताऱ्याला तिनं जागा दिली हे त्याला आवडलं नव्हतं. अजिताच्या ते लक्षात आलं, ती त्याच्याकडे वळली, आणि मिस्कील गंभीरपणे म्हणाली, "किती गाढ झोप लागलीय ना म्हाताऱ्याला. एखाद्या लहान मुलांसारखी"

तो माणूस चकित होऊन काही क्षण अजिताकडे पाहात राहिला, काही क्षण त्या म्हाताऱ्याच्या चेहऱ्याकडे. पण ह्यावर आपण कशी प्ऱतिक्रिया द्यावी हे त्याला समजले नसावे, त्याने चुपचाप कुस बदलली आणि अजिताकडे पाठ फिरवली. अजिता हसली. खुष होऊन हसली. मग तिनं म्हाताऱ्याच्या खांद्याला स्पर्श करीत परत हाक दिली. म्हातारा जागा झाला, त्यानं अजिताच्या चेहऱ्याकडे नजर वळवली, मग त्याच्या चेहऱ्यावर एक गाढ समाधानाचे हास्य पसरले.

रात्रीच्या भितीचा लवलेशही नव्हता त्या चेहऱ्यावर. "उठा बाबा, माझं स्टेशन येतयं" असं म्हणून अजिताने बाकाखाली ठेवलेली आपली सॅक काढली. सॅक सीटवर ठेवून तिनं अंगावरील शाल काढली, शालीची घडी करून तिनं मागे वळून पाहिलं, म्हाताऱ्याने ब्लँकेटची घडी केली होती, बर्थवर पसरलेल्या स्लीपींग बॅगचे काय करावे हे त्याच्या लक्षात येत नव्हते, मग तो ब्लँकेटवरच आपल्या तळहाताचे फटके मारून झटकत होता, जणू आपल्या अंगाचे त्या ब्लँकेटला चिकटलेले स्पर्शही झटकून काढत होता. त्याच्या चेहऱ्यावर परत तोच अपराधीपणाचा, भितीचा भाव उमटत होता. अजिता घाईघाईने पुढे झाली, तिने त्या म्हाताऱ्याच्या हातातून ब्लँकेट घेतले, म्हाताऱ्याकडे दुर्लक्ष करून तिने झपाट्याने स्लीपींग बॅग गुंडाळली, सॅकमध्ये कोंबली, आणि सॅक पाठीवर टाकून ती दाराकडे निघाली. म्हातारा तोंडातल्या तोंडात काहीतरी पुटपुटल्याचा आवाज तिला ऐकू आला, पण तिनं मागे वळून पाहिलं नाही.

फाटकापाशी सहजच उभं असल्यासारखे भाव चेहऱ्यावर आणून उभ्या असलेल्या तरुण स्टेशन मास्तरच्या हातात तिकीट खुपसून अजिता बाहेर आली. गाडीतून उतरल्यावर तिनं स्टेशनवर ऐलपैल नजर टाकली होती. ह्या आठ-नऊ वषर्ाात काहीही फरक झाला नव्हता. बाहेर आल्यावर मात्र् घोडयांच्या बग्यांऐवजी दोन ऍटोरिक्शा उभ्या असलेल्या पाहून तिच्या मनात विचार आला, हे ही जग बदलतेय तर! ती रिक्शाकडे वळणार तोच आपल्या खांद्यावरील सॅकला कुणीतरी स्पर्श केल्याचे तिला जाणवले. तिने मागे वळून पाहिले, "सलाम ताईसाब. लाईये सामान दिजिये'' त्या आवाजातील अजिजी, त्या माणसाच्या चेहऱ्यावरचे लिनतेचे भाव, त्याचे पुढे झुकलेले शरीर पाहून तिला वाटलं, बग्गी गेली, रिक्शा आली, पण ह्या माणसाची मानसिकता बग्गीवाल्याचीच आहे अजूनही. नाही. इथं काही बदल झालेला नाही. बग्गी जाऊन ऍटोज् आल्या, गॅसबत्ती जाऊन टयूबलाईट आले, मोटा जाऊन इलेक्ट्रीक मोटर आली, बैलगाडया जाऊन

बसेस आल्या. बदल तर झालाच असला पाहिजे. पण बदलांना विरोध करणे हा तर माणसांचा स्वभावच. मग तो माणूस एक्स्प्लॉईटेड् असो वा एक्स्प्लॉईटर. प्रथम नैसर्गिक प्रतिक्रिया म्हणजे ओळखींचं जग बदलायला विरोधच. तिनं मुकाटयानं आपली सॅक त्याच्या ताब्यात दिली. मग रिक्शाकडे वळत ती म्हणाली, "जुन्या वाडयावर घ्या"

"जी. जी साबबहादूर' ' जुन्या वाडयाचा उल्लेख ऐकून रिक्शावाल्याचं शरीर अधिकच पुढे झुकलं असं वाटलं अजिताला. आपण इथं यायचा निर्णय घेतला हे योग्य केलं की नाही ह्याबद्दल तिच्या मनात प्रथमच शंका निर्माण झाली. पण आपल्याला जर पूजाला भेटायचे असेल तर इथं येण्याशिवाय पर्याय काय होता? आणि येथे काय आपण येथील जग बदलले असेल अशा आशेने आलो आहोत का? आपण आलो आजीला भेटायला. का? स्वत:लाच केलेल्या प्रश्नाचं उत्तर न देता तिनं रिक्शातून डोकं बाहेर काढून नजर भोवती

फिरवली. गर्द झाडीतून कच्च्या मातीच्या रस्त्यावरून रिक्शा चालली होती. नारळीची, फणसाची झाडे, आणि पिवळया, लाल फुलांची झुडपे. ह्या झाडांच्या गर्दीतून अधुन मधून दिसणारी भाताची खाचरं. अजिताने डोकं आत घेतलं. तिची नजर रिक्शावाल्याच्या पाठीवर रोखली गेली. भोवतालच्या विश्वातून येणारे गंधसुगंध तिच्या मनाचा तळ जणू अलगद ढवळून काढत होते. बालपणाच्या त्या आठवणीत आपल्याला रस नाहीये. ह्या वातावरणापासून, ह्या आठवणीपासूनच आपण पळून गेलो ना दूर. हे जूनाट संबंध बदलायचे स्वप्न मनात रुजवत. तिला वाटलं, आपल्या मनावर एक पुसट निराशेची छाया पडलीय आणि दाट होतेय.

एकाएकी रिक्शावाल्याने कर्कश हॉर्न वाजवला. अजिताने नजर उचलून समोर रस्त्याकडे पाहिलं, रस्ता रिकामाच होता. मग तिच्या लक्षात आलं, रिक्शा जुन्या वाडयापाशी पोचली होती आणि रिक्शावाला आपण येत असल्याचा इशारा वाडयातील प्रतिष्ठित साबबहादूर

लोकांना करून देत होता. रिक्शा थांबली, अजिता खाली उतरली, खिशात हात घालून काढलेली दहाची नोट तिनं रिक्शावाल्याच्या हातात दिली, रिक्शावाल्याने तिला लवून सलाम केला आणि आत ठेवलेली सॅक काढायला तो मागे वळला. अजिता वाडयाकडे वळली. रिक्शाच्या मागे मागे धावत आलेली, अंगावर केवळ सदरा चढवलेली तीन चार नागवी पोरं तिच्याकडे कुतूहलाने पाहात होती. वाडयाच्या चार पायऱ्या उतरून उभी झालेली एक वयस्क जाडजूड स्त्री तिच्याकडे पाहात होती. त्यांची नजरानजर झाली आणि अजिताच्या लक्षात आलं ती काकूच आहे, आणि तिच्या पाठीमागे वरच्या पायरीवर आहेत काका. पलिकडे वाडयातील नोकर माणसंही जमा झालीत. मात्र आजी कुठं दिसत नव्हती. तिच्या मनात शंका आली, आजीला काही..

"काकू, मी अजिता'' असं म्हणत ती पुढे झाली. "अगं, ये..ये'' असं म्हणत काका आणि "अरे तुला का

ओळखणार नाही मी बाये'' असं म्हणत काकू, दोघेही खाली आले.

बराच वेळ ती तसाच पडून राहिली. डोळे सताड उघडे ठेवून आढयाकडे पाहात. काकूने केलेले माशांचे चविष्ट कालवण तिनं मनापासून भरपूर खाल्लं होतं. जेवताना, आणि त्याच्या आधीही नेहमीच्या प्र्श्नांना उत्तरे देऊन झाली होती. जुन्या आठवणी काढून झाल्या होत्या. आईवडलाविना पोरकं झालेली ही पोर कशी भरकटली ह्याबद्दल खेदही व्यक्त करून झाला होता, आणि मरण्याच्या आधी तिचा संसार उभा झालेला बघायला मिळेल अशी आशाही व्यक्त करून झाली होती. तिनं आजीची चौकशी केली होती. आजी लवकर जेवण करून झोपली होती. रात्री तिला झोप येत नाही, म्हणून दुपारचं जेवण झाल्यावर ती झोपते अशी माहिती तिला देण्यात आली होती. तिनं तिला चहा प्यायल्या नंतर साडेचारच्या सुमारास भेटावे असं सुचवून, आजी काहीशी भ्रमिष्ठ झाली आहे, आणि कदाचित तुला

ओळखू शकणार नाही अशा प्रकारे तिला सावधही केलं गेलं होतं. आणि मग सगळे दुपारच्या सामिष जेवणानंतर येणाऱ्या सुस्तीच्या आणि झोपेच्या स्वाधीन झाले होते.

अजिताही पलंगावर जाऊन पडली होती. पण तिला झोप येण्याची शक्यताच नव्हती. आढ्याकडे पाहाताना तिला असं वाटायला लागलं, ह्या वाडयात येऊन आपल्याला कितीतरी दिवस झालेत आणि आता लवकरात लवकर येथून बाहेर सटकायला हवे. नाहीतर ह्या ओल्या हवेत, ह्या बुरसटलेल्या कोंदट वातावरणात आपल्या अंगावर बुरशी चढेल. तिनं परत एकदा घडयाळाकडे पाहिलं. अजून दोनच वाजत होते. चहाला अजून दोन अडीच तास अवकाश होता. ती उठून बसली. तिच्या मनात विचार येऊन गेला, काहीतरी वाचावं, आपल्याला लिहायचंय ते लिहावं. पण मनात आलेला विचार एखाद्या लहानशा बुडबुड्यासारखा काही क्षण तरंगत राहिला आणि मग हळूच फुटून

नाहीसाही झाला. ती उठली, तिने पेटीकोट आणि ब्लाऊजवर आपली ओढणीच साडीसारखी अंगाभोवती गुंडाळून घेतली, आणि पदर खांद्यावर टाकला. ती हळूच खोलीबाहेर, वाडयाबाहेर, वाडयाच्या आवाराबाहेर, भोवती असलेल्या नारळाच्या, पोफळीच्या झाडांच्या दाट सावलीतून बाहेर मोकळयावर आली. किनारा निर्मनुष्य होता. स्वच्छ उन्हात चमचमत्या रेतीचा रुंद पट्टा सागराची सीमा दाखवत, वळणे घेत लांब दोन्ही बाजूच्या क्षितिजांकडे गेला होता. सागराच्या लाटा कर्तव्यबुध्दीने सुस्त हालचाल करीत पुढे मागे होत होत्या. तिनं आकाशाकडे पाहिलं, क्षितीजावर दोन तीन ढग आडवे पसरले होते, आणि कुठेतरी एक पारवा थांबून थांबून घुमत होता. तिला वाटलं आपल्याला मोकळेपणी श्वासोश्वास घेता येत नाहीये. गुदमरतोय आपण मोकळया आकाशाखाली. तिनं मनाशी निर्णय घेतला, सकाळी आपण परत निघायचं, संध्याकाळी आजीला भेटायचं, पूजाचा शोध घ्यायचा. ती ह्या भागात तरी आहे की नाही कुणास

ठाऊक? पण आजची रात्र तरी कशी काढणार आपण? त्या काळवंडलेल्या आढ्याखाली त्या पलंगावर आपल्याला झोप येईल का? मग तिनं ठरवलं सागर किनाऱ्याने लांबचलांब भटकून यायचे, शरीराला इतके थकवायचे, झोप लागलीच पाहिजे. नाहीतर सर्व झोपल्यावर हळूच सॅक घेऊन जायचं वर, आकाशाखाली झोपायला. तिनं उजव्या हाताला पाहिलं, काही अंतरावर गावाच्या खुणा दिसत होत्या. तिनं त्या दिशेला पाठ फिरवली आणि ती उलटया दिशेला सागराच्या किनाऱ्याने वेगाने चालायला लागली.

ती परत वाडयात आली तेंव्हा काका चहा भूरकत ओसरीवर बसले होते. तिला येताना पाहून काकू आत गेल्या होत्या, ती येताच तिच्या हातात त्यांनी चहाची कपबशी दिली.

"का गं बाई, दुपारी तुला झोप घ्यायची सवंय नाही

वाटतं. नसणारच. तुम्हा शहरातल्या लोकांना कामाचं व्यसन लागलेलं असतं. बस्स. काम आणि काम. त्यापुढे खाणं, पिणं, झोपणं ह्या जगण्याच्या गरजाही दुय्यम. मग चाळीसाव्या वर्षीच रोग लागतात मागे. आम्ही पाहा. तुझी आजी पाहा. आज एकाण्णव उलटून गेलयं. अजून टुणटूणित आहे. आता वयोमानानूसार जरा हेकटपणा आलाय."

"हं काका, तेच मी विचारणार होते, आता उठली असेल ना? मी जाऊन येते तिच्याकडे."

"जरा घंटाभरानं जा. आता तिचा दरबार भरला असेल." काका म्हणाले.

"दरबार?"

"दरबारच म्हणा ना! आता ह्या वयात देवाचं नाव घ्यावं. जपजाप्य करावं. पण नाही. रोज संध्याकाळी

आजुबाजूच्या गावच्या बाया पोरं जमा होतात, कुठं काय झालं, कोणाचं कुणाशी लग्न झालं, कोण जमीन विकतंय, गावात कोण नवीन आलंय. भोवतालच्या पंचक्रोशीतल्या सर्व भानगडी चर्चिल्या जातात येथे." काका उद्वेगाने म्हणाले.

"पण अशा गावगप्पा करायला रोज येतात बाया तिच्याकडे?'' अजिताने विचारले. तिच्या मनातील आजीची प्रतिमा वेगळीच होती. ह्या घरावर ती सत्ता गाजवत होती. वीस पंचवीस माणसांच्या भरलेल्या घरात राणीसारखी वावरत होती. हे खरं आहे आता ह्या घरात आहेच कोण? काका, काकू, काकूंची आश्रीत बहिण, जुने दोन नोकर.

"ह्याचं बोलणं म्हणजे जरा टोकाचंच बरं का?" काकू हळूच म्हणाल्या, "अगं अजिता, आमच्या सासूबाईच्या हाातात गुण आहे, पोरासोरांना, बायाबापडयांना काय काय होत असतं, सासूबाई त्यांना कसल्या त्या

साखरेच्या गोळया देतात. शिवाय वाणी गोड आहे. सास्वा, सूना, बाप, लेक आपल्या घरातील तक्रारी सांगायला येतात. सल्लामसलत करायला येतात."

"लोकांना काय, आपली रडगाणी ऐकायला कुणी हवंच असतं. आणि तुझ्या आजीला चांभार चौकशा करायची हौस." काका जरा त्राग्याने म्हणाले.

"आजीला जडीबुट्टी माहीत असेल. पण होमिओपाथीच्या गोळया कशा देते ती?"

"अगं बाई, ती एक रामकहाणीचं आहे' ' काकांनी सुरुवात केली, पण काकूने त्यांना मध्येच तोडले, "तुम्ही काही बोलू नका. मी सांगते काय झालं. तुला माहीतच आहे. तुझ्या वडीलांनी तर आयुष्य सर्व परदेशातच काढले. जाऊबाई होत्या, तुम्ही मुलं होता. घर भरलेलं होतं. मग तुझे आजोबाही गेले. सासूबाईंना हे रिकामं मोठं घर अगदी खायला यायचं. मग त्यांनी

आपलं बिऱ्हाड मागल्या छोट्या घरात हलवलं. सीताबाईला बरोबर घेऊन गेल्या. ती बापडी त्यांची सर्व काळजी घेते. तेंव्हा त्याचं वय असेल एैंशीच्या पुढे. पण नजर तरीही चांगली होती. आरशी न लावता वाचता येत होतं. गावातल्या रूस्तूम पारशाची आपल्या घरी ये जा होती, तूला आठवत असेल. आजोबांचा खास मित्र. तो ह्या साखरेच्या गोळया द्यायचा लोकांना. आजीनी त्या वयात त्याच्याकडची बुकं वाचली. तुझ्या काकाचं काहीही मत असो, मला बापडीला वाटतं, सासूबाईनी चांगलंच केलं. आणि आम्हाला त्यांचा बिलकूल त्रास नाही, कधी तक्रार नाही, कधी वाद नाही. आपलं जीवन जगतात त्या. "

हा काका काझ्ूंच्चा नेहमीचा वादाचा मुद्दा असावा. कारण काकू बोलत असताना काका उठून पायऱ्याशी जाऊन उभे राहिले होते. काकूच्या बोलण्याला जरा विराम मिळताच, "मी जरा बागेकडे चक्कर टाकून येतो. तू ये जाऊन आईकडे. मी बघतो ह्या आळशांनी

काही केलंय का? का गेले ताडीच्या दुकानात? फार माजोर झालेत हे लोक हल्ली. सरकारनं लाडवून ठेवलंय त्यांना. कामं करायला नकोत आणि कायदा दाखवतात' 'काका कोणावर चिडले होते कुणास ठाऊक. पण संतापाने फणफणत ते पायऱ्या उतरून चालायला लागले.

" काकू, हल्ली पूजा कुठे असते, काही माहिती आहे का गं?"

' ' पूजा. तिच्या नवऱ्याची बदली झाली तिकडे कलकत्त्याला का दिल्लीला कुठे. इकडे तिचे वडीलही गेले. मग आई गेली तिच्याच बरोबर. मला मेलीला एवढीच माहिती आहे. कागं, तुम्ही काही संबंधच नाही का गं ठेवलेला. कशा गं पोरी तुम्ही. पण सासूबाईना माहीत असेल बघ, ती कुठं ते. तिच्या आईला घेऊन आली होती, दोनेक वर्षापूर्वी. भेटायला आली होती वाडयावर."

अजिता उठली, वाडयाला चक्कर मारून मागच्या घराकडे वळली. वाडयाच्या पाठीमागे हे तीन चार खोल्यांचे घर बहुधा दिवाणजींकरता बांधलं गेलं असावं. कुळकायदा झाला, सर्व जमिनी गेल्या, दिवाणजीही गेले. मग हे घर तसं रिकामंच होतं. घरासमोर आली तशी तिला बाहेरच्या व्हरांडयात खुर्चीवर बसलेली आजी दिसली. तिच्या पुढयात सतरंजीवर दोनतीन बाया बसल्या होत्या. खुर्ची साधीच होती, पण अजिताला वाटलं, जमिनदारीणबाई आपल्या सिंहासनावर बसल्या आहेत, समोर अडाणी शेतकरी बाया. रयत. किंचित घोटाळली ती.

"ये गं...ये गं..माझ्या बायो. आता वेळ मिळाला का तुला पोरी?'' मग समोरच्या बायांकडे वळत आजी म्हणाली, "बरं जास्मीन, ये आता. माझी नात आलीय, म्हातारीला भेटायला."

अजिता पुढे सरकली, तिनं झुकून आजीच्या पायाला

स्पर्श केला. तिच्या डोक्यावर हात ठेवत आजी उठली, म्हणाली, "चल, आत जाऊया."

"आज्ये, दुपारी काकूच्या हातचं माशाचं जेवण खाल्लं, मग फिरायला गेल्ये होते."

"हो, रेक्सनं पाहिलं तूला. पण सकाळीच आलीस तू. जदूनं सोडलं तूला रिक्शानं. आणि आजीकडे यायला संध्याकाळ झाली तूला"

"नाही, काका म्हणाले, तुझ्याकडे लोक येतात खूप...." अजिताने आपलं वाक्य अर्धवटच सोडलं.

"हं, माझा दरबार म्हणून हिणवलं असेल त्यानं. पण त्याला नाही कळायचं आमचं नातं. अगं ह्या लोकांच्या जीवावरच सुखाचं जगलं ना रे हे घर. त्यांचं भलंबुरं आपण नाही पाहाणार तर कोण पाहाणार? मला वाटतं, माझं कामच आहे हे. ह्या नारायणला काही

उमजत नाही हे. नेहमी कामं करत नाहीत, आळशी आहेत म्हणून शिव्या घालत असतो. अरे बाबा, माणसं जोडावी लागतात, प्रेमानं, जिव्हाळयानं. पैशे जास्त देवून काय माणसं मन लावून काम करतात. पण ते जाऊ दे. सीताबाई, अजिताकरता ते खारे काजू ठेवलेत ना, घेऊन ये. पूजाला कधी भेटली होतीस बाई? ती बिचारी तुझी आठवण काढत होती. अरे जात्या, आपल्या माणसांशी संबंध जपून राखावे, असे तोडायचे कशाला?"

"तोडले नाहीत आज्ये. तुटले." तिनं खाकरून घसा साफ केला होता, पण तिचा घसा दाटून आला होता. आज कितीतरी वर्षांनी ती आजीला 'जात्या' नावाने हाक घालताना ऐकत होती. 'पण मी जाणार आहे, ह्या दोन चार दिवसात तिला भेटायला. तिचा पत्ता आहे तुझ्याकडे?"

आजी पलंगावरून उठली, भिंतीतल्या

कोनाडयात काही पुस्तकं, वह्या पडल्या होत्या. वरच पडलेला एक चतकोर कागदाचा तुकडा तिने तिच्यापुढे केला, म्हणाली, "तू आल्याचं कळल्यावर काढूनच ठेवला होता."

अजिताने कागदाचा तुकडा घेतला, त्यावरील पूजाचं अक्षर तिनं ताबडतोब ओळखलं. खिशातील डायरी बाहेर काढत ती म्हणाली, "पत्ता लिहून घेते मी."

"घेऊन जा गं बाये तू. पोर म्हणाली, आज्ये, पत्ता ठेवलाय, पत्र लिही. मलाही माहीत होतं आणि तिलाही. पोरीनं पत्ता ठेवला तो तुझ्याकरता. काही गोष्टी बोलायचा नसतात. जात्या, समजणाऱ्याने समजून घ्यायचा असतात. सांगणाऱ्याने सांगायचा नसतात."

प्रकरण तेरावे

अजिता एक दिवस आधीच परतली होती. स्टेशनवरून सरळ घरी परतण्याच्या ऐवजी चाणाक्य सोसायटीत जाऊन तिने टपालपेटीतील पत्र ताब्यात घेतलं होतं घरी आल्याबरोबर अजिताने पत्र बघितले. एमजीने तिला एन पॉईंटवर दुसऱ्या दिवशी दुपारच्या दिवशी बोलावले होते, आणि त्या दिवशी येऊ न शकल्यास तिसऱ्या दिवशी सकाळी यावे अशीही पुस्ती होती. शासनाने झोपडपट्ट्यांचे निर्मुलन करण्याची महत्त्वाकांक्षी आणि मध्यमवर्गीय लोकांना संतुष्ट करणारी योजना जाहीर करून झोपडपट्ट्या उठवल्या होत्या आणि शहराची सर्व घाण वाहून नेणाऱ्या एके काळी नदीचं रूप असलेल्या आणि आता नावापुरतीच नदी असलेल्या गटारगंगेच्या काठी एक एक खोल्यांच्या ह्या चाळी बांधल्या होत्या. बऱ्याच वर्षांपूर्वी काही जुन्या कॉम्रेडस्नी येथील लोकांना संघटीत करून झोपडपट्टी संघ स्थापन करून लोकांच्या समस्या सोडवण्याचे प्रयत्न केले होते. काही मर्यादित प्रमाणात त्यांना यशही आले होते. परंतु पोलीसांपासून

संरक्षण मिळण्याकरता गुन्हेगारांकडून झोपडपट्टी संघाचा उपयोग केला जात आहे असं आढळून आल्याने, आणि अन्य इतर कारणांनी हे काम ठप्प झाले होते. तसा एसजी ग्रुपचा ह्या कामाशी काही संबंध नव्हता. परंतु येथील जागेचा त्यांना उपयोग करता येत होता.

अजिता ह्या चाळींमधील खोलीवर पोचली तेव्हा एमजी तिच्या आधीच तेथे पोचला होता. चाळीतील खालच्या मजल्यावर बहुतेक खोल्यांतून वेगवेगळे व्यवसाय चालत होते. त्यामुळे त्या चाळीमध्ये लोकांची इतकी ये जा होती की, कुणी त्यांच्या येण्याची दखलही घेतली नाही. एमजीने तिचे स्वागत केले आणि ताबडतोब त्याने आपली खांद्यावरील छोटीशी बॅग काढून त्यामधून प्रथम दर्शनी टिव्ही चा रिमोट वाटेल अशी वस्तू काढून तिच्यापुढे केली. "ही फारच सुंदर चीज आहे अजिता. एसजीने कुठून ही चीज पैदा केली माहीत नाही. बनावट तर निश्चितच परदेशाची आहे. किती सोयीची वस्तू आहे ना. टिव्हीसमोर

टीपॉयवर ठेवलेली असेल तर कुणाला संशयही येणार नाही. ब्युटीफूल.

हे बघ. ह्याकरता आम्ही एक खास पट्टा तयार केला आहे. तू काय करायचंस की ही वस्तू तुझ्या मांडीवर आतल्या बाजूस येईल अशा रितीने पट्ट्टा बांधायचा. ते स्पिन्डीलिऑसीसचे पेशंटस् कमरेला पट्टा बांधतात ना तसा हा पट्टा असेल. आणि हा बाँब तुझ्या मांडयांच्या मध्ये असल्यामुळे कुणी हात लावून तपासणी केली तरी त्यांनाही पत्ता लागणार नाही. कदाचित चालताना तुला जरा विचित्र वाटेल पण त्यासाठीच आपण आधीपासून काळजी घेत आहोत. हे बघ ह्या बाँबच्याच आकाराची ही बॉक्स मी तयार केली आहे, ती घालून हा पट्टा काही दिवस वापरलास ना, तर तुझ्या शरीरालाही सवंय होईल. हा बाँब मी घेऊन जातो, कॉन्फरन्स सुरू झाल्यावर योग्य वेळी तो तुझ्या स्वाधीन करण्यात येईल. त्याचवेळी तो ऍक्टीव्ह कसा करायचा हे ही सांगितले जाईल. ओके? "

एमजीने दीर्घ निश्वास टाकला. सहज स्वरात नेहमीप्रमाणे बोलण्याचा त्याने प्रयत्न केला होता. पण त्याला हा विषय संपवण्याची घाई झालो होती आणि म्हणूनच ठरवून आल्याप्रमाणे एका दमात त्याने अजिताला सर्व माहिती सांगून टाकली होती. एखाद्याला आपण जहाल विष आणून दिलं आणि त्याचा परिणामकारक उपयोग होण्यासाठी त्यानं ते कशा पध्दतीने घ्यावे हे सांगताना काय वाटेल? एमजीची मानसिकता अजिता समजू शकत होती. एमजी कसबी कारागीर होता, लेथवर उभा झाला म्हणजे एखाद्या जादूगाराप्रमाणे हातातील धातूच्या तुकडयाला पाहिजे तो आकार देऊ शकत असे.

"ओके. ओके" अजिताने त्याला उत्तर दिले, "माझ्या सर्व लक्षात आलं. फक्त एकच प्रश्न आहे. ह्याचं प्रभावक्षेत्र किती आहे? मला वाटतं ह्याचं प्रभावक्षेत्र मर्यादित असेल तर फारच योग्य होईल. निष्कारण निरपराधी, काहीही संबंध नसलेल्या सामान्य

माणसांच्या मृत्यूला आपण कारणीभूत होऊ नये असं वाटत मला."

"म्हणून तर मी ह्याला ब्युटिफूल म्हटलं. म्हणून तर मी जीएसचं कौतूक केलं. सीसीने ह्या सर्व गोष्टीचा विचार केला आहे. ह्याच प्र्भावक्षेत्र् अगदी मर्यादित आहे. ज्याची शिकार आपल्याला करायची आहे ना, त्या व्यक्तीला तुला मिठीतच घ्यावं लागेल बघ. आणि टाईमिंग. . . टाईमिंगला फार महत्त्व आहे. इग्नाईट केल्यावर जास्तीतजास्त साठ सेंकदात आणि कमितकमी पाच सेकंदात बॉम्बचा स्फोट होईल असे ह्यात मेकॅनिझम केले आहे. तुला किती अंतर जावे लागेल, त्याला किती वेळ लागेल ह्याचा निश्चित अंदाज तूला घ्यावा लागेल. नाहीतर उगाचच त्या व्यक्तीला जास्तवेळ मिठीत घेऊन बसावं लागेल सर्व जनतेसमोर. किंवा तुझ्या मिठीत यायला तो तयार नसेल आणि तो पळायला लागला तर पाठलाग करून त्याला मिठीत घेणं म्हणजे अशक्यच.'' तो हसू लागला, आणि मध्येच

त्यानं हसणं गच्‌चकन्‌ थांबवलं. त्याचा चेहरा गोरामोरा झाला, मग शरमेनं काळवंडला, त्याचे ओठ थरथरू लागले.

एमजी साध्या सरळ स्वभावाचा माणूस आहे, हा गटामध्ये कसा आला असेल? अजिताला त्याच्याबद्दल कणव आली, त्याच्या खांद्यावर हात ठेवून थोपटत ती म्हणाली, "एमजी. समज सर्व आवश्यक मटेरियल तुला उपलब्ध करून दिलं तर तू अशी सुंदर वस्तू तुमच्या वर्कशॉपमध्ये तयार करू शकशील?"

एमजी काही क्षण पाणावलेल्या डोळयांनी तिच्याकडे पाहात राहिला, जणू अजिता काय म्हणत आहे ते त्याच्या लक्षात येत नव्हते. मग त्याचे डोळे चकाकले, "का नाही करता येणार? जरुर येईल. खरं तर आपल्या मशीनटुल्सवर अशी वस्तू तयार करणं म्हणजे आव्हानच एक प्रकारचे. पण पुरेसा वेळ आणि उर्जा दिली तर मला नाही वाटत हे अशक्य आहे. पण

त्याकरता एखादा पीस खोलावा लागेल आणि त्याकरता असा पीस कुठून मिळेल? पण तरी मी कागदावर ह्याचं डिझाईन करायला सुरुवात केली आहे. बघूया. पण ही चीज. म्हणजे चीजच आहे अजिता." आपण कशाबद्दल कुणाशी बोलतोय ह्याची त्याला परत एकदा जाणीव झाली आणि त्याने आपले ओठ एकदम घट्ट मिटले.

कॉम्प्युटर समोर बसून स्क्रीनवरील स्क्रीन सेव्हरची विविध रंगांची, विविध आकारांची सातत्याने बदलती डिझाइन्स पाहात असलेल्या अजिताला आजीचं ते वाक्य आठवत होतं. त्या वाक्याला खास अर्थ होता का? आज्येचा निरोप घ्यायला म्हणून अजिता गेली होती त्यावेळी आजी जे बोलली होती त्यावरून तिला तसं वाटलं होतं. ती सकाळी खांद्यावरची सॅक सांभाळत गेली आज्येकडे गेली होती, तेव्हा आज्येने थरथरत्या हातांनी तिचं डोकं धरून तिच्या डोक्यावर आपले ओठ टेकले होते, घोगऱ्या आवाजात ती म्हणाली होती, तू

कुठे निघालीस मी विचारत नाही जात्या. पण तूला आपल्या आज्येची भेट घ्यावीशी वाटली. . ह्यात सगळं पावलं.'' तिनं वर नजर करून आज्येच्या चेहऱ्याकडे पाहिले तेंव्हा तिच्या डोळयातील अश्रू गालांवरील अनेक सुरुकुत्यांच्या अनेक वाटांनी खाली घसरत होते.

गावाकडे जाताना तिला वाटलं होतं, पूजा गावाकडेच जवळपास कुठं तरी असेल. पण ती दिल्लीला आहे असं म्हटल्यावर तिनं ठरवलं होतं, घरी परतायचं, शिल्लक कामं उरकायची, पूजाला आपण येत असल्याचा निरोप द्यायचा, पीकेशी, सुन्याशी आणि अनिता असली तर तिच्याशी बोलायचं, अन् मगच दिल्लीकडे जायचं. आल्या आल्या तिनं पूजाकडे फोन केला होता, तिच्या अंदाजाप्रमाणे तो कॉन्टॅक्ट नंबर होता, तिने तेथील बाईला ती येत असल्याची खबर पूजाला द्यायची विनंती केली होती आणि दिल्लीला पोचल्यावर परत फोन करते असंही सांगितलं होतं.

घरातील प्रत्येक कागदपत्र तपासून त्यांची नीट विल्हेवाट लावण्याचे काम करूनच तिनं पुढे जावे असे पीकेने एमजीच्या हस्ते दिलेल्या सूचनांमध्ये सांगितले होते. प्रत्यक्ष बोलण्यासाठी वेळ आणि फोन नंबरही दिला होता. अजिताने दिल्लीहून आल्यावर आपण एक दिवस ते काम करणार आहोत असं सांगण्याचा प्रयत्न केला, पण तिला मध्येच तोडत पीकेने बजावले होते, "नाही अजिता. आजच आणि लवकरात लवकर घर स्वच्छ कर. बिलकूल कचरा राहू देऊ नकोस." पीकेनं गंभीर आणि काहीशा हुकूमी स्वरात तिला सांगितले होते. त्याचा स्वर ऐकून अजिता वैतागली होती. पण तरीही सर्व दुपार तिने घराची साफसफाई करण्यात घालवली होती. किचनमधील भांडी ठेवण्याच्या शेल्फपासून सुरूवात करून तिनं तीन्ही खोल्यांतील सर्व जागा आवरून काढली होती. आपल्या जून्या डायऱ्या, टिपणं, वेगवेगळया लेखांच्या झेरॉक्स प्रती.. सर्व सामान तिनं एका बॅगेत घालून ठेवलं होतं. आणि ही बॅग ती सकाळी दिल्लीकरता गाडीत बसण्याआधी

क्लोकरूममध्ये ठेवून जाणार होती. कारण आताच हे सामान आपल्या बहिणीकडे पाठवयाला तिला वेळ नव्हता.

तिनं घड्याळाकडे पाहिलं. अजून बारा वाजले नव्हते. पण तरीही तिनं इंटरनेटला कनेक्ट होण्यासाठी सर्व्हर कॉम्प्युटरचा टेलिफोन नंबर टाईप केला. अजितानं फारसा कुणाला आपला ई-मेल ॲड्रेस दिलेला नव्हता. हा ई-मेल ॲड्रेस केवळ पक्षातील काही खास लोकांनाच माहीत होता. दुसरा हॉट डॉट कॉमचा पत्त्यावर आलेल्या ई-मेल ती सायबर कॅफेमध्ये जाऊनच तपासत असे. त्यामुळे ह्या खास पत्त्यावर काही ई-मेल येण्याची शक्यताच नव्हती. पण तरीही युडोरा प्रोग्रॅम उघडून तिनं 'चेक मेल' कमांड दिली. आपल्याकरता एक ई-मेल आलेला आहे हे पाहून ती काहीशी गोंधळातच पडली, आणि प्रत्यक्ष ई-मेल च्या मजकूरावर नजर टाकल्यावर तर ती चक्रावलीच. तिनं प्रथम इंटरनेट कनेक्शन डिसकनेक्ट केले. प्रिन्टर ऑन

करून तिनं ह्या ई-मेल ची प्रीन्ट आऊट कॉपी काढली. त्यानंतर तिनं ई-मेल डिलीट केला. प्रिन्टेड कॉपीवर सेन्डरचा ई-मेल ॲड्रेस आहे अशी खात्री करून युडोराच्या ॲड्रेस लिस्टमध्ये आपोआप गेलेला ॲड्रेसही तिने डिलीट केला. जॉनशी किंवा इतर कुणाशी इंटरनेटवर गप्पा मारण्याचा विचार तिच्या मनातून साफ नाहीसा झाला होता. कॉम्प्युटर बंद करून तिने टेबल लॅम्प लावला, आणि तिनं प्रिंटेड ई-मेल सावकाश, एक एक शब्द काळजीपूर्वक वाचला.

ई-मेलमधील मजकूर वाचून तिच्या मन गोंधळले तर होतेच, पण तिच्या मनात काहीसा भितीच्या भावनेचा उद्भवही झाला होता. पीकेने तिला घर साफ करण्याची जी सूचना दिली होती, त्या सूचनेला काही वेगळाच अर्थ आहे का अशी शंका तिच्या मनात यावयास लागली होती. तिनं घडयाळात पाहिलं. एकला दहा मिनिटं कमी होती. तिची गाडी पहाटे सव्वा पाचला होती. खरं तर तिनं सकाळी चारला उठून स्टेशनवर

जायचं ठरवलं होतं. पण तिनं ताबडतोब घरातून बाहेर पडायचं ठरवलं. सकाळी आल्यावर कॉटजवळ स्टूलावर ठेवलेली सॅक तिनं उघडली, त्यातील जुने वापरलेले कपडे तिने काढून टाकले, कपाटातून धोब्याकडून आलेले कपडे तिने सॅकमध्ये भरले. पॅन्ट चढवण्यापूर्वी तिनं एमजीने दिलेला बेल्ट मांडीभोवती बसवला. वर खाली करून तिनं बेल्ट ॲड़जेस्ट केला. तिनं थोडं चालून पाहिलं. तिच्या मांडयांमधील मोकळया जागेत ती चौकोनी चपटी पेटी बरोबर बसत होती. चालताना तिचा होणारा वेगळा स्पर्श जाणवत होता. नवीन जीवाला ह्या जगात आणण्याची आणि जीवाला ह्या जगातून बाहेर घालवण्याची क्षमता असलेली दोन्ही टू◌्ल्स जवळ जवळ आहेत असा विचार तिच्या मनात येऊन ती काही क्षण स्तभितच झाली. मी गौरी, मी काली. ती स्वत:शीच हसली. ती तयार झाली, कुलूप हातात घेतल्यावर तिला आपल्या डायऱ्या, टिपणं ठेवलेल्या बॅगेची आठवण झाली. आता ह्यावेळी रेल्वेचे क्लॉकरूम बंदच असणार असा विचार मनात येऊनही

तिनं ती बॅगही बरोबर घेतली. पाठीवर सॅक आणि हातात बॅग घेऊन कुलूप लावून ती बाहेर पडली. ही सिनेमे सुटण्याची वेळ, कोपऱ्यावरील चौकात रिक्शा सहज मिळतील हे तिला माहित होते. कदाचित ह्या ई-मेलचा आपण पीकेच्या सूचनेशी विनाकारणच संबंध जोडत असू. कदाचित आपण ह्या ई-मेलला विनाकारणच महत्त्व देत असू. तिला रिक्शा ताबडतोबीने मिळाली. ती स्टेशनवर पोचली तेंव्हा तिला क्लॉक रूम चालू असल्याचे दिसले. आपली बॅग क्लार्ककडे सोपवताना अजिताने आता ह्यावेळीही क्लॉकरूम उघडी असल्याबाबत आश्यर्य व्यक्त केले तेंव्हा छोटया लाईनवर जाताना अनेक प्रवासी आपले सामान ठेवून जातात, त्या लाईनवरची गाडी आता परत येत असल्याने त्या प्रवाशांकरता क्लॉक रूम ह्यावेळी काही वेळ उघडी ठेवायची पध्दत असल्याचे त्याने सांगितले. बॅग क्लार्कच्या स्वाधीन करून गरमागरम चहाचा कप घसात रिकामा करून प्लॅटफॉर्मवरील बाकावर ती आरामात बसली.

ई-मेल अर्थातच इंग्लीश भाषेत होती, पण वाक्यरचनेवरून इंग्लीश ही पत्रलेखकाची मातृभाषा नसावी हे स्पष्ट जाणवत होते. एवढेच नव्हे ही भाषा लिहिण्याची त्या व्यक्तीला सवंयही नसावी हे स्पष्ट कळत होते. त्यातून ह्या अज्ञात लेखकाने त्याला जे सांगायचे आहे ते सरळ स्पष्ट न लिहिता सांकेतिक शब्द वापरून लिहिण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळे तर मजकूर अधिकच गुंतागुंतीचा आणि दुर्बोध झाल्यासारखा वाटत होता. मजकूराशी संबंधित नसलेल्या कुणीही हे पत्र वाचले तर त्या व्यक्तीला हे पत्र कुणीतरी फिरकी घेण्यासाठी लिहिलेले असावे, किंवा कोणातरी यडया माणसानं ते लिहिले असावे असे वाटले असते. पण अजिताकरता तो मजकूर निरर्थक नव्हता आणि आता त्याचा प्रत्येक शब्द तिच्या मेंदूच्या पाटीवर कोरला गेला होता. त्या पत्रलेखकानं लिहिले होते,

'रॉबींग इज माय हॉबी. बट धिस हॉबी इज नॉट

सेन्सलेस. आय ब्रोक अ लॉक ऑफ स्टार टूल मेकर हु इज मेंबर ऑफ वॉच मेकर्स ग्रुप. इन द कबर्ड इज अ लेटर. लेटर मेन्शन्स दॅट ही हॅज फॉऊंड सम रिसर्चर्स हु आर रेडी टू डिस्कव्हर टेकनि टू वाईप ऑफ द डीएम स्टेन्स. आय गेस, रिसर्चर्स हॅव सम सेन्स बट डोन्ट नो फॉर हुम दे आर वझर्िोंच्ग. आय गेस, द रिसर्चर्स आर माय कलिग ऍन्ड सो धीस लेटर. इफ धीस डझ् नॉट मेक एनी सेन्स, वाईप इट ऑल, ऑर स्पीक टू मी. विझ.

पत्रलेखकाला काय म्हणायचं आहे ते समजून घ्यायला तिला बराच वेळ लागला होता. प्रत्येक शब्दाशी तिला झगडावे लागले होते. प्रथम तर काहीच अर्थबोध झाला नव्हता. पण मग तिच्या लक्षात आलं पत्रलेखक स्वत:ला विझ म्हणवत होता. हल्ली कॉम्प्युटर तंत्रात जे असामान्य तज्ञ असतात, अशा तरुण पोरांना कॉम्प्युटर विझ म्हटले जाते. आणि असे विझच कॉम्प्युटर हॅकर्स असतात. म्हणजे पत्रलेखक

हॅकर होता. हॅकर म्हणजे असा कॉम्प्युटरमधील कीडा की, ज्याला कोणाच्याही कॉम्प्युटरच्या पासवर्डचा अडथळा क्रॉस करून त्यातील इन्फॉर्मेशनपर्यंत पोचण्याचं कौशल्य असतं, शौक असतो. लिहिणारा हॅकर आहे असं लक्षात आल्याबरोबर बऱ्याच गोष्टींचा अर्थ लागला होता. 'आणि ह्या त्याच्या शौकाला एक सेन्स होता. . एक विचार होता..एक विचारप्रणाली होती. ह्या हॅकरने घडयाळं बनवणारा देश (वॉच मेकर्स ग्रुप) म्हणून प्रसिध्द असलेल्या स्वित्झर्लंडमधील एका शस्त्रात्रं बनवणाऱ्या कंपनीच्या कॉम्प्युटरमध्ये प्रवेश करण्यात यश मिळवले होते. तेथे कंपनीला एका देशातून आलेल्या पत्रात असे म्हटले होते की, एका ऍक्टीव्ह ग्रुपवर डीएमचे डाग क्लीन करण्याचे तंत्र शोधून काढण्याची, म्हणजे डीएमला नष्ट करण्याची जबाबदारी देण्यात यश आले आहे. मला असं वाटतं की एक विचारसरणी मानणाऱ्या ह्या ग्रुपला आपण काय करतो आहोत आणि कुणाकरता करत आहोत ह्याची माहिती नाही म्हणून हे पत्र. ह्या पत्रातून काही अर्थ

निघत नसेल तर सर्व काही पुसून टाका, नाहीतर माझ्याशी संपर्क साधा. विझ.

अजिताला पत्र निरर्थक वाटत नव्हतं. पत्राचा अर्थ तिला समजत होता. बहुतेक सर्व मजकूर तिला समजला होता. पण टूलमेकर्सला स्टार विशेषण का लावलं आहे? स्टार म्हणजे सुप्रसिध्द, झगमगतं व्यक्तिमत्व. जसा स्टार ऍट्रॅक्शन हा शब्द आहे. शस्त्रास्त्रे तयार करणाऱ्या कंपनीची स्टार प्रतिमा कशी असू शकते? ह्याचा काही वेगळा अर्थ आहे का? ह्याशिवाय काही प्रश्न निर्माण झाले होते. एक तर डीएमचा अर्थ डिफेन्स मिनिस्टर असा घेतला तर इथं काहीतरी चूक असावी असं अजिताला वाटत होतं. तिच्या मताप्रमाणे पीएमला ऍनिहिलेट करण्याचा निर्णय घेतला जाण्याची शक्यता होती. दुसरा प्रश्न हा आहे की, अजिताचा ई-मेल ऍड्रेस ह्या पत्रलेखकाला त्या कंपनीच्या कॉम्प्युटरमध्ये मिळाला असेल तर तो तेथे का असावा व कसा पोचला असावा? आपला हा ई-मेल

ॲड्रेस कोणाकोणाला दिला होता, आणि कुणाकडून तो ह्या कंपनीला पत्र लिहिणाऱ्याकडे गेला असावा ह्याचा ती विचार करत होती. सीसीमध्येच कुणी दगाबाज घुसला आहे का? का ह्या कंपनीकडून अस्त्रे मिळवण्याकरता एसजीनेच ही माहिती कंपनीला पुरवली असावी? एमजीने परदेशी बनावटीचा बॉंब दाखवला होता तो ह्या कंपनीकडूनच आला असावा का? पक्षाला मिळणाऱ्या शस्त्रांच्या बदल्यात डीएमच ला वाईप ऑफ करण्याची सुपारी आपल्या गटाने घेतली आहे का? ह्या कपंनीचा डीएमला नष्ट करण्यात काय हेतू असावा?

का कुणी खरोखरच आपली फिरकी घेत आहे? का सीसी मधीलच कुणी आपली फिरकी घेत आहे. का आपला कुणी राइव्हल पक्षामध्ये गोंधळ उडवण्यासाठी हे करत आहे? का सी.बी.आय. किंवा रॉ मधील कुणाचा हा उद्योग आहे? एक एक शक्यता तपासायला हवी. दिल्लीला जाण्याऐवजी येथेच थांबून एसेनला गाठून

त्याचा सल्ला घ्यावा का? का पीकेला गाठून विचारावे. का प्रा. नायरना भेटावे? पण आपल्याला असा ई-मेल आलाय, ह्यावरच त्यांचा विश्वास बसला नाही तर? विचार करून करून तिचं डोकं ठणकायला लागलं. तिनं ठरवलं, दिल्लीला जायचं, तेथे कुणाला तरी भेटूय◌ा. कुणातरी शस्त्रास्त्र विषयातील तज्ज्ञ. पक्षाचा कुणी सहानुभूतीदार पत्रकार! मग परत येऊन एसेनला गाठायचं, किंवा तोपर्यंत कुणाची शिकार करायची आहे ह्याबाबत निश्चित माहिती कळेल आणि त्यात डीएमचा संबंधच काही नसेल तर ह्या पत्राला काही अर्थ नाही असं ठरेल. पण माझं मन सांगतेय, हे पत्र निरर्थक नाही. ह्या पत्राला अर्थ आहे. हा पत्रलेखक चांगल्या हेतूने मदत करण्याचा प्रयत्न करतोय. मदतीचा हात पुढे करतोय. एकाएकी आपण खूप थकलोय अशी तीव्र भावना तिला झाली. डोळे मिटून तिनं बाकाच्या मागे असलेल्या भिंतीला डोकं टेकवलं. गाडीला अजून तासभर वेळ होता.

प्रकरण चौदावे

त्या अलिशान हॉटेलच्या पोऱ्यानं खोली उघडून तिचं सामान ठेवलं आणि सलाम मारून तो बाहेर पडल्याबरोबर तिनं फोन उचलला. पूजाच्या कॉन्टॅक्ट फोनवर आपण असलेल्या हॉटेलचे नाव व फोन नंबर देऊन तिनं आपण दुपारी एक वाजेनंतर हॉटेलमध्ये असल्याचा निरोप दिला. सॅकमधून टॉवेल काढून ती बाथरूममध्ये शिरली. शॉवरमधून गरम पाणी येतेय अशी खात्री करून ती गरम पाण्याच्या फवाऱ्यात घुसली. ती इतका वेळ त्या गरम पाण्याच्या फवाऱ्याखाली भिजत राहिली की, तिच्या शरीरात आणि मेंदूत एक मस्त सुस्तीची भावना निर्माण झाली. ती बाहेर आली, घडयाळावर तिनं नजर टाकली. सकाळचे साडेआठ वाजत आले होते, तिनं हॉटेल सर्व्हिसला रिंग देऊन आपल्याला साडेबारा उठवावे असा

निरोप देऊन पर्समधून झोपेची गोळी काढली, आणि पाण्याच्या एकाच घोटाबरोबर ती घशातून खाली लोटून तिनं आपलं शरीर मऊ मऊ गादीवर लोटून दिलं.

ती जागी झाली घंटीच्या आवाजाने. काही क्षण तिला समजे ना, घंटी कुठली वाजतेय, दाराची की टेलिफोनची. मग तिनं टेलिफोन उचलला आणि उत्तर दिलं, "हां, अॉपरेटर. मी उठलेय. थँक्यू." असं म्हणून ती हँडसेट खाली ठेवणारच होता, तोच ऑपरेटर घाईघाईत म्हणाला, "मॅडम, एक मेसेज आपके लियॆ. मिसेस पूजाको आपका मेसेज मिल गया है। वो यहाँ पहुंचतेही आपको कॉन्टॅक्ट करेगी। "

तिनं घडयाळात पाहिलं, बारा चाळीस झाले होते. ऑपरेटरने जरा उशिराच उठवलं होतं. ती उठून परत बाथरूममध्ये घुसली, आरशासमोर उभी राहिली.

सलवार घालून ती अंगावर कुडता चढवून ती बटणंच लावत होती, तोच फोन खणाणला, तिनं फोन उचलला, पूजाचा ओळखीचा आवाज - "हाय जितू, तू तयार होऊन खाली ये. मी डायनिंग हॉलमध्ये आहे आणि माझ्या आवडीप्रमाणे तूला आज जेवावं लागेल."

अजिता हसली, आणि 'ओके' म्हणून तिनं फोन खाली ठेवला.

डायनिंग हॉल शिरताच अजिताचं लक्ष तिच्याकडे गेलं. प्रवेशद्वारापासून आणि वॉशिंग बेसिन्सपासून दूर खिडकीजवळच्या टेबलावर ती बसली होती. त्यांची नजरानजर झाली, आणि हसून तिनं एक हात उंचावून हलवला. तिच्याकडे जाता जाता अजिताच्या मनात आलं, पूजाच्या वागण्यात जरा प्रौढपणा आलाय. हा विचार मनात येऊन तिला किंचिंत खेद वाटला, पण तिच्या चेहऱ्यावर जी प्रसन्नता होती, जे समाधान होतं ते पाहून ती चकितच झाली. तिने पुढे केलेला हात

तिनं हातात घेतला आणि ती तशीच तिच्या समोर सिटवर बसली. त्यांनी एकमेकाच्या चेहऱ्यांकडे पाहिले, ती हसली, आणि तिच्या जिव्हणीची टोकं किचिंत वर उचलली गेली. अजिताचा हात किंचित दाबून अलग करीत ती म्हणाली, "सो, हिअर वुई आर"

अजितानं पूजाकडे निरखून पाहिलं. तिचा चेहरा भलताच तजेलदार दिसत होता. काहीसा फुललेला, ओठ किंचित सुजल्यासारखे, लालेलाल. नाही.. आणखी काही तरी मोठा बदल तिच्या चेहऱ्यात झाला आहे. चेहऱ्यात का तिच्या शरीरातही. तिच्या मनात आलं, आणि त्याला प्रतिवादही केला तिनंच. चार वर्षे झाली की तिला भेटून. बदल तर होणारच.

तिच्याकडे पाहून डोकं हलवत अजिता म्हणाली, "छान दिसतेस. मागच्या वेळेपेक्षा."

"म्हणजे मागच्या वेळेस छान दिसत नव्हते ना?"

पुजाने प्रतिप्रश्न केला.

अजिता किंचिंत वैतागली, म्हणाली, "तू नेहमी माझ्या म्हणण्याचा निगेटिव्ह अर्थ काढतेस."

"आणि तुला नेहमीच गंमत केलेली समजत नाही"

दोघीही दिलखुलास हसल्या. मग अजिताकडे स्निग्ध दृष्टीने टक लावून पाहात पुजा म्हणाली, "बोल कशी आलीस दिल्लीला? मला भेटायलाच ना?"

अजिता किंचित घोटाळली, मग म्हणाली, "थोडसं काम होतं, पण तुलाही भेटायचं होतं."

"बरीच लवकर आठवण झाली की. तशी पाच वर्षे म्हणजे काही फार नाही म्हणा"

" पाच कुठली पूजा. चार वर्षे" अजिता म्हणाली.

"हो, बरोबर आहे. पाच वर्षे पुर्ण व्हायला अजून दीड महिना बाकी आहे. पण ते जाऊ दे. पत्ता कधी मिळाला?"

"कधी म्हणजे रविवारीच की. पूजा मी आज्येकडे गेले होते. वाटेत येताना ताईलाही भेटून आले."

"का गं, एकदम सदिच्छा दौऱ्याची गरज वाटली?"

"तुम्हाला भेटावसं वाटतं नाही, मग काय करणार. आमचंच अडतं ना?

पूजा हसली. पुढे झुकून अजिताचा हात तिने आपल्या हातात घेतला, दोन्ही हातांनी तिचा हात उचलून हलकेच आपले ओठ त्यावर टेकवत म्हणाली, "जितू, कुणी कुणाला दूर केलं हे शोधण्यात काही अर्थ आहे का?"

अजिताने नजर उचलून पूजाकडे पाहिलं, ती तिच्याकडेच रोखून पाहात होती. बराच वेळ कुणी बोललं नाही, मग पुजाच हसून म्हणाली,

"म्हणजे पत्ता मिळाल्याबरोबर सरळ इकडे आलीस. मला भेटायला. मग तसं कबूल केलेसं तर मला काय वाईट वाटलं असतं?"

अजिता काही क्षण गप्प राहिली मग दिलखुलास हसत म्हणाली, "ओके, ओके. खरं सांगते, केवळ तुलाच भेटायला आलेय दिल्लीला. आता बोल काय चाललंय तुझं. कुणी जुनी मित्रमंडळी भेटतात की नाही कॉलेजमधली?"

"भेटतात की. पण तुला हाच प्र्श्न विचारण्यात काही अर्थ नाही. कारण सर्वांपासून तोडून घेतलं आहेस तू स्वत:ला. मुद्दामून.' 'मग अजिताच्या चेहऱ्यावरचे बदलते भाव पाहात पुजा म्हणाली, "अगं, तुझ्या

ओळखीचे ते जेएनयुमधले प्राध्यापक भेटले होते परवा. इतक्या योगायोगानं. आमच्या एका कॉमन फ्रेंन्डने ओळख करून दिली. नाव ऐकल्यावर म्हणाले त्यांना. माझी एक मैत्रिण तुमची खुप वर्षांपासून फॅन आहे म्हणून. तर गृहस्थ हसून काय म्हणतो, फॅन आहे म्हणू नका, फॅन होती म्हणा."

मी म्हटलं, "छे सर, तिचं मत बदलले असणं शक्यच नाही."

ते किंचिंत हसून म्हणाली, "पण मी बदललो असण्याची शक्यता आहे."

"प्रा. अशोक?" अजितानं विचारलं.

"राईट. बरोबर ओळखलंस. पण फॅन होती असं म्हणा असं का म्हणाले असतील गं ते. मला काही समजलं नाही.?"

अजिताने काहीच उत्तर दिले नाही. माओवादी क्रांतीकारी चळवळीच्या सुरूवातीच्या काळातील तो एक कटू काळ होता. पक्षावर शासनाने जोरदार हल्ले सुरू केले होते, पोलिसांची माणसं पक्षात घुसली होती, वैचारिक मतभेदांच्या सबबीवर फुटाफूट सुरू झाली होती. गटागटातील मतभेद मग एकमेकांवर हल्ले करण्यापर्यंत गेले होते. जे बुध्दीमंत, विचारवंत ह्या डाव्या विचारप्रवाहाच्या बाजूने होते, हळूहळू दुरावले होते. ह्या पडझडीत अनेकांचा भ्रमनिरास झाला होता. प्रा. अशोक कशाकडे निर्देश करत होते हे स्पष्ट होते. अजिता काहीच उत्तर देत नाही म्हणून पुजाने तिच्याकडे पाहिलं तर ती कुठल्या तरी विचारात हरवली होती, तिच्यापासून दूर गेला होती. पुजाने तिच्या हाताला स्पर्श करीत म्हटले, "जितू, मी तुझ्या समोर बसलेय, इतक्या वर्षांनी भेटतोय आपण."

"सॉरी पूजा. तू प्रा. अशोकांची आठवण करून दिलीस आणि मला एकदम आठवण झाली, प्रा. अशोक

डिफेन्सशी संबंधित विषयांचे गाढे अभ्यासक आहेत. मला पाहिजे असलेली माहिती कदाचित ते देऊ शकतील. थॅंक्स. बरं पण तू काही ऑर्डर दिलीयसं की नाही. काल दुपारपासून काही खाल्लेले नाही मी."

जेवण आणि गप्पा करता करता दोन तास कसे गेले हे त्यांच्या लक्षातच आले नाही. जेवण आटपून प‍ूजा हात धुवायला जाऊन आली तेंव्हा तिचा चेहरा पाहून अजिताला परत एकदा जाणवलं, पूजा अधिक सुंदर दिसत्येय. अधिक समाधानी. तिच्याकडे पाहात अजितानं विचारलं, "पूजा, तू खुपच छान दिसत्येस. खुपच समाधानी. नाही. मला सांगता येत नाहीये. पण तुझ्यात काही तरी बदल झालाय."

पूजा मनापासून हसली, काहीशी खटयाळपणे, काहीशी निरागसपणे. जरासं पुढे सरकून ती अजिताचा हात हातात घेत ती तिच्याजवळ सरकली, अजिताचा हात आपल्या पोटावर ठेवत म्हणाली, "तुझ्या लक्षात

आलं जितू. पण जगदीशच्या नाही आलं लक्षात'' ती थांबली.

अजिताच्या हाताचा तळवा पूजाने आपल्या पोटावर किंचित दाबला, अजिता क्षणभर गोंधळली, मग आपली अनामिका पुजाच्या पोटात अलगद खुपसत तिने प्रश्नार्थक, सस्मित मुद्रेने पुजाच्या चेहऱ्याकडे पाहिले. पूजा मोकळेपणी हसली, मग मानेला झटका देत म्हणाली, "मी आई होणारेय जितू. मला मुलगी होणार आहे."

"ओ..ओ...दॅटस् इट. अभिनंदन पूजा. मन:पूर्वक अभिनंदन'' पण मग जरासं गोंधळून तिनं विचारलं, "पण पूजा, तुला मुलगी होणार हे एवढ्या आत्मविश्वासाने कसं सांगतेस? "

पूजा हसू लागली आणि ती हसतच राहिली. हसता हसता तिचा चेहरा लालेलाल झाला. मग कसंबसं हसू

आवरत म्हणाली, "अगं तो म्हणजे मोठा विनोदच आहे. काय झालं बघ. मला हे असं अभक्ष खाण्यापिण्याची सवंय. जगदीशबरोबर पार्ट्यांत जाण्याची सवंय. पोटात मुल आहे म्हटल्यावर मनात आलं खात्री करून घ्यावी, पोर ठिक आहे ना? म्हणून गेले डॉक्टरकडे. त्याला सांगितलं. त्यानं स्कॅन केलं. त्याचा चेहरा जरा गंभीर दिसला, मी विचारलं, "डॉक्टर, मुलाला काही व्यंग नाही ना?'' तो म्हणाला, "नाही. व्यंग काही नाही मिसेस पूजा. पण हे मूल म्हणजे मूलगी आहे' ' हे सांगताना त्याच्या चेहऱ्यावरचे भाव पाहून मला असं जोरात हसू आलं, अगं आवरताच येईना मला. अन् त्याचा चेहरा लागला लाल लाल..गोरामोरा व्हायला..." बोलता बोलता पूजा परत हसू लागली, पण आता ती एकटी हसत नव्हती, अजिताही हसत होती.

"अगं खरी गमंत पुढेच आहे, माझ्या हसण्यामुळे तो एवढा गोंधळला की, त्याला वाटलं मला हिस्टेरियाचा झटका आला, मला दिलासा देत म्हणाला, 'मॅडम,

स्वत:ला सांभाळा. बसा.. बसा. खुर्चीवर बसा. नर्स जरा पाणी आण पिण्याचं. मॅड़म, काळजी करायचं काही कारण नाही. अजून काही बिघडलं नाही, साहेबांना मुलगी नको असेल तर' यडाच होता तो. मी एवढी चिडले, त्याला म्हटलं, कोण साहेब? मुल मी जन्माला घालणार आहे की साहेब?'' परत बिचारा घाबरला, सॉरी..सॉरी करायला लागला. पण मी भडकलेच होते, म्हणाले, "तुम्ही डॉक्टर आहात ना, एका हेल्दी जीवाला मारायला सांगताहात, काही मॉरल नाहीतर प्रोफेशनल इथिक्स तरी... निदान कायद्याची भिती तरी..' अगं असा घाबरला, धाडकन् माझ्या पायावर लोटांगणच घातलं."

हसता हसता पुजाला धाप लागली, त‍िचा चेहरा लालेलाल झाला. तोंड उघडं टाकून ती जोरजोरात श्वासोच्छवास करू लागली. अजिता गडबडीनं उठली, तिच्याशेजारी बसत तिने तिच्या पाठीवर हात फिरवत म्हणाली, "जरा आरामात पूजा. काळजी घ्यायला

पाहिजे तुला आता. आपण असं करू, चल, माझ्या खोलीत जाऊ, जरा आराम कर. मी पाच एक मिनिटात फोन करून येतेच."

पूजा आता सावरली होती, वेटरला बील आणण्याचा इशारा करत म्हणाली, "चल. मी म्हणणारच होते तूला. आहे मला वेळ संध्याकाळपर्यंत. पण जित्या, जवळ नाही येऊ देणार हं मी तूला"

"पुजा, तुला काय वाटतं की मला"

तिचं वाक्य अर्ध्यावरच तोडून हसत पुजा म्हणाली, " मी म्हणाले ना, तुला अजूनही गंमत केलेली समजत नाही. तु काही..ही बदललेली नाहीस जित्या. बिलकूल नाही. तू तिच आहेस..तीच...तशीच.

खोलीचं दार उघडून अजिता आत आली, तेंव्हा पूजा आरामात बेडवर पाठीमागे उशांची चळत लावून आडवी

होऊन वाचत होती. आपल्या शेजारी हाताने गादीवर थापटत म्हणाली, "या बाईसाहेब. दोन मिनिटांत फोन करून येते म्हणून गेलीस आणि..

'' अगं, प्रा. अशोकांना फोनवर गाठायला जरा वेळ लागला. आणि..तुझ्याकरता एक वस्तू घेऊन आलेय. आधी डोळे मीट, घट्ट. बघ हाँ. हात पुढे कर."

तिच्या शेजारी बसून अजिताने पुजाचा हात हातात घेतला आणि दुसऱ्या हाताने पर्समधून तिने कैरी बाहेर काढली, तिच्या हातात कैरी ठेवून तिची बोटे कैरीभोवती गुंडाळत अजिता म्हणाली, " अं..हं. डोळे नको उघडू, तसंच ओळख बघू"

तरीही पूजाने डोळे उघडलेच, हातातील कैरी पाहून ती विस्मयाने आणि आनंदाने किंचाळलीच, मग ती उठून बसली, कैरी तोंडात घालून तिने तिचा एक कोर तिने दातांनी तोडला, आणि तिने ती कैरी अजिताच्या

तोंडाजवळ नेली, अजिताने कैरीचा तुकडा तोंडात घेतला. दोघी हसत होत्या. हसता हसता दोघींनी एकमेकांकडे पाहिले, परत एकदा अजिताच्या नजरेसमोर आंब्याच्या झाडाखाली उभं राहून कैरीचे लचके तोडणाऱ्या दोन मुलींचे दृश्य उभे राहिले. त्या दृश्याला नजरेसमोर धरून ठेवण्याचा प्रयत्न करतच तिने पुजाच्या चेहऱ्याकडे पाहिले, आणि तिची नजर धूसर झाली, तिचे डोळे भरून आले, आणि पुढच्याच क्षणी त्या दोघींनी एकमेकांना घट्ट मिठी मारली. दोघींच्या ड ोळयांतून अश्रू वाहात होते, गालांवरून ओघळत गळयाकडे घसरत होते.

संध्याकाळी इंडिया गेटजवळील बागेच्या दरवाजाशी एकमेकाचा निरोप घेताना पूजाने अजिताचा हात हातात घेतला, आणि तिने एकदम प्रश्न केला, "जितू, खरं सांग, कुठं जाणार आहेस तू?'' तिचा स्वर कातर झाला होता.

अजिता दचकली, बावरली, पण स्वत:ला सावरत म्हणाली, "कुठं म्हणजे हॉटेलात परत. आणि उद्या प्रा. अशोकाना भेटून बॅक टू पॅन्हेलियन"

'जितू, खरंच काही विशेष नाही ना गं? तू मला भेटायला आलीस, खूप आनंद झाला गं. पण मुद्दामून आज्जेकडे जाऊन पत्ता घेऊन तातडीने भेटायला आलीस. . मला..माझ्या मनात काहीतरीच शंका येतेय गं..

अजिता कित्येक क्षण स्थिर नजरेने पूजाकडे पाहात राहिली, आपल्या हातातील तिच्या पंजा बोटांनी कुरवाळत राहिली, मग जणू झोपेतून जागं झाल्यासारखी, मानेला झटका देत, जरासं हसून म्हणाली, "पूजा वेडी आहेस का तू? अगं, चार, पाच महिन्यात येते बघ, तुझ्या मुलीला भेटायला"

प्रकरण पंधरावे

प्रा. अशोक दाराशीच उभे असलेले तिला दिसले. तिने त्यांना आपली ओळख करून देताच तिच्याशी हस्तांदोलन करून ते म्हणाले, "चला, एखाद्या फर्लांगावरच माझ्या मित्राचा रिकामा फ्लॅट आहे. तेथे बसूया आपण. हल्ली मी सहसा राजकीय कार्यकर्त्यांना भेटत नाही. म्हणजे मला माहीत नाही तुम्ही राजकीय कार्यकर्ते आहात की थिसिस लिहिणारे संशोधक. पण प्रा. नायरांची ओळख सांगता आहात आणि कार्यकर्ते दिसताहात, शिवाय पुजानेही फोन केला होता काल. तेव्हा चला"

असं म्हणून ते चालू लागले. अजिता त्यांच्या बरोबर निघाली. मुख्य रस्ता सोडून ते एका मातीच्या रस्त्याला लागले. मातीचा रस्ता झुडूपातून, तुरळक

असलेल्या छोटया छोटया बंगल्यातून वाट काढीत दूर अंतरावर दिसणाऱ्या घरांच्या गुच्छाकडे जात होता. जरासे अंतर चालल्यावर ते म्हणाले, "बोला"

काय बोलायचे आणि कसं बोलायचे ह्यावरच अजिता विचार करत होती. तसा यावर तिने खुप विचार केला होता, वेगवेगळे पर्याय काय आहेत ह्यावर विचार केला होता, पण अखेर तिनं मनाशी ठरवलं होतं की, प्राध्यापक महाशयांना भेटूनच निर्णय घ्यायचा. आता तिनं ठरवलं होतं, शक्य तेवढं खरं बोलायचं.

"मी दक्षिणेत काम करते एसजी ग्रुपबरोबर. मला माहीत आहे सर, गटागटांच्या वादावादीमुळे, आणि काही गटांनी आपसातील स्पर्धेमध्ये तुमचा उपयोग करून घेतल्यामुळे तुम्ही ह्यातून बाजूला झाला आहात. मी तुमच्या इच्छेचा मान ठेवते. मला तुमच्याकडून जो काही सल्ला वा माहिति म्हणणं जास्त योग्य ठरेल, त्या माहितीचा ग्रुप्समधील राजकारणाशी काहीही

संबंध नाही असं प्रामाणिक आश्वासन मी तुम्हाला देते. पुढील आठवडयात आमच्या राज्यात एक कॉन्फरन्स होणार आहे. सीमा प्रदेशात अनेक एनजीओ संस्था काम करत आहेत, अशा संस्थांचा, संघटनांचा स्थानिक व राष्ट्रीय पातळीवरही लष्कराशी संपर्क असावा ह्या कल्पनेतून एक कॉन्फरन्स घेतली जात आहे. ह्यामध्ये परराष्ट्रातील काही नावाजलेल्या म्हणजे दोन्ही अर्थाने नावाजलेल्या फंडींग एजन्सींचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. केंद्र सरकारातील काही व्ही.व्ही.आय.पी. मंडळीही आहेत. मी एका एनजीओची प्रतिनिधी म्हणून ह्या कॉन्फरन्सला जात आहे. ह्यात सहभागी होणाऱ्या काही फंडींग एजन्सीजचा शस्त्रास्त्रं निर्माण करणाऱ्या कंपन्यांशी संबंध आहे. मुळात ही कॉन्फरन्स बोलण्यातील अंतस्थ हेतू काय हे ही माझ्या नीट लक्षात येत नाहीये. तुम्हाला ह्या कंपन्यांचा व्‍्यवहार कशा प्रकारचा आहे हे सांगता येईल का? ह्यातील सर्वात मोठी कंपनी कोणती इत्यादी माहिती तुम्ही देऊ शकाल का?"

प्रा. अशोक काही पावलं काहीच न बोलता चालत राहिले. मग अजिताकडे वळून तिच्याकडे रोखून पाहात म्हणाले, "त्या भागात एक मुलगी काम करत्येय गेल्या काही वर्षापासून तुमच्याबरोबर?"

अजिता क्षणभर घोटाळली, मग म्हणाली, "एएन, ऍन उर्फ अनिता"

प्राध्यापकांच्या चेहऱ्यावर समाधान पसरले ते म्हणाले, "ठीक आहे. तुमच्या शेवटच्या प्र्श्नाचं उत्तर मी मागून देतो. तसं मला त्या कॉन्फरन्सबद्दल माहीत आहे. कदाचित तुमच्यापेक्षा जास्त माहिती आहे. पण खरं तर मला तुम्हाला नेमकं काय हवयं हे कळत नाहीये. मी जनरल माहिती सांगतो. जी तुम्हाला कुठल्याही ह्या विषयावरील पुस्तकात मिळू शकेल. भारत सरकार आपल्या संरक्षण खात्याच्या गरजा पुऱ्या करण्याच्या बाबतीत शक्यतोवर स्वयंपुर्णतचे धोरण राबवत आले आहे. नेहरूंच्या तटस्थतेच्या धोरणाचे हे

ही एक अंग होते. क्षेपाणास्त्रे आपण तयार करतो. दारूगोळाही आपण तयार करतो. परंतु तरीही आपल्याकडे ज्याप्रकारे रिसर्च ऍन्ड डेव्हलपमेंटसाठी पैसा मिळाला पाहिजे तसा मिळू शकत नाही. आणि ते अटळही आहे. कुठल्याही प्रकारे अधुनिक तंत्रज्ञान संशोधन करायचे असेल त्यासाठी तुमची एकूणच तंत्रज्ञानातील पातळी उच्च लागते. उदाहरण घेऊया पृथ्वीच्या कक्षेतून बाहेर अंतराळात बोजा घेऊन जाऊ शकतील अशी क्षेपणास्त्रे आपण तयार केली. ते तंत्रज्ञान आपल्याकडे आहे. आता कुणी म्हणेल इतर देशांवर टेहळणी करण्यासाठी कॅमेरे असणारे सॅटेलाईट आपल्याला सोडता येतील. पण ते तेवढे सरळ साधे नसते. इतर अधुनिक इलेक्ट्रॉनिक्सची तंत्रे तर सोडा, आपल्याकडे त्यासाठी हे उत्कृष्ट कॅमेरे तयार करण्याकरता आवश्यक लेनेन्स तयार करण्याचे तंत्र विकसित असण्याची गरज असते. पण प्रत्यक्ष वास्तवात तशी परिस्थिती नसते. संशोधनाकरता अमर्याद साधनसंपत्ती आपण खर्च करू शकत नाही.

संशोधनाचे सोडा, शस्त्रास्त्रे निर्मितीलाही आपण भरपूर पैसे खर्च करू शकत नाही. त्यामुळे अनेक प्रकारच्या छोटयामोठ्या पण महत्त्वाच्या वस्तू, तंत्रे आपल्याला आयात करावी लागतात.

उदाहरण घ्यायचे तर आपल्याकडे लांब पल्ल्यांच्या तोफा असतील पण आकाराने लहान परंतु वेगवेगळया क्षमतेचे स्फोटक गोळे आपण विकत घेतो. हा माल पुरवण्याऱ्या काही कंपन्या गेल्या शतकापासून अस्तित्वात आहेत. पण गेल्या काही दशकात नव्या कंपन्या ह्या व्यवसायात आलेल्या आहेत. आणि मुख्य म्हणजे ह्या कंपन्या एका अर्थाने प्राईव्हेट असल्यातरी त्या त्या देशांचा ह्या कंपन्यांशी अगदी घनिष्ट संबंध असतो. ह्या देशांच्या शासनसत्ता ह्या कंपन्यांचे हितसंबंध लक्षात घेऊन इतर देशांशी करारमदार करत असते. वेळ पडली तर ह्या देशांनी आवश्यक निर्णय घ्यावेत म्हणून दबावही आणत असते.

पन्नास वर्षांपूर्वी शस्त्रास्त्रांची निर्मिती करणाऱ्या कंपन्या तशा मोजक्याच होत्या. उत्पादनही मर्यादित होते. मागणीही मर्यादित होती. मग आशियातील, साऊथ इस्ट आशियातील एक एक देश स्वतंत्र होत गेले, आणि ही मागणी वाढत गेली. तेव्हा शस्त्रास्त्र निर्मिती करणाऱ्या कंपन्यांची संख्या वाढत गेली. त्यांच्यातील स्पर्धाही वाढत गेली. स्वित्झर्लंड मधील कंपन्यांतील इस्रा ही कंपनी त्या मानाने नवीन आहे. परंतु तिने इतर कंपन्यांवर मात केली आहे. तिचे वैशिष्टय आहे, अण्वस्त्र निर्मिती. विविध प्रकारची लहान, वापरण्यास, हाताळण्यास, वाहातूक करण्यास सोयीची परंतु शक्तीमान अशी शस्त्रे ही कंपनी तयार करते. ह्या कंपनीचा ज्यांना आपण विकसनशील देश म्हणतो अशा देशांशी असलेला व्यापार गेल्या काही वर्षांत डोळयात भरण्याइतक्या प्रमाणात वाढत गेला आहे. दरसाल शस्त्रास्त्रांचं होणारं उत्पादन प्रचंड प्रमाणात वाढत गेलंय. अगदी संशयास्पद प्रमाणात वाढत गेलंय. ह्या कंपनीच्या व्यवहारासंबंधी बऱ्याच

अफवा आहेत. ह्या अफवा आहेत, पण लक्षात घेतलं पाहिजे, अफवाही अगदीच आधारहीन नसतात. एक अफवा अशी आहे की, हिंसेच्या मार्गावर विश्वास असणाऱ्या विविध देशातील प्रादेशिक, धार्मिक, वर्गीय संघटनांना ही कंपनी शस्त्रे पुरवत असते. परंतु त्यात काही विशेष नाही. धंदा म्हटलं की गिऱ्हाईक कुठलीही असो, नफा झाल्याशी कारण. हे बरोबर आहे. पण अफवा अशी आहे की, कंपनी अशा गटांना जवळ जवळ फुकटच अशी शस्त्रं देत असते."

प्रा. अशोक जी माहिती देत होते ती ऐकून अजिताचे विचारचक्र गरागरा फिरू लागले होते. खरं तर ते ज्या फ्लॅटमध्ये बसले होते, त्यामध्ये आता कुणीच नव्हते. बहुधा घरातील सगळीच माणसं नोकरी करणारी असावीत. पण तरीही तिनं पुढे झुकून हलक्या आवाजात विचारले, "सर, तुम्हाला असं म्हणायचं आहे का की ज्या देशांच्या संरक्षण खात्याला कंपनी शस्त्रास्त्रांचा पुरवठा करते त्याच देशांतील अतिरेकी

गटांना ती शस्त्रं भेट देते?"

"नाही. तसंच काही खात्रीपुर्वक सांगता येणार नाही. तशी निश्चित माहिती उपलब्ध होणेही कठीण आहे. कारण अशाप्रकारे ही शस्त्रे सरळ अतिरेकी गटांना दिली जात नाही, हस्तेपरहस्ते पोचवली जातात, हे दोघांच्याही सोयीचे असते. पण तुम्ही हा प्रश्न ज्या अर्थाने विचारताय तसं असण्याची शक्यता फार कमी आहे. म्हणजे ह्या गटांना शस्त्रं देऊन त्यांची आणि संरक्षण खात्यांची लढ़ाई लावून द्यायची म्हणजे सातत्याच्या मागणीची खात्रीच, असा हेतू त्यामागे असेल, असं तुम्हाला म्हणायचे असेल तर तसं नसावं. कारण एक लंका सोडली तर आशियातील इतर देशांत असे अतिरेकी गट फार प्रभावी नाहीत. मलाही प्रथम तसचं वाटलं होतं. पण मग माझ्या लक्षात आलं ह्या बदल्यात अशा गटांकडून कंपनी दुसरंच काही स ाधत असेल, किंवा कधीकाळी अशा गटांचा उपयोग करता यावा असाच केवळ दृष्टिकोन असेल. एक शक्यता

अशीही आहे, कल्पना करा, जंगल विभागातील संपत्तीचे संरक्षण करतात वनखात्याचे कर्मचारी. ह्यांच्याकडे शस्त्रे कुठची असणार? थ्री नॉट थ्री रायफल्स, स्टेन गन्स, फार तर मशीन गन्स! आणि आता जंगलात तस्करी करणाऱ्यांना जरब बसवायला ती पुरेशी असतात. पण समजा ह्या तस्करांकडे अत्याधुनिक शस्त्रे आली, तर ह्या फॉरेस्ट गार्ड्स्ना निदान तेवढी अधुनिक शस्त्रास्त्रे तरी द्यायला पाहिजे ही गरज निर्माण होईल. मग संबध डिपार्टमेंटचे अधुनिकीकरण करण्याचा निर्णय घेतला गेला की, मोठ्या प्रमाणावर शस्त्रास्त्र खरेदी आलीच. ही शस्त्रे आपल्याचकडून खरेदी केली जावी ह्यासाठी ह्या कंपन्याकडून इतर मार्ग वापरले जातात. आर्म्ड फोर्सेसमधील रिटायर्ड उच्चाधिकाऱ्यांना कमिशन एजंट नेमणे हा एका राजरोस अवलंबलेला मार्ग.

पण हा एक मार्ग झाला. आपल्या शस्त्रास्त्रांना विकसनशील देशांतून सातत्याने मागणी व्हायची

असेल तर ह्या देशांच्या आपसात लढाया होत राहिल्या पाहिजेत. ह्यांचे एकमेकाशी नाते शत्रुत्वाचे असले पाहिजे. पण अखेर हे देश विकसनशील आहेत म्हणजे गरीब आहेत. त्यांना शस्त्रे विकत घेण्याकरता अगदी पोटाला चिमटा नसेल घ्यावा लागत, पण त्यामुळे त्यांना विकासयोजना राबवण्यावर मर्यादा येतात. दूरगामी लाभदायक असलेल्या परंतु प्रचंड खर्च असलेल्या योजना बाजूला ठेवाव्या लागतात. आता बघा, गंगा-कावेरी जोडण्याची योजना किती वर्षांपासून हवेत आहे. उत्तर भारतातील महापुरांची समस्या आणि मध्य, दक्षिण भारतातील पाणीटंचाईची समस्या दोन्ही समस्या ह्यातून सुटल्या असत्या पण त्यासाठी प्रचंड लागणारा प्रचंड पैसा, इतर सर्व खर्च कमी करून उपलब्ध करावा लागला असता. कदाचित हे पूर्वीच होऊन गेलं असतं. आता भारत साम्राज्यवादी होऊ पाहतोय. आता तर हे कधीच शक्य होणार नाहीये. आता संरक्षणावर होणाऱ्या खर्चात कपात करा असं म्हणण्याची कोणाची हिंमत आहे. कुणी असं म्हटलंच

तर त्याच्या राष्ट्रभक्तीबद्दल शंका घेतली जाणार.

मग हे गरीबडे देश आपसातील शत्रुत्व कायम जागते ठेवतात. निखारे प्रज्वलित ठेवतात. पण लढाया मात्र नेहमीच करत नाहीत. अशा देशांकडून सातत्याने शस्त्रास्त्रांची मागणी व्हावी म्हणून ही कंपनी दुसराच एक मार्ग वापरते, असं मला वाटतं.'' प्राध्यापक बोलता बोलता मध्येच थांबले. मग अजिताकडे वळून म्हणाले, "तुम्हाला उपयोगी पडेल अशी काही माहिती ह्यातून मिळतेय असं वाटतंय का?"

'' सर, मला ह्या विषयात जितकी माहिती मिळेल तेवढी पाहिजेच आहे. तशी गरज निर्माण झालीय सर. ह्या कंपन्या दुसरा कोणता मार्ग वापरतात म्हणालात तुम्ही? "

" हा मार्ग वापरतात असं मी खात्रीपुर्वक सांगू शकत नाही. पण घटना कशा होतात पहा. काही

महिन्यापूर्वी आपल्या येथे अशाच शस्त्रास्त्रांच्या एका कोठाराला आग लागली, ह्या आगीने आजुबाजूंच्या काही खेडयांचेही नुकसान झाले. आग लागल्याच्या बातम्या पेपर्समध्ये आल्या, पण त्यानंतर सर्व गप्प झालं. ते सहाजिकही आहे. संरक्षण खाते म्हटले म्हणजे पेपरवाल्यांचीही दातखिळी बसते. पण झालं असं की त्यानंतर तीनच आठवड्यानंतर पाकिस्तानातही अशाच एका कोठारालाही आग लागली. हा योगायोग नव्हता. शस्त्रास्त्रांच्या कोठाराला उन्हाळयामुळे वाढलेल्या तापमानामुळे आग लागली म्हणणे म्हणजे मूर्खपणा आहे. आणि शिवाय ते दिवस उन्हाळयाचे नव्हते. कुणी त्याचा अर्थ असा लावला असेलही की भारतात लोगलेली आग ही पाकिस्तानच्या आय.एस.आय.चे काम असावे आणि पाकिस्थानातील ी आग म्हणजे आपण त्या घातपाताला दिलेले उत्तर असावे. पण तसे नव्हते. कारण त्यानंतर आपल्या डिफेन्स मिनिस्टरने चौकशीचा आदेश दिला होता. चौकशी अधिकारी अर्थातच आर्मीचे उच्च अधिकारी

होते. चौकशी कमिटीने रिपोर्ट दिला. सर्व शांत झाले. पण असं म्हणतात की, नव्या डिफेन्स मिनिस्टरचे ह्या रिपोर्टमुळे समाधान झालेले नाही. त्याने परत हे प्रकरण उकरून काढण्याचा प्रयत्न चालवला आहे. पण मला माहीत आहे ह्यातून काही घडणार नाही. ह्यातही राजकारणच आहे आणि तेही पक्षातील सत्तेचे घाणेरडे राजकारण!

बराच वेळ प्राध्यापक अशोक काही बोलले नाहीत. अजिताही आपल्यालच विचारात गप्प राहिली. मग प्रा. अशोकांनीच परत सुरुवात केली,

"बाजारात कांदे भरपूर आले, कांद्यांचे भाव गडगडले तरी आपण कांद्यांची मणावारी खर ेदी करत नाही. कांद्यांचा साठा करून ठेवत नाही. कारण कांदे ठराविक काळ गेल्यानंतर सडतात, निकामी होतात. सडलेले कांदे फेकून देऊन आपल्याला नव्याने कांदे घ्यावे लागतात. शस्त्रास्त्रे जर ठराविक काळानंतर

कांद्यांसारखी निकामी, निरूपयोगी होऊ लागली तर?"

प्राध्यापक अशोकांना काय म्हणायचं आहे हे अजिताच्या लक्षात आलं होतं. आणि ते ऐकून ती सुन्न झाली होती. पण तरीही तिला वाटत होतं, आपल्याला मुख्य मुद्याची गोष्ट कळलेली नाही. तिनं विचारलं, "हे सर्व भयानक आहे. ह्याचा अर्थ विकसनशील देश हे नेहमीच आपसात भांडले नाहीत तरीही, आपल्या शत्रूशी सामना करायला आपलं पुरेसं सामर्थ्य पाहिजे ह्या इच्छेतूनही शस्त्रास्त्रे खरेदी करत राहातील, किंवा निर्माण करत राहातील. आणि दरिद्री राहातील. पण एक प्रश्न आहे, आपण ज्या कंपनीचं नाव सांगितले, ती स्वित्झर्लंडमधील सर्वात मोठी कंपनी आहे का?

"मोठी म्हणजे तुला काय म्हणायचंय? धंद्याने विचारलंस तर ती मोठी आहेच. पण तशी ती नवीन आहे, तिच्यापेक्षा जुन्या आणि नावाजलेल्या शस्त्रास्त्रं निर्मिती करणाऱ्या कंपन्या तेथे आहेत. उदाहरणार्थ

नोबेल. पण तिचा आपल्या भारताशी व्यापार फार नाही."

अजिता विचारात पडली. सरांना कितपत सांगावं? ई-मेल बद्दल त्यांना सांगावं का? त्याचा काही उपयोग होईल का?

"सर, आम्हाला काही माहिती मिळालीय, ते पत्र सांकेतिक भाषेत लिहिलेय. त्यात ह्या कंपनीचं नाव लिहिलेले नाही. पण 'स्टार टुल मेकर ऑफ द वॉच मेकर्स क्लब' असं तिचं वर्णन केले आहे."

सर काही क्षण विचार करत राहिले मग त्यांच्या चेहऱ्यावर हास्य चमकले, "ब्रिलियंट. जस्ट ब्रिलियंट. वॉचमेकर्स क्लब म्हणजे स्वित्झर्लंड. टूल मेकर्स म्हणजे शस्त्रास्त्रे बनवणारे. स्टार म्हणजे झगमगणारी. प्रतिमा असलेली. पण ... पण. ओ हाऊ फुलीश आय ऍम. अजिता. इस्रा हा लॅटीन शब्द आहे. इस्रा म्हणजे

ठिणगी.. किंवा तारा देखील. इस्रा टुल मेकर, इथे इस्रा हे टुलमेकरचं विशेषण नाही, नाव आहे नाव. शंकाच नाही.'' सरांचा चेहरा आनंदानं नुसता फुलला होता. पण त्यानंतर सर एकदम गंभीर झाले.

"इस्रा ही एक मल्टी नशनल होऊ घातलेली नवीन कंपनी आहे हे लक्षात घेतलं पाहिजे आपण. ग्लोबलायझेशनच्या प्रोसेसचा धोका आपल्या लक्षात येत नाही, कारण आपल्याला मल्टीनॅशनल्सच्या खऱ्या शक्तीची कल्पनाच नाहीये. आशियाईतील कित्येक देशांचं बजेट म्हणजे ह्या मल्टी नॅशनल्सचा वर्षाचा नफा आहे. एखाद्या कंपनीने ठरवलं, तर सर्व मिनिस्ट्री ती विकत घेऊ शकते सहजतेने.. "

प्रा. अशोक बराच वेळ त्यानंतर बोलत राहिले होते. सर्वात शेवटी ते म्हणाले होते, "अजिता, मल्टी नॅशनल्स जर प्रबळ होतच गेल्या तर सर्व अविकसित देश ढासळतच जातील. त्यांची अर्थव्यवस्था

रसातळाला जाईल. कर्जे सोडा, व्याज फेडता फेडता ते भिकेला लागतील. देशातील शासनसंस्था पार मोडकळीला येईल. मग आताचे अविकसित देश म्हणजे राहातील दरिद्री लोकांचे समुदाय. ह्यावर एकच उपाय आहे लोकसमुदाय जागरूक व्हायला हवेत. त्यांच्याच जाणिवा प्रगल्भ व्हायला हव्यात. पण त्यासाठी खरी लोकशाही रुजेल अशी परिस्थिती शाबूत राहिली पाहिजे. हे कसं होणार? कसं होणार? लोकांच्या नावाने काही थोडया लोकांनी निर्णय घ्यायचे अशीच परिस्थिती राहाणार असेल तर ... काही आशा नाही मानवाला.. "

अजिता प्राध्यापक अशोक ह्यांचा निरोप घेऊन बाहेर पडली तेंव्हा तिचे डोके गरगरत होते. विकसित देशांचे सोडाच विकसनशील म्हणजे अविकसित देशांचा शस्त्रास्त्रांवर होणारा खर्च, शस्त्रास्त्रांची निर्मिती करणाऱ्या कंपन्याचा होणारा प्रचंड नफा ह्यांची आकडेवारी ऐकून ती सुन्न झाली होती. परतीच्या

प्रवासात तिच्या डोक्यात एकच प्रश्न घोंघावत होता, प्राध्यापकांनी सांगितलेल्या माहितीचा, विझने दिलेल्या माहितीचा, सीसीने पीएम किंवा डीएम ह्यांना ॲनिहिलेट करण्याविषयी घेतलेल्या निर्णयाचा आणि मी मान्य केलेल्या, आत्महत्येच्या मार्गाचा परस्पर काही संबंध आहे का? ह्याच्यातील हरवलेले दुवे आपल्याला सापडतील का? का हे सर्व आपल्या कल्पनेतील खेळ आहेत, आपल्या अंतर्मनाने जगण्यासाठी चालवलेली धडपड?

स्टेशनवर उतरल्याबरोबर तिने एसेनला फोन लावला, खरं तर ह्या फोनचा उपयोग तिने आत्तापर्यंत कधी केला नव्हता, करण्याची इच्छाही झाली नव्हती कधी. एसेनच्या आणि ग्रुपच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ते धोक्याचे होते. एसेननेच फोन उचलला, "हॅलो.. हॅलो अजिता. गेल्या दोन दिवसापासून शोध घेतोय तुझा. कुठे गेली होतीस, कुणाला भेटलीस? आपल्याला भेटलेच पाहिजे. मी घरी येतो,"

"नको सुन्या. आपण कुठेतरी बाहेर भेटूया. घर एकदम साफ केलेयं मी."

"ठीक आहे. आर.जी.च्या खोलीवर भेटूया. चालेल?"

"येते. साडेआठ वाजता."

क्लास फोरच्या सरकारी कर्मचाऱ्यांकरता बांधलेल्या त्या चाळीसारख्या बिल्डींगमध्ये आर.जी.चा वन रूम किचन फ्लॅट होता. तिच्या मनात आलं, एक काळ होता, मी आणि सुन्या भेटायचो तेथे, रात्रभर एकांतात एकमेकाच्या सहवासात राहण्यासाठी. हळुहळू ह्या भेटीतील अंतर वाढत गेलं. . आणि आता इतक्या काळानंतर परत भेटणार त्या जागेत. अखेरचा निरोप घेण्यासाठी..

ती तेथे पोचली तेंव्हा एसेन आधीच पोचला होता. आत आल्याबरोबर त्याने तिच्यासमोर चहाचा मोठा मग्

ठेवला आणि एक मग् आपल्यासमोर ठेवून म्हणाला, "अजिता, तू दिल्लीला जाऊन आलीस. पूजाकडे गेली होतीस ना? कुणाकुणाची भेट झाली."

त्याने आपल्या आवाजात सहजता ठेवण्याचा प्र्यत्न केला होता, तरीपण त्याच्या आवाजातील ताण अजिताला जाणवला. तिने त्याच्याकडे रोखून पाहिले, अजूनही, ह्या स्थितीतही ह्याला पूजाबद्दल असूया वाटावी? तिला वाटलं, त्याला पूर्वीप्रमाणेच चिडवावं, त्याला विचारावं, चेष्टेच्या सुरात. . माझ्या पुरुष मित्रांबद्दल सुन्या तुला कधी असूया वाटत नाही, आणि माझ्या एका मैत्रिणीबद्दल, आणि लग्न होऊन दूर राहणाऱ्या मैत्रिणीबद्दल तुला असूया वाटावी? विचित्रच ना?. पण तो विचार तिच्या मनात आकार घेताघेताच विरून गेला. ती त्याच्याकडे पाहात म्हणाली, "दिल्लीला गेले होते पूजालाच भेटायला सुन्या. पण तेथे प्रा. अशोकांची भेट झाली. पण त्याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट, मला एक विचित्र इ-मेल आलाय

सुन्या. थांब, मी तुला लिहूनच दाखवते."

तिने विझचा आलेला इ-मेल त्याला दाखवला, प्रा. अशोक ह्यांच्याशी झालेले बोलणे सविस्तरपणे त्याला सांगितले. तो कितीतरी वेळ काहीच बोलला नाही. तिने कागदावर लिहिलेल्या इ-मेल कडे तो पाहात राहिला. तीही गप्प राहिली त्याच्या चेहऱ्याकडे पाहात. तिला स्पष्ट जाणवत होतं, त्याच्या मनात विचारांचे वादळ उठले आहे, शंकाचे, संशयाचे वादळ..

"काय वाटतं तुला सून्या..अरे काहीतरी बोल ना"

तिनं त्याला कळवळून विचारलं. त्याने तिच्याकडे बघितलं, काहीतरी बोलण्याकरता त्याने तोंड उघडले, पण त्याच्या जीभेने जणू बोलण्याची क्षमताच हरवली असावी अशाप्रकारे तो केवळ तिच्याकडे पाहात राहिला. त्याच्या चेहऱ्याकडे पाहाता पाहाता तिला एक प्रकारची भिती वाटू लागली. अगदी असह्य झालं

तेव्हा त्याला गदगदा हलवत ती तीव्र स्वरात म्हणाली, "अरे सून्या बोल ना. . काहीतरी बोल. असा सुंभासारखा काय बसलाहेस माझ्यासमोर"

मग तो उठून उभा राहिला, तिच्याकडे पाठ करून. त ो बोलायला लागला तेव्हा त्याचा आवाज इतका खोल गेला होता, पहिले काही शब्द तिला ऐकूच आले नव्हते, "अजिता, काय अर्थ लावायचा ह्या सर्वांचा. कालचं जग फार साधसुधं अन् सरळ होतं गं. आता सगळंच कसं गुंतागुंतीच झालंय. इतकं गुंतागुंतीचं, की आपल्या हलणाऱ्या हातांकडे पाहून शंका येते, हे आपलेच हात आहेत ना? हे मीच हलवतोय ना? मी काहीतरी खातोय, पाण्याचा ग्लास घेऊन पाणी पितोय, तुझ्याशी बोलतोय, ते माझ्याच इच्छेने करतोय ना? का कुणीतरी मला माहीतही नसलेला माणूस. . कदाचित माणूसही नाही. . एखादा कॉम्प्युटर माझ्याकडून ह्या गोष्टी करवून घेत नाही ना? माझ्या अमुक कृतीनं तमुक होईल हा माझा विश्वास, ही माझी श्रृध्द तरी

माझी आहे का? अमुक केलं म्हणजे तमुकच होईल की काही वेगळंच होईल.'' तो काही वेळ थांबला, मग कर्कश आवाजात म्हणाला, "नाही. मला काय म्हणायचं आहे, मलाच कळत नाहीये. ह्या शब्दांना काही अर्थ आहे का, मलाच समजत नाहीये.'' त्याचा आवाज इतका थरथरत होता की, अजिताला वाटलं, तो आता रडायला लागणार..ढसढसा.. टाहो फोडून.

बराच वेळानं तो बोलला तेव्हा मात्र त्याचा आवाज एकदम शांत होता, गंभीर होता, तो तिच्याजवळ आला, त्याने तिचे दोन्ही हात आपल्या हातात घेतले, आणि तो म्हणाला, " अजिता, तुझ्या ह्या आत्महत्त्येला काही अर्थ नाही. ही आत्महत्त्या कशाकरता, कोणाकरता, कोणाच्या इच्छेने करते आहेस तू अजिता. तुला समजत नाही अजिता? काही अर्थ नाहीये ह्या गोष्टींना.. आपलं जीवन म्हणजे एक दीर्घकाल चालू असलेली फसवणूक आहे .. फसवणूक..."

"शट् अप. आय से, शट् अप.'' अजिता तीव्र पण हलक्या आवाजात म्हणाली. चाबकाचा फटकारा बसल्यासारखा एसेन गप्प झाला. "मी जे करतेय ना सुन्या. माझ्या इच्छेने करतेय. का करतेय, त्याचा परिणाम काय होईल, हे योग्य का अयोग्य. मला कुणाशी वाद घालायचा नाही. मला विचार करायचा नाही.'' बोलता बोलता ती एकदम थांबली, आणि ती हसू लागली.. हसतच ती म्हणाली, "मी कधीच काऊंट डाऊन सुरू केलाय सुन्या."

एसेन गर्रकन तिच्याकडे वळला, त्याचा एक हात वर उचललेला होता, त्याने तिच्याकडे दोन पावले टाकली, तिला वाटले तो आता तिच्या कानशीलात मारणार, पण तो थबकला, आणि दुसऱ्याच क्षणाला तो दरवाजातून बाहेर पडला. जिन्यावरून वेगाने उतरणाऱ्या त्याच्या पावलांचा आवाज येत राहिला.

ती फ्लॅटवर पोचल्यावर तिनं कॉम्प्युटर उघडून

इंटरनेट सुरू केले. तिने विझला दिलेल्या डॉट कॉम पत्त्यावर ई-मेल पाठवली.

डिअर सेन्सेटिव्ह ब्रदर,

इट मेक्स सेन्स. डीएम सीम्स टु हॅव थ्रोन अ स्टोन ऑन हनीकोम्ब. इन व्हाट वे? मेक हेस्ट.

ई-मेल पाठवून तिने कॉम्प्युटर बंद केला. मी काय करणार आहे? काय करणार आहे? कुणाची मदत घेणार आहे मी. तिला माहीत होतं, दिवसभराच्या धामधूमीने तिचं शरीर थकलं आहे. आपल्याला जे जे काही कळलं ते तिने सर्व बारकाव्यांसकट लिहून काढलं होतं. आपल्या मनातील शंका खुल्लेपणाने व्यक्त केल्या होत्या. रिजनल कमिटीने ह्या सर्व गोष्टींचा खुल्ला विचार करावा असं आव्हान तिने ॲनला केले होते, आणि अखेर एसेनची काळजी घेण्याची विनंती केली होती. हे सर्व लिखाण पीक अप् पॉईंटवरून ॲनाला

मिळेल तेव्हा कॉन्फरन्स संपलेली असेल. ऍनाशी झालेल्या भेटीत तिने ऍनाने हे पत्र कलेक्ट करावे अशी विनंती केली होती. एसेनचा शोध घेण्याचा तिने प्रयत्न केला होता, पण तो जणू जिन्यावरून खाली उतरून हवेत विरून गेला होता. पीकेकडूनही त्याचा मागमूस लागला नव्हता. विचार करकरून तिचं डोकं भणभणायला लागलं होतं. तिनं दुध गरम केलं, परवापासून कॉन्फरन्स सुरू होणार आहे, आणि आपल्या डोक्यात सर्व गोंधळ उडाला आहे. आपण जे करणार आहोत, जे करत आलो आहोत त्याचा अर्थ काय? नाही, तिला ऍबस्क्ट्र प्रश्न निर्माण करून ऍब्स्ट्रॅक्ट पातळीवर निर्णय घ्यायचे नाहीत. वास्तवाच्या कठीण प्रस्तरावर उभं राहूनच तिला आपली कृती निश्चितच करायची होती. एक स्लिपींग टॅबलेट तिनं जिभेवर ठेवली आणि दुधाचा मोठा घोट घेऊन तिनं गोळी गिळून टाकली.

प्रकरण सोळावे

एसेन बाहेर पडला आणि रस्त्याने चालायला लागला. त्याच्या डोक्यात विचारांचे वादळ घोंघावत होते. मनात संताप आणि निराशा ह्यांचा अंधार दाटून आला होता. अजिताचा हटवादीपणा त्याला समजत होता, पण पटत नव्हता. आपला जीव असा फुकाचा गमावण्यात काय अर्थ होता, हे फुकटचे, कुचकामी हौताम्य का मान्य करायचे? जिथे नेतृत्वाच्या हेतूबद्दल वा बुध्दीमत्तेबद्दलचं संशय घेण्यास पुरेशी जागा आहे, जेथे बोलावता धनी कुणीतरी वेगळाच आहे हे स्पष्ट दिसत आहे तेथे निष्ठा काय कामाची, किंबहुना अशी निष्ठा ठेवून आंधळेपणाने काही कृती करणे, आणि त्यातून आपल्याच लोकांवर संकटाला आमंत्रण देणे म्हणजे क ाय क्रांतीकारक काम आहे?

तो भराभरा चालत होता, गर्दीतून वाट काढीत, गर्दी नेईल तेथे. जणू सारखं चालत राहाणं हीच त्याची गरज होती, कुठे, कोणत्या दिशेने ह्याला काहीही महत्त्व नव्हते. समोर आडवा आलेला रुंद रोड क्रॉस करण्याकरता हिरवा सिग्रल मिळण्याची वाट पाहात लोकांचा थवा उभा होता, एसेन त्या थव्यात मिसळला, उभा राहिला. त्याची नजर समोरच्या लाल दिव्याकडे लागली होती, इतर अनेकांप्रमाणे, लाल रंग जाऊन हिरवा रंग येण्याची प्रतिक्षा करत. पाठीमागून आणखीही लोक येत होते, त्याच्याभोवती जमा होत होते, बाजूला, पुढे, मागे. एकाएकी तो गर्रकन मागे वळला, मागे येऊन उजव्या बाजूला वळला आणि फुटपाथने चालायला लागला. नाही... मी नाही वाट पाहाणार हिरवा सिग्नल होण्याची. मी नाही राहाणार, नाही जाणार त्या थव्याबरोबर. तो भराभरा चालायला लागला, चालतच राहिला.

एकाएकी तो थबकला, त्याला वाटले, मागे वळावे,

धावत धावत अजिताच्या खोलीवर जावे, बेल वाजवावी, तिने दार उघडले की अंगात जेवढी ताकद असेल तेवढी हातात आणून तिच्या एक थोबाडात ठेवून द्यावी. जबरदस्तीने तिला न्यावे येथून कुठेतरी दूर. . कोंडून ठेवावे ही कॉन्फरन्स होईपर्यंत. त्याच्या नजरेसमोर ते चित्र् उभे राहिले, अजिताला तो मारत होता, वेडयासारखा, आंधळयासारखा. हातांनी, गुद्यांनी, लाथांनी तिला तुडवत होता. कॅमेरा अधिक जवळ सरकला, अजिताचा चेहरा, आश्चर्य, वेदना ह्यांनी चोळामोळा झालेला, त्याचा चेहरा... क्रूर्ता, आसूरी आनंद, पागल नशा... तो स्तंभित होऊन त्या चित्र्ाकडे पाहात उभा होता, फुटपाथवर मध्येच. कुणीतरी त्याला धक्का मारून बाजूने पुढे गेले, 'ओ भाईसाब, अरे रस्ता छोडो भाई' कुणीतरी म्हणाले, त्याला ऐकू येत होते, पण त्या शब्दाचे अर्थ त्याच्या मेंदूपर्यंत पोचतच नव्हते. ही हिंसा. . ही कु्रूर्ता, हा संताप, ही चीड माझ्या मनात कुठून उदभवलीयं, हिचा उगम कुठून झालाय? का माझ्या मनात, माझ्या अंतरात ही होतीच छुपलेली,

दडलेली. तो भेदरला होता, घाबरला होता. स्वत:चच हे भयावह रूप पाहून. कुठूनतरी पादचाऱ्यांचा थवाचा थवा त्याच्या अंगावर आला.त्याच्या अंगावर आदळला, एसेन त्या धक्क्याने जोरात ढकलला गेला, खरं तर पडायचाच पण त्याने तोल सावरला, त्याने आजुबाजूला पाहिले, आपण ह्या गर्दीत, रस्त्यावर असे मध्येच वेडयासारखे का उभे आहोत?

हा संताप, ही चीड, ही हिंसा.. ह्याच्या मुळाशी आहे असहाय्यता. .दुबळेपणाची भावना. यू इडियट.. अजिताला तू वाचवू शकत नाहीस हे तुला माहीत आहे, काही करू शकत नाहीस तू. अजिताशिवाय राहाणं ही कल्पना सहन होत नाहीरे तुला, मान्य कर तू. तृ एसेन, अजितावर प्रेम करतोस.. प्रेम ह्या भावनेला तृ नाकारत आला आहेस. शारीरिक आकर्षण म्हणून.. मर्दपणा सिध्द करण्याची गरज म्हणून, मालकीहक्कांचा प्रत्यय म्हणून.. प्ेमात हे सर्व आहे आणि हे नसूनही प्रेम आहे. मलायीच्या जंगलातील

दिवसांपासून ही भावना तुझ्या अंतरात रुतलेली आहे, सलत राहिलेली आहे, तू त्या जिवंत अंकुराला दाबत आला आहेस, छाटत आला आहेस, पण तो नष्ट नाही झालेला एसेन. कल्पना कर एसेन, जर हे काम अजिताऐवजी ॲनावर सोपवण◌्यात आलं असतं, आणि ह्या निर्णयाच्या हेतूविषयी अशी शंका तुझ्या मनात आली असती, बोलावता धनी कुणीतरी वेगळा आहे हे तुला कळलं असतं, तु एवढा चिडला असतास? दुबळेपणाची भावना अशी यातनादायक वाटली असती तुला? हे सर्व इतक्या तिव्रतेने वाटतंय कारण अजिता अस्तित्वात नाही ही कल्पनाच तुला सहन होत नाहीये.

एसेनने खिशातून रुमाल काढला, आपला घामाने थबथबलेला चेहरा त्याने नीट पुसला. तो स्वत:शीच हसला थोडासा. अजिता योग्य करतेय की अयोग्य, मी कोण ठरवणार? पण घडतंय ते अयोग्य आहे असं मला वाटतंय तर ते होऊ नये म्हणून काय करता येईल

ह्याचा विचार मी केला पाहिजे. रस्ता शोधला पाहिजे. इगोरबरोबर अजिताने ज्या माणसाला पाहिले होते तो कोण होता? अजिता म्हणते तो सैन्यातील अधिकारी वाटत होता. इगोरला अजिताला त्या माणसाची ओळख पटेल अशी भीती वाटतेय. पण त्याला शोधायचा कसा.. चालता चालता तो एकदम थबकला, 'ओ शीट' त्याने एक शिवी हासडली, स्वत:लाच. एवढी साधी गोष्ट माझ्या लक्षात कशी आली नाही. तो माणूस कोण होता हे दोघांना माहीत आहे. इगोरला आणि पंडित शर्माला. ह्या दोघांपैकी कुणाला तरी एकाला गाठलं की...इगोरला बोलतं करणं अवघड नाही, पण त्याचा पत्ता काढणं? पंडित शर्माला गाठणेही अवघड आहे, अशक्य नाही. पंडित शर्मा सहजपणे ही माहिती नाही देणार आपल्याला, पण दातखिळी उचकटून त्याला बोलतं करणं असंभवनीय नाहीये. दिल्लीला जाण्याआधी अजिताने हा इ-मेल का नाही दाखवला मला. का नाही सांगितला त्यातील मजकूर. ह्या दोन दिवसांत मी अर्धा भारत हिंडून इगोरला शोधून काढला

असता. आता..आता.. काळ थोडा आहे, पण हे शक्य आहे.. पंडित शर्माला शोधणं कठीण नाही. कोण मदत करेल आपल्याला ह्या मोहिमेत. ऍना...ती मदत करेल पण एका सीमेपर्यंत. त्याने भोवताली नजर फिरवली, काही अंतरावरच त्याला एस.टी.डी. बुथ दिसले. झपाट्यानं चालत तो बुथपाशी पोचला. काऊंटरवर बसलेल्या तरूणीला तो म्हणाला, "मला जरा भुवनेश्वरचा एस.टी.डी. नंबर काढून द्या हो. टेलिफोन नंबर आहे माझ्याकडे, एस.टी.डी. नंबर बदललेत काही दिवसापूर्वी. "

काही मिनिटानंतर तो रंजनशी बोलत होता. 'कॉम्रेड रंजन, मी दुपारच्या हावडा मेलने तिकडे येतोय. इतर कुठलेही कार्यक्रम असले तरी रद्द कर. आपल्याला अर्जंट मोहीमेवर निघावे लागेल. इन द मेमरी ऑफ प्रिझनर्स फ्रेन्डशीप"

रंजन काही क्षण काहीच बोलला नाही, मग शांत

आवाजात म्हणाला, " ओके कॉम्रेड. ओके. आय ऍम ऍट युवर डिस्पोजल. आय होप इट इज इन कनेक्शन विथ अजिता. इजंट इट?

"यस. यस. कॉम्रेड. बहोत कुछ गोलमाल है.. लेकिन.."

"कॉम्रेड एसेन. तुम यहॉ आ जाओ. ऍक्च्युअली मै कलसे तुमको कॉन्टॅक्ट करनेकी कोशिश कर रहा था? फीर बाते करेंगे?"

"ओके. मै पहुँचता हूँ रातको. एक काम है, अर्जंटली, व्हेरी अर्जंटली इगोर और पंडित शर्मासे बात करनी है. प्रत्यक्ष मुलाकातमे. जरा पता लगाओ. उन्हे कैसे मिल सकते है, देखो. पंडित शर्मा आजकल कहॉ है पता लगाओ."

"ओके. शुअर. इगोरका पता लगाना मुश्कील बात

नही है. दिल्लीमे उनके कार्यलयसे पता चल सकता है. लेकीन तुम यहॉ आ जाआ. आर.जी."

"आर.जी."

एस ेनने फोन डिसकनेक्ट केला. त्याच्या चेहऱ्यावर हसू आले. चार वर्षे त्यांनी एकाच जेलमध्ये पण वेगवेगळया सेलमध्ये काढली होती. प्रथम काही काळ दिवसाच्या कामाच्या वेळी ते एकमेकासमोर आले की एकमेकाला 'क्रांति जिंदाबाद' करून अभिवादन करत असत. पण एकदा तुरुंगाधिकारी आजुबाजूला असताना त्यांनी जिंदाबाद केले आणि तुरुंगाधिकाऱ्यांनी त्यांना जिंदाबाद म्हणायचे नाही असा हुकूम दिला. दुसऱ्या दिवशी भेट झाली तेव्हा रंजनने हा उंचावून आर.जी. म्हणून पुकारा केला होता. मग अनेक दिवस ते एकमेकाला क्रांती जिंदाबाद म्हणून अभिवादन करण्याऐवजी आरजी म्हणजे रिव्होल्युशनरी ग्रिटींग्ज म्हणून अभिवादन करत होते,

काहीवेळा मुद्दामून तुरुंगाधिकारी जवळपास आहे असं पाहून.

एसेन बुथमधून बाहेर आला. क्षणभर तो विचार करत उभा राहिला. मग त्याने तोंडात बोट घालून कर्कश शिट्टी मारून पलीकडे उभ्या असलेल्या टॅक्सीवाल्याला इशारा केला.

टॅक्सीत ड्रायव्हरशेजारी बसता बसता त्याने घडयाळ पाहिले मग म्हणाला, " पहिले शहागंज. बँक ऑफ हैद्राबाद चलो, फीर वहाँसे स्टोशन जायेंगे. फीर एम.जी.रोडपर. फीर वापीस स्टेशनपर. ओके? "

टॅक्सी वहानाच्या गर्दीतून वाट काढीत धावू लागली. एसेनने मनाशीच पुढील दीड तासाचे वेळापत्रक तयार केले. स्टेशनवर पोचल्यावर निघण्याच्या आधी ऍनाशी जरा सविस्तर बोलायचे आणि पुढील चार दिवसांत तिला इमर्जन्सीमध्ये

कॉन्टॅक्ट कसा करता येईल हे विचारून घ्यायचे त्याने ठरवले होते. एक गोष्ट चांगली झाली होती, त्याचे आणि अजिताचे संबंध लक्षात घेऊन ह्या मोहीमेत त्याच्यावर कुठलीही जबाबदारी टाकण्यात आलेली नव्हती. त्याला माहीत होतं, काळ फार कमी आहे आणि अनेक गोष्टी ह्या त्याच्या हातात नाहीत, पण तो प्रयत्न करणार होता, सेंट्रल कमिटीशी संपर्क करणे कठीण होते, पण रिजनल कमिटीला ह्यामागे बोलावता धनी वेगळ◌ाच आहे हे पटवण्याइतका व कार्यक्रम काही दिवस पुढे ढकलण्यास तयार करण्याइतका पुरावा तो जमा करणार होता. कुठल्या तरी दुरस्थ, असंबंधित अशा शक्तींपुढे अजिताचा बळी जाऊ द्यायचा नाही असं त्यानं ठरवलं होतं. ही नियती त्याला मान्य नव्हती. परिस्थितीपुढे तो हात टेकणार नव◌्हता, हार मानणार नव्हता. पण पंडीत शर्मा कुठे परदेशात गेला असला तर? त्यांना आपण गाठू शकलो नाही तर? त्यांनी माहिती द्यायला नकार दिला तर? गरज पडली आणि दुसरा काही उपाय नसला तर त्या हरामखोराला

मुसक्या बांधून पीके आणि ऍनासमोर उभा करेन मी. एसेन मनाशीच पुटपुटला. आज तारीख 2 1 ऑगस्ट. सेमिनार परवा सुरू होईल. 2 5 तारखेला सकाळी अकरा वाजता डीएम. स्टेजवर असेल, अकरा पाचला डीएम भाषण करायला उठेल. त्याचे भाषण संपल्याबरोबर अजिता आपल्या जागेवरून उठेल, तीस पस्तीस सेंकदांत ती स्टेजवर पोचेल, आणि ..ह्या क्षणापासून बरोबर 96 तासात. मला 24 तारखेला संध्याकाळी इथे पोचायला हवे. निदान 25 ला पहाटेपर्यंत तरी. म्हणजे माझ्याकडे जास्तीतजास्त नव्वद तास आहेत. . नव्वद तास! टॅक्सी बँक ऑफ इंडियापाशी उभी राहिली आणि तो खाली उतरला.

गाडी भुवनेश्वर स्टेशनवर पोचण्याच्या आधीच दहा मिनीटे एसेन दरवाजाशी जाऊन उभ ा होता. प्लॅटफॉर्मवर गर्दीच्या मागे एकटा उभा असलेला रंजन त्याला ताबडतोब दिसला. त्याने घडयाळाकडे नजर टाकली, रात्रीचे साडेअकरा वाजत होते. 82

तास...गाडी थांबताच तो खाली उतरला. झपाट्याने पावलं टाकत तो रंजनपाशी पोचला. दोघांनी एकमेकाला घट्ट मिठी मारली. मग रंजन मागे सरकला, त्याने एसेनच्या शरीराकडे नंतर त्याच्या चेहऱ्याकडे पाहिले. जवळ जवळ तीन वर्षांनी ते भेटत होते. त्याच्या चेहऱ्याकडे पाहात रंजन म्हणाला, "कम ऑन, ओल्ड फ्रेंड्स चीअर अप. नाऊ टू ऑफ अस आर टूगेदर. आणि आपल्याला अशक्य काही नाही. एकतर ह्यूमन बॉम्बसारख्या आत्मघातकी मार्गाचा अवलंब करणं हे पार्टीच्या बहुसंख्य पदाधिकाऱ्यांना पटलेलं नाही. शिवाय अजितासारखी सिनिअर कॉम्रेडवर ही जबाबदारी सोपवण्याची गरज नव्हती असंच सर्वांना वाटतं. ह्याबाबत माझं सेंट्रल कमिटीच्या तिघांशी बोललोही काल. तुझा फोन आल्याबरोबर मी हालचाल सुरू केली आहे. दिल्लीच्या माझ्या मित्रानं खात्रीची बातमी दिलीय, इगोर पंजाबमध्ये अंबाल्याला आहे, हॉटेल हरीओम् मध्ये. पंडित शर्मा जबलपूरला आहे असं समजलंय. पण अर्धा तासातच आपल्याला निश्चित कुठे

आहे, तेथे कितीवेळ असेल ह्याची माहिती समजेल. पण तोपर्यंत आपण जेवूया आणि बोलूया. "

ते स्टेशनच्या बाहेर आले. जवळच असलेल्या एका लहानशा हॉटेलमध्ये शिरल्याबरोबर रंजनने मालकाकडे पाहून खूण केली आणि कोपऱ्यावरच्या जिन्याखालील टेबलाकडे तो वळला. टेबलाशी बसल्याबरोबर पुढे आलेल्या पोऱ्याला रंजनने ऑर्डर दिली आणि एसेनकडे पाहून त्याने हातानेच एसेनला बोलण्याची खूण केली. एसेनने अगदी मोजक्या शब्दात पण पुरेशा स्पष्टपणे घडलेल्या घटना सांगितल्या, मग किंचित थबकून तो म्हणाला, "या परिस्थितीत मला एकच उपाय दिसतोय रंजन. डी. एम. ला मारण्यामध्ये दुसऱ्याच कुणाचा लाभ होणार आहे, शस्त्रास्त्रे विकणाऱ्या कुणा कपंनीचा हा कट आहे, आणि आपल्या पक्षाच्या नेतृत्वाची फसवणूक करण्यात आली आहे. ह्याबद्दल सॉलीड पुरावा आपल्याला पुढच्या साठ तासाच्या आत अजिताला, पीके दाखवला पाहिजे.

"

"आणि हा पुरावा आपल्याला इगोरकडे किंवा पंडित शर्माकडे मिळेल असा तुला वाटते. आपल्याला इगोरला गाठता आलं आणि त्याला बोलता करता आलं तर... पण ते कठीण काम आहे. त्यापेक्षा पंडित शर्माला गाठणं आणि बोलतं करणं शक्य आहे असं मला वाटतं. म्हणजे पहिली गोष्ट पंडित शर्माला गाठणे. मी शर्माला पूर्वी भेटलेलो आहे एसेन. त्याला बोलता कसं करायचं हा प्रश्नच आहे. ते काम स ोपं नाही एसेन. शर्मा मुर्ख असेल, संधीसाधूही असेल, पण डरपोक नाही.'

' 'रंजन, पहिली गोष्ट त्याला शोधून काढून त्याच्यापर्यंत पोचणे, मग पुढे काय करायचे ते बघूया. तुझा फोन कसा आला नाही अजून? आणि शर्मा जर जबलपूरला असेल तर परत सात-आठ तसाचा प्रवास करणे आले. तेथे आपण कसे पोचणार? "

'' तू त्याची चिंता करू नकोस. पृथ्वीच्या पाठीवर कोठेही जायची तयारी आहे माझी. विंचवाचे बिऱ्हाड पाठीवर आहे बघ.'' टेबलावर पडलेल्या हॅवरसॅककडे निर्देश करीत रंजन म्हणाला. मग तो उठून काऊंटरकडे जात म्हणाला, "एक मिनीट, मी आलोच."

काऊंटरवरून तो कुण ाशी तरी टेलिफोनने बोलला, मग परत येऊन आपली सॅक उचलून पाठीवर घेत म्हणाला, "चलो, मोहीम सुरू. मी जबलपूरच्या दिशेने प्रवास सुरू करतो. तू दिल्लीकडं निघ. अजून दीड तासाने दिल्लीला डायरेक्ट प्लेन आहे इथून. मला आता एक प्राईव्हेट बस आहे अर्धा तासात, रायपूरला. तू येथ े दहा मिनिटं थांब. कॉम्रेड गणेश तुला एरोड्रमवर सोडून येईल. तो येईलच. तेथे गेल्यावर बघूया.'' माझा मोबाईल घे. संपर्कात राहा.'' बोलता बोलता रंजनने घडयाळाकडे नजर टाकली, म्हणाला, "दोन मिनिटं वाट पाहूया. फोन येईलच आता."

खिशातून सिगारेट काढून, काउंटरवरच्या माचीसने सिगारेट पेटवून तो हॉटेलच्या पायऱ्या उतरला, आणि रस्त्यावरील लाकडी बाकड्यावर त्यानं बैठक मारली आणि शांतपणे त्यानं सिगारेटचे झुरके घ्यायला सुरुवात केली. काही न बोलता, आपल्याच तंद्रीत. शेवटचा कश घेऊन त्यानं सिगारेट टाचेखाली चुरगळली आणि काउंटरवरील फोनची घंटी खणाणली. रंजन एका टांगेत तेथे पोचला, फोन त्याच्याच करता होता. बराच वेळ तो केवळ ह्यां..ह्यां करत ऐकत राहिला मग, त्यानं खिशातून कागदाचा कपटा काढून त्यावर काहीतरी लिहून घेतले आणि फोन खाली ठेवून खाली उतरत म्हणाला, 'चलो एसेनभाई, आपले मित्र परवा संध्याकाळपर्यंत तेथेच आहेत. तुम दिल्ली सांभालो, मैं गल्ली देखता हूँ. इन्शाल्ला. आपण त्यांना योग्य वेळी भेटू शकू."

प्रकरण सतरावे

हॅाटेल हरिओम म्हणजे भोवती अलिशान बाग असलेले थ्री स्टार किंवा फोर स्टार असेल अशी एसेनची अपेक्षा होती. पण हॅाटेल हरिओम म्हणजे पाच मजल्यांची प्रचंड अवकाश व्यापणारी, जागेचा ढिसाळ उपयोग केलेली जुन्या प्रकारची बिल्डीग होती. इगोर त्या हॅाटेलमध्ये आहे आणि तो आपल्याला पाहण्याचा धोका आहे, हे लक्षात येऊनही एसेन अंबाल्याला पोचल्याबरोबर हॅाटेल हरिओमला पोचला होता. काही वेळातच इगोर दुसऱ्या मजल्यावरील डाव्या विंगमध ील खोलीत असल्याची माहिती त्याने मिळवली होती, आणि त्यानंतर त्याने हॅाटेल हरिओमसमोरील रस्त्याच्या पलिकडच्या बाजूच्या शिवओममध्ये आपला मुक्काम टाकला होता. कॅम्प एरियातील एका गजबजलेल्या गांधी रोडवर एसेनने हरिओमच्या समोरचं रोडच्या पलिकडे असलेल्या शिवओम हॅाटेलमध्ये वरच्या मजल्यावरील रस्त्याच्या

बाजूची खोली घेऊन तातडीने दुर्बीण काढून समोरच्या हॉटेलच्या प्रत्येक खिडकीची तपासणी करायला सुरुवात केली होती. आपण इगोरला कसे गाठणार आहोत, त्याला कसे बोलते करणार आहोत ह्याबद्दल एसेनच्या मनात अजून योजना स्पष्ट नव्हती. पण एसेनला ब◌ोलते करण्यासाठी कुठल्याही टोकाला जायची त्याच्या मनाची तयारी होती. पण प्रथम इगोर येथे आहे, ह्याची प्रत्यक्ष पाहून खात्री करून घेणं गरजेचं होतं. त्याकरताच तो अर्धा तास डाव्या बाजूच्या विंगच्या प्रत्येक खिडकीवर नजर फिरवत राहिला होता. आल्याबरोबर बिगर दुधाच्या कडक कॉफीचा बंपर ग्लास त्यानं मागविला होता, आणि आता अधुनमधून त्या कडक कॉफीचे घुटके घेत तो समोर पाहात होता. त्याला जेव्हा इगोर खिडकीच्या चौकटीशी दिसला, तेव्हा एसेन सावधपणे मागे सरकला. इतक्या दुरून इगोर त्याला ओळखणं शक्यच नव्हते. त्यांची दोघांची भेट अशी काही मिनिटांकरताच झाली होती, आणि तीही अगदीच धावती. तरीही एसेन

खिडकीपासून जरा मागे सरकला होता.

इगोर मोबाईलवर कुणाशी तरी बोलत होता, परंतु बहुधा त्याला सिग्नल्स क्लीअर मिळत यसावेत, कारण तो मध्ये मध्ये थांबत होता. एसेनने त्याच्या ओठांवर दुर्बीण केंद्रीत केली. लहानपणी त्याच्या जवळच्या नातेवाईकात दोन मुले बधीर-मुक होती. समवयस्क असल्याने एसेनला त्यांच्याशी संवाद साधण्याची सवय झाली होती, त्याच्या नकळत त्यांने ओठांच्या हालचालीवरून बोलणं समजून घेण्याची कला काही प्रमाणात अवगत केली होती. त्यांच्या दोघांमध्ये 70-75 मिटर्सचेच अंतर असल्यामुळे एसेनला त्याच्या ओठाच्या हालचाली स्पष्ट दिसत होत्या, तरीपण इगोरच्या बोलण्यातले काही शब्दच त्याला वाचता आले. त्यामध्ये रेंज, ब्लास्ट, डिफेन्स डेपो असे काही शब्दच त्याच्या कानावर आले. ह्या शब्दांचा परस्परसंबच त्याच्या लक्षात येत नव्हता. परंतु इगोरला कुणाशी तरी भेटीची वेळ ठरलेली असावी. कारण बोलता बोलता

त्यानं दोन वेळा मनगटावरील घडयाळाकडे नजर टाकली होती आणि बोलणं ऐकता ऐकताच तिसऱ्यांदा घडयाळाकडे पाहून त्यानं पलिकडच्या माणसाचा निरोप घेतला होता. एसेनने घाईघाईने कपडे करावयास सुरुवात केली, झपाटयाने तयार होत असतानाच त्याची नजर समोरच्या खिडकीवर होती. इगोर बाहेर पडणारे आणि कुठेतरी काही मिनिटात त्याला पोचायचे आहे हे एसेनला माहित होते. एसेनला इगोरच्या फ्लॅटचे दार तर दिसत नव्हते. परंतु समोरच्या भिंतीवर पडलेल्या प्रकाशाच्या झोतात होणाऱ्या बदलांवरून त्याला ख◌ोलीचा दरवाजा उघडल्याचे आणि बंद केल्याचे लक्षात आलं. एसेन झपाटयाने दार बंद करून खाली उतरला. त्याच्या अंदाजाप्रमाणे काही मिनिटातच इगोर हॉटेलच्या दाराबाहेर पडला. बाहेर पडल्याबरोबर समोर येऊन गर्दी केलेल्या ऑटोरिक्षावाल्याकडे दुर्लक्ष करून इगोरने रस्त्याने पायीच चालायला सुरुवात केली होती. त्याला काही अंतर पुढे जाऊ दिल्यानंतर एसेन बाहेर पडला आणि

काही अंतर राखून त्यानं इगोरचा पाठलाग सुरू केला. एसेनने वेषांतर केले नव्हते वा त्याचे कपडेही काही वेगळे घातले नव्हते. तरीही एखाद्या ओळखीच्या माणसाने त्याला काही अंतरावरून पाहिले असते तरी ओळखले नसते. त्यानं आपली चाल तर बदलली होतीच, पण पाठीला किंचित पोक काढून आपली मान पुढे वाकवून त्यानं आपली हनुवटी पुढे ढकलली होती. गुडघे किंचित पुढे व बाहेरच्या बाजूस काढून तो पावले फरफटत चालला होता. काही अंतरावर चालत गेल्यावर इगोर एखाद्या टॅक्सीत घुसेल आणि आपल्या नजरेसमोरून नाहीसा होईल असं एसेनला वाटत होतं, पण इगोर संथ आणि सहज चालीनं चालतच राहिला. डोक्यावरील लोकरी टोपीमुळे त्याचे लाल केस संपुर्ण झाकले गेले होते, आणि अंगातील कपड्यामुळे त्याचा युरोपियन गोरेपणा सहजपणे जाणवत नव्हता. त्याच्या पायातील जुती पंजाबी प्रकारची असल्याने येणाऱ्या जाणाऱ्या माणसात तो अगदीच वेगळा असा दिसत नव्हता. काही अंतर चालल्यावर इगोर डावीकडे

वळला, एसेनही मागेच होता.

आता शहराचा भाग सोडून त्यांनी छावणी भागात प्रवेश केला होता. रस्त्यावरील गर्दी कमी झाली होती. रस्तेही रुंद आणि दोन्ही बाजूंना केवळ बंगले. त्यामुळे इगोरने सावधपणा बाळगून मागे नजर टाकली असती तर एसेन त्याच्या नजरेस पडण्याची खुपच शक्यता होती. पण इगोर मॉर्गिंग वॉकला निघाल्यासारखा आरामात चालत होता. तो कुणा मिलिटरी अधिकाऱ्याला भेटायला निघालाय का? फोनवर तो डेपोबद्दल बोलला होता, इगोर डेपोच्या दिशेनेच चालला होता, पण डेपो तर तेथून दोन एक किलोमिटर्स दुर होता. मिलटरी बॅरक्सपासून ते आता जरा दूर आले होते. ज्या रस्त्याने ते जात होते, तो रस्त्याच्या एका बाजूस प्रचंड मोठे मैदान होते, आणि दुसऱ्या बाजूस तलाव. एसेनने मागे वळून पाहिले, दूरपर्यंत दिसणारा रस्ता अधुनमधून जाणारी जीप सोडली तर निर्मनुष्य होता. एसेनने आपली गती कमी केली, त्याच्यातील

आणि इगोरमधील अंतर वाढत गेले.

मध्येच इगोर थांबला. तलावाच्या बाजूला रोडपासून जरा दूर असलेल्या झाडाच्या सावलीत तो थांबला. त्याने घडयाळात पाहिलं. रस्त्यानं वर खाली पाहिलं. एसेनही ह्या रस्त्याला लागल्यापासून अगदी कडेनं सावली, सावलीनं चालला होता. तो झटकन् झुडपाच्या आड गेला. काही सेकंदस निश्चल राहून त्यानंतर तो हळूच रस्त्याच्या दिशेने सरकला. अजूनही तो झुडपाच्या आडच होता, पणत आता त्याला इगोरच्या हालचाली स्पष्ट दिसत होत्या. इगोरने खांद्यावरील पिशवीतून हाताच्या तळव्यात बसेल अशी काहीतरी वस्तू काढली. त्यानं परत एकदा घडयाळाकडे पाहिलं, आजुबाजूला पाहिलं. तो कशाची तरी प्रतिक्षा करत होता, कुणाच्या तरी येण्याची किंवा काहीतरी इशारा मिळण्याची. एसेनने कानोसा घेतला, रोडच्या दोन्ही दिशेला त्यानं नजर टाकली, दूरपावेतो काहीही हालचाल नव्हती. तलावाच्या बाजूने कुणीतरी बोलत

असल्याची गुणगूण ऐकू येत होती, बहुधा खालच्या बाजूला कुणी बाया कपडे धुवायला आल्या असाव्यात.

इगोर इथं अंबाल्याला काय करतोय? तो डेपोचा उल्लेख का करत होता? इगोरचे ह े रूप आपल्या कॉम्रेडस्ना माहीत असेल का? का पक्षाच्या टॉप लीडरशीपमध्ये कुणी घुसले आहे? खरं खरा इगोर आहे तरी कोण?

इगोरने घडयाळाकडे पाहिलं, रस्त्याच्या दोन्ही बाजूला पाहिलं, त्याच्या शरीराच्या हालचाली अशा काही होत्या, की आता तो काहीतरी करणार असं एसेनच्या लक्ष ात आलं, आणि त्यानं दोन तीन पावलं पुढे टाकली, इगोर त्याच्या हातातील त्या वस्तूवर काहीतरी केलं...त्याच्या हातात रिमोट आहे का? दुसऱ्याच क्षणी त्याानं ती वस्तू पाण्याच्या दिशेने फेकली, आणि इगोरने मागे वळून, रोड क्रॉस करून मैदानाच्या दिशेने पळायला सुरूवात केली. काय झालं

हे एसेनच्या लक्षात आलं नव्हतं, तसं म्हटलं तर केवळ काहीतरी वस्तू इगोरने पाण्यात टाकली होती, एवढेच. पण एसेनने रस्त्याकडे धाव घेतली होती, आणि त्यानं इगोरच्या दिशेने पळायला सुरुवात केली होती. आणि पळता पळता तो एकाएकी धडपडला, त्याच्यानजरेसमोर अर्धा एक किलोमिटर अंतरावर प्रचंड स्फोट झाल्यासारखा प्रकाश चमकून गेला, जमिनीला भूकंपासारखा धक्का बसला, त्याच्या नजरेममोर इगोर हवेत फेकला गेल्याचे त्याला दिसले, आणि दुसऱ्याच क्षणाला त्याच्या लक्षात आलं त्याचेही पाय जमिनीवर नाहीत त्यानं स्वत:ला सावरण्याचा प्रयत्न केला, पाठीवर पडण्याकरता त्यानं आपलं शरीर वळवळं, आणि तो खाली जमिनीवर आदळला.

त्याला शुध्द आली तेव्हा एकमेकामागोमाग होणारे स्फोटांचे प्रचंड आवाज त्याला ऐकू येत होते. ते ज्या दिशेने चालले होते, समोरचे क्षितीज काळया पिवळया धूराने व्यापले होते, पायाखालची जमीन थरथरत

होती. क्षणभर तो तसाच पडून राहिला, आणि त्याला एकदम आठवण झाली....इगोर. . तो धडपडत उठला, आणि त्यानं पळायला सुरुवात केली. एसेनच्या काय झालंय ते नीट उमजले नव्हते, पण जवळच असलेल्या संरक्षण खात्यांच्या शस्त्रास्त्रांच्या डेपोमध्ये हे स्फोट होत आहेत, आणि इगोरने आपल्या हातातील इन्स्टूमेंन्टच्या साह्याने हे केले आहे, आणि म्हणून ते इन्स्टूमेंट पाण्यात फेकून देऊन तो पळून जात आहे, इगोर...इगोर .. पिसाळल्यासारखा एसेन मैदानाच्या दिशेने धावत सुटला. रस्ता सोडून तो खाली उतरला, आणि मागच्या बाजूला आणि भोवती सायरन्स वाजू लागल्याचा आवाज त्याच्या मेंदुत घुमू लागला. धावता धावता त्यानं मैदानाच्या दिशेने, समोर पाहिलं. इगोरचा पत्ता नव्हता, त्यानं सभोवती पाहिलं, मैदानाच्या डावीकडे दाट जंगल दिसत होते. त्याला वाटलं, आपण बराच वेळ बेहोश असणार, आणि त्या काळात इगोर पळाला असणार, जंगलाच्या दिशेने. तो काय करेल आता, काय करेल? नक्कीच लवकरात

लवकत तो आपल्या हॉटेलात परतेल आणि एकतर पुढील काही दिवसांकरता येथेच कुठेतरी लपून बसेल, किंवा येथून जास्तीतजास्त दूर जाण्याचा प्र्यत्न करेल. आकस्मित झालेल्या ह्या घटनेच्या धक्क्यातून शासनाला बाहेर यायला काही काळ लागेल, पण पोलीस आणि मिलिटरी अधिकारी परिसरात पसरणार होते, संशयास्पद माणसांना चौकशीकरता अडकवले जाणार होते, इगोर पोलीस जागृत होण्याआधीच पळ काढणार ह्यात काही शंका नाही. कदाचित कुठेतरी दडवून ठेवलेल्या कारने त्यानं दिल्लीच्या दिशेनं प्र्वास सुरुही केला असेल. त्य ाच्या लक्षात आलं, आपल्यालाही तेच करावयास पाहिजे. प्र्थम म्हणजे ह्या स्पॉटपासून जास्तीतजास्त दूर जाणं. त्यानं जंगलाच्या दिशेने धावायला सुरुवात केली. ते ज्या दिशेकडून आले होते, त्या दिशेला जंगलातून जवळच्या रस्त्याने जाता येणार असा त्याचा पुर्ण विश्वास होता.

द ुसऱ्या दिवशी सर्व पेपर्समध्ये शस्त्र्ास्त्र्ांच्या

डेपोला आग लागल्याचे आणि अनेक क्षेपणास्त्रे जळून खाक झाल्याचे, जवळील काही गावांना हानी पोचल्याचे वृत्त प्रसिध्द झाले. कुठल्यातरी सार्वजनिक कार्यक्रमात उद्घाटनासाठी आलेल्या संरक्षणमंत्र्यांना पत्रकारांनी गाठले होते, आणि त्यांना ह्यामागे परदेशी शक्ती असाव्यात का? असा विशिष्ट उत्तर अपेक्षून प्रश्न विचारला होता. परंतु संरक्षणमंत्र्यांनी ह्या घटनेविषयी संपुर्ण माहिती मिळाल्याशिवाय आपण काहीही मतप्रदर्शन करणार नाही असं सांगून, आपल्या शत्रुराष्ट्रातच नव्हे तर शेजारी र◌ाष्ट्रातही अशा प्रकारच्या अपघाती किंवा घातपाती घटना गेल्या काही वर्षात वाढल्याची माहिती देऊन ह्यामागे 'बोलाविता धनी' वेगळाच असण्याची शक्यता दिसत असल्याचे सांगितले होते.

दिल्लीच्या टाईम्समध्ये प्रा. अशोक मित्रांचा ह्या विषयावर सविस्तर लेख आला होता, त्यात त्यांनी मागील काही वर्षांत तिसऱ्या राष्ट्रात असे अपघात

होण्याचे प्रमाण कसे वाढले आहे, आणि त्यात जळून नष्ट झालेली अस्त्रे कोणती हे जगजाहीर होत असल्याचे शत्रुच्या भीतीने तातडीने अस्त्रे खरेदी करण्याची निकड कशी भासते, त्यामुळे शस्त्रास्त्रे तयार करणाऱ्या कंपन्यांच्या मालाला उठाव होऊन त्यांचा लाभ कसा होतो, ह्याविषयी उहापोह करून ह्या कंपन्यांच तिसऱ्या जगातील अविकसित देशांतील शस्त्रास्त्रेसाठ्यांना आग लावत असल्याची संभाव्यता नाकारता येणार नाही असे प्रतिपादन केले होते. तसेच पूर्वीच्या शासनाच्या संरक्षणमंत्र्यांनी अशा अपघाताची चौकशी करण्यासाठी खास समितीही नेमली होती, त्या समितीने शस्त्रखरेदीत गुंतलेल्या डिफेन्स अधिकाऱ्यांच्या, शस्त्रास्त्रांच्या व्यवहारात कमिशन एजंट म्हणून काम करणाऱ्यांच्या मुलाखती घेऊन ह्या विषयात एक सविस्तर अहवाल तयार केला होता. हा अहवाल जुन्या आणि नव्या सत्ताधारी पक्षांना सोयीचा नसल्याने दडपून टाकल्याचेही प्रा. अशोकांनी षलिहिले होते. ह्या चौकशीमुळे सत्ताधारी पक्षाच्या

उच्चपदस्थ नेत्यांचे शस्त्रास्त्रं विक्री करणाऱ्या दलालांशी आर्थिक संबंध असल्याचे वास्तव उघड करणं भाग पडणार असल्यामुळे शासनाने हा अहवाल दाबून टाकला आहे असा आरोपही त्यांनी केला होता.

ह्यातून बऱ्याच गोष्टी स्पष्ट होत होत्या. 'इस्त्रा'च्या कॉम्प्युटरमध्ये आपल्या गटांविषयक माहिती पोचण्यामागे इगोरच्च जबाबदार असावा. खरा इगोर आहे तरी कोण? एका फंडींग एजन्सीचा प्रतिनिधी की जर्मनीतील माओवादी ग्र्ुपचा सदस्य की इस्त्राकरता छुपेपणाने काम करणारा घातपाती. पक्षनेतृत्वाशी असलेल्या आपल्या नात्याचा उपयोग करून अजितावर डिफेन्स मिनिस्टरची शिकार करण्याचे कार्य सोपवून त्यानं अजिताचाही काटा काढला होता का? परंतु इस्त्रासारख्या शस्त्रास्त्रांचा धंदा करणाऱ्या कंपन ीच्या हितसंबंधांना रक्षण्याकरता आपला उपयोग केला जात आहे ह्याची पक्षनेतृत्वाला जाणीव आहे का? एसेनसमोर अनेक प्रश्न अक्राळविक्राळ रूप

घेऊन उभे होते आणि ह्या प्रश्नांची खरी उत्तरे आपल्याला यातनादायक होणार आहेत हेही त्याच्या लक्षात आलं होतं. इगोर आपल्या हातून निसटला ह्याची त्याला तीव्रतेनं खंत वाटत होती.

दिल्लीला पोचल्याबरोबर त्यानं अजिताला इ-मेल
पाठविला आणि रंजनला इगोर आपल्या हातून
निसटल्याचे सांगूने कुठल्याही स्थितीत पंडीत
शर्माकडून माहिती मिळवण्याला काहीही पर्याय नाही
असं त्यानं त्यानं स्पष्ट केलं होतं.

प्रकरण अठरावे

सकाळी तिला जाग आली तेंव्हा खिडकीतून उन्हे आत आली होती. सर्व खोली सकाळच्या प्रसन्न प्रकाशात न्हाऊन निघाली होती. ती उठली आणि

दाराशी पडलेला न्युज पेपर तिने उचलला, टेबलावर ठेवला. आत जाऊन ती चहाचा कप घेऊन आली आणि कॉम्प्युटरपुढील खुर्चीत ती बसली. आदल्य◌ा दिवशी तिच्या कॉम्प्युटर विक्रेत्याशी तिने संपर्क केला होता, त्यान कबूल केलं होतं, ◌ं हा कॉम्प्युटर तो संध्याकाळपर्यंत घेऊन जाणार होता, आणि कुणाला तरी हे जुने मॉडेल विकून अजिताला लेटेस्ट मॉडेल तो देणार होता. अर्थात त्यासाठी सात आठ दिवस लागणार होते. त्या दरम्यान तिला गरज असल्यास तात्पुरता दुसरा कॉम्प्युटर द्याचची त्यानं तयारी दर्शवली होती. पण अजितानेही त्याला सांगितले होते, "पर्यायी कॉम्प्युटर देण्याची गरज नाही, कारण मीही काही दिवसाकरता बाहेर जाणार आहे."

तिने न्युजपेपर उघडला, फ्रंटपेजवरच अंबाला शस्त्रास्त्रं डेपोला आग लागल्याचे आणि लाखो रुपयांचे नुकसान झाल्याची बातमी होती. डेपोमधील अस्त्रे आणि स्फोटके ह्यांच्यामुळे भोवतालच्या

खेडयातही वित्तहानी आणि प्राणहानी झाल्याचे वृत्त होते. तिला प्रा. अशोकांशी झालेली चर्चा आठवली. तिने संपुर्ण बातमी वाचली, परंतु बातमी अगदीच त्रोटक होती, ह्या अपघातामुळे किती खेडयांना हानी सोसावी लागली, त्यात कुणी मरण पावले काय, ह्याबद्दल काहीही माहिती दिलेली नव्हती.

इंटरनेटशी कनेक्ट झाल्यावर अजिताने युडोरा उघडला, तिच्या अपेक्षेप्रमाणे तिच्या इ मेलचे उत्तर आले होते.

'अवर प्रेंच्ड डीएम हॅव युजड् अ पर्सनल मायकोस्क्रोप, ऍन्ड सीम्स टू हॅव फॉऊंड अन्हेल्थी व्हाईट सेल.'

अर्थ स्पष्ट होता, डिफेन्स मिनिस्टरने आपल्या अधिकारात कोठारांमध्ये लागलेल्या आगींची चौकशी करण्यासाठी नेमण्यात आलेल्या शासकीय चौकशी

कमिशनचा अहवाल ग्राह्य न मानता खास चौकशी अधिकारी नेमला होतो. ह्या अधिकाऱ्याने गुन्हेगार कंपनीचा शोध लावला आहे. तिचं नाव आहे इस्रा. व्हाईट सेल हे गोल नसतात, त्यांचा उल्लेख स्टार ह्या अर्थाने असायला हवा. ह्या चौकशीचा आणि डिफेन्स मिनिस्टरला टारगेट करण्याचा काही संबंध असेल का? आणि पक्षकार्याला इतका धोका पत्करून काय साधण्याचा उद्देश आहे पक्षाचा? जर्मनीतील भातृ राजकीय संघटनेला आणि आपल्या पक्षाला निर्माण झालेल्या धोक्याचा विचार करून ही योजना आखण्यात आली आहे का? की कंपनी देत असलेल्या शस्त्रास्त्रांच्या बदल्यात ही सुपारी आपल्या पक्षाला देण्यात आली आहे? मनातील शंका कुशंका बाजूला सारून अजिताने दुसरा इमेल पाहिला.

डिअर कॉम्रेड,

आय वीटनेसड् आयडी इग्नाईटींग डेपो वीथ द हेल्प

ऑफ रिमोट. ही मस्ट बी इस्त्राज् एजंट. आय वीश टू अपील आर.सी. टू कॅन्सेल अवर प्रोग्रॅम. गेटींग द इन्फॉ अबाऊट द मॅन यु सॉ ऍट खैबर. रिक्वेस्ट, ऍप्र्ोच आरसी बीथ् ऑल द इमेल्स ऍन्ड एक्स्प्लेन व्हाट वुई फाऊड ऑउट.

एसेन बाहेर गेला आहे हे अजिताला कळलं होतं. त्याची इ-मेल आलेली पाहून तिला फारसे आश्चर्य वाटले नाही, परंतु इ-मेल मधील मजकूर पाहून ती अत्यंत अस्वस्थ झाली होती. एसेनने अंबाल्याला शस्त्रास्त्रांच्या ड्ेपोला लागलेल्या आगीला इगोर जबाबदारी असल्याचे ठामपणे मांडले होते. तशाप्रकारचे पुरावे घेऊन तो तातडीने परत येणार होता आणि रिजनल कमिटीसमोर हे पुरावे ठेवून सर्व योजनाच रद्द करण्याचा निर्णय घ्यावा अशी आपण मागणी करणार होता. ह्याशिवाय तो तिसरा माणूस कोण होता ह्याच्ा शोधही आपण घेत असल्याचे त्यानं कळवलं होतं.े दरम्यान तिने तिला आलेली अज्ञात माणसाची इ-मेल

आणि त्याची इ-मेल घेऊन रिजनल कमिटीतील काही लोकांना भेटावे आणि ह्या मोहीमेचा पुनर्विचार करावा अशी विनंती करावी, असा सल्ला त्यानं दिला होता. हे सर्व आपल्या ग्रुपच्या दृष्‌टीने झालं, पण तेवढाच विचार करणं पुरेसं आहे का? अशा परिस्थितीत एसेनने काय करायला हवे. अशा घातपाती कृत्यामुळे केवळ भांडवली शासनाचे, सत्ताधारी वर्गाचेच नुकसान होणार आहे का? ह्यात सामान्य नागरिकांचा काही संबंध नाही का? जर ईगोर डाव्या माओवादी असल्याचे भासवून देशची संरक्षण व्वस्थेलाच सुरुंग लावायचा प्रयत्न करतेय अशी एसेनची खात्री असेल तर त्यानं काय केले पाहिजे? त्या संदर्भातील माहिती त्यानं शासनाला द्यायला हवी का?

दोन्ही ईमेल लेटर्स तिने परत एकदा वाचले आणि नष्ट केले.

इगोरविषयीचा तिचा संशय अखेर खरा ठरला होता,

आता एसेन हे सप्रमाण सिध्द करू शकणार होता. पण त्याचा अर्थ ही मोहीम रद्द करायला हवी असा थोडाच होतो. इगोर म्हणजे जर्मनीतला भ्रातृभावी गटाचा प्रतिनिधी नाही. पण ह्याबद्दल कदाचित त्या गटालाही काही माहिती नसेल, कदाचित त्यांचीही फसवणूक होत असेल! ह्या गटाचे आणि पक्षाचे संबंध उघड होऊ नयेत, आंतरराष्ट्रीय पातळीवर जी एक फळी उभी आकारात येत आहे, तिला धोका पोचू नये ह्या उद्देशाने ही मोहीम असेल, तर ही मोहीम का रद्द करायची? पण इगोरच्या नेतृत्वावरील प्रभावामुळे हे ऑपरेशन आखण्यात आले असेल तर त्याचा अर्थ नेतृत्वाची चूक आहे असंच म्‍हणावं लागेल ना? का केंद्रीय समितीमध्ये इगोरने आपली माणंणं घुसवली असतील तर? ही मोहीम रद्द केल्याने काय होईल? पक्षातील घाणीची सफाई करण्याचं काम कोण करेल, कशी सफाई होईल?का पक्षाचे तुकडे तुकडे होतील? त्या परिस्थितीत आपलं स्थान काय राहील? संस्थेचं स्थान काय राहील? सर्व पक्षसंघटनाच आतून सडली असेल

तर..

ही स्थिती का आलीय? का मुळातच परिस्थितीत असे काही बदल झाले आहेत, ते आपल्याला उमजत नाहीयेत? जागितिकीकरण, ग्लोबलायझेशन ह्या प्रक्रियेतून काय आकारात येतंय निश्चितपणे? सत्ताधारी, शोषक वर्गाचे हितसंबंध जपणारी शासनसंस्था, तिच्या स्वरूपात काही मूलगामी बदल होताहेत का? ही पूर्वीची शासनसंस्थेला केवळ बुजगावण्याचंच रूप येतय का? मग सत्ता कोणाच्या हाती आहे?

मनात उठलेल्या वैचारिक कल्लोळाला आवर घालायला पाहिजे मला. मनातील विचार स्पष्ट करण्यासाठी तर्काच्या, विचारसरणीच्या कसोटीवर घासून पुसून पाहिले पाहिजेत हे मनातील विचार. पण माझ्या मनातील हा गोंधळ केवळ वैचारिक पातळीवर आहे का? का भावभावनांच्या पातळीवरच

कोसळतेय काहीतरी...

माझा जीव वाचेल, पण काय साधेल त्यातून? काय शिल्लक राहील पक्षातील भ्रष्टतेविरूध्द संघर्षाला तोंड दिलं तर..

खिडकीतून दिसणाऱ्या आकाशाच्या तुकड्यावरून तिची नजर आत आली. कॉम्प्युटरवर स्क्रीन सेव्हर चालू झाला होता, काळया अवकाशात असंख्य प्रकाशबिंदू चमचमत होते आणि केंद्रस्थानी फिरत होता, ब्लू प्लॅनेट..धरती...उजव्या बाजूने ग्रहाच्या कडेमागून झळाळत होता, सूर्याचा तेजस्वी बिंदू...

संथगतीने फिरणाऱ्या पृथ्वीच्या निळया गोलकाकडे ती पाहात राहिली...

काय करणार आहोत आपण? अनुला फोन करणार आहोत? रिजनल कमिटीच्या उपलब्ध सदस्यांसमोर

कुठल्या तरी अज्ञात व्यक्तीने पाठवलेल्या संदिग्ध मजकूराचा पुरावा देऊन काय सांगणार आहोत आपण? मला मरणापासून वाचवा ह◌ेच ना! आपल्याला बाजूला ठेवून आपल्या क्रांतिकारी संघटनेबद्दल, बदलत्या परिस्थितीबद्दल आपण मांडू शकणार आहोत का नव्याने सर्व परिस्थितीकडे बघण्याची गरज? का आपल्या भूमिकेला स्वरूप येईल चामडीबचावू रडगाण्याचं, नैराश्यवादाचे?

फोन खणाणला, दचकून उठून उभीच झाली ती.

तिने फोन उचलला, कानाशी लावला,

' ' हॅलो...हॅलो ' ' प्रेरणाचा आवाज तिच्या कानी आला.

काही क्षण ती काही न प्रतिसाद न देता तशीच नि:शब्द ऐकत राहिली, जणू आपल्या स्वरयंत्रातून

योग्य आवाजच निघणार नाही अशी संभ्रमावस्थेत ती होती.

अखेर घसा जरा साफ करून ती म्हणाली, " हॅलो, मी अजिता' तिचा आवाज अगदी अस्पष्ट आणि खोल गेलेला होता. "बोल प्रेरणा"

"अजिता, कालपासून फोन करायचा म्हणत होती. काही विशेष नाही. सर्व ठीक आहे. आम्ही सर्वजण आजच निघतोय, सहलीवर. एक सुमो आणि मेटाडोर घेतोय बरोबर. नायरजींना येणं जमणार नाही, मात्र बाकी सर्वच लोक आहेत ह्यात. तीन चार दिवसांपूर्वी डिएसपीं.चे दोन तीन वेळा फोन आले होते, तुला कॉन्टॅक्ट करायला सांगितलय. इगोरबद्दल चौकशी करत होते."

" ठीक आहे. मी बघते काय करता येईल ते. सर्वांना सदिच्छा. आरामात या. उगाच परत यायची घाई करू

नका."

" थँक्स अ लॉट. म्हणज े आम्हा सर्वांतर्पेच्. बट वुई वील मिस यू अजिता. इतक्या दिवसांनी हे छान जमून आलंय. सर्व येत आहेत, पण तूच नाहीस. वुई विल रिअली मिस यू."

अजिताचा गळा दाटून आला, तिच्या लक्षात आलं, तिच्या डोळयात पाणी जमा होतंय., घसा साफ करीत नेहमीच्या आवाजात बोलण्याचा प्र्यत्न करत ती म्हणाली, " मला तुमच्या बरोबर यायला निश्चितच आवडलं असतं प्रेरणा. पण डोन्ट वरी... प्र्थम प्र्थम चुकल्या चुकल्यासारखं वाटेल, माझी गैरहजेरी जाणवेल, पण मग तुम्ही एन्जॉय कराल. आणि हेच नैसर्गिक आहे प्रेरणा. गतकाळ आणि गतकाळाच्या खाणाखूणा सांगणाऱ्या आठवणीतून पाशातून मुक्त होणंच योग्य असते." क्षणभर ती अडखळली, मग हसत म्हणाली, " असो..असो.. माझी भाषणं झोडायची सवंय

अशी जाणार नाही. गुड बाय ॲन्ड गुड विशेस्. सर्वांना... समस्तांना.."

तिने फोन कट केला.

एकाएकी तिला वाटलं, आपल्या अंगातील सर्व शक्ती संपलीय, अडथळा दूर होताच, सर्व पाणी वाहून गेलंय झफाटयानं. तिनं कॉम्प्युटर मागे ढकलला, टेबलावर तिच्या पुढ्यात असलेल्या एकमेकात गुंफलेल्या हाताच्या पंजांकडे ती पाहात राहिली, आणि मग मानेतील शक्ती गेल्याप्रमाणे तिने आपलं हनुवटी त्यावर टेकली. तिला वाटलं, तिच्या अंगातील, नसेनसेतील, सर्व अवयवातील शक्ती झपाटयाने कमी होतेय, प्रचंड थकवा. . . निराशा. . हताशपणा.. असहाय्यता...

आपल्या डोळयांतून अश्रू ओघळायला लागल्याचं तिच्या लक्षात आलं, पण त्या अश्रूनां तिनं आवर

घालायचा प्रयत्न केला नाही, गालांवरून ओघळणारे अश्रू हनुवटीच्या कडेवर येऊन पालथ्या हातावर टपकत होते. तिला वाटलं तिचं संपूर्ण शरीर गदगदत आहे, आपल्या शरीरातून अश्रुंच्या सागराला भरती आली, लाटांवर लाटा.. कातडीच्या तटाला आपटून असंख्य छिद्रांतून त्या अश्रुंच्या चिळकांड्या बाहेर उडत आहेत...

नाही. मी ऍनीला फोन करणार नाही, मी आरसी च्या सदस्यांना ह्या इमेल्स दाखवणार नाही, त्यांच्या उलट तपासणीला उत्तरं द्यायची माझी इच्छा नाही. ठरल्याप्रमाणे... की ठरवल्याप्रमाणे मी मृत्यूला सामोरे जाईन, काय आहे ती कविता..

जेव्हा मृत्यू माझ्या घराचा दरवाजा ठोठावेल,

मी उठून दार उघडेन, आणि हात पुढे करून मी म्हणेन,

वेलकम, स्वागत असो मृत्यो....

एसेननी पुरावे आणले धडपड करून, सिध्द केले त्याने की, हा निर्णय चुकीने घेतला गेला आहे! खोटया समजुतींवर घेतला गेलाय हा निर्णय! क्रांतीची स्वप्ने पाहणाऱ्या भोळसट स्वभावाच्या, जीवाची पर्वा न करणाऱ्या लोकांना बुद्दू बनवण्यात आलंय! ठीक आहे. निर्णय बदलला गेला, मी आणि डिफेन्स मिनिस्टर दोघेही वाचलो.. मग काय? त्यामुळे काय होणार आहे? परस्पर अविश्वास. . संशय. . पण हा तर आमच्या नात्यातील एक धागा राहिलाच आहे की सातत्याने...

एकाएकी वाजलेल्या घंटीने ती धडपडत उठून उभी राहिली, आपल्याला झोप लागली ह ोती की आपण तंद्रीत गेलो होतो? तिने फोन उचलला,

"अजिता, एक तासात मी तेथे पोचतेय. सी यॉू" ऍनाचा निरोप आला, आणि फोन कट झाला.

अजिता उठली, उठून ती बाथरूमकडे वळली, जाताना सहजच तिची नजर आरशाकडे वळली. आरशातील स्वत:ची प्रतिमा ती पाहातच राहिली. ही प्रतिमा तिला अनोळखी होती. केस विस्कलटलेले, डोळयांखाली काळी वर्तुळे, भकास चेहरा. एखाद्या हरलेल्या माणसाचा चेहरा असाच असतो का? नाही... मी हरलेले नाही. माझा रस्ता चुकला की काय अशी शंका माझ्या मनात असेल, पण मी भेकड नाही. हा रस्ता सोडून मी मध्येच थांबणार नाही, मागेही वळणार न◌ाही. शेवटच्या टोकापर्यंत मी प्रवास करणार आहे. आरशातील ही मी..मी नाही. मान्य नाहीयेस मला तू. गेट लॉस्ट.. आय से गेट लॉस्ट.

ती झपाटयाने बाथरूमकडे वळली, घाईघाईने तिने शॉवर सुरू केला, अंगावरील गाऊन काढून बाथरूमबाहेर फेकला, आणि तिच्या डोक्यावरून, खांद्यावरून, छ◌ातीवरून, पोटावरून, पाठीवरून, सर्व अंगांगावरून वाट काढीत पाण्याचे ओघळ वाहू लागले.

घट्ट डोळे मिटून सर्वांगांला होणाऱ्या वहात्या पाण्याचा थंडगार स्पर्श ती अनुभवू लागली.

ऍना लिफ्टमधून बाहेर आली, अजिताच्या दाराजवळ पोचून डोअर बेलचं बटण न दाबता तशीच उभी राहिली काही क्षण. मग तिने बेल वाजवली. दरवाजा उघडला आणि तिच्यासमोर अजिता उभी होती, नुकतेच स्नान केलेली, ओल्या केसांचा बुचडा बांधलेली, टवटवीत चेहऱ्याची. चेहऱ्यावर हास्य घेऊन आणि बाहू पसरून स्वागत करणारी. डोळे जरा खोल गेलेले आहेत, पण ते सहाजिकच नाही का?

ऍना पुढे झाली आणि त्यांनी एकमेकाला मिठीत घेतलं.

"बैस एएन. चहा ठेवलाय गॅसवर. घेऊन येते. ज्या अर्थी तू आलीस, त्याअर्थी तुला एसेनचा ईमेल आला असावा, किंवा निदान फोनतरी. खरं सांगू ऍना, ह्या

विषयावर बोलावसंच वाटत नाहीये मला. माझ्याकरता सर्व निश्चित झालंय. सर्व आखलं गेलंय. मनाची सिध्दता झालीय पूर्ण. मागे वळूनही पाह्यची गरज नाही वाटत मला. पण ठीक आहे. त्या टेबलावर मला आलेल्या अज्ञात हितेच्छूच्या दोन ई-मेल वाचून बघ. मी चहा घेऊन येते."

अजिताच्या आवाजात किंचिंतही ताण नव्हता, तणाव नव्हता. जणू तिने कुठल्यातरी टूरवर जायचं ठरवलं होतं, आणि त्याबद्दल ती बोलत होती, अशी सहजता तिच्या स्वरात होती. अजिता आत गेली आणि ऍना ती गेल्यावर मोकळया झालेल्या दाराच्या चौकटीकडे पाहातच राहिली.

अजिता आली आणि चहाचा मग तिच्या हातात देऊन तिच्यासमोर बसत म्हणाली, "बोल, काय म्हणतेस?"

"खरं सांगू का अजिता, मला काही समजेनासेच

झालंय. मूळात ह्या ऑपरेशनच्या सूचना आल्यापासूनच मी अस्वस्थ झालंय. सारखं वाटायचं, काहीतरी चुकतंय. काहीतरी भलतंच घडतंय. पण मग मी समजूत घालायची मनात, इतक्या वर्षांची आपली कलिग, आपली मैत्रिण, ती आपल्यातून जाणार ह्या भावनेवर माझी राजकीय निष्ठा मात करू शकत नाहीये. आपला हा दुबळेपणा आहे असं वाटायचं मला. आणि तू ज्या शांतपणाने हा निर्णय मान्य केलास, पचवलास, ते बघून तर असूया वाटली मला. वाटलं, मी इतकी दुबळी कशी?

अजिताने काहीच प्रतिक्रिया दिली नाही. शांत नजरेनं ती ऍनाला निरखित राहिली. ऍनानं आपली नजर आपल्या मांडीवर एकमेकात गुंफलेल्या बोटांकडे लावली होती, " पण आता एसेनशी बोलणं झाल्यावर, ह्या ई-मेल पाह्यल्यावर मला वाटतंय, माझं आंतरमन मला सूचना देत होतं, आणि मी दुर्लक्ष करत होते. अजिता, अनेकदा वाटलं मला, इतरांशी बोलावं, पण

वाटलं, माझ्या कमिटमेंटवर शंका घेतली जाईल...आणि आता सुरू केलेल्या चक्राला तातडीनं थांबवणं अशक्य नाही, पण कठीण आहे. आरसीच्या सदस्यांशी संपर्क साधायलाही वेळ लागेल बराच. मग जी माहिती मिळालीय, मिळेल तिच्या आधाराने हे ऑपरेशन रद्द केले जाईल, खात्री आहे मला. पण कॉन्फरन्स उद्या सुरू होतेय. . अजिता. . मी ुतुला विनंती करायला आलेय, माझं ऐक. नाहीशी हो तू, निघून जा कुठेतरी. निदान एका पंधरवड्याकरता. तेवढया काळात सर्व गोष्टी स्पष्ट होतील. इगोर कोण आहे ते पुढे येईल. हा निर्णय का व कोणत्या स्थितीत घेतला गेला ह्यावर चर्चा होईल. ह्या हत्त्येतून होणारा अनर्थ टळेल, खेडयाखेडयातील स्त्रीपुरुषांना होणार त्रास वाचेल. मी.. मी तुला वचन देते, अजिता, मी तुझ्याबाजूने उभी राहीन, मी तुला भूमीगत व्हायचा सल्ला दिला असं कबूल करेन मी तेव्हा."

ऍना थांबली, तिने अपेक्षेने अजिताकडे पाहिलं, पण

अजिता काहीही न बोलता तिच्याकडे पाहात राहिली. तिच्या चेहऱ्यावरील भाव वाचण्याचा ऍनानी प्रयत्न केला, पण तिच्या चेहऱ्यावर तोच शांतपणा होता.. निर्विकारपणा..

बराच वेळ वाट पाहूनही अजिता काहीच बोलत नाही, असं पाहून ऍना खुर्चीच्या काठावर सरकली, हात लांबवून अजिताच्या मांडील स्पर्श करीत म्हणाली, ' ' ह्यापूर्वीच मी हालचाल करायला पाहिजे होती अजिता, कबूल आहे मला. निषेध नोंदवायला पाहिजे होता, निदान निर्णयाची योग्यता क्वेशन करायला हवी होती. पण मी गप्प राहिले. . पण ही चूक सुधारायची संधी दे अजिता, ह्या चूकीच्या निर्णयामुळे होणारा सर्वनाश तूच टाळू शकतेस अजिता... पक्षाचं काय व्हायचं ते होईलच. पण अजिता, तू इतक्या वर्षात उभं केलेलं काम, ह्या हजारो स्त्रीपुरुषांना लाभलेली आत्मसन्मानाची भावना, त्यांची माणूसपणाकडे सुरू झालेली वाटचाल. . . अजिता, तू नाहिशी हो...

एसेनचाही हाच सल्ला आहे.. तो काळाशी स्पर्धा करत आहे पण.. कदाचित विलंब होण्याची शक्यता आहे."

ऍना परत मूक होऊन अजिताकडे अपेक्षेन पाहात राहिली, परंतु अजिता काही बोलली नाही, तिच्या चेहऱ्यावरील भाव तसेच निर्विकार... आपण जे काही सांगतले, हिने ऐकले का नहाही ? ही अशी निश्चल का? तिच्या मनाच्या तळातून कधीतरी अभ्यासलेल्या इंग्रजी कवितेच्या ओळी तरंगत वर आल्या...

व्हेन दे व्रॉट हर वॉरिअर डेड, शी डिड नॉट वीप ऑर डीड नॉट क्राय..

अस्वस्थ हालचाल करीत ऍना अजिताच्या प्रतिक्रियेची प्रतिक्षा करीत राहिली बराच वेळ. मग काहीतरी आठवण झाल्याप्रमाणे तिने आपली पर्स उघडली, आतून एक पांढरं जाड ब्राऊन पेपरचं पाकीट तिनं बाहेर काढलं, ते पाकीट टेबलावर ठेवत ती

म्हणाली, " अजिता, हे वीस हजार रुपये आहेत. वीस दिवसांची मुदत दे आम्हाला. मधल्या काळात सर्व व्यवस्थित होईल. एसेन प्रेरणाला निरोप देईल. "

अजिताने पाकिटाकडे नजर टाकली, पण ती काही बोलली नाही. तिच्या चेहऱ्यावरील भाव बदलले नव्हते, पण ती विचार करीत होती हे निश्चित. ऍना तिचा प्रतिसाद मिळण्याची वाट पहात राहिली काही वेळ. पण अजिता काहीच बोलली नाही.

ही अशी गप्प का? जे झालं त्याला मीच जबाबदार आहे का? पक्षाची सिनिअर सदस्य म्हणून हिचीही काही जबाबदारी नव्हती का? ती का गप्प राहिली. पहिली ईमेल आल्याबरोबरच हीने का नाही दिली माहिती आरसीला? ऍनाच्या लक्षात आलं, ह्या विषयाला सुरूवात केल्यापासून अजिताने एक शब्दही उच्चारला नव्हता.

आपला स्वर शांत ठेवण्याचा प्रयत्न केला ऍनाने, तरीपण तिच्या आवाजात एक प्रकारचा कडवटपणा होता, ध ार होती, "अजिता, मला जे सांगायचं होतं, ते संपलं. तू काही बोलायचं नाही असंच ठरवलं आहेस का? मी काय करू अजिता, तुझी क्षमा मागू पाय धरून? कसं समजावून देऊ तुला मला काय यातना होताहेत त्या? मी ही माणूस आहे अजिता, स्त्री आहे तुझ्यासारखी.. " तिचा गळा दाटून आला होता, आवाज जड झाला होता.

अजिताने टेबलावरील पाकिटावरची नजर उचलून ऍनाच्या चेहऱ्याकडे पाहिलं, ऍनाच्या डोळयांतून दोन अश्रू ओघळून गालावर आले होते.

अजिता पुढे वाकली, तिने ऍनाच्या खांद्यावर हात ठेवला, ती बोलली तेंव्हा तिचा आवाज संथ आणि शांत होता, " तुझं काही चुकलं नाही ऍना. तु कशाला क्षमा मागतेस, कशाला त्रास करून घेतेस मनाला? " ती

काही क्षण थांबली, विचार करीत, मग म्हणाली,

"माझा निर्णय झालाय ऍना. जगण्यापेक्षा ह्या वेळेला मरणंच योग्य असं मनापासून वाटतंय मला. समजा, केले हे ऑपरेशन आपण रद्द, काय होणार आहे उद्या? चर्‌चा, वाद, आरोप..प्रत्यारोप. . अविश्वास, संशय.. पश्चाताप. फॅ्रगमेंटेशन. . भ्रमनिरास. . नाही. . ऍना, एकदा, दोन तपापूर्वी मी ह्या सर्व यातनांतून गेले आहे.. अनेक साथी नाहीसे झालेलें पाहिलेत, निरर्थक लढाई लढताना, आपसातच. भोवती सगळी पडझड, आणि आत मनातही पडझड. परत सर्व मूळापासून उभं करायचं म्हणजे काय असतं? नाही ऍना. मी ठरल्याप्रमाणे , माझ्याकरता निवडलेल्या मार्गाने जाणार आहे. . माझ्या निष्ठेला, श्रध्देला, विश्वासाला धक्का न लावता. माझा कुणावर राग नाही अना. कुणाला दोष नाही देत मी. पण मी तयारी केलीय ऍना, प्रवाहात उडी घ ेतलीय मी ऍना. . काहीही धडपड न करता, प्रतिरोध न करता, मी वाहात जाणार

प्रवाहाबरोबर... अखेरपर्यंत. "

''पण अजिता. . हा हटवादीपणा आहे अजिता, हा हा..." ऍनाच्या आवाज रडवा झाला होता..

"बस्स!" 'शब्दाचा फटकारा मारून अजिता उभी राहिली, " उठ ऍना, ते पाकीट उचल आणि फ़ूट."

असं म्हणून ती आत निघून गेली. कितीतरी वेळ ऍना सुन्न होऊन खुर्चीत बसून राहिली होती.

प्रकरण एकोणिसावे

कॉन्फरन्स अगदी वेळेवर सुरू झाली. कॉन्फरन्सच्च्या उद्घाटनासाठी वृध्द स्वातंत्र्यसेनानी मृदूला सिंघानी आल्या होत्या. अजिताला दुसऱ्या

ओळीतील मधल्या मोकळया पॅसेजजवळ कडेची खुर्ची मिळाली होती. कॉन्फरन्स सुरू व्हायच्या जरा आधीच ती पोचली होती, अजून प्रतिनिधी जमा झाले नव्हते. जे आले होते ते कुणी स्टेजजवळ तर कुणी पेन्डॉलच्या बाहेर रेंगाळत होते. अजिता खुर्चीवरून उठली, आणि स्टेजजवळ ठेवलेल्या शिल्पाला जवळून निरखण्याच्या मिषाने जरा भरभर चालत स्टेजपर्यंत गेली. काही वेळ शिल्पाकडे निरखून पाहात उभं राहून ती सावकाश आपल्या स्थानाकडे परतली. स्वयंसेविकेने आणून दिलेली कार्यक्रम पत्रिका तिने उघडून पाहिली, समारोपाच्या कार्यक्रमात स्थानिक एन.जी.ओ.चे आणि इंटरनॅशनल पातळीवरील फंडींग एजन्सीच्या प्रतिनिधींनी पहिले दोन दिवस ज्या समस्या मांडल्या असतील वा मागण्या केल्या असतील त्यांचा सारांश पीएम, डीएम व तिन्ही फोर्सेसचे चिफज् ह्यांच्या कानावर घालण्यासाठी दोन प्रतिनिधी बोलणार होते. त्यासाठी दिल्लीत स्थित असलेली आणि कोस्टल एरियाजमध्ये कार्यरत असलेली डीएएसएच (डॅश)

संस्थेची मोनिका बोलणार होती. फंडींग एजन्सीचा प्रतिनिधी म्हणून जर्मनीतील फंडींग एजन्सीचा प्रतिनिधी इगोर स्टेजवर असणार होता. तिने आल्याबरोबर ज्या हॉटेलमध्ये प्रतिनिधींची निवासाची व्यवस्था केली होती, तेथील प्रतिनिधींची यादी पाहिली होती. इगोरचे नाव त्यात नव्हते. पण त्यात आश्चर्य नव्हते, कारण फंडींग एजन्सीच्या प्रतिनिधींची एनजीओच्या प्रतिनिधींबरोबर एकाच हॉटेलमध्ये सोय करणे सोयीचे नाही असे गृहीत धरून त्यांची दुसऱ्या टू स्टार हॉटेलमध्ये सोय केली होती. त्याच हॉटेलमध्ये डिफेन्समधील अधिकारी वर्गही उतरला होता, कदाचित एकमेकांचे संबंध प्रस्थापित व्हायला सोपे जावे हाही हेतू दोघांना एकत्र ठेवण्याचा असावा.

शेजारी येऊन बसलेल्या माणसांकडे एक फॉर्मल हास्य करून त्यानंतर अजिताने त्याच्याकडे दुर्लक्ष केले. कार्यक्रम सुरू झाल्यावर तिनं संपुर्ण लक्ष स्टेजवर बोलणाऱ्या वक्त्यांकडे केंद्रित केले. खिशातील

लहानशी डायरी काढून आपल्या जाकीटाच्या खिशातील भारी पेनने ती प्रत्येक वक्त्याच्या बोलण्यावर आपल्या प्रतिक्रिया बंगाली लिपिमध्ये लिहित होती. शेजारील माणसाने तिच्या डायरीतील नोंदीवर धावती नजर टाकायचा चोरटा प्रयत्न केला, परंतु आपल्याला अनोळखी भाषा दिसल्यावर त्यानं परत अजिताकडे पाहिलेही नाही. अजिताला माहित होते तो कुणातरी इटालियन फंडींग एजन्सीचा प्रतिनिधी होता. बुफे लंचच्या वेळेस ती इकडं तिकडं फिरून तेथे कोण कोण प्रतिनिधी आहेत ह्याचे निरिक्षण करून आली. मात्र त्याच्याशी तिनं ओळख करण्याचे तर टाळलेच, पण त्याच्या पासून जाणिवपूर्वक ती दूर राहिली. वक्त्यांच्या मग ते केंद्र सरकारातील सेक्रेटरी पदे भुषवणारे आय. ए. एस. अधिकारी असोत, भारतीय उद्योगांचे प्रतिनिधी असोत वा वेगवेगळया देशातील एनजीओचे प्रतिनिधी असोत, प्रत्येकाच्या भाषणांमधून अजिताला जाणवत होता तो फंडींग एजन्सीचा वाढ़ता प्रभाव आणि मल्टी नॅशनल कंपन्यांची अविकसित

देशांवरील वाढती मगरमिठी. पण फंडींग एजन्सीचा प्रभाव म्हणणेही तितकेसे योग्य नव्हते कारण आपल्या देशात येणाऱ्या फंडींग मधील बऱ्याच मोठया प्रमाणातील फंडींग हे शासनसंस्थेला मिळणारे फंडींग असते ही तिला माहीत होते. फंडींग एजन्सींपेक्षा देशाला हानी पोचवू शकत होत्या अशा मोठल्या कंपन्यांचे प्रतिनिधी आपल्या भोवती बसलेले आहेत हे तिला माहीत होते. ह्यात शस्त्रास्त्रनिर्मितीशी वा व्यापाराशी संबंध असलेल्या कंपन्यांची संख्या जास्त दिसत होती. पण तसेही म्हणणे कठीण होते, कारण ज्या कंपन्या टीबी, कॅन्सर, एडस् सारख्या असाध्य रोगांवर असलेल्या महागडया औषधांची निर्मिती करत होत्या, त्याच लांब पल्ल्याच्या बंदुका, तोफाही निर्माण करत होत्या. तिला हे माहीत होतं की ह्या कंपन्या स्वत:ला इटालियन म्हणवत असतील वा जर्मन, ह्यांचे हितसंबंध देशाच्या सीमांनी बध्द केलेले नाहीत. ह्या मल्टीनॅशनल्समध्ये आपसात स्पर्धा आहेत, पण ह्या स्पर्धेत काही मोजक्या कंपन्या वरच्या पायरीवरच

आहेत, आणि त्यांच्यात स्पर्धेपेक्षा सहकार्याचेच संबंध जास्त आहेत. केवळ ह्या भाषणांवरून, प्रतिनिधींच्या आपसातील वागण्यावरून काही निष्कर्ष काढणे चुकीचे आहे हे तिला माहीत होते.

कॉन्फरन्सचा पहिला दिवस संपल्यावर तिला देण्यात आलेल्या हॉटेलवर ती पोचली तेव्हा काऊंटरवर तिच्या नावाने एमजीचा मेसेज आला होता. तिनं मेसेज वाचून आपल्या खिशात खुपसला, ती लिफ्टने आपल्या खोलीकडे निघाली. काही वेळात ती ड्रेस बदलून खाली आली, हॉटेलच्या बारमध्ये जाऊन तिनं सावकाश एक बियर संपवली आणि ती रमत गमत हॉटेलबाहेर पडली. रोडच्या कोपऱ्यावर आल्यावर मात्र तिनं झपाट्यानं चौक पार केला आणि टॅक्सी पकडून ती तेथून एमजीला भेटायला निघाली.

त्या छोटया छोटया दुमजली चाळींच्या गर्दीतून तीने 11 नंबरची चाळ शोधून काढली, आणि ती दुसऱ्या

मजल्यावर जाऊन अरुंद गॅलरीतून शेवटाला असलेल्या खोलीपाशी पाचली. दरवाजा केवळ लोटलेलाच होता, तिने हळूच दार ढकलले. एमजी भिंतीला पाठ लावून बसला होता. त्याचे डोळे मिटले होत े, आणि चेहऱ्यावर थकव्याच्या खाणाखूणा दिसत होत्या. तिने त्याच्याकडे पाहिले, आपली तर सुट्टी होणार आहे, पण ही घटना घडल्याबरोबर पोलीस मोहीम काढणार, गाव गाव पिंजून काढणार, ह्यांच्या मागे लागणार. हा एवढा थकला का असावा? ती हळूच त्याच्या शेजारी बसली, त्याच्या खांद ्यावर हलकेच हात ठेवण्याआधी तिने हलकेच हाक घातली, "कॉम्रेड एमजी..कॉम्रेड..! मी अजिता आलेय. "

त्याच्या खांद्याला तिच्या हाताचा स्पर्श झाल्यावर त्यानं डोळे उघडले. सावरून बसत तिच्याकडे पाहून एक ओशाळवाणे हास्य करत म्हणाला, "झोप लागून गेली. खरं तर कालच इथं पोचायला हवे होते. पण दंगलीत अडकलो. दोन दिवस झोपलेलो नाही कॉम्रेड"

"ओ यु पुअर चैप. आय ऍम सॉरी. ऍनाची भेट झाली होती?"

"नाही. तिला भेटावे म्हणून निरोप मिळाला मला. पण अगदी अशक्य होते. आज सकाळी कसाबसा येथे येऊन पोचलो. इकडे येण्याकरता उलट्या दिशेला कर्नाटकात धुसून इकडे आलो. गावची गावं पेटली आहेत, रस्त्यावर जागोजागी गाडया जळत आहेत. एकट्या दुकट्या माणसाला गाठून मारत आहेत साले भेकड. दंगल सुरू होऊन आज आठ दिवस झालेत, पण तरीही काही बदल नाही. खरं तर ही दंगल नाहीच. लोकांना हिंसक बनवण्यात यश मिळालंय, हिंदुत्ववाद्यांना आणि धर्मांध मुसलमानांना.

छे! नुसती त्या दृश्याची आठवण झाली तरी पोटात ढवळाढवळ सुरू होते. पोटात जे काही थोड अन्न आहे, बाहेर येऊ पाहाते उलटून. माणसाच्या माणुसपणावर विश्वास ठेवून एखादा मुसलमान हिंदुंच्या वस्तीत

आला, किंवा त्या वस्तीतून जात असेल, तरी जमा होतात सर्व. सामुहिक हत्त्या करतात बिचाऱ्याला कोंडीत पकडून. दगडांचा मारा करून. मारपीट करून, मग भोसकून, नंतर बिचारा तळमळत असताना अंगावर रॅकेल टाकून पेटवून देतात हे राक्षस. अशी वुच्रता, अशी पशुपेक्षाही दाखवली जाणारी पशुता... नाही.. नाही.. अजिता. दुसऱ्याचा वेदना पाहून ह्यांना आसूरी आनंद मिळतो. अजिता, अगं मारणाऱ्याच्या अंगात कपडे नाहीत, मरणाऱ्याच्या पोटात अन्न नाही, आणि खून, कत्तली करताहेत एकमेकांच्या. नाही, कॉम्रेड.. मला नाही सहन होत आता.

खाली मान घालून एमजी हुंदके देऊ लागला. त्या हुंदक्यांनी त्याचं सर्व शरीर हिंदकळत होतं. परंतु डोळे मात्र् कोरडे होते. हा धिप्पाड शरीराचा पुर्ण वाढ झालेला माणूस तिच्यापुढे हुंदके देऊन रडत आहे.

अजिताने एखाद्या लहान मुलासारखे त्याला कवेत

घेतले, त्याच्या केसावरून, पाठीवरून हात फिरवून तिनं त्याला शांत केलं. मग काही वेळानं ती उभी झाली, खोलीचा दरवाजा बंद करत त्याच्याजवळ जाऊन म्हणाली, "कॉम्रेड, जागा हो. . जागा हो. स्वत:ला सावर कॉम्रेड! आपल्याला फार मर्यादित वेळ आहे. मी लंच पिरिएडला आलेय इथं, आणि सेमिनार सुरू व्हायच्या यायचंय मला परत पोचायलाच हवे."

काही क्षण तो तिच्याकडे डोळे विस्फारून असा पाहात राहिला की, जणू त्याच्या नजरेसमोर दुसरंच कुठलं दृश्य उभं होतं.

अजिता कार्यक्रमाच्या ठिकाणी अगदी वेळेवर पोचली, ती आपल्या जागेवर येऊन बसली. एनजीओचा एक प्रतिनिधी, पाकिस्थानशी शत्रुत्व असल्याने आणि सीमेवर सातत्याने ताणतणाव असल्याने भारताला शस्त्रसज्ज राहाण्यासाठी काय किंमत द्यावी लागते त्याची आकडेवारी सांगत होता. एका टॅंकरच्या

किमंतीत किती शाळा उभ्या करता येतील? एका आरमारी जहाजाच्या बदल्यात किती मुलांना जेवण व मोफत शिक्षण देता येईल ह्याचे आकडे तो भराभर सांगत होता. आणि मागे बसलेली तरुण मुलंमुली ही आकडेवारी भराभर लिहून घेत होती.

काही वेळानं एमजीनं स्वत:ला सावरलं होतं. त्याने तिला सांगितले होतं की, समारोपाच्या कार्यक्रमाची वेळ एक तास आधी करण्यात आली आहे. व्ही.आय.पी.च्या सोयीने ही वेळ बदलण्यात आली आहे आणि त्याची अनाउन्समेंट आज दुपारी करण्यात येईल. त्याने तिला सूचना दिली होती की दुसऱ्या दिवशी म्हणजे 24 तारखेला दुपारच्या लंचला न थांबता तिनं हॉटेलवर परत यायचे आहे. तसे बरेच प्रतिनिधी आराम करायला येत असतात. येथे काऊंटरवर तिला तिच्या नावाने आलेली एक बॉक्स मिळेल. त्यात आवश्यक साधन असेल. बॉम्बवरील टाईमिंग योग्य प्रकारे सेट अप झोच्ले आहे. खुर्चीवरून उठण्याआधी पॅन्टच्या

पुढच्या चेनच्या कडेने बाहेर आलेल्या नॉबला काही क्षण दोन बोटांत धरून ठेवले की टाईमर ऍक्टिव्हेट होईल. स्टेजकडे जातानाही हे करणं शक्य आहे परंतु खुर्चीवर बसूनच हे केलेले जास्त चांगले, कारण एक्साईटमेंटमध्ये हाताला कंप येण्याची शक्यता आहे. एमजीने त्याच्या पूर्वीच्याच पध्दतीने भराभर माहिती दिली होती. रिमोट कंट्रोलच्या आकाराचा तो बॉम्ब तिच्या हातात देऊन वरच्या कडेला असणाऱ्या वायरच्या टोकाला असलेला लहानसं बटणही तिला दाखवलं होतं. त्यानं तिला समजावून सा ंगितले होतं, "बटणाला स्पर्श केल्याबरोबर बोटाच्या उष्णतेने टाईमर ऑक्टिव्हेट होत असल्याने कुठे दाबण्याची गरज नाही. प्राईम मिनिस्टरच्या आधी डिफेन्स मिनिस्टरचे भाषण होईल. डिफेन्स मिनिस्टर भाषणासाठी उठले आणि पोडियमपाशी पोचून त्यांनी पहिला शब्द उच्चारला की तू ट ायमर ऍक्टीव्हेट करायचास. पोडीयमच्या जवळच स्टेजवर जाण्याकरता स्टेप्स आहेत, तू पायऱ्या चढू लागेपर्यंत कुणाच्या काय होतंय हे लक्षातही येणार

नाही. आणि लक्षात येईल तेव्हा फार उशीर झालेला असेल. आपली योजना यशस्वी झालेली असेल."

अजिताने सर्व माहिती शांतपणे ऐकून घेतली होती. मग तिने एमजीला विचारले होते, "जर बोटाच्या उष्णतेने टाईमर ॲक्टिव्हेट होणार असेल तर अपघाताने पोटाच्या कातडीला स्पर्श झाल्याने टाईमर ॲक्टिव्हेट होण्याची शक्यता नाही का? "

एमजी हसला, म्हणाला, "दॅट इज द ब्युटी ऑफ धिस मेकॉनिझम. टाईमरच्या अगोदर बाँब ॲक्टिव्हेट करायला लागेल आणि त्याचं मेकॅनिझम वेगळं आहे."

"आणि ते मेकॅनिझम रिमोटने ॲक्टिव्हेट केले जाईल. होय ना?'' अजिताने विचारलेल्या प्र्श्नाला एमजीनं होकारार्थी मान हलवली आणि मग आपण चूक केली हे त्याच्या लक्षात आलं होतं. त्याचा चेहरा उतरला होता. खरं तर टायमर आणि बॉम्ब एकाच

स्वीचने ॲक्टीव्हेट होतात, असं सांगायला हवे होते.

अजिताही ह्यावर काही बोलला नव्हती. तिने भोवती बसलेल्यांना एकेकाल नीट न्याहळलं. ह्यातंच कुठेतरी तिला माहीत नसलेला पक्षाचा सदस्य बसला असणार. योग्य वेळी तो रिमोटने बॉम्ब ॲक्टीव्हेट करणार, आणि ती टाईमर. ती विचार करत होती. योजना शंभर टक्के अमलात आणली जावी ह्याची खात्री करणं गरजेचेच नाही का? माणसाचे मन मोठे गुंतागुंतीचे असते, आणि जगण्याची उर्मी बलवान. ह्यूमन बॉम्ब म्हणून जाणारी व्यक्ती शेवटच्या क्षणाला कचरणार नाहीच अशी काय गॅरंटी देता येते? ह्यात माझ्या कमिटमेंटचं वा माझ्यावरील विश्वासाचं अवमुल्यन झालयं असं समजायचं काय कारण? जरी आपण टाईमरचे मेकॅनिझम ॲक्टिव्हेट केले नाही तरी मॅक्झिमम टाईम संपल्यानंतर बाँबचा स्फोट होईल अशी रचना ह्यात असणारच. म्हणजे शिकार जरी साधली गेली नाही तरी शिकारी मरणार हे निश्चित.

प्रकरण विसावे

बस जबलपूरच्या हद्दीत घुसली तेव्हा एसेनने घड्याळाकडे नजर टाकली. सकाळचे सात वाजत होते. अठ्ठेचाळीस तास. त्याच्या मेंदूने आता काऊंट डाऊन सुरू केला होता. पहाटे तीनच्या आसपास तो इटारसीला पोचला होता, आणि त्याला ताबडतोब बस मिळाली होती. एसेनने बाहेर पाहिले, दुकाने अजूनही बंद होती, कुठे मध्येच एखादी चहाची टपरी उघडी दिसत होती. क्वचित सायकलवर दुधाच्या किटल्या अडकवून जाणारी माणसं दिसत होती.

तो स्टँडबाहेर आला, आणि रंजन त्याच्यासमोर हजर झाला. त्याच्या खांद्यावर हात ठेवत रिक्शाकडे वळत रंजन म्हणाला, "पंडित शर्मा काल संध्याकाळी शहरात पोचला आहे. दहा वाजण्याच्या आत तुला शर्माच्या

पुढ्यात हजर करतो. पण आता जरा स्नानसंध्या करून शुचिर्भुत हो. तदनंतर योग्य वस्त्रे परिधान करूया. तुझ्याकडे पायजमा आहे की नाही? आहे ना? गुड. माझ्याकडे दोन झब्बे आहेत. बस्स. काम बन गया. तुला शर्मापुढे नेणं हे माझं काम, मग पुढे काय करायचे बघूया. "

नऊ वाजता ते दोघे लॉजमधून बाहेर पडले, तेंव्हा त्यांच्यात खुपच बदल झाला होता. खाली पांढरेशुभ्र पायजमे घातलेले होते, त्यावर सिल्कचे पिवळसर रंगाचे झब्बे, खांद्यावर पंचे, आणि कपाळावर गंधाचे टिळेह ी दिसत होते. पायात बूट तेच होते, परंतु सॉक मात्र नव्हते. बाहेर पडल्याबरोबर रंजनने एक सायकलरिक्शाला इशारा केला आणि ते दोघे चाणाक्यपुऱ्याकडे निघाले. वीस पंचवीस मिनिटांतच रिक्शा एका मैदानाजवळ येऊन पोचली. दुरूनच लाऊडस्पीकरवर जोरजोरात म्हटले जाणारे मंत्र ऐकू येत होते. प्रचंड मोठा मंडप टाकलेला होता. एसेनने

मंडपाकडे बघितले सहस्त्र्चंडी यज्ञ. दुष्मनपर विजय पानेके लिये पुजनिय पंडीतजी शर्माजीकी मार्गदर्शनमे सहस्त्र्चंडी यग्य. उदारतासे दान किजिये अशी रंगीबेरंगी अक्षरे त्याच्या नजरेत भरली. मंडपाच्या एका बाजूला अनेक कार्स उभ्या होत्या. अजूनही नवीन कार्स येत होत्या. कार्समधून येणाऱ्या विशालाकाय सधन स्त्री पुरुषाचे स्वागत करायला खास स्वयंसेवक उभे होते. ते त्यांना मंडपाच्या दुसऱ्या बाजूने मंडपाच्या कोपऱ्यात मांडलेल्या खर्ुच्याजवळ नेऊन पोचवत होते. ज्या बाजूला यज्ञ होणार होता, त्याच्याच मागच्या बाजूला स्टेज उभे केले होते. चोहोकडे भगव्या लाल रंगाची रेलचेल दिसत होती. मंडपाच्या ह्या बाजूला जेथे सर्वसामान्य माणसांकरता राखीव जागा होती, तेथे मंडप केंव्हाच भरला होता, बसलेल्या लोकांभोवती उभ्या असलेल्या लोकांचा घोळका होता आणि तो सतत वाढत होता. एसेनने स्टेजकडे नजर टाकली, स्टेजच्या बाजूला एक महिलांच्या घोळक्यात पंडित शर्मा उभे होते. शुभ्र धवल धोतर आणि भगव्या रेशमी शालीमधून

त्यांचे पोट बाहेर डोकावत होते. चेहऱ्यावर एक रुंद हास्य घेऊन ते उभे होते, भोवताली उभ्या असलेल्या भद्र महिलांच्या बोलण्यावर मान डोलवत होते. एसेन पंडीत शर्मा आणि त्यांच्या भोवती जमलेल्या गर्दीकडे काही क्षण पाहात राहिला, मग रंजनला तेथेच थांबायला सांगून आल्या वाटेने परत मंडपाच्या प्रवेशद्वारातून बाहेर पडला. दुसऱ्या बाजूच्या प्रवेशद्वाराजवळ येऊन दुरूनच तो काही काळ निरिक्षण करत राहिला. मग हळूच तो स्वागतकक्षाच्या जवळ सरकला. प्रवेशद्वारापाशी असलेल्या चहाच्या टपरीवर कारमधल्या ड्रायव्हर्सची गर्दी झाली होती. आपल्या गाडया आत उभ्या करून आणि आपले सेठ, सेठानी आता बराच वेळ येणार नाहीत अशी खात्री करून ही मंडळी चहा प्यायला, सिगारेट ओढायला व चकाटया पिटायला बाहेर येऊन उभी होती. त्यांच्या सहज नजरेस पडणार नाही अशा रितीने उभा राहून तो काही वेळ त्यांच्या गप्पा ऐकत राहिला. काही वेळातच एक अलिशान गाडी प्रवेशद्वारातून आत शिरली, स्वागतकक्षाच्या

बाहेर उभी झाली आणि ड्रायव्हरने बाहेर येऊन मागचे दार अदबीने उघडल्यावर त्यातून एक वृध्द गृहस्थ बाहेर पडला. ड्रायव्हरकडे एक कटाक्षही न टाकता हा म्हातारा तरातरा स्वागतकक्षाकडे चालायला लागला, ड्रायव्हर त्याच्यामागे काहीतरी सांगायला निघाला परंतु त्या म्हाताऱ्याने हाताने त्याला झिडकारल्यासारखे करून मागे जायला सांगितले. गोंधळलेला ड्रायव्हर गाडीपाशी परत आला, त्याने मागचा दरवाजा उघडून आतून फुलांचा मोठा हार बाहेर काढला, म्हातारा ज्या दिशेने गेला त्या दिशेने त्याने काही पावले टाकली. तो घोटाळला, मग खांदे उडवून तो परत मागे आला, त्याने हार गाडीत टाकला, आणि गाडी सुरू करून गाडी मागे घेऊन पार्कींग करण्यासाठी राखीव असलेल्या जागेकडे घेऊन गेला. गाडीच्या मागच्या काचेवर लिहिलेली अक्षरे एसेनने वाचली. मजेठिया ॲन्ड सन्स. एसेन ही सर्व घटना दुरून पाहात होता. काही वेळाने त्याला जेव्हा तो ड्रायव्हर चहाच्या टपरीच्या दिशेने दिसला, एसेन

घाईघाईने तेथ्ून सटकला, भराभरा चालत तो परत पहिल्या प्र्वेशद्वारातून आत आला.

मंडपाबाहेर उभ्या असलेल्या गर्दीत घुसून तो हळूहळू वाट काढीत स्वागतकक्षाच्या बाजूच्या कार्सकरता असलेल्या प्र्वेशद्वाराकडे जाणाऱ्या वाटेपाशी पोचला, त्याने भोवताली नजर टाकली. हळूच पायजम्याच्या खिशातून त्यानं पाचशे रूपयांची एक नोट डाव्या हातात घेतली आणि दोहो बाजूनी विटा लावून तयार केलेल्या पादपथावर उडी मारून तो झपाटयाने फाटकाकडे निघाला. जणू तो मंडपातूनच बाहेर आला होता. झपाझपा चालत तो ड्रायव्हर्सचा घोळका जेथे उभा होता तेथे आला, त्याने शोधक नजरेने चहाच्य्ा टपरीजवळ उभ्या असलेल्या घोळक्याचा शोध घेतला, मग त्याला तो ड्रायव्हर दिसल्याबरोबर तो हसतच त्याच्याकडे निघाला. तो ड्रायव्हर एसेनची धावपळ पाहात होता, एसेन त्याच्याजवळ पोचला, मग त्याच्या कपडयावर नजर टाकीत घाईघाईत म्हणाला, " आप

मजेठियाजीके ड्रायव्हर है ना? "ड्रायव्हरने होकार भरण्याचीही वाट न पाहाता तो घाईघाईने पुढे म्हणाला, "मजेठिया सेठ बोले की गाडीमे फुलोंके हार रह गये है, वो लेके आना. लेकीन पहिले गाडी लेके कहींसे पाच किलो पेठाभी लेके आना. ये पैसे दिये है मेरेपास." ड्रायव्हरने एक सुटकेचा निश्वास सोडला, घाईघाईने पार्कींग स्पेसकडे वळत म्हणाला, "चलीये, आईये. मै सोचही रहा था की, ये हार रह गये और सेठ मुझेही गाली देगा."

काही वेळातच गाडी बाहेर पडली, तेव्हा एसेन ड्रायव्हर शेजारी फ्रंट सीटवर बसून ड्रायव्हरशी गप्पा मारत होता. पंधरा मिनिटांनी गाडी परत आली, आणि सरळ आत जाऊन मंडपाजवळ स्वागतकक्षापाशी जाऊन उभी राहिली. ड्रायव्हरने मागेच दार उघडले तेव्हा एका हातावर फुलांचे हार आणि दुसऱ्या हातात मिठाईची बॉक्स घेऊन एसेन बाहेर पडला. तो सरळ स्वागत कक्षाकडे गेला. काउंटर मागे उभ्या असलेल्या

एका प्रौढ गृहस्थाकडे इशारा करत तो जरा मोठयानेच म्हणाला, "श्रीमानजी, मुझे शर्मासाबके पीए को अर्जंट मेसेज देना है, कुड यु प्लीज हेल्प मी सर' ' त्या गृहस्थाने एसेनला कारमधून उतरताना पाहिले होते, त्याच्या हातातील ओझेही तो पाहात होता, त्याने जवळच उभ्या असलेल्या एका स्वयंसेवकाला ओरडून सांगितले, 'अर‍े गिरधर, साबको अपने पंडितजीके पी.ए.के पास ले जाओ"

गर्दीच्या एका बाजूला झाडाच्या सावलीत त्याची प्रतिक्षा करीत उभ्या असलेल्या रंजनला एसेनने शोधून काढले आणि ते दोघे प्रवेशद्वारातून बाहेर पडले तेंव्हा पंडितजीने भाषण चालू होते, दुपारचे दोन वाजत आले होते. रस्त्‍याने बरेच दूर गेल्यावर एसेन रंजनकडे वळत म्हणाला, " चला, आता प्रथम पेटपूजा करूया. च्यायला, तेथील पदार्थांच्या स्वादाने भूक खवळलीय नुसती. माझ्याकडे पंडितजीचा पुढचा दोन दिवसांचा पूर्ण कार्यक्रम आहे. कुठे राहाणार, कुठे जेवणार,

कुणाला भेटणार, अगदी डिटेल्ड कार्‍यक्रम. ऑफिशियल कार्यक्रमापेक्षा वेगळा. आता आपल्याला आपला कार्यक्रम ठरवावा लागणार आहे."

"आणि त्यांच्या कार्यक्रमात काही बदल करावे लागणार आहेत." रंजन हसत म्हणाला.

जेवण आटपून ते दोघे लॉजवर खोलीत आले आणि त्यांनी पंडितजीच्या कार्यक्रमावर नजर टाकली तेव्हा एसेन निराशच झाला. पंडित शर्मा जेव्हा यज्ञमंडप सोडून बाहेर जाणार होते ते सर्व कार्यक्रम जाहीर स्वरुपाचे होते. म्हणजे त्यांच्याभोवती गर्दी असणार होती. एकच कार्यक्रम असा होता की, जो खाजगी स्वरुपाचा दिसत होता, पण तो दुसऱ्या दिवशी होता. तारीख चोवीसला संध्याकाळी साठेआठपासून शर्माजी कुणा भल्लाकडे पार्टीला जाणार होते. हा कार्यक्रम कुठे आहे ह्याचा उल्लेख नव्हता, तो संपणार केव्हा आणि शर्माजी रात्री मुक्कामाला कुठे येणार ह्याचाही उल्लेख

नव्हता. ह्या कार्यक्र्माविषयी तपशिल नव्हते म्हणूनच एसेनला ह्यावेळी शर्माजीना गाठता येईल असे वाटत होते. पण हा कार्यक्र्म चोवीसला होता म्हणजे काऊंट डाऊन संपण्याच्या अगदी सीमारेषेवर. त्याच्या अगोदर शर्मांना कसं पकडता येईल, त्यांना एकांतात कसे भेटता येईल, ह्याबद्दल एसेन एकेक आयडिया सुचवत होता, आणि रंजन त्या कशा इम्प्रॅक्टीकल आहेत हे सांगून त्या कचऱ्यात टाकत होता. अखेर भल्लाच्या कार्यक्र्माचीच जास्त माहिती मिळवायला पाहिजे ह्यावर त्यांचे एकमत झाले आणि मुळात भल्ला कोण आहे ह्याची माहिती मिळवण्याचे प्र्यत्न करण्यासाठी रंजनने परत यज्ञमंडपाकडे जायचे आणि एसेनने चेंबर ऑफ कॉमर्स किंवा तत्सम संस्था, अशा कोणत्या तरी मार्गाने भल्लाची माहिती मिळवायची असे ठरवून दोघे संध्याकाळी लॉजबाहेर पडले.

एसेनचा अंदाज होता की, भल्ला हा गृहस्थ हा बिल्डर असावा किंवा कन्स्ट्रक्शन व्यवसायात असावा.

आणि असेही असायला हवे की, त्याने ह्या यज्ञसमारंभाला मोठी देणगी दिली असावी. रंजनने ही शक्यता मान्य केली होती. त्यामुळे रंजनने भल्लाची माहिती यज्ञमंडपात मिळवायची आणि एसेनने बाहेर अशी त्यांनी कामाची वाटणी केली होती. ठरल्याप्रमाणे रात्री दहा वाजता ते जेव्हा एकमेकाला भेटले तेव्हा दोघेही भल्लाला शोधून काढण्यात अयशस्वी ठरले होते. एसेनला कन्स्ट्रक्‌शन व्यवसायातील एक भल्ला सापडला होता, पण इंदिरा गांधीच्या खूनानंतर झालेल्या दंगलीत तो पोळलेला होता. हिंदु संघटनांचा तो मनापासून द्वेष करत होता आणि राजकारणापासून दूर राहात होता. भल्ला नावाचा कुणाही माणसाने ह्या यज्ञाला एका रुपयाचीही देणगी दिलेली नाही अशी रंजनची खात्री झाली होती. ह्या भल्लाचा कसा शोध घ्यायचा ह्यावर भरपूर वादावादी करून अखेर वैतागून ते जेवायला आणि प्यायला एका बारमध्ये शिरले होते आणि तेथे त्यांना टेबलावर भल्ला ॲन्ड ब्रदर्स लिकर सप्लायर्सचे लहानसे कॅलेन्डर पाह्यला मिळाले होते.

बारच्या मालकाकडे च◌ौकशी केल्यावर ह्याच भल्लासाहेबांकडे पंडीतजी पार्टीला जाणार आहेत हे निश्चित झाले होते, आणि ही केवळ निमंत्रितासाठी असलेली पार्टी तेथून पस्तीस किलोमिटर्स दूर असणाऱ्या हॉटेल पॅरडाईझवर होणार असल्याचेही त्यांना कळले होते.

शहरापासून इतक्या दूर अंतरावर, जंगलात ह◌ायवेपासून जरा आत हे टूमदार हॉटेल, त्याच्याभोवतीचा परिसर पाहून ह्या ठिकाणी हॉटेलमध्ये कोण येत असणार अशी शंका कुणाही माणसाला येणं साहाजिक होतं. पण तेच ह्या हॉटेलचे वैशिष्टय होते. सहज लहर आली म्हणून वा वाटेत दिसले म्हणून ह्या हॉटेलमध्ये कुणी गिऱ्हाईकांनी यावे ही मॅनेजमेंटची अपेक्षाच नव्हती. केवळ खास लोकांनी येथे उपलब्ध असलेल्या सर्व सुखसोयींचा लाभ घ्यावा अशीच मॅनेजमेंटची अपेक्षा होती. त्यामुळे भल्लांनी दिलेल्या पार्टीच्या केवळ अर्धा तासच अगोदर पोचूनही एसेन

आणि रंजनला हॉटेलमध्ये सर्व कसे शांत शांत दिसले होते. म◌ोटरसायकल घेऊन ते आत आले, रेस्ताराँमध्ये येऊन बसले तरी त्यांच्याकडे कुणी लक्ष दिले नव्हते. त्यांच्या अंगावरून वेटर्स धावपळ करत होते. मागच्या बाजूच्या लॉनमध्ये पार्टीची तयारी जोरात चालू होती. एसेन आणि रंजन आधी येऊन ह्या परिसराचं निरिक्षण करावे, जमले तर कुणा वेटर्सशी दोस्ती जमवावी ह्या विचारांने आले होते. त्यांनी संध्याकाळीच लॉज सोडले होते आणि इकडे येण्यासाठी एका बारमध्ये चाललेल्या पार्टीतील कुणा एकाची बाहेर उभी केलेली मोटरसायकल घेऊन ते इथे येऊन पोचले होते. बराच वेळ कुणी लक्ष देत नाही असे पाहिल्यावर त्यांनी एक◌ा वेटरला आरडाओरड करून बोलावले होते, त्या वेटरने जवळ येऊन एसेम काही बोलण्याच्या आधीच दाराजवळ असलेली आज हॉटेल बंद असल्याची सूचना त्यांना दाखवली होती, आणि दिलगिरी व्यक्त करून मेहरबानी करून त्यांना थंड पाणी मात्र पाजले होते. बाहेर पडताना रंजन तर एवढा चिडलेला ह◌ोता की,

ह्या वेटर्सच्या डोक्यात त्यांच्याच हातातील पाण्याचा जग घालावा आणि नंगे करून बाहेर थंडीत सोडून द्यावे असे वाटत असल्याचे असे त्याने जाहीर केले होते. त्यावर चालता चालता एसेन एकदम थबकला होता, आणि हलक्या आवाजात रंजनला म्हणाला होता, "हळू बोल. आपण आता तेच करणार आहोत."

मोटर सायकलवर बसून ते बाहेर रोडवर आले, मात्र परत गावाकडे न जाता सावकाश उलट्या दिशेने निघाले. ते वळले आणि दुरून येणारा मोटरीचा ताफा त्यांना दिसला. भल्लाच्या पार्टीचे लोक येऊन पोचले होते.

रात्रीचे दहा वाजत होते. पार्टीला आता चांगलीच रंगत चढली होती. मुंबईहून आलेल्या डान्सींग पार्टीने आपला कार्यक्रम सादर केला होता, आणि आता ह्या नर्तिका लोकांमध्ये मिसळल्या होत्या. पंडित शर्मा आणि त्यांची खास चेले मंडळी काही काळ इतरांपासून

बाजूला बसली होती. पंडितजी स्वत:ची आब सांभाळून इतरांशी वागत होते, पण पोटात उतरणारा द्रव पदार्थ, कानातून मेंदूपर्यंत पोचणारे संगीत आणि त्यांच्याजवळ येऊन त्यांच्याशी स्वीट नथिंग बोलत त्यांना स्पर्श करणाऱ्या तरूणींची जवळीक ह्यामुळे ते हळुहळू मूडमध्ये येत होते. मध्येच एकदा ते एका जुन्या पार्टीतच ओळख झालेल्या स्त्रीशी गप्पा मारत लॉनच्या कडेला असलेल्या झाडांच्या गर्दीतही जाऊन आले होते. झाडांच्या अंधाऱ्या काळोखात उभे राहून एसेन आणि रंजन हा हळूहळू होणारा बदल निरखित होते. एसेन आता अस्वस्थ झाला होता, वारंवार आपल्या घडयाळाकडे पाहात होता. आपले पाऊल पुढे टाकत होता. पण रंजनचा दमाने घे अशी सूचना देणारा हात त्याच्या खांद्यावर येत होता. अखेर तरूण डान्सरच्या खांद्यावर हात ठेऊन तिच्याशी गप्पा मारणाऱ्या पंडितजीचा हात पाठीवर सरकू लागला, तेव्हा मात्र एसेन रंजनचा खांद्यावरील हात झटकून पुढे झाला. त्याच्या अंगावर हॉटेलच्या वेटरचा ड्रेस होता, त्यामुळे

कोणाचे त्याच्याकडे लक्ष जाण्याचे वा कुणी त्याच्या अस्तित्वाची दखल घेण्याचे काही कारण नव्हते. एसेन पंडितजीजवळ पोचला, आणि अत्यंत आदबीने त्या तरुणीला म्हणाला, " मॅडम, साबके लिये खास मेसेज है, आप जरा और ड्रींक ले आईये." तिच्या काही वेळ तो काय म्हणतोय हे लक्षात आले न ाही, पण मग ती काही न बोलता डोकं हलवत त्यांच्यापासून दूर झाली. एसेन पंडीतजीच्या जवळ सरकला, हळूच कानाशी तोंड नेऊन म्हणाला, "साहेबजी, थोडा मैरे साथ चलिये, इगोरसाब आपकी राह देख रहे है. कुछ अर्जंट, इम्पॉर्टंट बात करनी है आपसे" पंडीतजीच्या होकाराची वाट न पाहाता त्याने त्यांचा हात आपल्या खांद्यावर गुंडाळून घेतला आणि दुसऱ्या हाताने त्यांच्या खांद्याला आधार देऊन तो झाडांच्या दिशेने निघाला. पंडीतजींच्या एक दोघा चेल्यांनी हे दृश्य पाहिले आणि ओठातल्या ओठात हसत त्यांनी आपले लक्ष हातांतील ग्लासकडे वळवले. पंडीतजीना घेऊन एसेन बराच वेळ चालत राहिला. झाडांमुळे दाटलेल्या अंधाराचा लाभ

घेऊन तो पंडितजीना उलटया दिशेने, रोडच्या विरोधी दिशेने घेऊन आला. झाडांच्या गर्दीतून ते दोघे बाहेर आले तेंव्हा पंडीतजीना दूर स्वीमिंग टॅंकजवळ सूटात उभी असलेली व्यक्ती दिसली. वेटर त्यांना त्या व्यक्तीकडेच घेऊन चालला होता. हॉटेलच्या एखाद्या रूममध्ये भेटण्याऐवजी इगोरने हे असे ठिकाण का पसंत केले. काय झाले असावे? त्यांच्या मनात प्र्श्न आकार घेत होता तोपर्यंत ते स्विमिंग टॅंकजवळ उभ्या असलेल्या त्या व्यक्तीजवळ पोचले होते. इगोरला काय झालंय, एवढा धिप्पाड इगोर असा लहानखुरा का दिसतोय? कुतूहलाने त्यांनी त्या अंधुक उजेडात त्याला निरखून पाहण्याचा प्रयत्न केला, त्यांनी आपला चेहरा त्या व्यक्तीच्या चेहऱ्याजवळ नेला आणि एकाएकी त्यांच्या कानशीलावर जबरदस्त गुद्दा येऊन आदळला. त्यांनी जोराने ओरडायला तोंड उघडले, पण त्यांना आधार घेऊन आलेल्या वेटरचा मजबूत पंजा त्यांच्या तोंडाभोवती आवळला गेला होता. काय झालंय हे त्यांच्या लक्षात येत होते तोच वेटरने त्यांच्या पायांत

पाय अडकून खाली आडवे पाडले होते. त्यांचे छातीपासून पुढचे शरीर स्विमिंग टॅंकमधील पाण्यावर तरंगत होते, पाण्यापासून केवळ काही इंचावर. त्या वेटरने त्यांच्या डोक्याच्या मागील भागावर हात ठेवला आणि त्यांचे डोके पाण्यात दाबले, त्यांचे नाक, डोळे, तोंड पाण्यात बुडाले होते, त्यांनी उठण्याकरता धडपड केली पण त्यांच्या पाठीवर कुणीतरी बसले होते आणि त्यांचे खांदे त्याने गच्च दाबून ठेवले होत े. त्यांचा नाकपुडयातून त्यांना उच्छवास बाहेर पडण्याची धडपड करत होता, पण त्यांना माहीत होतं, उच्छवास सोडला की पाणी त्यांच्या नाकात शिरणार होतं, पण श्वास रोखून धरणं अशक्य होतं, आपली छाती फुटते की काय असं त्यांना वाटत होतं, तरीही त्यांनी आपला श्वास रोखून धरल ा अन मग त्यांना आपल्या नाकपुडयातून घशात उतरणारे पाण्याचा स्पर्श जाणवला. त्यांनी जोराने हालचाल केली, आणि त्याचवेळी त्याच्या डोक्यावरील दाब किंचित कमी झाला, त्याचा चेहरा पाण्यातून बाहेर आला.

'पंडितजी, आम्हाला काही माहिती पाहिजे आहे. इथे आपल्या मदतीला कुणीही येणार नाही. आमच्या प्रश्नाला उत्तरे द्या, आणि दहा मिनिटात आपल्या लोकांमध्ये परत जा. ती डान्सर तुमची वाट पाहातेय.'

क्षणभर बोलणारा थांबला आणि पंडितजीना जाणवले त्यांच्या डोक्यावरचा दाब वाढतोय. " नाही...नाही..मी माहिती देतो.'' त्यांच्या तोंडून बोबडे शब्द धडपडत बाहेर पडले.

एसेननी खूण केली तसा रंजन त्याच्या पाठीवरून बाजूला झाला. एसेन त्यांच्या पंडीत शर्माच्या कमरेखाली हात घातला आणि एकाच झटक्यात त्यांने त्यांचे शरीर उलटले, आता ते पाठीवर होते, पण तरीही त्यांचे खांदे आणि डोके पाण्यापासून काही इंचावर अधांतरी तरंगत होते.

"पंडितजी, इगोरचा आणि तुमचा संबंध कसा आला?

बोला. पटापट बोला, नाहीतर परत गंगाजलाची चव देतो.'' एसेमचा धारदार आवाज भोवतालच्या शांततेला चिरत गेला. एसेमने रंजनकडे पाहून मान हलवून इशारा दिला. रंजनने टेपरेकॉर्डरचे बटण ऑन केले आणि टेप रेकॉर्डर स्विमिंग टॅ◌ंकच्या काठाशी पंडितजीच्या शक्यतोवर तोंडाजवळ येईल असा ठेवला.

एसेमने घडयाळात पाहिले. सकाळचे पाच वाजायला फक्त तीन तास उरले होते, आणि अकरा वाजण्यासाठी आठ तास. पंडितजी एकदा बोलायला लागल्यावर बोलत राहिले होते. इगोरचा त्यांचा संबंध गेले पाच वर्षांपासून होता. हिंदू धर्माविषयी आस्था असलेल्या एका इस्त्रायली ज्यू गटाशी इगोरचा संपर्क होता. इस्लामपासून जगाचे रक्षण करण्यासाठी हा गट सज्ज झाला होता. इगोरमुळेच ह्या गटाशी पंडितजींचा संपर्क जुळला होता. हा गटे त्यांना एके 4 7 रायफल्स तर पुरवत होताच, परंतु माईन्स आणि टाईमबॉम्बजही त्याने पंडितजीच्या संघटनांना पुरवल्या होत्या.

ह्याशिवाय सशस्त्र् लढयावर विश्वास असणाऱ्या डाव्या गटांच्या बातम्याही तो पंडितजीना पुरवत होता आणि पंडितजी त्या बातम्या सीबीआय. इन्स्पेक्टर्सना पुरवून त्यांच्याशी सौदेबाजी करत होते. अजिताने पंडितजीना आणि कर्नल षणमुखम्ना इगोर बरोबर पाहिले होते आणि आता आपली सर्व पोल खुलणार म्हणून घाबरलेल्या इगोरने षणमुखमच्या साह्याने एक मारेकरी अजिताच्या मागे लावला होता.

सर्व माहिती घेतल्यानंतर एसेमने पंडित शर्मांना उभे केले होते, आणि परत एकदा जंगलातून फिरवत स्विमिंग टँक आणि पार्टी गार्डनपासून दूर वेगळयाच दिशेला आणले होते आणि त्याच्या कानशिलावर नेमका जोर लावून एक फटका दिला होता. बेशुध्द पडलेल्या पंडितजीना त्याने अलगद जमीनीवर झोपवले होते. आणि ते दोघे परत पार्टीच्या ठिकाणी आले होते. पंडितजींना आधार देणारी ती डान्सर आता त्यांची वाट प◌ाहून कंटाळून त्यांच्या एका

चेल्याबरोबर गप्पा मारत होती. काही लोक कमी झाले होते, पण ते आपल्या घरी परतले होते की, इथेच कुठेतरी कुणाबरोबर तरी अंधारात लपले होते हे कळण्याला काही मार्ग नव्हता. एसेम व रंजन हळूच हॉटेलच्या प्रवेशद्वाराजवळ जेथे गाडया उभ्या केल्या होत्या तेथे आले. दारापाशी वॉचमन पेंगत होता. उभ्या असलेल्या गाडयांमध्ये तीन जीप्स होत्या. रंजन हळूच पुढे झाला, प्रत्येक जीपच्या ड्रायव्हर सीटवर बसून त्याने जीप्सची तपासणी केली, त्यातील एक जीप त्याने पसंत केली. जीप मालकाची अडचण होऊ नये म्हणून त्यांनी जबलपूर गावातून तात्पुरती वापरायला म्हणून आणलेली टू व्हिलर तेथे ठेवली आणि जीप स्टार्ट करून ते आपल्या रस्त्याला लागले. खरं ते दोघेही थकले होते, दोन दिवसापासून त्यांना नीट झोपही मिळाली नव्हती. पण हा प्रवास त्यांना ठराविक काळामध्ये संपवायलाच हवा होता. जीपच्या आवाजाने जागे होऊन घाईघाईने त्यांना सलाम करणाऱ्या वॉचमनला गुड मॉर्निंग करून रंजनने जीप

रोडवर आणली आणि ती रोडने सुसाट धावू लागली. एसेमने सवयीने घडयाळावर नजर टाकली. मग त्याने पुर्वेच्या क्षितीजाकडे नजर टाकली, पुर्वेला लाली चढत होती.

प्रकरण एकविसावे

सर्व दिवस गडबडीत गेला होता. एन.जी.ओ.च्या आपसातील चर्चेमध्ये एन.जी.ओ.च्या प्रतिनिधींनी पोलीस, रेव्हेन्यू, वेगवेगळया मिनिस्ट्रीज आणि काश्मिर, नागालँड, मणीपूर, आसाम, कच्छ, भूज सारख्या राज्यातील अशा क्षेत्रात जेथे आर्मी युनीटस्चा कारभार जास्त प्रभावी आहे, अशा भागात एन.जी.ओ. आणि स्थानिक अधिकारी ह्यांच्यात जास्त संवाद व सांमजस्य निर्माण करण्याची गरज आहे हे आग्रहपूर्वक सांगितले होते. अशा ठिकाणी स्थानिक लोकांच्या

आणि मिलिटरी अधिकाऱ्यांच्या गेट टूगेदर मिटींगा ऑर्गनाईझ करता येतील असे सुचवले होते. एनजीओशीं संबंध साधण्यासाठी आर्मी हेड क्वार्टरकडून प्रथम एनजीओज् ची निवड करून त्यांच्याशी संपर्क साधण्याची प्रक्रिया सुरू झाली पाहिजे अशी मागणी करणायात आली. ह्या संबंधात आणखी काय करता येईल ह्याबद्दल काही प्रतिनिधीनी सूचनाही केल्या. परंतु त्याचबरोबर काम करताना मिलीटरी युनिटचा एकूण व्यवहार कसा अरेरावीचा, आणि दादागिरीचा असतो ह्याबद्दल तक्रारीही काही प्रतिनिधींनी केल्या होत्या. पोलीस व मिलिटरी अधिकाऱ्यांना शासनाची एन.जी.ओ.बाबत काय धोरण आहे, विकासाच्या कार्यात एन.जी.ओ.चा काय रोल आहे ह्याबद्दल जाणीव जागृती करण्याची गरज आहे असं एका प्रतिनिधींनी मांडल्यावर त्याला इतर प्रतिनिधींनी टाळयांचा गजर करून पाठिंबा व्यक्त केला होता. ह्यातून ह्या संबंधांचे स्वरूप काय आहे हे बरेच स्पष्ट झाले होते. हा विषय अत्यंत जिव्हाळयाचा असल्याने

चर्चा वेळ संपून गेला तरी चालू राहील असे दिसल्यावर अजिता हळूच उठून बाहेर आली आणि तिने सरळ हॉटेलचा रस्ता धरला. एमजी तिच्यासाठी बॉक्स आणून ठेवणार होता, ती ताब्यात घेणे गरजेचे होते. ती हॉटेलवर पोचल्याबरोबर काऊंटरवरून चावी घेत असतानाच तिच्या हाती बॉक्स सोपवण्यात आली.

अजिताने बॉक्स घेतली ती मागे वळली, आणि आपल्या तोंडून निघणारा आश्चर्योद्गार तिने मोठ्या कष्टाने गिळला. आपली किंचित थबकलेली पावले तशीच पुढे टाकत ती लीफ्टकडे न जाता कोपऱ्यातील सोफ्याकडे वळली. हातातील बॉक्स आणि पर्स सोफ्यावर ठेवून तिने पर्समधील लहानशी डायरी बाहेर काढली, आणि काऊंटरकडे जराशी पाठ करून ती डायरीत लिहू लागली. लिफ्टच्या पलीकडील पॅसेजमधून दोन जण बोलत येतांना तिने पाहिले होते आणि त्यांच्यातील एकजणाला तिने ओळखले होते. दुरूनच. त्याच्या हालचालीत असं काहीतरी होते तिला

तो मिलिटरीमधील असावा असं वाटलं होतं. ह्याच माणसाला तिने इगोर व पंडीत शर्माबरोबर खैबरमध्ये पाहिले होते.

तो माणूस एका एन.जी.ओ.च्या प्रतिनिधीबरोबर बोलत येत होता. एन.जी.ओ.चा प्रतिनिधीने आपल्या खोलीची चावी काउंटरवर ठेवली, आणि ते दोघे बाहेर निघाले. काउंटरच्या जवळच सोफ्यावर बसलेल्या अजिताकडे दोघांचेही लक्ष गेले नव्हते. ते दोघे काउंटरपासून दूर गेल्याबरोबर ती उभी राहिली, ते दोघ े जर बाहेर गेले तर त्यांच्या पाठोपाठ जायचे असे तिने ठरवले होते, पण हातातील ह्या बॉक्सचं काय करायचे हा प्र्श्न होता. पण ते दोघे बाहेरच्या दिशेने न जाता बारच्या दिशेने वळले तेव्हा तिने सुटकेचा नि:श्वास सोडला, आणि ती घाईघाईने लिफ्टकडे वळली.

पंधरा मिनिटांनी अज िता परत लिफ्टमधून बाहेर

पडली तेव्हा तिचं रूपच बदलले होते. तिने जीनवर परिधान केलेल्या टॉपचा रंग भडक नव्हता, पण तरीही हिरव्या रंगाच्याच वेगवेगळया छटांच्या पानांच्या आकारांतून निर्माण केलेले डिझाईन निराळे आणि आकर्षक दिसत होते. तिने आपले केस आता मोकळे सोडले होते, आणि त्यांचे वळणही काहीसे बदलले होते. तिच्या चालण्यात, वागण्यातही काहीतरी सूक्ष्म बदल झाला होता. संध्याकाळ कुठल्या तरी बारमध्ये वा डान्सींग हॉलमध्ये घालवण्यासाठी निघालेल्या एखाद्या श्रीमंत घरातील रमणीसारखी ती दिसत होती. आपली चावी काऊंटरवर ठेवण्याकरता ती काऊंटरकडे वळली नाही, तशीच सरळ चालत ती बार आणि रेस्तारॉंकडे वळली.

दारातून आत जाताच तिच्या नजरेने उजव्या बाजूला खिडकीपाशी ते दोघे बसले आहेत हे पाहून घेतले होते. अजून बारमधील बरीच टेबले रिकामीच होती. आणि ते साहाजिकच होते. सेमिनारला आलेले प्रतिनिधी

आताशी आपल्या खोल्यांवर पोचले होते. कपडे बदलून, संध्याकाळला योग्य असे कपडे घालून बाहेर पडायला अजून काही काळ जाणार होता. त्या टेबलाकडे लक्ष न देता, ती त्यांच्या पलीकडील टेबलाशी पोचली आणि खिडकीजवळील खुर्चीवर बसली. त्या माणसाची तिच्याकडे पाठ होती. वेटरकडून तिने बियर मागवली, आणि आरामात ती खुर्चीत विसावली तरीही तिच्या वारंवार खिडकीतून बाहेर बघण्यातून, दारातून येणाऱ्या जाणाऱ्याकडे बघण्यातून ती कुणाची तरी प्रतिक्षा करत होती असे कुणालाही जाणवले असते. तिने त्या टेबलाकडे सहज नजर टाकली. त्या माणसाची तिच्याकडे पाठ होती, मात्र एन.जी.ओ.च्या त्या प्रतिनिधीची आणि तिची क्षणभर नजरानजर झाली. पण तिची नजर पुढे सरकून दाराकडे गेली. ते अगदी हळू आवाजात बोलत होते, तिला त्यांच्या बोलण्यातले सर्वच शब्द स्पष्ट ऐकू येत नव्हते पण त्यांची चर्चा काय चालली आहे ह्याचा अंदाज तिला आला होता, आणि ह्याचे कारण म्हणजे तो

एन.जी.ओ.चा प्रतिनिधी हळू बोलण्याचा प्रयत्न करीत होता पण त्याच आवाजच मोठा असल्यामुळे वा हळू बोलण्याची सवयंच नसल्यामुळे फारसा फरक पडत होता असे जाणवत होते.

ते दोघेही कॉफी पीत होते, त्याअर्थी ते जास्त वेळ तेथे बसणार नव्हते हे स्पष्ट दिसत होते. शिवाय त्या एन.जी.ओ. शी बोलण्यात त्या माणसाला विशेष रस आहे असेही दिसत नव्हते. तो माणूस फारसा बोलत नव्हता, केवळ हं हं करून ऐकण्याचीच भूमिका बजावत होता. अजिताने मनात निर्णय घेतला होता, ती ह्या माणसाला गाठणार होती, त्याला बोलतं करणार होती, कसं? हा प्रश्न होता. पण ती सावधपणे वाट पाहात होती, उंदराची प्रतिक्षा करणाऱ्या मांजरासारखी. आणि ती संधी तिला मिळाली, काहीवेळाने तो एन.जी.ओ.वाला फोन करायला म्हणून काऊंटरकडे गेला. त्याने फोन उचलल्याचे तिने बघितले आणि ती हळूच नाजूक खोकली, लक्ष वेधून घेण्याकरता

खोकतो तसे. त्या माणस ाने मागे वळून पाहिले, आणि ती त्याच्याकडे पाहून किंचित हसली. तिने भोवताली नजर फिरवली. जवळपासची टेबले अजूनही रिकामीच होती. ती हलक्या परंतु धारदार आवाजात म्हणाली, " आय हॅव गॉट अ मेसेज फॉर यू फ्रॉम युवर फ्रेंन्ड इगोर. सर."

क्षणभर तो तिच्याकडे पाहात राहिला, स्थिर नजरेने. मग नजर दुसरीकडे वळवून काऊंटरकडे पाहात तो म्हणाला, " मीट मी व्हेन आय लेफ्ट. नंबर इज फोर सेव्हन थ्री वन्.' ' त्यानंतर त्याने तिच्याकडे वळून बघितलेही नाही. त्याचा साथीदार फोन करून परत आला, परत त्यांच्या गप्पा सुरू झाल्या. दहा पंधरा मिनिटात ते उठले. दोघे काऊंटरपाशी पोचले. त्या माणसाने सहजपणे तिच्या दिशेने कटाक्ष टाकल्याचे अजिताच्या लक्षात आले, पण अजिता तशीच बसली होती, आरामात हातातील ग्लास ओठाशी नेऊन चवीने घोट घेत.

ते दोघे गेल्यावर तिने खिडकीतून नजर टाकली, उभ्या असलेल्या कार्सवरून तिची नजर रेंगाळत सरकली. कोपऱ्याला उभी असलेली निळसर रंगाची इतर कार्सपासून बाजूला असलेल्या कारची नंबरप्लेट तिला ह्या खिडकीतून दिसत नव्हती. पण तेथे उभ्या असलेल्या बाकी कार्सचे नंबर तिला दिसत होते, आणि त्यातील एकीचाही नंबर तिला ओळखीचा नव्हता.

बियरचा शेवटचा घोट घेऊन तिने वेटरला खूण केली. वाट पाहून ती वैतागली होती आणि आता जास्त प्रतिक्षा करायची नाही असंच जणू तिनं ठरवले होते. ती उठली, पोर्चमध्ये येऊन पायऱ्यांशी जाऊन ती काही क्षण थांबली. त्या निळसर कारच्या ड्रायव्हर सीटवर कुणीतरी बसले असल्याचे तिला दिसत होते. ती खाली उतरली, पायऱ्या उतरून ती सरळ त्या निळसर कारशी पोचली. मागचा दरवाजा उघडला गेला, आणि त्या माणसाचा आवाज आला, "प्लीज, बी सीटेड मॅडम."

ती आत बसली. त्याने गाडी सुरू केली. सफाईने वळण घेऊन दारातून बाहेर रोडवर आणली. आतमध्ये बसतानाच तिने पर्समधून पिस्तूल काढून हातात घेतले होते, त्यामुळे त्याच्या ते लक्षात आले नव्हते. पण आपल्या मानेला धातूचा गार स्पर्श जाणवल्यावर मात्र त्याने शांत सहज आवाजात विचारले, "नाऊ व्हाट आय ऍम सपोज्ड टू डू मॅडम?"

"ड्राईव्ह स्ट्रेट टू युवर बंगलो. आय वॉंट टू टॉक टू यू."

" ओके! बट लेट असं गेट ऍक्वेंटेंड. आय ऍम अजय किरमाणी. आय ऍम इन आर्म्स ट्रेडिंग बिझीनेस. ग्लॅड टू मीट यू... मॅडम?"

"अजिता, मेंबर ऑफ अ पॉलिटिकल ग्रुप, विच बिलीव्हज् इन् आर्म स्ट्रगल"

"हा.. दॅट मीन्स वुई आर इंटरेस्टेड इन् द सेम थींग. आर्म्स" किरमाणी किंचित हसला.

"नो!" अजिताने झटक्यात उत्तर दिले," नो. वुई बोथ ऑफ अस आर नॉट इंटरेस्टेड इन आर्म्स. यु आर इंटरेस्टेड इन मनी मेकिंग, ऍन्ड आय ऍम इंटरेस्टेड इन स्ट्रगल. पिपल्स स्ट्रगल."

कार सहज तेजगतीने धावत होती. ते दोघेही पुढे काही बोलले नाही. कार आता कॅम्प एरिया पार करून बाहेर आली होती. उजव्या बाजूला लहान लहान बंगल्यांच्या दोन रांगा दिसत होत्या. ह्या बंगल्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर कार वळली आणि बंगल्यांच्या दोन रांगामधून जाणाऱ्या रोडने टोकाला पोचली. बंगल्याचे फाटक अर्धवट उघडे होते, कारचा स्पीड कमी करून किरमाणीने कार फाटकाशी आणली आणि हलकेच अर्धवट उघड्या फाटकाला धक्का देऊन कार आत घेतली. कार थांबताच अजिता पटकन् बाहेर आली.

तिने स्वत:भोवती गिरकी घेऊन भोवताली पाहिले, आणि ती कारमधून बाहेर पडणाऱ्या किरमाणीकडे वळली.

खिशातून चावी काढून दाराला लावत किरमाणी तिच्याकडे वळला, आणि एक निरागस हसू देत म्हणाला, "वेलकम, टू माय टेम्पररी अबोड मॅडम. काही लोक दारूचा धंदा करतात पण आयुष्यात कधी दारूची चव घेत नाहीत. अनेक कार्सचे मालक असूनही काहीना ड्राईव्हिंग येत नाही. मी तसाच आहे, मी अस्त्रशस्त्रांचा व्यापार करतो, लाखो रुपये कमावतो, पण मला पिस्तुलाची भीती वाटते. "

त्याच्याकडे पाहून किंचित हसत अजिता म्हणाली, "आय नो व्हाट यू मीन. कार चालवण्याकरता जसे पगारी ड्रायव्हर्स ठेवता येतात तसे अस्त्रांचा उपयोग करण्याकरता पगारी गुंड ठेवता येतात."

"ओके. बोला तुम्हाला माझ्याकडून काय पाहिजे आहे? तुम्ही इगोरकडून आला नाहीत ह्याची मला खात्री आहे. कारण इगोर आणि मी कालच भेटलो आहोत."

अजिता बराच वेळ किरमाणीकडे पाहात राहिली, संथ नजरेने. मग किंचित खांदे उडवल्यासारखे करून ती हसली. ''तुमचं म्हणणं अगदी खरं आहे. ह्या देशातली संरक्षण व्यवस्था तुमच्या दिमतीला सज्ज आहे." बोलता बोलता ती उठली, "तुम्ही फोन केलात आणि तुमचं नाव सांगितलं तर'' बोलता बोलता ती किंचित पुढे झुकली होती, तिचा पिस्तुल असलेला उजवा हात किंचित पुढे आला होता, किरमाणी तिच्या चेहऱ्यावरील हास्याकडे आणि हातातील पिस्तुलाकडे पाहात होता, आणि तिच्या डाव्या हाताची हालचाल झाली, त्याच्या उजव्या कानावर तिच्या पालथ्या हाताचा इतका जोरदार फटका बसला की तो डाव्या बाजूला कोलमडत होता, तोच तिच्या उजव्या हातातील

पिस्तुलाचा फटका त्याच्या डाव्या गालावर बसला आणि त्याच्या डोळयांसमोर काजवे चमकले. उजव्या हाताकडे वेधून डाव्या हाताची किमया दाखवण्याचे कसब तिने खास प्रयत्न करून कमावले होते. किरमाणी काही क्षणाते सावरला, पण त्याच्या चेहऱ्यावरचं स्मित मात्र पुसलं गेलं होतं. त्याने डाव्या गालावर हात फिरवला, हात खाली घेतला तो रक्ताने माखलेला होता. काही क्षण तो आपल्या हाताकडे वेडयासारखा पाहात राहिला, मग त्याची नजर समोर बसलेल्या अजितावर आली. शांत नजरेने ती त्याच्याकडे पाहात होती. आता मात्र किरमाणी घाबरला होता.

"बोला. मला काय माहिती पाहिजे ते तुम्हाला माहीत आहे." अजिता थंड आवाजात म्हणाली.

किरमाणी नकारार्थी मान हलवत तिच्याकडे पाहात राहिला, मग म्हणाला, " मी एक प्रतिष्ठित कमिशन

एजंट आहे मॅडम. गर्वनमेंट ऑफ इंडियाच्या लायसन्सड् एजंटसच्या यादीत माझं नाव बरंच वर आहे. मी लफ्टनंट कर्नल पदावर रिटायर्ड झालोय."

"मिस्टर किरमाणी, तुमच्या करियरबाबत काही ऐकायचं नाही मला.'' आता ती पुढे झुकली, त्याच्या जखमी गालाला कुस्करत म्हणाली, " मला तुमच्या मित्रामध्ये इटरेस्ट आहे. इगोरची माहीत द्या"

'' मी इस्त्रा कंपनीचा भारतातील दलाल आहे. त्या कंपनीचा आणि इगोरचा काय संबंध आहे, काय व्यवहार आहे मला माहीत नाही. माझं एवढेच काम आहे, कंपनी सांगेल ती आणि सांगेल तितकी अस्त्रे पोचवून देणे. डिफेन्सला येण ारा माल हा परस्पर त्यांना डिलिव्हर केला जातो. त्यात माझा काही रोल नसतो. पण इंडस्ट्रीयल एरीयातील प्रायव्हेट सुरक्षा दलाकरता किंवा एखाद्या राज्याच्या विशिष्ट भागातील संरक्षक दलाकरता घाऊक विक्रीकरता असलेली शस्त्रे

आमच्या एजन्सीच्या नावाने डिलीव्हर होतात. ह्या शस्त्रात काही शस्त्रे इगोरकरता येतात, ती शस्त्रे तो सांगेल तिथे पोचवणे एवढेच माझे काम. ती कुणाला जातात, त्याचं काय होतं मला काही माहीत नसते."

"अगदी बरोबर. ती शस्त्रं कुणाच्या हातात जातात, त्याचा उपयोग कोण कुणसाठी करतात, हे जाणण्याची तुम्हाला आवश्यकता नाही. देशप्रेमी म्हणून तुम्हाला सर्टीफिकेट मिळालंय ना? पण ते असो! तुम्ही, इगोर आणि पंडीत शर्मा एकत्र भेटता. तुम्हाला माहीत आहे, गेल्या सहा आठ महिन्यात बिहारमधील काही भागात, काही जिल्ह्यात उच्च जातीच्या संघटनानी सामुहिकपणे दलित आदिवासी जमातीची गावेच्या गावे जाळून टाकली. तेथे वापरली गेलेली अस्त्रे अत्यंत आधुनिक होती आणि परदेशी बनावटीची होती."

किरमाणी काही न बोलता तिच्याकडे पाहात

राहिला. त्याच्या गालावरील डोळयाच्या खाली हाडावर फाटलेल्या कातडीतून अजूनही रक्त ओघळत होतं.

"मला एवढीच माहिती पाहिजे आहे, मला खत्म करण्याकरता माणूस कुणी पाठवला होता, तुम्ही, इगोरने की पंडीत शर्मांनी?"

" ते इगोरचेच काम होते. त्यानेच शकीलला तुमच्या मागे लावले होते. तुम्ही आम्हाला खैबरमध्ये पाहिले, तुम्ही गेलात आणि त्याने ताबडतोब तुम्ही आता जिवंत राहून चालणार नाही असे जाहीर केले. एवढय‍ा पातळीपर्यंत जायची गरज नाही. तुम्ही मला ओळखत नाही, असं मी त्याला समजावून सांगत होतो. पण तो ऐकायला तयार नव्हता. पंडित शर्मांनी माणूस पाठवावा असं त्याचं म्हणणं होतं.'' अजिताच्या लक्षात आलं बोलता बोलता एक क्षणच भर किरमाणीची नजर तिच्या पाठीमागे कुठेतरी स्थिरावली होती, पण त्याच्या बोलण्यात मात्र् खंड पडला नव्हता, " त्यानं मला ती

व्यवस्था करायला सांगितले पण मला ते शक्यच नव्हते. अखेर त्यानेच एका जागी फोन केला, आणि कुख्यात शकीलला सुपारी देऊ केली.' 'आपल्या पाठीमागेच अगदी जवळ काहीतरी चोरटी हालचाल झाल्याचे अजिताला जाणवले, मग तिच्या लक्षात आले, काही क्षणापूर्वी तिला असाच आवाज जाणवला होता. तिच्या हे ही लक्षात आले की. . आणि पाठीमागून आवाज आला, ' 'मॅडम, तुमच्या हाता...'

अजिता आवाजाच्या दिशेने वळली नाही. पण तिने झटक्यात हालचाल केली, आपल्या समोरील काचेच्या टीपॉयला दोन्ही पाय लावून तिने सर्व जोर एकवटून टीपॉय समोर बसलेल्या किरमाणीच्या अंगावर ढकलला आणि आपली खूर्ची मागे ढकलली, आणि खुर्चीच्या पाठीवर डोके टेकवून टीपॉय ढकलायला घेतलेल्या आधाराच्या जोरावर तिने कोलांटी मारली. अंगावर येणारा टीपॉय पाहून किरमाणी धडपडत उठला होता, मागे उलटलेली खुर्ची आपल्या अंगावर येत आहे असं

पाहून मागे सरकणाऱ्या आणि किरमाणीकडे लक्ष गेलेल्या मागच्या माणसाच्या थोबाडावर तिचे बूट आदळले होते, तो मागे धडपडला होता, तोपर्यंत अजिता धडपडत उठली होती, आणि तिच्या लक्षात आलं होतं, ह्या धडपडीत तिच्या हातातील पिस्तुल निसटले होते, क्षणात तिने दाराकडे धाव घेतली, पोर्चच्या पायऱ्या उतरून उजवीकडे बंगल्याच्या मागच्या भागाला पळता पळता तिला मागे पावलांचा आवाज आला. ती झुडपामधून, झाडामधून आडवी तिडवी पळत सुटली, आणि ती एकदम थबकली, समोर काही अंतरावर असलेली आडवी भिंत तिला दिसली होती. ती जमीनीवर पालथी पडली. नि:श्चल. श्वास रोखून.

मागून येणारा पावलांचा आवाज थांबला, पण अजिताला त्या माणसाचा जोरजोराने चालणारा श्वासोच्छवास ऐकू येत होता,

' ' हरामखोर कुत्री साली. ह्यावेळी तू माझ्या

तावडीतून सुटणार नाहीस. पळायला जागाच नाहीये तुला. चांगली सापडलीयसं. माझी बरगडी मोडून पळालीस काय?"

त्याच्या राकट आवाजात वुच्र्ता होती पण तो आवाज किंचित थरथरतही होता. आपल्यापासून काही फूटावरच आहे तो, पण अंधारात मी कुठे आहे ह्याचा अंदाज त्याला येत नसावा. कदाचित आपल्याकडे आणखी काही शस्त्र असावे असेही वाटत असावे त्याला. कदाचित आपल्या हातून पिस्तुल पडलं हे त्याच्या लक्षातच आलं नसेल. आपण काय करू असं वाटत असेल त्याला? आपण भिंतीवरून पलिकडे जाण्याचा प्र्यत्न करू अशीच अपेक्षा असेल त्याची. तिला पाचोळयाचा आवाज आला, आपल्याच दिशेने येतोय का हा? तिने भोवतालची बघितलं. तिच्यापासून काही अंतरावर तिला एक दगड दिसला, अगदी हलकेच तिने आपला हात पुढे सरकवला, दगड हातात आल्यावर तिने भिंतीकडे पाहिले, मध्ये कुठलही झुडप

नव्हते. अगदी संथ गतीने हालचाल करीत तिने आपले डोके वर उचलले, डाव्या हाताचे कोपर जमिनीत रोवले, उजवा हात मागे घेतला आणि..

तिने भिरकावलेला दगड झाडाच्या खोडावर आपटून खाली पडला पाचोळयात. त्या आवाजाच्या रोधाने तो माणूस पुढे धावला होता, आणि त्याचवेळी अजिता मागे वळून बंगल्याच्या दिशेने पळत सुटली. तिला माहीत होते की तिच्या पायाखाली बंगल्याकडे जाणारा रस्ता आहे, त्यावर पाचोळा नसल्याने आवाज येणार नाही. काही पावले घेतली की ती बंगल्याच्या कोपऱ्याशी पोचणार होती, आणि मग बंगल्याचाच आडोसा घेऊन पुढच्या भागाकडे जाणार होती. मागील भिंतीजवळून तिला धडपडीचा आवाज ऐकू येत होता. आणि ती एकदम थबकली, बंगल्याच्या भिंतीआडून किरमाणी समोर येऊन तिच्या रस्त्यात उभा होता, तिची नजर डाव्या बाजूला गेली, पण त्याचवेळी तिच्या डोक्यावर काहीतरी येऊन आदळले, तिने मागे बघण्याचा प्रयत्न

केला पण तिची शुध्द हरपली.

प्रकरण बाविसावे

एसेनने परत घडयाळाकडे नजर टाकली. पाचला पाच मिनिटे कमी होती. आता केवळ बत्तीस किलोमिटर्सचे अंतर बाकी होते, ह्याआधी त्यांनी एका ठिकाणी थांबून ऍनाने दिलेल्या फोनवर तिला कॉन्टॅक्ट करण्याचा प्रयत्न केला होता, परंतु रिंग वाजत राहिली होती, आणि कुणी फोन उचललाच नव्हता. एसेन एवढा हताश झाला होता की, सुन्न होऊन गाडीच्या स्टिअरींग व्हीलवर डोकं टेकून बसून राहिला होता. अखेर रंजनने त्याला धक्का मारून बाजूला केले होते आणि स्वत:च गाडीचा ताबा घेतला होता, आणि त्यांचा प्रवास परत सुरू झाला होता.काही मिनिटे गाडी चालवल्यावर रंजन त्याला म्हणाला,

'एवढे निराश होण्याचे काही कारण नाही भय्या. अजूनही आपण बरेच काही करू शकतो. कार्यक्रम दहा वाजता सुरू होत आहे. डी.एम. काही प्रथमच भाषण करणार नाही. हे खरे आहे की, अनिताला घेऊन कोडाईकेल्लीला पोचायचे म्हणजे आणखी एखादा दोन तास लागतील. पण दिलेल्या पत्त्यावर ऍना सापडणारच नाही असं तू गृहीत का धरतोस? फोनवर ती भेटली नाही म्हणून काय झालं? रात्रीच तिने आपली जाग ा सोडायचं निश्चित केले असेल, आणि आपण फोनवर सापडणार नाही हे माहीत असल्यामुळेच तिने हा डायरेक्ट भेटीचा मार्ग सांगितला असेल भय्या. "

"पण तिथेही ऍनाची भेट झाली नाही तर? आणि तीच शक्यता जास्त आहे, मी तिच्या जागी असतो तर तेच केले असते, कुणालाच आपल्यापर्यंत पोचता येणार नाही ह्याची काळजी घेतली असती."

'हे खरं आहे भय्या. पण ही परिस्थिती वेगळी आहे, तू

ऍनाशी बोललेला आहेस, तु कुठल्या कामगिरीवर जात आहेस, ह्याची काहीशी कल्पना तिला आहे. वेगळी आणि खात्रीची माहिती मिळाली तर शेवटच्या क्षणी ही मोहीम रद्द करण्याची तयारीही तिने दाखवली आहे. शिवाय ती अजितालाही भेटणार होती. कदाचित सर्व ऑपरेशन रद्दही झाले असेल. हाऊ डू यू नो? तिने आपला संपर्क होईल अशीही काळजी घेतली नसेल, असं नाही वाटत मला कॉम्रेड"

एसेन काहीच न बोलता समोरील रस्त्याकडे थिजलेल्या नजरेने पाहात राहिला कितीतरी मिनिटे. मग म्हणाला, " मला कुणाचाच विश्वास वाटेनासा झालाय कॉम्रेड. स्वत:वरही विश्वास नाही माझा. केवळ माझ्याशी वाद नको, म्हणून तर तिने हा पत्ता देऊन ठेवला नसेल ना? मला भीती वाटतेय कॉम्रेड. ह्या पत्त्यावर आपल्याला कुणीच सापडणार नाही. फसवा पत्ता असेल हा. आपण तिला श ोधत राहावं आणि तिकडे ती घटना होऊन जावी असाच हेतू असेल तर

तिचा?"

"कॉम्रेड!" रंजनने एकाएकी आवाज चढवून त्याला झटका दिला होता, "आपला ग्रुप म्हणजे काय एकमेकावर कुरघोडी करायला, एकमेकाला संधी मिळेल तेव्हा विश्वासघात करायला, एकमेकाच्या पाठीत खंजीर खुपसायला टपल◌ेली संधीसाधू गुंडांची टोळी आहे का? का रानटी कुत्र्यांची गँग! तूच काय केवळ प्रेम करायचा आणि विचार करायचा मक्ता घेतला आहेस? का इतर कुणा कॉम्रेडस्ना भावना नाही, बुध्दी नाही."

बराच वेळ कुणीच काही बोलले नाही. मग परत रंजनचं म्हणाला, "कॉम्रेड, एखादा दिवस आधी तू माझ्याकडे आला असतास तर शर्माला आपण आधीच गाठू शकलो असतो, एखादा दिवस आधीच अजिताला तो इ-मेल आला असता तर तू आधीच जागा झाला असतास, कॉम्रेड जर तर च्या गोंधळात पडून काही

लाभ नाही. आज, ह्या क्षणाला परिस्थिती आहे तशी मान्य करायला हवी. त्यात जास्तीतजास्त काय करता य‌ेईल ह्याचा विचार करायला हवा. आता ह्या क्षणाला ऍनाला लवकरात लवकर गाठण्याचा प्र्यत्न करणे एवढेच आपण करू शकतो आणि तेच केले पाहिजे."

रंजन गप्प झाला, त्यानं आपलं सगळं लक्ष ड्रायव्हींगवर केंद्रित केले. एसेनही गप्प झाला. त्याला माहीत होतं, रंजन खरं तेच बोलत होता. तेच वास्तव होतं. मनाचा तोल जाऊन काहीच लाभ होणार नव्हतं. पण त्याला वाटत होतं, आपलं डोकं बधीर झालंय., एक चमत्कारीक गुंगी आपल्या मनावर, आपल्या अस्तित्वावर काळोखून आली आहे. त्याला असं वाटतं होतं, आपल्या डोक्यावर सतत कुणीतरी हातोडीने ठोकत आहे, आपल्या पाची इंद्रियांनी जणू असहकार पुकारलेला आहे. समोरचे क्षितीज सारखे हलत आहेत, थरथरत आहे, आणि त्यामागे कुठेतरी क्षितीजावर अजिताचा चेहरा दिसत आहे अंधूक..अस्पष्ट.

ते आता शहरात शिरले होते. रंजनने कुठेतरी गाडी रोड साईडला घेऊन थांबवली होती. एका दुकानदारांशी जाऊन तो बोलत होता. एसेनने घड्याळात पाहिले, पावणे सहा वाजत आले होते. अस्वस्थ होऊन त्याने रंजनच्या दिशेने पाहिले, रंजन त्या माणसाला काहीतरी सांगत होता, रस्त्याच्या दिशेने इशारा करून काहीतरी बोलत होता. ह्या रंजनला काही वेळेचे काळाचे भान आहे की नाही? लागला गप्पा मारायला. मिळाला असेल कुणी गाववला किंवा बिहारी बबुआ. त्याला वाटलं, खाली उतरावं, धावत जावं, रंजनची कॉलर पकडावी, आणि खेचत आणावं त्याला इथं. त्यानं भोवती पाहिलं त्याला वाटलं, सर्वच जण असे संथ हालचाल का करताहेत, सर्व जगाचीच गती कमी झालीय का? घट्ट डोळे मिटून त्यानं आपलं डोकं दोन्ही हातांत दाबून धरलं. काही उपयोग नाही...काही उपयोग नाही. त्याच्या मेंदूत जणू कुणी तरी भसाडया आवाजात हा मंत्रपाठच करत होतं.

त्याचं अंग थडथडत होतं, भोवताली जे जे काही उब देऊ शकेल ते सर्व अजिताने त्याच्या अंगावर घातले होते. त्याला माहीत होतं, एवढी रात्र गेली की सर्व ठीक होणार होतं. सकाळ झाली की, त्यांच्यापासून केवळ शंभर यार्डावरील झोपडीत मुक्काम केलेली रिझर्व पोलीसांची टोळी पुढे सरकणार होती. पोलीस ज्यांचा शोध घेत होते, ते खतरनाक नक्सलवादी त्यांच्यापासून काही अंतरावरच दडून बसले होते, ह्याची त्यांना काहीही कल्पना नव्हती. पण त्यांना किंचित चाहूल जरी लागली असती तरी... खरं तर रात्रभर चालतच राहून त्यांच्या मागावर असलेल्या सशस्त्र पोलिमापासून जास्तीतजास्त दूर जायचं अशा उद्देशानेच ते तिघे निघाले होते, सर्व दुपार चालत राहिले होते, पण गेल्या दोन दिवसापासून फ्ल्यूच्य‍ा तापामुळे अशक्त झालेल्या एसेनला एक पाऊल पुढे टाकणं अशक्य झालं होतं. त्यानं अजिताला सांगितलं होतं, त्याला तेथेच सोडून त्यांनी पुढे जावे. काही मैलांवरच असलेली राज्याची सरहद्द ओलांडून मद्रासच्या हद्दीत

जावं, पण पुढे जाण्याऐवजी अजिताने त्या पडक्या वाड्याच्या खबदाडात रात्रभर राहण्याचा निर्णय घेतला होता, आणि त्यांच्यामागून येणाऱ्या पोलीसांनी तेथेच मुक्काम ठोकला होता, नक्सलवाद्यांना हद्दीपलिकडे हाकलून लावलं ह्या समाधानाने.

एसेनने आपले ओठ घट्ट दाबून धरले होते, पण थंडी त्याच्या हाडांपर्यंत पोचली होती, त्याची हाडे थडथडत होती. जवळ लाकडे होती, पण लाकडे पेटवण्याचा विचार करणंही धोक्याचं होतं. त्याला ते कळतं होतं, पण तरीही त्याला अजिताचा, ... राग येत होता. त्याला वाटत होतं, त्याचं थंड पडणाऱ्या अंगाला जर उब मिळाली नाही, तर त्याचं धडधडणारं हृदय गारठून जाईल, तो परत केंव्हाच उठणार नाही. त्याला कळत होतं पण तरीही तो असहाय्य होता, त्याच्या तोंडातून कण्हण्याचा आवाज निघत होता. आपण एका विचित्र ग्लानीत जात आहोत असं त्याला वाटत होतं. त्यानं डोळे मिटले, आजाराशी चाललेल्या ह्या शरीराचा लढा

तो हरणार होता, त्याची खात्री होती.

अन् मग त्याला जाणवलं त्याच्या छातीला, पोटाला, मांड्यांना उबदार स्पर्श होतोय, कुणीतरी त्याला आपल्या मिठीत घेतलंय, आपल्या शरीराची उष्णता त्याच्या शरीरात ओततेय. त्याच्या शरीराची थरथर कमी होतेय. त्याचा श्वासोच्छवास गरम होतोय, एका अजब उबेने त्याच्या शरीराला, त्याच्या प्रत्येक अवयवाला वेढून टाकलंय. आपल्या ओठावर, डोळयावर, कपाळावर उबदार ओठ फिरत आहेत.

त्याच्या खांद्याला स्पर्श झाला, त्यानं डोळे उघडले, रंजन त्याला उठवत होता. गाडी एका बंगल्याच्या फाटकाशी उभी होती. एसेन खडबडून जागा झाला, धडपडत तो खाली उतरला. त्यानं भोवती पाहिलं, आजुबाजूला तसेच लहान लहान बंगले दिसत होते, प्रत्येक बंगल्याभोवती लहानशा बागा फुलल्या होत्या. समोरील बंगल्यातील उंच बुचाच्या झाडावर सुर्याची

कोवळी उन्हे उतरली होती. कुठून तरी बांगडयांचा किणकिणाट ऐकू आला, दार उघडल्याचा आवाज...आणि एकदम त्याच्या लक्षात आलं.. अजिता.. त्याची नजर झटकन् खाली आली, समोरच्या बंगल्याच्या पायऱ्या उतरून ऍना त्यांना सामोरी होत होती, आणि रंजन फाटकाशी पोचला होता. एसेनने घडयाळाकडे पाहिलं, सहा वाजून चाळीस मिनिटे झाली होती. तो पुढे झाला, अधीरतेने त्यानं ऍनाला प्र्श्न केला, " अजिता कबूल झाली?"

"नाही, अजितानं नाहीसं व्हायला संपूर्ण नकार दिला. मी खूप समजावलं, परंतु..."

"येथून कोडाईकल्लीला जायला किती वेळ लागतो ऍना?"

"जास्तीत जास्त अडीच तास!"

एसेनचा चेहरा खुलला, हसतच तो म्हणाला, "आपण जिंकलो, रंजन. ऍना, डी.एम.चा खून करण्यासाठी आपला उपयोग केला जात आहे ह्याची खात्री झालीय आमची. तसे ठोस पुरावे आहेत आमच्या जवळ. चल आत चल. पंधरा वीस मिनिटात आपण पुढे निघालो तरी वेळेवर पोचू शकू. वाटेत तुला सांगतो सर्व हकिकत."

ऍना मागे वळली, परंतु मध्येच अडखळली. मागे वळून म्हणाली, "नको, तेवढाही वेळ घालवून नाही चालणार. तुम्ही गाडी वळवून घ्या. मी तीन मिनिटात येते. गाडीतच बोलुया आपण."

पायऱ्या चढून ती आत गेली. एसेनचा आनंद ती समजू शकत होती. त्याला तिला निराश करायचं नव्हतं आणि वेळेवर पोचण्याची शक्यता जरी नसेल तरी प्रयत्न करायलाच पाहिजे होता. एसेनला माहीत नव्हतं, व्हि.व्हि.आय.पी.च्या सोयीसाठी कार्यक्रमाची

वेळ एक तास आधी घेण्यात आली होती. पण ही गोष्ट ऍना त्याला सांगणार नव्हती. ती धावतच आतल्या खोलीत गेली.

प्रकरण तेविसावे

तिने डोळे उघडले, तिला शकील आणि किरमाणी समोर उभे असलेले दिसले. तिने सभोवती पाहिले. तिला खुर्चीवर गच्च बांधले होते. तिच्या छातीवरून, दंडावरून दोरांचे अनेक फेरे घेऊन तिला खुर्चीच्या पाठीला इतके गच्च आवळून बांधले होते की, तिला श्वासोच्छवास करायलाही त्रास होत होता. तिचे दोन्ही दंड खुर्चीच्या पाठीशी बांधलेले होतेच, पण कोपरांपाशी हातही बांधलें गेल्यामुळे कोपर◌ा◌ंपासून पुढचे हात मोकळे असूनही तिला हातांची फारच मर्यादित हालचाल करता येत होती.

तिने डोळे उघडताच शकील पुढे झाला होता, तिच्या गालावर हात फिरवित म्हणाला होता, " लौंडी, बहुत होशियार बन रही थी. अब तो तुम्हे दिखाऊंगा शकीलमे कितनी ताकद है! "

बोलता बोलता त्याचा हात तिच्या गालावरून, गळयावर आणि मग खाली सरकला होता. तिने श्वास रोधून धरला, ओठ घट्ट आवळले, तिच्या छातीवरून फिरणाऱ्या हाताकडे दुर्लक्ष करून ती त्याच्याकडे रोखून पाहात होती, चेहऱ्यावर काहीही भाव उमटू न देता.

तो तिच्या चेहऱ्याकडे पाहात होता, तिच्याकडून अपेक्षित प्रतिक्रिया न आल्याने तो गोंधळला होता. त्याने हळूच हात मागे घेतला. ' सिम्पल माईंडेड बुट' ती मनातल्या मनात पुटपुटली.

"शकीलदादा, जरा मुझे बात करने दो लडकीसे"

शकीलदादा मागे सरकला, किरमाणी पुढे आला, तिच्याकडे रोखून पाहात मान हलवत तो हसला,

" यु आर रिअली अ ऍमेझिंग वुमन. रिअली. पण तुझं आता काय करायचं हा प्र्श्न आहे. आजच्या सगळया कार्यक्र्माचा विचकाच केला आहेस तू. इगोरशी बोलणं झालं माझं. इगोर विमानानं पोचेल परंतु त्याला तसंच कार्यक्र्माला जावं लागेल. आणि आला तरी त्याच्याबरोबर बोलायची संधी मिळणं फारच कठीण आहे. . दुसरा काही इलाज नाही दिसत मला. तुला संध्याकाळपर्यंत असाच आराम करावा लागेल. मगच तुझी भेट होईल इगोरशी. शकील असेल तुला कंपनी द्यायला. मग ठरवू तुझं काय करायचं ते."

ती हसली, त्या दोघांकडे निरखून पाहिलं तिनं. मग म्हणाली, " माझं काय करायचं ते मीचं ठरवत असते नेहमी. पण आता तुमचं काय करायचं हेही मलाच ठरवावं लागणार आहे."

" ये कुत्री, बकवास मत करो"

शकील संतापून पुढे आला होता. पण किरमाणी मात्र तिच्याकडे संशयाने आणि सावधपणे पाहात होता.

"तुम्हाला दोघांना एक गोष्ट सांगते. तुमच्या इगोरभाईकडे खूप लहानमोठी खेळणी आहेत. आपल्या देशातल्या अनेक संघटनांना तो ही खेळणी देत असतो. त्यात तो भेदभाव नाही करत. पंडित शर्मांनाही देतो, आम्हालाही देतो.'' बोलता बोलता तिचे हात हळू हळू तिच्या पोटाकडे सरकत होते. त्यामुळे तिच्या कोपरांना यातना होत होत्या, दंडामध्ये आणि कोपरांजवळ बांधलेले दोर मांसात रुतत होते. पण तिचे हातांचे पंजे तिच्या मांडयाशी येऊन पोचले होते, "स्वत:ला तो माओवादी ग्रुपचा म्हणवतो, आणि एन.जी.ओ.चा प्रतिनिधी म्हणूनही वावरतो आणि जहाल हिंदूत्ववादी संघटनांना तो मदतीचा हात पुढे करत असतो. आणि संधी मिळाली तर डिफेन्सचे शस्त्रास्त्रांचे डेपोना

आगीही लावतो. पण मला त्याची गोष्ट सांगायची नाहीये. मी गोष्ट सांगत्येय इगोरने भेट दिलेल्या वस्तूची. आज होणाऱ्या सेमिनारमध्ये उपयोग करण्यासाठी त्यानं आम्हाला अशीच एक लहानशी पण उत्तम वस्तू दिली आहे. काल संध्याकाळी ती माझ्याकडे पोचवण्यात आल ी. ती वस्तू अशी बनवलीय की सहज माझ्या दोन मांड्यामध्ये व्यवस्थित ठेवता आलीय. मला सांगण्यातच आलं होतं तसं. सवय होण्यासाठी अगोदरच मांडीशी बांधून ठेवायला सांगितले होते मला. कालपासून हा लहानसा बॉम्ब बरोबर घेऊन हिंडतेय. आणि काहीही त्रास नाही झालेला मला. आणखी एक गोष्ट. ह्याला ॲक्टिव्हेट करायलाही फारच सोपं आहे. माझ्या पॅन्टच्या बटणाजवळ एका बारीक वायरच्या टोकाला असलेल्या बटणावर मी माझं बोट ठेवले ना, तरी बोटाच्या उष्णतेने हे खेळणं चालू होतं. हां..हां. किरमाणी, बिलकूल हलू नकोस. जराही नको. आणि तूही शकीलदादा. तुझ्या नाह ी लक्षात यायचं असं. हे बघ. माझ्या हाताकडे पाहा. माझ्या दोन बोटांच्या

चिमटीत बघ मी काय धरलंय. एक गुलाबी वायर दिसत्येय ना? माझं बोट मी ह्या वायरच्या टोकाला असलेल्या नाजूक हिरव्या बटणाला टेकवलं ना, क्षणार्धात माझ्या मांडयामध्ये ठेवलेले हे खेळणे प्रचंड स्फोट ह ोऊन उडेल. मी आणि शकील तू, किरमाणी सर, मी काय म्हणते आलं ना लक्षात. "

किरमाणी आणि शकील तोंड वासून पाहात होते, तिने डाव्या हाताच्या पंजाने आपला शर्ट किंचित उचलला होता. तिच्या जीन पॅन्टच्या बटणपट्टीतून एक लहानशी वायर बाहेर पडली होती आणि ती तिने आपल्या उजव्य ा हाताच्या बोटांमध्ये पकडली होती.

" तुम्हाला विश्वास वाटत नसेल ना तर तुम्ही पुढे सरका किरमाणी सर. अलगद माझ्या दोन मांड्यांच्या मध्ये बोट सरकवून पाहा.. माझ्या उजव्या मांडीला पट्टा बांधलाय आणि त्यात हे खेळणं ठेवलंय व्यवस्थित. "

अजिता हसू लागली आणि बराच व ेळ हसत राहिली ती. मग शकीलदादाकडे पाहून म्हणाली, " काय रे दादा, बघतोस का माझ्या मांड्यामध्ये काय आहे ते? ए भेकडा." ती परत हसू लागली.

मग हसू आवरून म्हणाली, " चला किरमाणी सर. आता वेळ नका घालवू उगाच. आजच्या कार्यक्र्माचा विचका नाही होऊ देणार मी. कारण हा कार्यक्र्म तुमचा नाहीये किरमाणी. तो आम्ही ठरवलाय, आमच्या, माझ्या ग्रुपने ठरवलाय. चला फार वेळ नाही शिल्लक आता. माझ्या जवळ या आणि प्र्थम ह्या दोऱ्या सोडा, जरा हळू हळू. बघा, माझ्या हाताला धक्का बसला आणि माझं बोट हललं तर.."

किरमाणी पुढे सरकला, त्याचे हात थरथर कापत होते.

काही वेळातच अजिता त्या बंगल्याच्या बाहेर आली.

दरवाजा बंद करून तिने कुलूप लावले. तशी ह्या कुलुपाची गरज नव्हती. कारण आतमध्ये किरमाणी आणि समीर दोघानाही दोन वेगवेगळया खर्ुच्यांवर गच्च बांधलेले होते. शिवाय ते दोघेही शुध्दीवर नव्हते आणि पुढील चार पाच तास तरी ते शुध्दीवर येणार नाहीत अशी अजिताला खात्र्ी होती.

अजिता घाईघाईने किरमाणीच्या गाडीकडे निघाली. सकाळचे आठ वाजत आले होते. आता फारच थोडा वेळ राहिला होता आणि तिला कितीतरी कामं उरकायची होती. मुख्य म्हणजे इतक्या वेळ खुर्चीवर बसून राहिल्यामुळे तिचे अंग आंबल्यासारखे झाले होते. तिला छानशी आंघोळ करायची होती. मग वेषभूषा करायलाही वेळ लागणार होता. शिवाय आदल्या संध्याकाळी मिळालेल्या बॉक्समधील खरा बॉम्ब मांडीवरील पट्टयातल्या नकली बॉम्बच्या जागी टाकायचा होता. आणि मुख्य म्हणजे कॉन्फरन्सला जाण्याआधी डि.वाय.एस.पी.ना फोन कर्ून विजयचा

खूनी ताब्यात घेण्याकरता मेजर किरमाणीचा पत्ता द्यायचा होता. अजिताने गाडी स्टार्ट केली.

सर्व तयारी ठरल्याप्रमाणे झाली होती. कार्यक्रम सुरू झाला होता. प्राईम मिनिस्टर आणि डिफेन्स मिनिस्टर स्टेजवर आले होते. तिन्ही फोर्सेसचे प्रमुख आधीच येऊन बसले होत े. मागे मिनिस्टर्सचे पर्सनल गार्डस् जरा अंतर राखून उभे होते. अजिता आरामात खुर्चीवर विसावली होती. समोर स्टेजवर होणारे नाटय पाहात होती. सकाळी ती हॉटेलमध्ये पोचली होती तेव्हा सात वाजून गेले होते. झपाटयात तिने जाण्याची तयारी केली होती. त्यातील बॉम्ब काढून आपल्या दिलेल्या पट्टयातील बॉक्स काढून तिने त्याजागी बॉम्ब ठेवला. मांडीभोवती पट्टा बांधताना ती स्वत:शीच हसली. आपले सहकारी खरोखरच बुद्दू आहेत. मी जर हा बॉम्ब हॉटेलमध्येच राहू दिला, अंगावर ठेवलाच नाही तर ते बॉंबला ऍक्टिव्हेट करणार तरी कसे? त्याची खात्री होती की, स्टेजच्या आजुबाजूला बसलेला आपलाच

कुणी अनोळखी सहकारी डिफेन्स मिनिस्टर उठल्यावर रिमोटने हे करणार. पण रिमोटच्या रेंजमध्ये बॉंब नसेल तर. . म्हणजे शेवटी काय करायचं ह्याचा निर्णय माझ्याच हातात आहे. माझीच कृती भविष्याला आकार देणारी ठरणार आहे." तिच्या मनात विचार आला.

इगोर आपले भाषण संपवून पोडियमच्या दुसऱ्या टोकाला असलेल्या कोपऱ्यावरच्या खुर्चीकडे पोचला. निवेदकाने माननिय रक्षामंत्र्यांना बोलण्याची विनंती केली. रक्षामंत्री खुर्चीवरून उठले, प्रधानमंत्र्याना उद्देशून काहीतरी बोलले. प्रधानमंत्र्यांनी केवळ हसून मान डोलावली. रक्षामंत्री लांब टांगा टाकीत पोडियमपाशी पोचले. त्यांनी समोरच्या अनेक स्पीकर्सकडे पाहिले. एका स्पीकरवर हलकेच टिचकी मारली आणि त्यांनी बोलायला तोंड उघडले. अजिताने हलकेच आपला हात खाली नेला, कोटाची खालची कड उचलून तिनं फ्लॅपच्या टोकाला असलेल्या बटणावर बोट ट◌ेकले. आणि ती उभी राहिली.

सावकाश एक एक पाऊल टाकीत ती स्टेजजवळ आली, स्टेजवर जाणाऱ्या तीन पायऱ्यांशी ती पोचली, आणि तीने आपली नजर वर केली. तिची नजर इगोरच्या नजरेला भिडली, खुर्चीवर बसता बसता तो मध्येच गोठल्यासारखा झाला होता, आ वासून तिच्याकडे पाहात होता. शांतपण े तिने पायऱ्या चढल्या आणि काय होत आहे हे कुणाच्या लक्षात येण्याआधीच तिने इगोरकडे धाव घेतली. इगोर मुढावस्थेतून बाहेर आला, किंचाळी मारत तो पळण्यासाठी विरुध्द बाजूला वळला, पण अजिताने धावत येऊन त्याला आपल्या घट्ट मिठीत घेतले, तो तिच्या मिठीतून सुटण्यासाठी धडपडत होता, तिने त्याच्या अंगाभोवतीची मिठी अधिकच घट्ट केली, अजून स्फोट कसा झाला नाही, तिच्या मनात विचार आला, अन् त्याचवेळी तिला हाका ऐकू आल्या.. अजिता... अजिता! छे, कोण हाका घालतेय मला.. पैलतीरावरून.. परंतु तिची नजर नकळत हाकांच्या दिशेने वळली होती, प्रेक्षकांच ्या बाजूने दूरून सुन्या धावत येत

होता, त्याचा हात उंचावलेला होता, त्याच्यामागे ऍना! हा काय मला शेवटचा क्रांतीकारक सलाम देतोय का? आपल्या हाताची मिठी मी ढिली नाही करू शकत हे ह्याला समजत नाही का? ह्या अखेरच्या सलामाला मी कशी उत्तर देणार...तिने आपल्या डाव्या हाताची पकड अधिकच घट्ट केली, आणि स्फोटाच्या आवाजाने स्टेज आणि आसमंत हादरूच गेला.

प्रकरण चोविसावे

सर्व तयारी ठरल्याप्रमाणे झाली होती. कार्यक्रम सुरू झाला होता. प्राईम मिनिस्टर आणि डिफेन्स मिनिस्टर स्टेजवर आले होते. तिन्ही फोर्सेसचे प्रमुख आधीच येऊन बसले होते. मागे मिनिस्टर्सचे पर्सनल गार्डस् जरा अंतर राखून उभे होते. अजिता आरामात खुर्चीवर विसावली होती. समोर स्टेजवर होणारे नाटय पाहात

होती. सकाळी ती हॉटेलमध्ये पोचली होती तेव्हा सात वाजून गेले होते. झपाट्यात तिने जाण्याची तयारी केली होती. त्यातील बॉम्ब काढून आपल्या दिलेल्या पट्ट्यातील बॉक्स काढून तिने त्याजागी बॉम्ब ठेवला. मांडीभोवती पट्टा बांधताना ती स्वत:शीच हसली. आपले सहकारी खरोखरच बुद्दू आहेत. मी जर हा बॉम्ब हॉटेलमध्येच राहू दिला, अंगावर ठेवलाच नाही तर ते बाँबला ॲक्टिव्हेट करणार तरी कसे? त्याची खात्री होती की, स्टेजच्या आजुबाजूला बसलेला आपलाच कुणी अनोळखी सहकारी डिफेन्स मिनिस्टर उठल्यावर रिमोटने हे करणार. पण रिमोटच्या रेंजमध्ये बाँब नसेल तर. . म्हणजे शेवटी काय करायचं ह्याचा निर्णय माझ्याच हातात आहे. माझीच कृती भविष्याला आकार देणारी ठरणार आहे.' ' असा विचार तिच्या मन ात आला होता.

इगोर आपले भाषण संपवून पोडियमच्या दुसऱ्या टोकाला असलेल्या कोपऱ्यावरच्या खुर्चीकडे पोचला.

निवेदकाने माननिय रक्षामंत्र्यांना बोलण्याची विनंती केली. रक्षामंत्री खुर्चीवरून उठले, प्रधानमंत्र्याना उद्देशून काहीतरी बोलले. प्रधानमंत्र्यांनी केवळ हसून मान डोलावली. रक्षामंत्री लांब टांगा टाकीत पोडियमपाशी पोचले. त्यांनी समोरच्या अनेक स्पीकर्सकडे पाहिले. एका स्पीकरवर हलकेच टिचकी मारली आणि त्यांनी बोलायला तोंड उघडले. अजिताने हलकेच आपला हात खाली नेला, कोटाची खालची कड उचलून तिनं फ्लॅपच्या टोकाला असलेल्या बटणावर बोट टेकले. आणि ती उभी राहिली. सावकाश एक एक पाऊल टाकीत ती स्टेजजवळ आली, स्टेजवर जाणाऱ्या तीन पायऱ्यांशी ती पोचली, आणि तीने आपली नजर वर केली. तिची नजर इगोरच्या नजरेला भिडली, खुर्चीवर बसता बसता तो मध्येच गोठल्यासारखा झाला होता, आ वासून तिच्याकडे पाहात होता. शांतपणे तिने पायऱ्या चढल्या आणि काय होत आहे हे कुणाच्या लक्षात येण्याआधीच तिने इगोरकडे धाव घेतली. इगोर मुढावस्थेतून बाहेर आला,

किंचाळी मारत तो पळण्यासाठी विरुध्द बाजूला वळला, पण अजिताने धावत येऊन त्याला आपल्या घट्ट मिठीत घेतले, तो तिच्या मिठीतून सुटण्यासाठी धडपडत होता, तिने त्याच्या अंगाभोवतीची मिठी अधिकच घट्ट केली, अजून स्फोट कसा झाला नाही, तिच्या मनात विचार आला, अन् त्याचवेळी तिला हाका ऐकू आल्या.. अजिता... अजिता! छे, कोण हाका घालतेय मला.. पैलतीरावरून. . परंतु तिची नजर नकळत हाकांच्या दिशेने वळली होती, प्रेक्षकांच्या बाजूने दूरून सुन्या धावत येत होता, त्याचा हात उंचावलेला होता, त्याच्यामागे ऍना! हा काय मला शेवटचा क्रांतीकारक सलाम देतोय का? आपल्या हाताची मिठी मी ढिली नाही करू शकत हे ह्याला समजत नाही का? ह्या अखेरच्या सलामाला मी कशी उत्तर देणार...तिने आपल्या डाव्या हाताची पकड अधिकच पक्की केली आणि उजवा हात...

आणि स्फोटाचा आवाज होऊन प्रकाशाने क्षणभर

सर्व आसमंत उजळून गेला.

समाप्त

दिनानाथ मनोहर

अवकाश, ३२ वागेश्वरी नगर,

नंदुरबार ४२५४१२

०२५६४ २६१००६